CMYK



सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

**आजचा सामना**




गुजरात
वि. पंजाब

वेळ : रात्री ७.३० वाजता
ठिकाण : नरेंद्र मोदी स्टेडियम, गुजरात

सोलापूर | मंगळवार, २५ मार्च २०२५ | युगाब्द ५१२६ | वर्ष ४१ वे अंक १३६ | पाने १२ | किंमत रु. ६/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

**विनम्र अभिवादन**



राष्ट्र सेविका समितीच्या द्वितीय प्रमुख संचालिका वंदनीय ताई आपटे यांचा आज जन्मदिन

# फहीम खानच्या घरावर चालला बुलडोझर

## तीन तासांत इमारत केली उद्ध्वस्त
## पोलिसांचा चोख बंदोबस्त

◆ **नागपूर, २४ मार्च**

महाल परिसरातील घटनेचा मुख्य सूत्रधार फहीम खानच्या घरावर मनपाने बुलडोझर चालविला. सोमवारी सकाळी ९.४५ वाजता अवैध बांधकाम पाडण्याच्या कामाला सुरुवात झाली. जवळपास तीन तासांत एक मजल्याची इमारत उद्ध्वस्त करण्यात आली. यावेळी पोलिसांचा मोठा बंदोबस्त होता. दरम्यान, दंग्यात सहभागी असलेला आरोपी मो. युसुफ शेख याच्या घरावरही हातोडा चालविण्यात आला.

औरंगजेबाची कबर हटाव मागणीवरून १७ मार्च रोजी आंदोलन करण्यात आले. त्यानंतर दोन गट आमने-सामने आले होते. महाल परिसरात दगडफेक, जाळपोळ, वाहनांची तोडफोड करण्याची घटना घडली. या प्रकरणी सायबर पोलिसांनी गुन्हा दाखल केला. एफआयआरमध्ये फहीमसह त्याच्या सहा साथीदारांवर देश विघातक कृत्य केल्याचा आरोप आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पत्रपरिषदेत बुलडोझर चालविण्याचे संकेत दिले होते. मनपाच्या अतिक्रमण विभागाने रविवारी सकाळी फहीम खानच्या कुटुंबीयांना नोटीस बजावली. चोवीस तासांत घर रिकामे करण्यात यावे, अनधिकृत बांधकाम असून, ते पाडायचे आहे, असे नोटीसमध्ये नमूद आहे. त्यानुसार फहीमच्या कुटुंबीयांनी चोवीस तासांच्या आत घर रिकामे केले. बांधकाम पाडताना तीनशेच्या जवळपास पोलिसांचा बंदोबस्त होता. सकाळी ९.४५ वाजता पाडकामाला सुरुवात झाली. एक-एक करीत घराच्या भिंती आणि छत पाडण्यात आले. दुपारी एक वाजेपर्यंत संपूर्ण घर उद्ध्वस्त करण्यात आले. ◀ *(तभा वृत्तसेवा)*



महापालिकेच्या कर्मचाऱ्यांनी फहीम खानच्या घरावर जेसीबीच्या मदतीने कारवाई केली

### युसुफच्या घरावर हातोडा

अतिक्रमण विभागाने पोलिस बंदोबस्तात महालच्या जोहरीपुऱ्यात अनधिकृत बांधकाम पाडले. दंग्यात सहभागी मो. युसुफ शेख याच्या घरी सकाळीच पथक धडकले. मंजूर नकाशा व्यतिरिक्त युसुफने पहिल्या आणि दुसऱ्या मजल्यावर अनधिकृत बांधकाम केल्याचे आढळले. अनधिकृत बालकनीचा काही भाग आणि पार्किंगमधील अतिक्रमण हातोड्याने तोडण्यात आले. यावेळी कोतवाली ठाण्याचे पोलिस अधिकारी उपस्थित होते. शाहीन अमिनची दोन दुकाने सील करण्यात आली.

# सावित्रीबाई, महात्मा फुलेंना 'भारतरत्न' द्या

## विधानसभेत प्रस्ताव पारित
## केंद्र सरकारकडे शिफारस पाठविणार



◆ **मुंबई, २४ मार्च**

क्रांतीसूर्य महात्मा जोतिबा फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांना मरणोत्तर 'भारतरत्न' पुरस्काराने सन्मानित करण्याची केंद्र सरकारला शिफारस करणारा प्रस्ताव पणन मंत्री जयकुमार रावल यांनी विधानसभेत मांडला. तो एकमताने मंजूर झाला.


महात्मा जोतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी उपेक्षित, वंचितांच्या जीवनात समृद्धीचा प्रकाश निर्माण करीत, सामाजिक न्यायासाठी आयुष्य खर्ची घालून अस्पृश्यता निवारण आणि स्त्री शिक्षणासाठी संघर्ष केला आहे. त्यामुळे महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांना भारतरत्न या सर्वोच्च पुरस्काराने मरणोत्तर सन्मानित करण्याच्या प्रयोजनार्थ हा प्रस्ताव मांडत असल्याचे मंत्री रावल यांनी सांगितले.

भारतरत्न हा देशाचा सर्वोच्च नागरी पुरस्कार असून राजकारण, कला, साहित्य आणि विज्ञान क्षेत्रातील विचारवंत, शास्त्रज्ञ, उद्योगपती, लेखक आणि समाजसेवकांना या पुरस्काराने गौरवण्यात येते. महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांना भारतरत्नने सन्मानित करण्याची शिफारस विधानसभेच्या माध्यमातून केंद्र शासनाकडे करण्यात येणार असल्याचे रावल म्हणाले. ◀ *(तभा वृत्तसेवा)*

## महत्त्वाचे

### निर्देशांकाची हजार अंकांनी उसळी

**मुंबई :** वाढती विदेशी गुंतवणूक आणि बँकिंग, खनिज तेल व वायुक्षेत्रात झालेल्या दमदार गुंतवणुकीच्या बळावर मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक सोमवारी १०७८ अंकांनी उसळून ७७,९८४ या पातळीवर बंद झाला.



निर्देशांकाने सहा आठवड्यांनंतर हा उच्चांक गाठला आहे. दिवसभराच्या व्यवहारादरम्यान निर्देशांकाने ७८,१०७ अंकांची उच्चांकी पातळी गाठली होती. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी ३०७ अंकांनी उसळून २३,६५८ या पातळीवर बंद झाला. अमेरिकी आणि युरोपियन बाजारांतील तेजीने देशातील शेअर बाजारांना बळ दिले. उसळलेला रुपयाही मोठे कारण ठरला. त्यामुळे गुंतवणूकदारांचा उत्साह वाढला. मुंबई शेअर बाजारात सहा व्यापारी सत्रांमध्ये आलेल्या तेजीमुळे कंपन्यांचे बाजारभांडवल २७.१० लाख कोटी रुपयांनी वाढून ते ४,१८,२९,३५१ कोटी रुपयांवर गेले.

### संभाजीनगरमध्ये आजपासून प्रतिबंधात्मक आदेश

**छ. संभाजीनगर :** औरंगजेबाच्या कबरीवरून राज्यभरात होणारी निदर्शने तसेच आगामी सणांच्या काळात कायदा आणि सुव्यवस्था कायम ठेवण्यासाठी छ. संभाजीनगरात प्रतिबंधात्मक आदेश जारी करण्यात आला, अशी माहिती अधिकाऱ्यांनी सोमवारी दिली. पोलिस आयुक्त प्रवीण पवार यांनी हा प्रतिबंधात्मक आदेश जारी केला असून, त्याची अंमलबजावणी मंगळवारपासून सुरू होईल व तो ८ एप्रिलपर्यंत कायम असेल, असे अधिकाऱ्याने सांगितले. छ. संभाजीनगर जिल्ह्यातील खुलताबाद येथील औरंगजेबाची कबर हटवण्याची मागणी केली जात आहे. पोलिस आदेशात २९ मार्च रोजी छत्रपती संभाजी महाराज पुण्यतिथी, ३० मार्च रोजीचा गुढीपाडवा, ३१ मार्च रोजी येणारी झुलेलाल जयंती आणि ६ एप्रिल रोजी येणाऱ्या रामनवमीसारख्या दिवसांचा उल्लेख करण्यात आला आहे. औरंगजेबाच्या कबरीविरोधात काही संघटना आंदोलन करण्याची शक्यता आहे तसेच विविध समुदायांकडूनन आंदोलने केली जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे कायदा व सुव्यवस्था कायम ठेवण्यासाठी छ. संभाजीनगरमध्ये महाराष्ट्र पोलिस कायदा-१९५१ मधील कलम ३७ (१) (३) नुसार प्रतिबंधात्मक आदेश देण्यात आल्याचे अधिकाऱ्याने सांगितले.

# सुपारी घेऊन अपमान केल्यास धडा शिकवू

## मुख्यमंत्री फडणवीसांचा विधानसभेतून इशारा
## प्रचंड गदारोळ, सभागृहाचे कामकाज तहकूब

◆ **मुंबई, २४ मार्च | विशेष प्रतिनिधी**

आमच्यावर विनोद करा, राजकीय व्यंग्य करा, आम्ही टाळ्या वाजवून दाद देऊ. मात्र, अशा पद्धतीने सुपारी घेऊन अपमान किंवा बदनामी कराल, तर त्याला धडा शिकवू. असले प्रकार महाराष्ट्रात खपवून घेणार नाही. असा इशारा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कुणाल कामरा प्रकरणावर बोलताना दिला.

कुणाल कामराने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर प्रसारित केलेल्या गाण्यावर आक्षेप घेत, कारवाई करण्याची जोरकस मागणी शिवसेना आमदार अर्जुन खोतकर यांनी विधानसभेत केली. त्यांच्या या मागणीला सत्ताधारी बाकांवरून जोरदार प्रतिसाद मिळला. आमदार वेलमध्ये उतरून प्रचंड घोषणा देत होते. यावेळी झालेल्या गदारोळामुळे



विधानसभाध्यक्षांनी सभागृहाचे कामकाज पाच मिनिटांसाठी तहकूब केले. कामकाज सुरू झाल्यावर मुख्यमंत्र्यांनी स्वतः निवेदन केले.

मुख्यमंत्री म्हणाले, हास्य, व्यंग्य आदींचा पुरस्कार करणाऱ्यातले आम्ही आहोत. राजकीय व्यंग्य केले तरी त्याला दुसरा राजकीय रंग देण्याचा प्रयत्न कधी केला नाही. अभिव्यक्ती स्वांतंत्र्य मानणाऱ्यातले आम्ही आहोत, पण अभिव्यक्ती स्वातंत्र्य स्वैराचाराकडे जात असले, तर ते मान्य होण्यासारखे नाही.

मुख्यमंत्री म्हणाले, या कुणाल कामरा नावाच्या स्टॅण्डअप कॉमेडियनचा पुर्वइतिहास बघितला तर, देशातल्या उच्चपदस्थ लोकांच्या संदर्भात विवादास्पद वक्तव्ये करून प्रसिद्धी मिळविण्याचा प्रयत्न करण्याचा दिसतो. मग ते पंतप्रधान असो, मुख्य न्यायधीश अथवा विविध न्यायालयाचे न्यायधीश किंवा थेट न्याय व्यवस्थांच्या संदर्भात अत्यंत खालच्या स्तराचे वक्तव्य करणे, न्याय व्यवस्थेवर विश्वास राहणार नाही अशा पद्धतीचे बोलणे, ही याची कार्यपद्धती आहे. मुळात वाद निर्माण करून प्रसिद्धी मिळविण्याचा याचा हव्यास आहे. अशाच हव्यासातून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर अतिशय खालच्या दर्जाची कॉमेडी करण्याचा याने प्रयत्न केला आहे. ◀ *(तभा वृत्तसेवा)*

### सुपारी दिली का?

राज्यातल्या जनतेत आदरभाव असलेल्या उच्चपदस्थ नेत्याबद्दल कोणी सुपारी घेऊन इतक्या खालच्या स्तरावर जाऊन बोलतो आणि आमचे विरोधक लगेच त्याच्या समर्थनार्थ उतरतात. एकाचे ट्विट येते, दुसऱ्याची क्लिप येते. त्यामुळे आता हे सगळे कामराशी ठरवून चालले आहे की, यांनीच सुपारी दिली आहे. असा प्रश्न आपसूक निर्माण होतो. असे मुख्यमंत्री म्हणाले.

# एकनाथ शिंदेंवरील विडंबन गीत भोवले

## कामराविरोधात प्राथमिक चौकशी अहवाल दाखल
## शिवसैनिकांनी केली स्टुडिओची तोडफोड

◆ **मुंबई, २४ मार्च**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर विडंबन गीत सादर करणे विनोदी कलाकार कुणाला कामराच्या चांगलेच अंगलट आले आहे. बदनामी केल्याचा ठपका ठेवत कामराविरोधात प्राथमिक चौकशी अहवाल सादर करण्यात आला. या गीतावरून सोमवारी दिवसभर महायुती आणि महाविकास आघाडीच्या नेत्यांमध्ये शाब्दिक युद्ध रंगले होते.

शिवसेनेचे अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर कुणाल कामराने विडंबन गीत म्हटले. हिंदी गीत 'दिल तो पागल है' या गीताच्या चालीवर शिंदे यांच्यावर गद्दार या शब्दाचा वापर करीत टीकेचे बाण सोडले. हे गीत समाज माध्यमांवर प्रसारित झाल्यानंतर संतप्त शिवसैनिकांनी जिथे हे गीत तयार



झाले, त्या खार भागातील हॅबिटॅट स्टुडिओची तोडफोड केली. या सर्वांविरोधात प्राथमिक चौकशी अहवाल दाखल करण्यात आला असून, शिवसेना कार्यकर्ता राहुल कनालसह अन्य ११ जणांना पोलिसांनी अटक केली. या सर्वांना न्यायालयात हजर केले असता १५ हजार रुपयांच्या जातमुचलक्यावर सर्वांना जामीन मंजूर करण्यात आला.

ज्या हॉटेल युनिकॉन्टीनेंटलमधील स्टुडिओत कामराच्या गाण्याचे चित्रीकरण करण्यात आले, त्या हॉटेलबाहेर रविवारी रात्री अनेक शिवसैनिक एकत्र आले होते. त्यांनी कथितपणे स्टुडिओ आणि हॉटेल परिसरात तोडफोड केल्याचे पोलिसांनी म्हटले आहे. व्हिडीओ प्रसार माध्यमांवर आल्यानंतर खार भागातील पदाधिकारी राहुल कनाल यांच्या नेतृत्वात एकत्र आले आणि हॉटेलवर धडक देऊन तोडफोड केली. ◀ *(वृत्तसंस्था)*

### कुणाल कामरा कंत्राटी विनोदी कलाकार

कामरा मुद्यावरून राज्यात महायुती आणि महाविकास आघाडीच्या नेत्यांमध्ये सोमवारी दिवसभर चकमकी झडत राहिल्या. शिवसेना आमदार मुरजी पटेल यांनी तर कामराने दोन दिवसांत माफी न मागितल्यास त्याला रस्त्यावर फिरू देणार नसल्याचा इशारा दिला. कामराने वक्तव्य मागे घेत एकनाथ शिंदे यांची माफी मागावी, अन्यथा त्याने शिवसैनिकांच्या संतापाचा सामना करण्यास तयार राहावे, असा इशारा शिवसेना नेते संजय निरूपम यांनी दिला. दरम्यान, कुणीही कायद्याचा अनादर करता कामा नये. विचारधारा वेगवेगळ्या असू शकतात, पण बोलताना कायद्याची चौकट मोडली जाणार नाही, याची काळजी घ्यावी, असा इशारा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिला.

# खासदारांचे वेतन, भत्ते व निवृत्तिवेतनात वाढ

◆ **नवी दिल्ली, २४ मार्च**

केंद्र सरकारने आज खासदार आणि माजी खासदारांच्या वेतन, भत्त्यात आणि निवृत्तिवेतनात भरघोस वाढ केली आहे. यामुळे खासदारांची बल्लेबल्ले झाली.

वाढती महागाई लक्षात घेऊन केंद्र सरकारने संसदसदस्य वेतन, भत्ते आणि निवृत्तिवेतन कायदा १९५४ मध्ये दुरुस्ती केली. संसदीय कामकाज मंत्रालयाने या संदर्भातील अधिसूचना जारी केली.

खासदारांना ही वेतनवाढ १ एप्रिल २०२३ पासून लागू होणार आहे. खासदारांना सध्या १ लाख रुपये वेतन मिळते, ते आता १ लाख २४ हजार रुपये झाले आहे. दैनिक भत्ता दोन हजार रुपयांवरून अडीच हजार रुपये करण्यात आला. निवृत्त खासदारांना आतापर्यंत २५ हजार रुपये निवृत्तिवेतन मिळत होते, ते आता ३१ हजार रुपये करण्यात आले. खासदारकीच्या वाढीव कार्यकाळानुसार आता निवृत्त खासदारांना दरमहा २ हजारऐवजी २५०० रुपये दरमहा वाढ मिळणार आहे. याशिवाय खासदारांना ७० हजार रुपये मतदारसंघ भत्ता तसेच ६० हजार रुपये कार्यालयीन खर्च मिळतो. याआधी एप्रिल २०१८ मध्ये खासदारांच्या वेतन, भत्त्यात आणि निवृत्तिवेतनात वाढ करण्यात आली होती. खासदारांच्या वेतन, भत्ते आणि निवत्तिवेतनाचा दर पाच वर्षांनी आढावा घेण्याचा नियम आहे. ◀ *(तभा वृत्तसेवा)*

## विधानसभा उपाध्यक्षपदाची निवडणूक जाहीर

◆ **मुंबई, २४ मार्च**

विधानसभा उपाध्यक्षपदाची निवडणूक जाहीर झाली असून, चालू अर्थसंकल्पीय अधिवेशनातच विधानसभेला नवा उपाध्यक्ष मिळेल हे आता निश्चित झाले आहे. उपाध्यक्षपदाच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाला असून, मंगळवारपर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत आहे. उपाध्यक्षपदाची निवड २६ मार्च रोजी होणार आहे.

विधानसभा अध्यक्ष आणि विधानपरिषद अध्यक्षपद भाजपाकडे आहे. तर, विधान परिषदेचे उपसभापतीपद हे शिवसेनेकडे असल्याने, आता विधानसभा उपाध्यक्षपद राष्ट्रवादी काँग्रेसकडे येण्याची शक्यता वर्तविली जात आहे. यासाठी मागील काळात आमदार राजकुमार बडोले यांचे नाव चर्चेत आले आहे. ◀ *(तभा वृत्तसेवा)*



आशुतोष शर्मा
धावा : ६६
चेंडू : ३१
चौकार : ५
षटकार : ५
स्ट्राईक रेट : २१२

# अटीतटीच्या सामन्यात दिल्लीचा विजय; लखनऊचा केला पराभव

**विशाखापट्टणम, दि. २४ मार्च**

आयपीएल-१८ मध्ये दिल्ली कॅपिटल्सने लखनऊ सुपर जायंट्सवर एका विकेटने रोमांचक विजय मिळवला. २० व्या षटकाच्या तिसऱ्या चेंडूवर त्यांनी २१० धावांचे लक्ष्य गाठले. आशुतोष शर्माने षटकार मारून संघाला विजय मिळवून दिला. तो ६६ धावा करून नाबाद राहिला.

शेवटच्या षटकात विजयासाठी ६ धावांची आवश्यकता होती आणि एक विकेट शिल्लक होती. अशा परिस्थितीत लखनऊचा कर्णधार ऋषभ पंतने पहिल्याच चेंडूवर शाहबाज अहमदला यष्टीचीत करण्याची संधी गमावली.

विशाखापट्टणममध्ये दिल्लीने नाणेफेक जिंकून गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. लखनऊने ८ विकेट्स गमावल्यानंतर २०९ धावा केल्या. मिचेल मार्शने ७२ आणि निकोलस पूरनने ७५ धावा केल्या. उत्तरादाखल खेळताना दिल्लीची सुरुवात खराब झाली. संघाने ७ धावांत ३ विकेट गमावल्या होत्या. जॅक फ्रेझर-मॅगार्क १ धावांवर, अभिषेक पोरेल शून्य धावांवर आणि समीर रिझवी ४ धावांवर बाद झाले.

अशा परिस्थितीत, ७ व्या क्रमांकावर आलेल्या आशुतोष शर्माने ३१ चेंडूत नाबाद ६६ धावा करून संघाला विजय मिळवून दिला. त्याने ५ चौकार आणि ५ षटकार मारले. आशुतोषने ट्रिस्टन स्टब्ससोबत ४८ धावांची महत्त्वपूर्ण भागीदारी केली. त्यानंतर त्याने विपराज निगमसोबत ५५ धावा जोडल्या. शेवटच्या विकेटसाठी ६ चेंडूत १९ धावांची नाबाद भागीदारी झाली.

# न्याय व्यवस्थेतील आणखी एक मोठे घबाड!

## न्यायाधीश-वकिलांकडून कोट्यवधींचा अपहार

**पाटणा, दि. २४ मार्च**

दिल्ली उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींच्या जळालेल्या घरात पोत्यांमध्ये अर्धवट जळालेल्या नोटा सापडल्याने खळबळ उडाली असतानाच आता न्यायाधीश आणि वकिलांनी मिळून रेल्वे नुकसान भरपाईचे कोट्यवधी रुपये हडपल्याचे प्रकरण समोर आले आहे. या प्रकरणी ईडीने छापेमारी केल्याने न्यायव्यवस्थेवर सामान्यांनी विश्वास कसा ठेवायचा, असा प्रश्न उपस्थित होऊ लागला आहे.

ईडीने ही कारवाई केली. आहे. न्यायाधीश आणि वकिलांच्या मिळून ८.०२ कोटी रुपयांच्या एकूण २४ मालमत्ता ईडीने जप्त केल्या. पाटणा, नालंदा, गया आणि दिल्लीत या मालमत्ता आहेत. ईडीने पाटण्याच्या विशेष न्यायालयात याची तक्रार दाखल केली. यात अधिवक्ता विद्यानंद सिंह आणि इतरांना दोषी ठरविण्याची मागणी करण्यात आली. रेल्वे अपघातात किंवा जमीन नुकसान भरपाईसाठी ज्या लोकांनी न्यायालयात दाद मागितली होती, त्या दाव्यांचे वकील आणि न्यायाधीश मिळून हा घोटाळा करीत होते. अशा प्रकारच्या ९०० दाव्यांत सुमारे १०.२७ कोटी रुपयांचा घोटाळा करण्यात आला आहे. वकील दावेदारांच्या नावे परस्पर बँकेत खाती उघडायचे. न्यायाधीशांच्या साथीने निकाल दावेदाराच्या नावे लावून घ्यायचे.

# न्या. वर्मांच्या विरोधात सर्वोच्च न्यायालयात याचिका

## एफआयआर दाखल करण्याची मागणी

**नवी दिल्ली, दि. २४ मार्च-**

घरी लागलेल्या आगीदरम्यान कोट्यवधी रुपयांची रोकड सापडल्यानंतर चर्चेत आलेल्या न्या. वर्मा यांच्या अडचणी वाढत आहेत. नोटांच्या प्रकरणात त्यांच्या विरुद्ध सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली.



त्यात दिल्ली उच्च न्यायालयाचे न्या. वर्मा यांच्या विरोधात एफआयआर दाखल करण्याची मागणी करण्यात आली. मुख्य न्यायाधीशांच्या परवानगीशिवाय न्यायमूर्तींच्या विरोधातील गुन्हेगारी प्रकरणांचा तपास रोखून धरणे शक्य असलेला नियमही रद्द करण्यात यावा, अशी मागणीही याचिकेत करण्यात आली. अनेक वकील आणि नागरिकांचा पाठिंबा असलेली ही याचिका मॅथ्यू जे. नेदुमपारा यांनी दाखल केली आहे.

कोणत्याही न्यायमूर्तीच्या विरोधात एफआयआर दाखल करण्यासाठी मुख्य न्यायाधीशांच्या परवानगी आवश्यक आहे, असे वीरस्वामी विरुद्ध भारत सरकार प्रकरणात म्हटले होते. हा निर्णय समतेसारख्या घटनात्मक सिद्धांताचे उल्लंघन करणारा आहे. अशा परिस्थितीत न्या. वर्मा यांच्याविरोधात तातडीने एफआयआर दाखल होणे आवश्यक असल्याचे याचिकेत म्हटले आहे. एखादा नेता किंवा अधिकाऱ्याकडे इतकी मोठी रोकड सापडली असती, तर त्याच्या विरोधात लगेच गुन्हे दाखल झाले असते. मग, न्यायमूर्ती याच्यापेक्षा मोठे कसे, असा प्रश्न याचिकेत उपस्थित करण्यात आला आहे.

### निवड मंडळाच्या चौकशीवर प्रश्नचिन्ह

सर्वोच्च न्यायालयाच्या निवड मंडळाने केलेल्या अंतर्गत चौकशीवरही प्रश्न उपस्थित करण्यात आला. अशा प्रकारच्या गुन्हेगारी प्रकरणाच्या तपासाचा निवड मंडळाकडे घटनात्मक किंवा वैधानिक अधिकार नाही. निवड मंडळाने तयार केलेली तीन सदस्यीय समिती पूर्णतः अवैध आहे, असे या याचिकेत म्हटले आहे.

# बोराळे येथे पैशाच्या कारणावरुन एकाचा खून

## बारा तासात आरोपी गजाआड; तालुक्यात पंधरा दिवसात तीन खून

**तभा वृत्तसेवा**
**मंगळवेढा दि.२४ मार्च**

शेतीसाठी लागणारे ठिबक सिंचनच्या साहित्यासाठी घेतलेल्या पैशाच्या कारणावरुन महेश उदयकुमार गोवर्धन (रा.बोराळे) याचा खून केल्याप्रकरणी भिमराव उर्फ बाळू कृष्णा चौगुले यास पोलीसांनी बारा तासाच्या आत अटक करुन गजाआड केले. दरम्यान मंगळवेढा तालुक्यात पंधरा दिवसात तीन खून झाल्याने कायदा सुव्यस्थेचा प्रश्न गंभीर बनला आहे.



पोलीस सुत्रांनी दिलेली माहिती अशी, आरोपी भिम राव उर्फ बाळू चौगुले याने मध्यस्थी राहून यातील मयत महेश गोवर्धन यास बटईने घेतलेल्या तामदर्डी येथील शेतीसाठी लागणारे ठिबक सिंचनचे साहित्य घेवून दिले होते. या साहित्याचे पैसे यातील मयत महेश गोवर्धन याच्याकडून येणे बाकी होते. आरोपी हा त्या पैशाची फोनवरुन सतत मागणी करीत होता. त्यामुळे फोन वरुन त्यांच्यात वादावादी झाली. त्याचा राग मनात धरुन यातील आरोपीने दि.२३ रोजी बोराळे येथील छत्रपती चौकात मयताच्या छातीत चाकूसारख्या हत्याराने वार करुन त्यास गंभीर दुखापत करुन जीवे ठार मारले. घटना घडल्यानंतर यातील आरोपी फरार होता. खून घडल्यानंतर आरोपीच्या शोधासाठी श्वान पथकही म ागविण्यात आले होते. घटनास्थळी एक शर्ट पडल्यामुळे या शर्टावरुन खून्याचा शोध सुरु करण्यात आल्यानंतर काही तासातच कोल्हापूर विभागाचे विशेष पोलीस महानिरीक्षक सुनिल फ ुलारी व पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी यांच्या म ार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक दत्तात्रय बोरीगिड्डे यांनी पोलीस पथकाच्या माध्यमातून शोध घेवून आरोपीस तात्काळ गजाआड केले. याचा अधिक तपास पोलीस करीत आहेत. दरम्यान मागील आठ ते दहा दिवसापुर्वी गुंजेगाव येथे दुहेरी खून प्रकरण घडले होते. या खूनाचा तपास पुर्ण होताच पुन्हा बोराळे येथील खून प्रकरण घडल्याने मंगळवेढ्यात कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न गंभीर होत चालला आहे. मागील दोन ते तीन वर्षात तालुक्यात कुठेही खूनाचा प्रकार घडला नव्हता,परिणामी सर्वत्र शांतता नांदत होती. या शांततेलाच गालबोट लागल्याची तिखट प्रतिक्रीया सुज्ञ नागरिकामधून होत आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्त्वाचे वृत्त

### महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांना 'भारतरत्न' पुरस्कार देण्याचा ठराव

**विधानसभेत एकमताने मंजुरी**

**मुंबई, दि. २४ मार्च-**
क्रांतीसूर्य महात्मा जोतिराव फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांना मरणोत्तर 'भारतरत्न' पुरस्काराने सन्मानित करण्याचा ठराव सोमवारी विधानसभेत एकमताने मंजूर करण्यात आला. केंद्र सरकारकडे हा ठराव पाठवण्यात येणार आहे. राज्याचे पणन मंत्री जयकुमार रावल म्हणाले,'क्रांतीसूर्य महात्मा जोतिराव फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी उपेक्षित, वंचितांच्या जीवनात समृद्धीचा प्रकाश निर्माण करत, सामाजिक न्यायासाठी आयुष्य खर्ची घालून, अस्पृश्यता निवारण आणि स्त्री शिक्षणासाठी संघर्ष केला आहे. त्यामुळे क्रांतीसूर्य महात्मा जोतिराव फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांना भारतरत्न या सर्वोच्च पुरस्काराने मरणोत्तर सन्मानित करण्याच्या प्रयोजनार्थ हा ठराव मांडला आहे. भारतरत्न हा देशाचा सर्वोच्च नागरी पुरस्कार असून राजकारण, कला, साहित्य आणि विज्ञान क्षेत्रातील विचारवंत, शास्त्रज्ञ, उद्योगपती, लेखक आणि समाजसेवक यांना या पुरस्काराने गौरवण्यात येते. क्रांतीसूर्य महात्मा जोतिराव फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांना भारतरत्न या सर्वोच्च पुरस्काराने सन्मानित करण्याची शिफारस केंद्र शासनाकडे करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले यावेळी जेष्ठ आमदार छगन भुजबळ म्हणाले,'भारतरत्न देण्याचा प्रस्तावाचे मी समर्थन करतो .मात्र महात्मा ही पदवी भारतरत्न पेक्षाही मोठी आहे देशात महात्मा ही पदवी केवळ महात्मा गांधी व महात्मा ज्योतिबा फुले या दोन महापुरुषांनाच मिळालेली आहे. महात्मा ही पदवी या पुरस्कारापेक्षा मोठी आहे. त्यामुळे त्यांना भारतरत्न किताब देऊन त्यांची उंची वाढवतो की कमी केली जाते ,याचा विचार करण्याचीही आवश्यकता आहे. मुख्यमंत्री फडवणीस म्हणाले, ''महात्मा ही लोकमान्य पदवी असून ती महत्त्वाची आहे. या विषयावर विनाकारण चर्चा करण्याची गरज नाही.''

# महायुती-महाविकास आघाडीत कुणाल कामरावरून रणकंदन

## आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी; कारवाईची मागणी

◆ **मुंबई, २४ मार्च**
मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावरील विनोदी कलाकार कुणाल कामराच्या विडंबनात्मक गीतावरून राज्यात सोमवारी दिवसभर राजकीय रणकंदन माजले होते. सत्ताधारी महायुती आणि विरोधी महाविकास आघाडीच्या नेत्यांमध्ये आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झडल्या.

कुणाल कामराविरोधात प्राथमिक चौकशी अहवाल दाखल करणे म्हणजे कायद्याची थट्टा करणे होय. सरकारविरोधात टीका करताना कोणत्या शब्दांचा वापर करू नये, हे पोलिसांनी स्पष्ट करावे, असे महाविकास आघाडीच्या नेत्यांनी म्हटले आहे.

खार पोलिस ठाण्यातही शिवसैनिकांविरोधात प्राथमिक चौकशी अहवाल दाखल करण्यात आला आहे. यात शिवसेना पदाधिकारी राहुल कनाल, कुणाल सरमळकर आणि अक्षय पनवेलकर यांचा समावेश आहे. वाहतूक मंत्री प्रताप सरनाईक, शिवसेना खासदार नरेश म्हस्के यांनीही कामरावर टीका केली. कामराने शिंदे यांना लक्ष्य करण्यासाठी उबाठा गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्याकडून पैसे घेतल्याचा आरोप


कुणाल कामराचा शो ज्या स्टुडिओत झाला तेथे शिवसैनिकांनी तोडफोड करीत संताप व्यक्त केला.

### कुणाच्या तरी सूचनेवरून एकनाथ शिंदे लक्ष्य

कुणाच्या तरी सूचनेवरून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना लक्ष्य करण्यात आले, असे भाजपा आमदार राम कदम यांनी म्हटले आहे. कुणालने सीमा पार केल्या असून, जेथे तो सापडेल, तेथे त्याचे तोफ्लड काळे करू, असा इशाराही कदम यांनी दिला.

# विधानसभेत विरोधी पक्षनेत्याची नेमणूक करावी : विजय वडेट्टीवार

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २४ मार्च -**
शिवसेना उध्दव ठाकरे गटाकडून विधानसभेचे विरोधी पक्षनेते पदासाठी भास्करराव जाधव यांचे नाव दिले असलेतरी विधानसभा अध्यक्षाकडून नियुक्ती घोषित करण्यात आलेली. त्याबाबत विरोधकांकडून आज प्रश्न उपस्थित करण्यात आला. संख्याबळ न पाहता विधानसभेत विरोधी पक्षनेत्याची नेमणूक व्हावी. अधिवेशनाचे शेवटचे दोन दिवस उरले असल्याने ही नियुक्ती करावी, अशी मागणी काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी केली..



विधानसभा कामकाज कार्यपद्धतीवर बोलताना त्यांनी हा मुद्दा मांडला.ते म्हणाले की,उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे सत्ताधारी आणि विरोधक ही विकासाची दोन चाके आहेत. यातील ही चाक म्हणजे विरोधी पक्षनेता आहे. हे चाक सध्या सभागृहात नाही. त्यामुळे विरोधी पक्षनेत्याची नेमणूक करावी ,महाराष्ट्रात संख्याबळाच्या आधारावर विरोधी पक्षनेत्याची नेमणूक होते अशी परंपरा नाही. असे आम्ही पाहिले नाही. त्यामुळे नवीन परंपरा पाडू नये. महायुती सरकारला प्रचंड बहुमत मिळाले आहे, त्यांना लगाम घालायला आणि महाराष्ट्रातील १४ कोटी जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी विरोधी पक्षनेत्याची गरज आहे.

विधानसभेचे कामकाज एकतर्फी होऊ नये. अधिवेशनाचे अंतिम आठवड्याचे काम ती खुर्ची खाली ठेवून कामकाज होऊ नये. अध्यक्षांना अधिकार आहे त्यामुळे त्यांनी निर्णय घ्यावा , असे सांगितले.त्यावर विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी सभागृहातील कामकाज हे नियमानुसार चालणार तसेच नियमानुसार नियुक्त्या करण्यात येतील असे आश्वासन दिले.

# ऊर्जा विभागाच्या १०० दिवसांच्या रिपोर्ट कार्डचे फडणवीस यांच्या हस्ते प्रकाशन


### साध्य केलेल्या उद्दिष्टांचा लेखाजोखा

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
राज्य सरकारच्या पहिल्या शंभर दिवसांत ऊर्जा विभागाच्या अंतर्गत महावितरण, महानिर्मिती, महापारेषण व महाऊर्जा या कंपन्यांनी केलेल्या कामगिरीच्या प्रगती पुस्तकाचे प्रकाशन सोमवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मुंबईत करण्यात आले.

देवेंद्र फडणवीस यांनी आगामी २५ वर्षांच्या राज्याच्या वाटचालीच्या अनुषंगाने ऊर्जा क्षेत्रातील गरजा पूर्ण करण्याची योजना निश्चित केला आहे. त्यांच्या व्हिजनला अनुसरून पहिल्या शंभर दिवसात वीजविषयक सार्वजनिक कंपन्यांसाठी विविध उद्दीष्टे ठरविण्यात आली होती. त्या उद्दिष्टांची माहिती व ती किती पूर्ण झाली याचा लेखाजोखा देणारे 'हंड्रेड डेज फॉर ट्वेंटी फाईव्ह इयर्स' हे पुस्तक महावितरणचे स्वतंत्र संचालक विश्वास पाठक यांनी लिहिले आहे.

एमएसईबी होल्डिंग कंपनीच्या संचालक मंडळाच्या बैठकीच्या वेळी पुस्तकाचे प्रकाशन झाले. यावेळी ऊर्जा राज्यमंत्री मा. मेघना साकोरे बोर्डिकर, अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला, महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र, उद्योग सचिव पी. अनबलगन, महापारेषणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक संजीवकुमार, महानिर्मितीचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक राधाकृष्णन बी., मुख्यमंत्र्यांच्या सचिव अश्विनी भिडे, एमएसईबी होल्डिंग कंपनीचे वित्त संचालक अनुदीप दिघे, स्वतंत्र संचालक आशिष चंदराणा आणि नीता केळकर उपस्थित होते.

देवेंद्र फडणवीस सरकारच्या पहिल्या शंभर दिवसात महावितरणने महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाकडे याचिका दाखल करून वीजदर कमी करण्याचा प्रस्ताव मांडला. आगामी काळातील विजेची गरज पूर्ण करण्यासाठी राज्याचा ऊर्जा परिवर्तन आराखडा तयार करण्यात आला असून, त्यामध्ये नवीकरणीय उर्जेवर भर देण्यात आला आहे. त्यामुळे वीजखरेदी खर्चात मोठी कपात होणार असून, त्यामुळेच वीजदर कमी करण्याचा प्रस्ताव मांडला आहे. ◀(तभा वृत्तसेवा)



### बहुतांश उद्दिष्टे वेळेत पूर्ण

ऊर्जा विभागाच्या अंतर्गत चारही कंपन्यांना देण्यात आलेली बहुतेक उद्दिष्टे वेळेत पूर्ण करण्यात आली. शेतकऱ्यांच्या हिताच्या मागेल त्याला सौर कृषी पंप योजनेत पंप बसविण्याच्या बाबतीत तसेच प्रधान मंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेच्या अंतर्गत घरगुती ग्राहकांच्या छतावर सौर ऊर्जा प्रकल्प बसविण्याच्या बाबतीत उद्दिष्टांपेक्षा जास्त कामगिरी झाली.

### अशी होती उद्दिष्टे

विद्युत ग्राहकांना नवीन वीज कनेक्शन देणे, अखंडित वीज पुरवठा करणे, ग्राहकांच्या तक्रारींचे निवारण करणे, वीज उपकेंद्रांची क्षमता वाढविणे, वीज वितरण जाळ्याची क्षमता वाढविणे, ग्रीन हायड्रोजन प्रकल्प सुरू करणे, सरकारी कार्यालये सौर ऊर्जेवर चालविण्याची योजना अशी अनेक उद्दिष्टे या कंपन्यांना देण्यात आली होती.

## राज्यात जिवंत सातबारा विशेष मोहीम : महसूलमंत्री बावनकुळे

**मुंबई, दि. २४ मार्च:**
मयत खातेदार यांच्या वारसांना शेतजमिनीच्या अनुषंगाने विविध दैनंदिन कामकाजासाठी आवश्यक असणाऱ्या कागदपत्रामध्ये वारसांची नोंद विहित कालावधीत अधिकार अभिलेखामध्ये न झाल्याने विविध अडचणींना सामोरे जावे लागते. या अडचणींचे निराकरण तातडीने व्हावे यादृष्टीने महसूल विभागामार्फत जिवंत सातबारा विशेष मोहिम राबविण्यात येणार आहे. असे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानसभेत निवेदन केले. याबाबत भास्करराव जाधव, प्रशांत बंब यांनी यावेळी उपप्रश्न विचारले. दि.१ एप्रिल २०२५ पासून राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये जिवंत सातबारा मोहीम राबविण्यात येणार असून या मोहिमेअंतर्गत मयत खातेदारांच्या वारसांच्या नोंदी अधिकार अभिलेखामध्ये अद्यावत करुन मयत खातेदारांच्या वारसाची नोंदींचे कामकाज पूर्ण करण्यात येणार आहे.असेही निवेदनात महसूल मंत्री बावनकुळे यांनी सांगितले.



# हॉटेलमधील सेटची मोडतोड करणाऱ्या शिवसेनेच्या ११ जणांना अटक व जामीन

**तभा वृत्तसेवा । जमीर काझी**
**मुंबई, दि. २४ मार्च-**
स्टँडअप कॉमेडियन कुणाल कामरा याच्या उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर केलेल्या विरोधात हॉटेलमधील सेटची मोडतोड करणाऱ्या शिंदे गटातील ११ जणांविरोधात पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे . सोमवारी त्यांना अटक करून दुपारी न्यायालयात हजर केले असता प्रत्येकी १५ हजार रुपयेच्या जातमुचलक्यावर सुटका करण्यात आली .

स्टुडिओची तोडफोड केल्याप्रकरणी कुणाल सरमळकर, राहुल कनाल यांच्यासह ११ जणांवर गुन्हा दाखल करून आज सकाळी त्यांना अटक करण्यात आली. दुपारी या सर्वांची जामीनावर मुक्तता करण्यात आली दरम्यान, शिंदे गटाचे आमदार मुरजी पटेल यांनी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून परिवहन मंत्री प्रताप नाईक यांनी आज कार पोलीस ठाण्यात जाऊन आणखी एक तक्रार दिली असून त्यामध्ये अवमानकारक वक्तव्य भावना दुखावल्याप्रकरणी कुणाल कामरा याला आरोपी करण्यात आले.त्याचसोबत कुणाल कामराला दोन दिवसाचा आत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी माफी मागावी, अन्यथा कुणाल कामळशराला मुंबईमध्ये फिरू देणार नसल्याच्या इशारा मुरजी पटेल यांच्याकडून देण्यात आला होता.

### माफी मागणार नाही: कुणाल कामरा

उपमुख्यमंत्री शिंदे यांच्यावरील विडंबनात्मक काव्यामुळे अडचणीत आलेल्या कुणाल कामरा याच्याशी मुंबई पोलिसांनी संपर्क साधला तो तामिळनाडूमध्ये असल्याचे समजते त्याने आपण आपल्या विधानावर ठाम असून माफी मागणार नाही मात्र कोर्ट जे आदेश देईल त्याची आपण अंमलबजावणी करू ,असे पोलिसांना सांगितले असल्याचे समजते. गद्दार असा उल्लेख केल्याचा कोणताही पश्चाताप नसल्याचं म्हटलं आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कुणाल कामराने माफी मागावी अशी मागणी केली आहे.

### कामरा नेमकं काय म्हणाला?

महाराष्ट्राच्या निवडणुकीत यांनी काय केलं आहे पाहा. शिवसेना भाजपामधून बाहेर आली. मग शिवसेना शिवसेनेतून बाहेर आली. राष्ट्रवादी राष्ट्रवादीमधून बाहेर आली. एका मतदाराला ९ बटणं दिली. सगळेच गोंधळून गेले. मुंबईतील ठाणे जिल्ह्यातील एकाने सुरु केलं होतं, असं म्हणत कुणालने पुढे 'भोली सी सुरत, आँखो मे मस्ती' गाण्याच्या चालीवर एक गाणं सादर केलं. यामध्ये त्याने ठाण्यातील रिक्षा, चेहऱ्यावर दाढी, डोळ्यावर चष्मा असा उल्लेख गाण्यामधून केला आहे. तसेच पुढे बोलताना, एक झलक दाखवून कधी गुवहाटीमध्ये लपले, असंही म्हटलं आहे. शिवसेनेत फूट पडल्यानंतर एकनाथ शिंदे बंडखोर आमदारांबरोबर काही काळ गुवहाटीमध्ये वास्तव्यास असल्याचा संदर्भ यामधून देण्याचा प्रयत्न कामराने केला आहे. याच गाण्याच्या चालीत कामराने, माझ्या नजरेतून पाहिलं तर ती व्यक्ती गद्दार आहे, असेही म्हटले आहे.

# उदंड झाले इच्छुक; भुसार आडत व्यापारी संघासमोर पेच

**बाजार समिती निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आठ संघटनांची बैठक**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ मार्च-**
अनेक कारणामुळे लांबणीवर पडलेल्या सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीची निवडणूक जाहीर झाली. आजपासून निवडणूक प्रक्रियेला सुरू होणार आहे. त्या पार्श्वभूमीवर भुसार अडत व्यापारी संघाच्या सभासदांची बैठक झाली. यावेळी व्यापारी सभासदांनी संचालक होण्यासाठी मीही इच्छुक आहे असा दावा केला. यामुळे भुसार अडत व्यापारी संघासमोर उमेदवार निवडीचा पेच निर्माण झाला आहे.

यावेळी बाजार समितीचे माजी संचालक बसवराज इटकळे, भुसार अडत व्यापारी संघाचे अध्यक्ष सुरेश चिक्कळ्ळी, उपाध्यक्ष अशोक संकलेजा, सचिव वैभव बरबडे, पशुपतीनाथ माशाळ, तुकाराम काळे संगमेश्वर रघोजी, गिरीधरीलाल मेहता, श्रीशैल अंबारे यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते. इच्छुक उमेदवारांनी आपला अर्ज संघाच्या समितीकडे सादर करावा आणि संघाने त्या उमेदवाराचा विचार करून उमेदवारी जाहीर करावी अशी अपेक्षा सुरेश चिक्कळ्ळी यांनी व्यक्त केली. माजी संचालक बसवराज इटकळे यांनी उमेदवार हा सक्षम, कृतिशील असावा. व्यापाऱ्यांच्या समस्यांना तोंड देण्यासाठी दोन हात करण्याची तयारी असणारा असावा. परिपूर्ण माहितीबरोबरच समस्यांवर तोडगा काढण्याची तयारी त्यांच्यात असावी अशी भावना व्यक्त केली. यावेळी व्यापारात राजकारण असू नये, कोणताही पक्षाचा शिरकाव बाजार समितीमध्ये होऊ नये. व्यापारी हा एकच पक्ष असावा असे मुद्देही यावेळी सभासदांनी व्यक्त केले. यावेळी गुरुशांत डंगे, सचिन लड्डा, पशुपतिनाथ माशाळ, सिद्धेश्वर बिराजदार, सोमनाथ रबगले, सचिन लड्डा धरीराज रमणशेट्टी, मल्लिनाथ कटाप, राहुल पंपटवार, श्रीशैल अंबारे, प्रवीण भुतडा, महालिंगप्पा परमशेट्टी, प्रभाकर विभुते, यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी बहुतांश सभासदांनी संचालक होण्यासाठी मीही इच्छुक आहे असा दावा केला.




### या आहेत आठ संघटना

भुसार आडत व्यापारी संघ, दि सोलापूर ऑइल मिल ओनर्स असोसिएशन, दि कॅन्व्हासिंग एजंट्स असोसिएशन, दाळ मिलर्स ओनर्स असोसिएशन, बारदाना व्यापारी असोसिएशन, मिरची व्यापारी असोसिएशन, मसाला व्यापारी असोसिएशन या आठ संघटनांचे पदाधिकारी मतदार आहेत. याशिवाय भाजीपाल्यामध्ये मार्केट यार्डातील भाजीपाला विभागाबरोबरच कस्तुराबा मंडई, राणी लक्ष्मीबाई मंडई येथील सभासदांना मतदानाचा अधिकार आहे.

# रमाई आवास योजनेतील ३०० चटई क्षेत्राची अट शिथिल करा

**आ. विजयकुमार देशमुख यांनी घेतली महापालिका आयुक्तांची भेट**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ मार्च -**
सोलापूर रमाई आवास योजनेतील तीनशे चौरस फूट चटई क्षेत्राची अट शिथिल करावी. वंचित अर्जदारांना लाभ द्यावा. या योजनेतील अनुदान वाढीसाठी शासन स्तरावर प्रयत्न करणार असल्याची माहिती आ. विजयकुमार देशमुख यांनी दिली.

आ. विजयकुमार देशमुख यांनी आज महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांची भेट घेतली. महापालिकेअंतर्गत प्रलंबित योजना सह विविध समस्या व प्रश्नांवर सविस्तर चर्चा केली. यावेळी अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे सार्वजनिक आरोग्य अभियंता वेंकटेश चौबे, माजी सभागृह नेते शिवानंद पाटील, नागेश भोगडे, किरण पवार आदींसह पदाधिकारी उपस्थित होते.

रमाई आवास योजनेतील ३०० चौरस फूट चटई क्षेत्राच्या अटीमुळे अनेक अर्जदार वंचित आहेत. यामुळे खाली दीडशे चौरस फूट आणि वर दीडशे चौरस फूट असे चटई क्षेत्र ग्राह्य धरून वंचित लाभार्थ्यांनाही लाभ द्यावा. या योजनेतील अनुदान तुटपुंजे आहे. ते वाढविण्यासाठी शासनस्तरावर प्रयत्न करणार असल्याचे पत्रकारांशी बोलताना आ. विजयकुमार देशमुख यांनी सांगितले.



### सोलापूर बाजार समिती निवडणूक लढविण्याची इच्छा नाही

सोलापूर बाजार समिती निवडणुकी संदर्भात विचारले असता आ. विजयकुमार देशमुख पुढे म्हणाले, यंदा सोलापूर बाजार समिती निवडणुकीच्या मतदान प्रक्रियेत बदल करण्यात आला आहे. ग्रामीण भागातील मतदार जास्त आहेत यामुळे यंदा मला निवडणूक लढविण्याची इच्छा नाही. निवडणूक लढविणार नाही. आता जे मतदान होणार आहे, ते सोसायटी आणि ग्रामपंचायत सदस्यांचे होणार आहे. पूर्वी शहरातील शहरी भागातील मतदार जास्त होते यंदा मात्र ग्रामीण भागातील मतदार जास्त असणार आहेत. त्यामुळे ही निवडणूक मी लढविणार नाही, असेही आ. विजयकुमार देशमुख यांनी स्पष्ट केले.

सोलापूर शहराला एक दिवसा आड पाणी पुरवठा कसा करता येईल या बाबत तसेच सोलापूर शहरातील पाणी वितरण व्यवस्था सुधारण्यासाठी ८९२.४२ कोटीचा रुपयाचा प्रस्ताव डी. पी. आर लवकरात लवकर सादर करणे बाबत चर्चा करण्यात आली. तसेच माता रमाई आवास योजना व पंतप्रधान आवास योजना बाबतच्या विविध तांत्रिक अडचणींवर चर्चा करण्यात आली.

बुधवार पेठ सफाई कामगार वसाहत आणि जुना बोरामणी नाका, २५६ गाळे येथील इमारती धोकादायक झाल्या असल्या कारणाने त्या पाडून बि ओ टी तत्वावर किंवा अन्य योजनेतून लवकरात लवकर नवीन इमारती बांधणेबाबत चर्चा करण्यात आली. तसेच मड्डी वस्ती तुळजापूर नाका येथील महाबली हनुमान मूर्तीस महाराष्ट्र शासनाच्या परवानगी करिता जिल्हाधिकारी यांच्या कडे प्रस्ताव पाठवण्याच्या सूचना देण्यात आल्या.

## फरार प्रशांत कोरटकर अखेर ताब्यात

**मुंबई :** छत्रपती शिवाजी महाराज यांच्याविषयी अपमानास्पद विधान करणाऱ्या फरार प्रशांत कोरटकरला अखेर पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. महाराष्ट्र पोलिसांनी त्याला तेलंगणातील मंचारियालमधून दुपारी २:४५ वाजता ताब्यात घेतले असून पोलिसा कोल्हापूरकडे रवाना झाले आहे. प्रशांत कोरटकरला उद्या कोल्हापूर न्यायालयात हजर करण्यात येणार आहे, अशी माहिती कोल्हापूरचे एसपी महेंद्र पंडीत यांनी दिली. प्रशांत कोरटकरवर इतिहास संशोधक इंद्रजित सावंत यांना धमकी दिल्याचा व छत्रपती शिवाजी महाराज यांचा अवमान केल्याचा आरोप आहे. या प्रकरणी पोलिस गत २५ फेब्रुवारीपासून त्याचा शोध घेत होते. पण तो पोलिसांना गुंगारा देत होता. अखेर पोलिसांनी सोमवारी त्याला तेलंगणातून ताब्यात घेतले. तेलंगणात त्याच्या अटकेची योग्य ते सोपस्कार पार पाडल्यानंतर त्याला कोल्हापुरात आणले जाईल. प्रशांत कोरटकरवर कोल्हापूरच्या जुना राजवाडा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल आहे. त्यामुळे त्याला तिथे आणले जाईल.



## अग्रलेख...

# समजुतीच्या वर्मावर बोट!

आपल्या प्राचीन ग्रंथांनी न्यायव्यवस्थेचे एक आशादायी चित्र हजारो वर्षांपूर्वी रंगविले आहे. 'न्यायमूलं सुराज्यं स्यात्' ही आपल्या परंपरेची समजूत आहे. भक्कम, पारदर्शक आणि विश्वासार्ह न्यायव्यवस्था आणि कायद्याचे प्रामाणिक पालन करण्याची जाणीव हा सुराज्याचा पाया असतो, अशी या प्राचीन परंपरेची समजूत आहे. ती केवळ समजूतच नाही, तर तो आपल्या सांस्कृतिक परंपरेचा भाग आहे. याच विचारावर आपल्या लोकशाहीची श्रद्धा असल्यामुळे, आपल्या देशाच्या राज्यघटनेची प्रस्तावनादेखील कायद्याचे राज्य याच संकल्पनेची अभिव्यक्ती आहे. या विश्वासामुळेच, सत्याच्या बाजूने कणखरपणे उभे राहण्याची ताकद सामान्य माणसाला मिळाली आहे. ही व्यवस्था वादातीत असावीच, पण ती जलद, पारदर्शक आणि परवडणारीदेखील असावी अशी जनतेची अपेक्षा असते. पण दुर्दैवाने तशी परिस्थिती दिसत नाही अशी खंत गेल्या दोन दशकांपासून देशाच्या हितरक्षणाचे सर्वोच्च विश्वस्त असलेल्या राष्ट्रपतिपदावरील जवळपास प्रत्येक व्यक्तीने वारंवार व्यक्त केली आहे. सुमारे नऊ वर्षांपूर्वी, २०१६ मध्ये याच महिन्यात अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या शतकोत्तर सुवर्ण महोत्सवी वर्षसोहळ्याच्या प्रारंभ समारोहात बोलताना तत्कालीन राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांनी तेव्हाचे सरन्यायाधीश टी. स. ठाकूर यांच्या उपस्थितीत हे बोल न्यायव्यवस्थेस सुनावले होते. लोकांच्या अपेक्षांची पूर्तता करण्यात न्यायव्यवस्था अजूनही यशस्वी ठरलेली दिसत नाही, असा स्पष्ट दावा त्यांनी केला आणि त्यानंतर पुढे अनेक दिवस न्यायव्यवस्थेच्या कार्यप्रणाली, त्रुटी आणि कारभाराविषयीच्या चर्चा उघड किंवा कानगोष्टींच्या स्वरूपात समाजात सुरू झाल्या. न्यायालयात न्याय मिळतो, अशी आपल्या देशातील जनतेची समजूत आहे. कारण न्यायव्यवस्था हा लोकशाहीच्या प्रमुख आधारस्तंभांपैकी एक भक्कम आधारस्तंभ आहे. पण काही वेळा या समजुतीला धक्का लागावा अशी परिस्थिती उद्भवते आणि न्यायालयात खरोखरीच न्याय मिळतो का, असा प्रश्न सामान्य जनतेस पडतो. राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांनी जी मते नऊ वर्षांपूर्वी व्यक्त केली होती, त्याच मतांशी सहमती दर्शविणारी मते पुढे पाच वर्षांनी, मार्च २०२१ मध्ये तेव्हाचे राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांनी व्यक्त केली होती. भारतीयांना या देशातील न्यायपालिकेकडून मोठ्या अपेक्षा आहेत. आपले न्यायाधीश हे विद्वान, निःस्पृह, तटस्थ आणि उच्च विचारांचे असावेत अशी समाजाची अपेक्षा असते. न्यायव्यवस्थेचे संख्येपेक्षाही गुणवत्तेला अधिक महत्त्व दिले जाते. सर्वसामान्य माणसासाठी न्यायपालिका हा शेवटचा आसरा असून न्यायव्यवस्थेवर लोकांचा विश्वास कायम राहणे अत्यंत आवश्यक आहे, असे मत राष्ट्रपती कोविंद यांनी मध्य प्रदेशातील जबलपूर येथे 'ऑल इंडिया स्टेट ज्युडिशियल अकॅडमीज डायरेक्टर्स' रिट्रीट'च्या उद्घाटनप्रसंगी बोलताना व्यक्त केले होते. याच मताचा पुनरुच्चार पुढे ७ एप्रिल २०२३ रोजी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी गुवाहाटी येथील गुवाहाटी उच्च न्यायालयाच्या ७५ व्या स्थापना वर्षपूर्तीनिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलताना केला, तेव्हाही पुन्हा एकदा न्यायालयांची कार्यपद्धती, विश्वासार्हता आणि न्यायव्यवस्थेविषयी जनतेच्या मनात भावनांचा एकत्रित संमिश्र कल्लोळ माजला. व्यक्तीनुसार विचार करता, न्याय हा समावेशक आणि म्हणूनच सर्वांसाठी सुलभतेने उपलब्ध असला पाहिजे, पण न्याय मिळण्याच्या मार्गात अनेक घटकांचे अडथळे असतात. न्यायासाठी मोजावा लागणारा पैसा हा त्यापैकीच एक घटक आहे, असे राष्ट्रपती मुर्मू म्हणाल्या होत्या. आज पुन्हा एकदा, देशातील जनता त्यांचे हे परखड मत एका पारड्यात घालून न्यायव्यवस्थेची विश्वासार्हता तोलण्याचा प्रयत्न करू लागली आहे. कारण, देशाच्या न्यायालयांनी जगातील या सर्वांत मोठ्या लोकशाहीच्या न्यायव्यवस्थेचे जागरूक संरक्षक म्हणून अमूल्य योगदान दिले आहे, अशी जनतेची भावना आहे. न्यायाविषयी श्रद्धा आणि न्याय व्यवस्थेविषयी आदरभावना आपल्या परंपरेचा भाग आहे, म्हणूनच देशातील प्रत्येक न्यायाधीशाला येथील जनता देव मानते. कारण, धर्म, सत्य आणि न्याय यांचा आदर करण्याची नैतिक जबाबदारी आपल्या देशातील प्रत्येक न्यायाधीश आणि न्यायिक अधिकाऱ्याची आहे, अशी या देशातील जनतेची भावना आहे. सर्वोच्च न्यायालयापासून जिल्हास्तरावरील न्यायालयांपर्यंत प्रत्येक न्याययंत्रणेमध्ये असलेली या नैतिक जबाबदारीची जाणीव हे न्यायव्यवस्थेचे दीपगृह आहे. न्यायालयांच्या कारभारातूनच कोट्यवधी नागरिकांच्या मनात न्यायव्यवस्थेची प्रतिमा निर्माण होत असते, त्यामुळे संवेदनशीलतेने व तत्परतेने व कमी खर्चात जनतेला न्याय देणे हा आपल्या न्यायव्यवस्थेच्या यशाचा पाया आहे, अशी जनतेची श्रद्धा आहे. प्रत्यक्षात मात्र या व्यवस्थेविषयी राष्ट्रपतिपदावरील व्यक्तींनी गेल्या अनेक वर्षांत व्यक्त केलेल्या भावना आणि या व्यवस्थेचे वर्तमान यांतील तफावत अजून कायमच असल्याचे दिसते. सीझरची पत्नी संशयातीत असली पाहिजे, असा एक राजकीय संवाद जगप्रसिद्ध नाटककार विल्यम शेक्सपियरने त्याच्या एका नाटकात ज्युलियस सीझर या राजाच्या तोंडी घातला आहे. न्यायव्यवस्थेचा भ्रष्टाचार आणि लाचखोरीच्या आरोपांतून वादातीतपणे मुक्त असली पाहिजे, या भावनेचा या संवादाशी थेट संदर्भ आहे. प्रत्यक्षात न्यायव्यवस्थेतील अनेकांवर भ्रष्टाचाराच्या आरोपांचे शिंतोडे असल्याने, पुन्हा एकदा पुराणातील श्रद्धा आणि परंपरेने व्यक्त केलेल्या अपेक्षांच्या कसोटीस उतरण्याचे आव्हान लोकशाहीचा हा प्रमुख आधारस्तंभ असलेल्या न्यायव्यवस्थेसमोर उभे ठाकले आहे.

दिल्ली उच्च न्यायालयाचे न्यायाधीश यशवंत वर्मा यांच्या निवासस्थानी गेल्या १४ मार्च रोजी लागलेल्या आगीत कोट्यवधींची रोकड आढळून आल्याचा आरोप झाल्यामुळे हे आव्हान आता अधिक गडद झाले आहे. घरातील एका साठवणुकीच्या खोलीत पोत्यांमध्ये भरलेली रक्कम आढळल्याचा आरोप होऊ लागल्याने, न्यायव्यवस्थेकडे संशयातीत राहण्याच्या अपेक्षेने पाहणाऱ्या न्यायश्रद्ध जनतेच्या मनात आता संशयाचे भुंगे भिरभिरू लागले आहेत. या प्रकरणाची चौकशी करण्याचा आदेश देण्यात आला असतानाच, सर्वोच्च न्यायालयानेच या घटनेशी संबंधित अशी एक चित्रफीत जारी केल्याने या संशयांच्या गर्तेतून स्वच्छ अवस्थेत बाहेर पडणे ही केवळ त्या न्यायाधीशाचीच नव्हे, तर न्यायव्यवस्थेचीही जबाबदारी ठरते. न्यायालयामध्ये भ्रष्ट मार्गाने न्याय विकला जात असेल, तर तो केवळ न्यायव्यवस्थेच्या प्रतिमेवरील डाग नसतो, तर न्याय विकला गेल्यास न्यायाचा हक्क असलेल्यांना त्यापासून वंचित राहावे लागत असल्याने, असा भ्रष्टाचार उघडकीस आलाच, तर तो एक मोठा सामाजिक धक्का म्हणावा लागेल. कोणतीही वस्तू विक्रीसाठी उपलब्ध असेल, तर खरेदी करण्याची क्षमता असलेल्यांना ती प्राप्त होऊ शकते आणि गरज असूनही क्षमता नसलेल्या व्यक्ती त्यापासून वंचित राहतात. न्यायाधीशाच्या घरात पोत्यांमध्ये भरलेल्या नोटा असल्याचा आरोप खरा नाही, हे सिद्ध झाले नाही, तर न्याय विकून पैसा कमावला जात असल्याच्या भावना बळावतील आणि ते संपूर्ण न्यायव्यवस्थेवरील शिंतोडे ठरतील. होळीच्या रात्री न्यायाधीश वर्मा यांच्या घरातील आगीत अर्धवट जळालेल्या स्थितीतील नोटांची छायाचित्रे आणि चित्रफिती सर्वोच्च न्यायालयाने शनिवारी रात्री आपल्या माहितीजालावरच प्रसिद्ध केल्या. न्यायाधीश वर्मा यांनी मात्र या आरोपांपासून हात झटकले असले, तरी या प्रकरणाच्या खोलात जाण्याची गरज स्पष्ट झाल्याचे मत सर्वोच्च न्यायालयाच्या या चौकशी अहवालात नोंदविल्याचे सांगण्यात येते. सर्वोच्च न्यायालयाने नेमलेल्या चौकशी समितीने आपला २५ पानी अहवाल सादर केल्यानंतर तूर्तास वर्मा यांना न्यायप्रक्रियेपासून दूर राखण्याचा निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. त्यामुळे, आता केवळ भावनांच्या आहारी न जाता, पुरावे आणि वस्तुस्थिती यांच्या आधारे कार्यवाही करून न्यायसंस्थेच्या विश्वासार्हतेची जपणूक करण्याची जबाबदारी न्याय प्रक्रियेवर पडली आहे. अगोदरच, राष्ट्रपतिपदावरून सामान्यपणे सर्वांना या व्यवस्थेच्या क्षमता आणि प्रामाणिकपणाविषयी शंका आहेत. त्यामध्ये भर घालणाऱ्या अशा कथित घटनांतून त्याला बळकटी मिळणार नाही, याची खबरदारी न घेतल्यास जनतेच्या मनातील संशयाच्या वर्मावर बोट ठेवले जाईल.

## आंतरराष्ट्रीय

वसंत गणेश काणे

# आत्मनिर्भर युरोपसाठी सरसावला जर्मनी!

जर्मनीतील निवडणुका या संमिश्र स्वरूपाच्या असतात. १) बहुमत पद्धती (मेजॉरिटी सिस्टिम)- या पद्धतीत ज्याला सर्वांत जास्त मते मिळतात, तो त्या मतदारसंघाचा प्रतिनिधी म्हणून निवडला जातो. त्याला एकूण मतदानाच्या निदान ५० टक्के तरी मते मिळालीच पाहिजेत, असा आग्रह नसतो. या सोबत प्रमाणशील प्रतिनिधित्व पद्धतीनेही (प्रपोर्शनल रिप्रेझेंटेटिव्ह सिस्टिम - यादी पद्धती) उमेदवार निवडले जातात. २) यादी पद्धती - समजा चार पक्षांनी निवडणूक लढविली आहे. यांना एकूण ९६ उमेदवार निवडायचे आहेत. हे चार पक्ष निवडणुकांपूर्वी प्रत्येकी ९६ उमेदवारांची यादी प्रसिद्ध करतील. मतदार पक्षाला मतदान करतात. समजा अ पक्षाला ५० टक्के, ब पक्षाला २५ टक्के आणि क व ड पक्षांना प्रत्येकी १२.५ टक्के मते मिळाली तर अ पक्षाचे यादीतील निम्मे म्हणजे पहिले ४८ उमेदवार निवडून येतील, ब पक्षाचे २४ उमेदवार निवडून येतील आणि क व ड पक्षाचे प्रत्येकी १२ प्रतिनिधी निवडून येतील. जर्मनीच्या लोकसभेत ६३० सदस्य असतात. यापैकी बहुमत पद्धतीने २९९ सदस्य निवडले जातात. ६३० - २९९ = ३३१. ३३१ उमेदवार यादी पद्धतीने (प्रमाणशील प्रतिनिधित्व पद्धती) निवडले निवडले जातात. ओव्हरहँग सीट्स - पण समजा एखाद्या पक्षाचे बहुमत पद्धतीनुसार ७५ उमेदवार निवडून आले, पण यादी पद्धतीनुसार कमी (समजा ७०) उमेदवारच निवडून आले असतील तर त्या पक्षाला ५ अधिकच्या जागा मिळतील. यांना 'ओव्हरहँग सीट्स' असे म्हणतात. यामुळे जर्मनीच्या 'बुंडेस्टॅग'मधील सदस्य संख्या बदलती असते.

जर्मनीमध्ये २३ फेब्रुवारी २०२५ या दिवशी निवडणुका पार पडल्या आहेत. १) कॉन्झर्व्हेटिव्ह पक्षाने २०८ जागा जिंकल्या आहेत. जर्मनीतील विद्यमान विरोधी पक्ष नेते फ्रेड्रिक मर्झ यांचा चान्सलरपदी आरूढ होण्याचा मार्ग या विजयामुळे मोकळा झाला आहे. पण जर्मनीच्या बुंडेस्टॅगमध्ये (पार्लमेंट) एकूण ६३० जागा असून बहुमतासाठी ३१६ जागा आवश्यक आहेत. त्यामुळे याही वेळी नवे सरकार हे परंपरेप्रमाणे आघाडीचेच राहील. विद्यमान चान्सलर ओलाफ शोल्झ यांच्या एसपीडीने १२० जागा जिंकल्या आहेत. एसपीडीबरोबर आघाडी करण्यावाचून दुसरा पर्याय मर्झ यांच्यासमोर दिसत नाही. या दोन पक्षांना मिळून (२०८+१२०) ३२८ जागांचे बहुमत असू शकेल. स्थलांतरितांबाबत या युतीचा पवित्रा शोल्झ किंवा मर्केल यांच्यापेक्षा अधिक कठोर असेल. सर्व स्थलांतरित हे बिचारे आश्रयार्थी नसतात तर त्यांच्यामध्ये उपद्रवी दहशतवादी, धर्मपिसाट अतिरेकीही असतात, असा अनुभव युरोपमधील राष्ट्रांना आलेला आहे. यापुढेही जर्मनी आणि युरोप युक्रेनच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहतील, असेही मर्झ यांनी जाहीरपणे नमूद केले आहे.

२) २० टक्के मते मिळविणाऱ्या आणि नाझी पृष्ठभूमी असलेल्या तरुण, उच्चशिक्षित आणि तडफदार, पक्षविरोध झुगारून समलिंगी विवाह करणाऱ्या, एक उभरते नेतृत्व म्हणून मान्यता पावलेल्या, निर्वासित विरोधक असलेल्या अलाईस वीडेल यांच्या अल्टरनेटिव्ह फॉर जर्मनी (एएफडी) या अतिउजव्या पक्षाचा क्रम दुसरा (१५२ जागा) आहे. म्हणजे या निवडणुकीत खरी बाजी मारली ती अल्टरनेटिव्ह फॉर जर्मनी (एएफडी) या पक्षाने. नाझीवादी आणि ट्रम्प समर्थक आणि अतिउजव्या पक्षाची ही अनपेक्षित मुसंडी या पक्षाची आजवरची सर्वोत्तम कामगिरी आहे. या विजयामुळे जर्मनीतील आणि युरोपातील शांततावादी हादरले आहेत. अमेरिकेचे नुकतेच निवडून आलेले अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या प्रशासनाने या निवडणुकीत ढवळाढवळ केली होती. या पृष्ठभूमीवर फ्रेड्रिक मर्झ यांच्या (ख्रिश्चन डेमोक्रॅटिक युनियन) सीडीयू आणि मर्कस सोडर यांच्या फक्त बव्हेरिया प्रांतातील ख्रिश्चन सोशल युनियन (सीएसयू) युतीला २८.५ टक्के मते मिळाली, ही बाबही नोंद घ्यावी अशी आहे. ३) विद्यमान चान्सलर ओलाफ शोल्झ यांच्या सोशल डेमोक्रॅटिक पार्टीला (एसपीडी) फक्त १६.५ टक्के मते (१२० जागा) मिळाली आणि जर्मनीतील या सर्वांत जुन्या पार्टीचा निवडणुकीत पार धुव्वा उडाला. ४) फेलिक्स बेनॅझॅक/रॉबर्ट हॅबेक यांचे हरित उदारमतवादी अलायन्स ९० व ग्रीन पार्टी या संयुक्त पक्षाला १२ टक्के मते (८५ जागा) मिळाली तर ५) ख्रिश्चियन डर यांच्या उदामतवादी फ्री डेमोक्रॅटिक पार्टीला (एफडीपी) ५ टक्क्यांचा किमान उंबरठाही न ओलांडता आल्यामुळे स्पर्धेतून बादच व्हावे लागले. ६) हीडी रिचिनेकव जान व्हान अकेन यांच्या दी लेफ्ट डाय लिंके या डाव्या पक्षाला ९ टक्के मते (६४ जागा) मिळाली. ७) यांच्यातीलच बुंडिस साहरा वागेनक्नेच्ट अलायन्स (बीएसडब्ल्यू) या अतिडाव्या फुटीर गटाला किमान ५ टक्के मतांचा उंबरठा कसाबसा ओलांडता आला.

जर्मनी हा युरोपातला सर्वांत जास्त लोकसंख्या असलेला आणि सर्वांत मोठी अर्थव्यवस्था असलेला देश आहे. संपूर्ण जगात तिचा तिसरा क्रमांक आहे. त्यामुळे युरोपियन युनियनचे अर्थकारण आणि राजकारण, जर्मनी काय भूमिका घेतो यावर अवलंबून असते. जर्मनीत कोणाची सत्ता येते, याचा परिणाम आंतरराष्ट्रीय राजकारणावर आणि जागतिक व्यापारावरही होत असतो. अमेरिकेवरील अवलंबित्व दूर करून युरोपला आत्मनिर्भर बनविण्यावर मर्झ यांचा भर असणार आहे. अण्वस्त्रधारी फ्रान्स आणि ब्रिटन यांनी जर्मनीसोबत जायचे ठरविले तर ही बाब अशक्य नाही. युरोपमधील सर्वांत मोठ्या अर्थव्यवस्थेच्या प्रमुखपदी मर्क यांचा विजय ही ट्रम्प यांच्याविरोधाची युरोपातील नांदी मानली जाते आहे. अशीच सडेतोड भूमिका त्यांनी रशियाविरुद्धही घेतली आहे. असे करणे कठीणच होते. कारण रशियातून जर्मनीपर्यंत टाकलेल्या वाहिनीतून जर्मनीला इंधनाचा पुरवठा होत असतो. पण त्याचे काय होईल याची चिंता त्यांनी केली नाही. कारण रशियालाही कोणाला न कोणाला इंधन विकणे भागच आहे, हे ते जाणून आहेत.

या निवडणुकीत (१) हवामान बदल (क्लायमेट चेंज) हा महत्त्वाचा मुद्दा ठरला. ग्रीन पक्षाला मिळालेला वाढता प्रतिसाद त्याचेच द्योतक आहे. आशियाचा विचार केला, तर (२) चीनच्या प्रभावाला प्रत्युत्तर देण्यासाठी जर्मनीला भारताची साथ महत्त्वाची वाटते. तसेच भारत आणि जर्मनी हे दोन्ही देश संयुक्त राष्ट्रांच्या (३) सुरक्षा परिषदेत कायमस्वरूपी स्थानासाठीही प्रयत्नशील आहेत. दोन्ही देशांत आजवर सांस्कृतिक, आर्थिक आणि तंत्रज्ञानाच्या बाबतीत देवाणघेवाण होत आली आहे. (४) युक्रेनला मदत, (६) इस्लामी स्थलांतर आणि (७) आर्थिक विवंचना हे मुद्देही या निवडणुकीत महत्त्वाचे ठरले.

अमेरिकेचे 'मेक अमेरिका ग्रेट अगेन' हे धोरण; अमेरिका आणि रशिया यांच्यात सुरू झालेली जवळीक; युक्रेन आणि युरोप यांनीच आपापले हितसंबंध जपावेत अशी ट्रम्प यांची भूमिका; या पृष्ठभूमीवर अमेरिकेला वगळून युरोपियन राष्ट्रांचे आत्मनिर्भर संघटन उभारण्याचा धाडसी मनोदय मर्झ यांनी निवडणुकीपूर्वीच व्यक्त केला होता. असा युरोप जर अमेरिका, रशिया आणि चीन यांच्या समोर बरोबरीच्या नात्याने उभा राहू शकला तर ती जगाच्या इतिहासातील महत्त्वाची घटना ठरेल, याबाबत शंका नाही.

९४२२८०४४३०

## वेध

नितीन शिरसाट

# शेतकऱ्याच्या आत्महत्येने शासन जागे होईल का?

शेतकरी दिवस-रात्र, उन्ह, वारा, पावसाची तमा न बाळगता कष्ट करून शेतात धान्य पिकवतो. भारत कृषिप्रधान देश असल्याने ऐंशी टक्के लोक शेती व्यवसायाशी निगडित सुपीक जमीन, पाणी आणि मनुष्यबळाचा वापर करीत, आसमानी सुलतानी संकटाचा सामना करून निसर्गाच्या भरवशावर शेतात पिके घेतात. ओला दुष्काळ, कोरडा दुष्काळ, अतिवृष्टीने खरडून गेलेली शेतजमीन शिवाय शेतमालाला हमीभाव नसल्याने अधिक उत्पादन झाले तर कापूस, सोयाबीन यासारख्या नगदी पिकांना मातीमोल किमतीत व्यापारी बाजार समित्यांना विकावे लागते. कुटुंबाचा उदरनिर्वाह, मुलांचे शिक्षण, विवाह अशा आर्थिक विवंचनेत असतानाच बँक, सावकाराकडून घेतलेल्या कर्जाच्या परतफेडीने त्रस्त झालेले शेतकरी दररोज आत्महत्या करीत असल्याने शासन-प्रशासकीय यंत्रणा हतबल झाली आहे. केंद्र व राज्य सरकारने शेती विषयक साधने, नवनवीन यंत्र खरेदीसाठी लागणारे कर्ज अनुदान, शिवाय सिंचनासाठी शेततळे, धरणातील पाणी, शेत पीक विमा योजना अशा अनेक सुविधा उपलब्ध करून दिले आहेत. गेल्या पाच वर्षांत अतिवृष्टी, दुष्काळ, नैसर्गिक आपत्ती नुकसानग्रस्तांचे सर्वेक्षण अहवालानुसार राज्यातील शेतकऱ्यांना चौपन्न कोटी रुपये मदत देण्यात आली आहे. त्यातील साडेसव्वीस कोटी रुपये पीक विमा योजनेतील लाभार्थींना मिळाले आहे. पिकांच्या नुकसानीसाठी राज्य शासनाने राज्य आपत्ती प्रतिसाद निधीमधून लाभार्थी निधी वापरला आहे. शेती पिकांच्या नुकसानग्रस्तांना दिलासा देण्यासोबतच आत्महत्या रोखण्यासाठी केंद्र व राज्य सरकार दरवर्षी मदत वाढवीत असते. पंतप्रधान पीक विमा योजना तसेच हवामानावर आधारित पिके विमा योजनाद्वारे विमाधारकांना हा लाभ मिळाला आहे. गेल्या सहा वर्षांत राज्यातील २२ जिल्ह्यांतील शेतकऱ्यांना सिंचन पायाभूत सुविधा सुधारण्यासोबतच हवामान बदलाच्या परिणामांना तोंड देण्याचे धोरण अवलंब करताना प्रशिक्षण देण्यात आले आहे. एकात्मिक फलोत्पादन विकास मोहीम डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना व बिरसा मुंडा कृषी क्रांती योजनांद्वारे विहीर, शेततळे, सिंचन सुविधा आर्थिक मदत दिली आहे. आत्महत्याग्रस्त जिल्ह्यात मराठवाडा, विदर्भात आघाडीवर असलेल्या धाराशिव येथील शेतकऱ्यांनी रोजगार हमी योजनेतून फळबाग लागवड करण्यात आघाडी घेतली असून केसर, आंबा, ड्रॅगन फ्रुट, खजूर, द्राक्षे, पेरू असे उत्पादन घेऊन आत्महत्याग्रस्त ही ओळख कायमची पुसली आहे. या योजनेचा लाभ बुलढाणा, जालना जिल्ह्यातील शेतकरी घेताना दिसत आहे. बुलढाणा जिल्ह्यातील शिवनी अरमाळ (ता. देऊळगाव राजा) येथील उपक्रमशील राज्य शासनाचा पुरस्कार प्राप्त युवा शेतकरी कैलास नागरे यांनी खडकपूर्णा संतचोखा सागर धरणाचे पाणी कालव्याद्वारे पंचक्रोशीतील चौदा गावांना सोडण्यात यावे या मागणीसाठी आत्महत्या केली, या धक्कादायक घटनेमुळे संपूर्ण शासन, प्रशासन, मंत्री, लोकप्रतिनिधी, समाजमन ढवळून निघाले. या मागणीसाठी उपोषण आंदोलन करणारा हा शेतकरी विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी कृतिशील उपक्रम राबवत होता. कौटुंबिक अडचणीवर मात करून व्यसनमुक्तीचे धडे देत सिंचनातून समृद्धीचे स्वप्न उराशी बाळगून शासनाचा पुरस्कार प्राप्त होऊन प्रशासनाशी संघर्ष करीत होता. त्यांनी कष्ट व जिद्दीने शेती कामात स्वतःला झोकून दिले होते. शेतातील पडक्या विहिरीत बोअर घेऊन पपई, केळी यांची फळबाग फुलवली. कोरोना काळात कांदा, लसूण, टरबूज, शेती पिके बांधावर विकली. त्यांची शेती प्रशिक्षण व पर्यटनाच्या दृष्टीने विकसित झाल्याने पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ कृषी संशोधन केंद्राने दखल घेतली. जैविक फार्मर प्रोड्युसर कंपनीची स्थापना केली. या कामासाठी लगतच्या चौदा गावांना खडकपूर्णा धरणाचे पाणी कालव्याद्वारे शिवनी अरमाळ धरणात सोडले तर शेतजमीन सुपीक होईल या मागणीसाठी प्राणांतिक अन्नत्याग आंदोलन केले. प्रशासनाने दखल न घेतल्याने सव्वीस जानेवारी प्रजासत्ताक दिनापासून पुन्हा उपोषणाचा इशारा दिला होता. पालकमंत्री मकरंद पाटील, आमदार मनोज कायंदे यांच्या मदतीने उपोषण मागे घेतले होते. परंतु होळीच्या दिवशी युवा शेतकरी कैलास नागरे यांनी जीवनयात्रा संपवली. शासनाच्या कृषी विभागामार्फत अमरावती विभागातील प्रयोगशील युवा शेतकरी कैलास नागरे यांना शासनाच्या कृषी विभागामार्फत अमरावती विभागातील प्रयोगशील युवा शेतकरी पुरस्काराने राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते गौरविण्यात आले होती. त्यांच्या आत्महत्येने शेतकरी, सामाजिक कार्यकर्ते, राजकीय लोकप्रतिनिधी आक्रमक झाले. या संदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार यांनी तात्काळ बैठक घेऊन या गावांना पाणी वाटपासंदर्भात सकारात्मक चर्चा करून संबंधित अधिकाऱ्यांना सूचना दिल्या आहेत. यानिमित्ताने कैलासची आत्महत्या सामाजिक, राजकीयदृष्ट्या चिंतनाचा विषय ठरत आहे.

९८८१७१७८२८

## इतस्ततः

दत्तात्रेय आंबुलकर

# कंपन्यांचे कर्मचाऱ्यांना असेही प्रोत्साहन

मार्च महिना म्हटला की, कॉर्पोरेट क्षेत्रात कर्मचाऱ्यांना वेध लागलेले असतात ते पगारवाढीचे आणि व्यवस्थापनाचे लक्ष असते ते कर्मचाऱ्यांच्या वार्षिक कामगिरीच्या मूल्यमापनाकडे. याबरोबरच काही कंपन्या वर्षभर सामाजिक वा परोपकारी क्षेत्रात आपल्या कर्मचाऱ्यांनी त्यांच्या इच्छेनुसार काम करावे, यासाठी प्रयत्नशील असतात. तेव्हा कॉर्पोरेट क्षेत्रातील अशाच या आगळ्यावेगळ्या प्रोत्साहनाविषयी...

कंपन्या व कंपनी व्यवस्थापनातर्फे आपापल्या स्तरावर व विविध प्रकारे कर्मचाऱ्यांना प्रोत्साहित केले जाते. या प्रोत्साहनाचा वा अशा उपक्रमांचा फायदा कर्मचारी-कंपनी या उभयतांना होत असतो. यामध्ये प्रत्यक्ष व्यवसाय वा तत्सम कामावर भर असणे स्वाभाविक असते. मात्र, त्याशिवाय अन्य प्रकारे व विविध स्वरूपात पुढाकार घेऊन सामाजिक वा परोपकारी क्षेत्रात आपल्या कर्मचाऱ्यांनी त्यांच्या इच्छेनुसार व आवर्जून काम करावे, यासाठी भारतातील प्रमुख कंपन्या ज्या प्रकारे व पद्धतीने त्यांना प्रोत्साहन देत आहेत, ते मुळातून पडताळून पाहणे महत्त्वाचे ठरते. कंपनीच्या कर्मचाऱ्यांना विविध प्रकारे परोपकारी व सामाजिक काम करण्यासाठी आवर्जून प्रोत्साहित करणाऱ्या कंपन्यांमध्ये आपल्याकडील 'इन्फोसिस', 'प्रॉक्टर अ‍ॅण्ड गॅम्बल', 'कॅप-जेमिनी', 'स्टॅण्डर्ड चार्टर्ड', 'हिंदुस्थान युनिलिव्हर', 'वेट-अ‍ॅप व प्राईस अ‍ॅण्ड वॉटर' यांसारख्या कंपन्यांचा प्रामुख्याने समावेश होतो.

या उदाहरणादाखल नमूद केलेल्या कंपन्यांतर्फे आपल्या कर्मचाऱ्यांना समाजातील विविध घटक व क्षेत्रांसाठी उपयुक्त ठरणाऱ्या शिक्षण, प्रशिक्षण व कौशल्य विकास, आरोग्यसेवा, नागरी सेवा व आपत्ती व्यवस्थापन व नियंत्रण इत्यादी विषयात स्वयंस्फूर्तपणे सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन दिले जाते; प्रसंगी मार्गदर्शन केले जाते. विविध कंपन्यांच्या या समाजाभिमुख व कर्मचारीपूरक उपक्रमांना चांगला प्रतिसाद मिळत आहे. कंपन्यांतर्फे कर्मचाऱ्यांना समाजसेवेसाठी देण्यात येणाऱ्या प्रयत्नांमध्ये त्यांनी या कामी अधिकाधिक वेळ परिणामकारकरीत्या देणे, त्यासाठी आवश्यक त्या सोयीसुविधा पुरविणे, त्यांच्या प्रयत्नांचे मूल्यमापन करून त्यांना आवश्यकतेनुरूप मार्गदर्शन करणे, त्यांच्या समाजसेवी प्रयत्नांना अधिक परिणामकारक करणे व अशा प्रकारे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना कामाच्या तासांमधून सवलत व मुभा देणे, त्यासाठी धोरणात्मक



निर्णय घेणे इत्यादींचा समावेश आहे. याशिवाय काही कंपन्यांमध्ये तर सातत्यपूर्ण व परिणामकारकपणे समाजोपयोगी कामे करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या यशस्वी प्रयत्नांची दखल त्यांच्या कामकाजाचे वार्षिक मूल्यमापन व पगारवाढीच्या वेळी केले जाते, हे यासंदर्भात उल्लेखनीय.

कंपन्यांतर्फे कर्मचाऱ्यांना सुलभ व सामान्य-जनांना उपयुक्त व प्रसंगी कमी वा फावल्या वेळात करता येण्यासारख्या कार्यक्रम आणि उपक्रमांना आवर्जून प्राधान्य दिले जाते. यामध्ये इंजिनीअरिंग अथवा 'एमबीए' पात्रता पूर्ण केलेल्या अथवा करणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांच्या मुलाखतीची पूर्वतयारी, संवाद-संभाषण कला, व्यक्तिमत्त्व विकाम इत्यादींचा प्रामुख्याने समावेश होत असतो. या प्रयत्नांचा संबंधित विद्यार्थ्यांना त्यांच्या पदवीनंतरच्या रोजगारासाठीच्या मुलाखतीला सामोरे जाताना विशेष फायदा होतो. याशिवाय या विद्यार्थ्यांना उपयुक्त ठरणाऱ्या उपक्रमांत सहभागी होण्याचे मोठे समाधान संबंधित कर्मचाऱ्यांना लागत असते.

काही कंपन्या तर याच प्रयत्नातील पुढील टप्प्यात छोटी शहरे, जिल्हा स्थाने वा तत्सम ठिकाणच्या विशेषतः इंजिनीअरिंगच्या अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांना त्यांच्या नेहमीच्या अभ्यासक्रमाव्यतिरिक्त प्रत्यक्ष उद्योगांसाठी वा उत्पादन प्रक्रियेसाठी आवश्यक विषयांवर व्याख्यानवजा मार्गदर्शन करण्याची व्यवस्था करतात. याकामी कंपन्यांच्या अनुभवी तंत्रज्ञ वा व्यवस्थापकांना प्रोत्साहन दिले जाते व त्यांच्या अनुभवाचा फायदा नव्या विद्यार्थी-पदवीधरांना होतो. याशिवाय प्रत्यक्ष उद्योग-कारखान्याला भेट व चर्चा, अल्पकालीन उमेदवारी, प्रशिक्षण इत्यादी पण या विद्यार्थ्यांना देऊन त्यांचा कौशल्य विकासाचे काम या कंपन्या व त्यांचे कर्मचारी समाधानकारकरीत्या करतात. या उपक्रमाचा फायदा गेल्या आर्थिक वर्षात ६८ हजार विद्यार्थ्यांना झाला, ही आकडेवारी पुरेशी बोलकी ठरते. याच धर्तीवर 'प्रॉक्टर अ‍ॅण्ड गॅम्बल' या कंपनीतर्फे गरजू विद्यार्थ्यांसाठी विशेष शैक्षणिक उपक्रमाची अंमलबजावणी केली जात आहे. या उपक्रमाचा लाभ सुमारे ५० हजार विद्यार्थ्यांना झाला आहे. त्यांच्या माध्यमातून शेकडो विद्यार्थ्यांच्या विविध गटांना त्यांच्या शैक्षणिक अभ्यासक्रम व पात्रतेच्या जोडीला त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी आवश्यक असणाऱ्या भावनिक प्रज्ञाशीलता, सकारात्मक विचार, सहकारी कार्यपद्धती, विश्लेषणपर वृत्ती, व्यावसायिक पत्रव्यवहार, संभाषणकला, स्वतःचा करीअर विकास व त्यासाठी करावयाचे प्रयत्न इत्यादीबद्दल मार्गदर्शन करण्यात आले. 'प्रॉक्टर अ‍ॅण्ड गॅम्बल' कंपनीचा हा विद्यार्थी विकास प्रकल्प युवा स्वयंसेवी कार्यकर्त्यांच्या माध्यमातून राष्ट्रीय स्तरावर व पहिल्या टप्प्यात महाराष्ट्राशिवाय गोवा, हिमाचल प्रदेश, गुजरात व तामिळनाडू या राज्यांमध्ये यशस्वीपणे राबविण्यात आला.

विद्यार्थ्यांच्या 'शैक्षणिक विकास' विषयक प्रयत्नात कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून विशेष विकास विषयक उपक्रम यशस्वीपणे राबविणारी कंपनी म्हणून 'कॅप जेमिनी' कंपनीचा प्राधान्याने उल्लेख करावा लागेल. यासंदर्भात उपलब्ध माहितीनुसार, 'कॅप जेमिनी' कंपनीच्या ९० हजार कर्मचाऱ्यांनी गेल्या वर्षी आपल्या उत्स्फूर्त प्रयत्नातून २ लाख ४३ हजार तास प्रयत्न करून विद्यार्थ्यांच्या कौशल्य विकासासाठी मोठे काम केले. आगामी काळात कंपनी कर्मचाऱ्यांच्या या विशेष उपक्रम प्रयत्नात सुमारे २० टक्क्यांनी वाढ करण्याचा कंपनीचा मानस आहे. या नव्या उपक्रमात नव्याने पदवी वा पदविका उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना नोकरीसाठी योग्य प्रकारे स्वतःची माहिती मांडणे, मुलाखतीची पूर्वतयारी, मुलाखतीचा सराव, अभिरूप मुलाखत यांसारखे मार्गदर्शन केले जाते हे विशेष.

'स्टॅण्डर्ड चार्टर्ड' बँकेत तर कंपनीच्या धोरणात्मक निर्णयानुसार, बँकेच्या कर्मचाऱ्यांना दरवर्षी तीन दिवसांची विशेष रजा सामाजिक जबाबदारीच्या भूमिकेतून समाजकार्य करण्यासाठी दिली जाते. या दरम्यान कर्मचाऱ्यांना त्यांच्या समाजकार्य प्रकल्पासाठी मार्गदर्शन व गरजेनुरूप साहाय्य केले जाते. या वर्षीपासून 'हिंदुस्थान युनिलिव्हर' कंपनीने सामाजिक क्षेत्रात विशेष उल्लेखनीय काम सातत्याने करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या सामाजिक योगदानाची विशेष नोंद घेत, त्यांच्या यशस्वी प्रयत्नांसाठी त्यांना प्रोत्साहनासह पुरस्कृत करण्याची विशेष योजना आखली आहे. पूर्वी कंपनी स्तरावर समाजसेवा वा सामाजिक कामासाठी केवळ आर्थिक मदत देऊन आपल्या सामाजिक भानाची इतिश्री मानणाऱ्या कंपन्या आज याकामी कर्मचाऱ्यांना सोबत घेऊन प्रोत्साहन देत आहेत, ही बाब निश्चितच अभिनंदनीय ठरते.

(लेखक एचआर व्यवस्थापन सल्लागार आहेत.)

९८२२८४७८८६

## वाचक पत्रे

### असामाजिक तत्त्वांचा पुरेपूर अभ्यास व्हायलाच हवा!



दिल्लीची दंगल झाल्यानंतर तशाच प्रकारच्या दंगली देशभर होऊ शकतात, तेव्हा प्रत्येक राज्य सरकारने अशा असामाजिक तत्त्व बाळगणाऱ्या लोकांचा व्यवस्थित अभ्यास करून, जनतेला त्रासदायक, जीवितहानी घडविणाऱ्या त्यांच्या योजना हाणून पाडायला हव्यात. त्यांच्यावर सतत कडक नजर ठेवून, त्यांच्या हालचाली, त्यांची देशद्रोहीवृत्ती यावर घाला घालायला हवा. समाजाचे वेगवेगळ्या माध्यमातून केलेल्या नुकसानाची भरपाई, समाजद्रोह्यांच्या जमीन, जुमला, घर विकून करायला हवी. जेणेकरून पुन्हा जनतेचे किंवा सरकारी मालमत्तेचे नुकसान करताना त्यांना दहावेळा विचार करावा लागेल. गुप्तचर खाते एवढे सक्षम करावे की शहरात घडणाऱ्या प्रत्येक हालचाली व त्यावर घटना घडण्यापूर्वीच अंकुश लावण्याचे कार्य व्हावे. गफलतीत राहून, दुर्लक्ष करणे म्हणजे जनतेच्या जीवाशी खेळणे असे होईल. पोलिस यंत्रणा, त्यातल्या त्यात महिला पोलिस यांच्याशी अभद्र व्यवहार करणाऱ्यांचे, कायद्याने चौरंग होईल अशी स्थिती गुंडांची व्हायला हवी. अशा लोकांच्या ठिकाणांवर छापे घालून, त्यांची सत्यता जनतेसमोर आणायला हवी. धर्माच्या नावावर, देशद्रोह होत असेल तर त्यांना कठोर शिक्षा व्हायलाच हवी असे वाटते.

**डॉ. भारती अनिल हेडाऊ**/९४२१७७३९९९

### 'चार' शब्दाचा मथितार्थ

'चार' हा शब्द केवळ संख्यादर्शक नाही तर हा शब्दसंस्कारदर्शक, बुद्धिमत्तादर्शक सुद्धा आहे. फक्त या शब्दाशी इतर शब्द कोणते जोडले जातात यावर ही गोष्ट अवलंबून असते. सदाचार, सुविचार हे शब्द आपल्या चांगल्या आचार-विचारांशी संबंधित आहे. तसेच अत्याचार, अविचार, स्वैराचार, व्यभिचार इत्यादी शब्द आपल्या वाईट आचार-विचारांशी संबंधित असतात.

काही तथाकथित विचारवंत आपले अविचार कोणताही सुज्ञ विचार न करता प्रस्तुत करतात. आपल्या शेजाऱ्यासंबंधी जेवढे सहजपणे ते वाईट बोलतात, त्यांचे वाईट गुण सांगतात, तेवढ्याच सहजपणे ते राष्ट्रपुरुषांविषयी सुद्धा नको ते कोणताही आधार नसताना सांगतात, बोलतात, लिहितात आणि स्वतःच तोंडघशी पडतात. आपण आपल्या कुटुंबातील लोकांविषयी, मित्रांविषयी जेवढ्या सहजतेने बोलून जातो, तेवढ्या सहजतेने, आपल्या देशाविषयी, राष्ट्रीय पुरुषाविषयी बोललो तर देशभक्त लोक, राष्ट्रपुरुषाचा आदर करणारे लोक ही गोष्ट अजिबात सहन करू शकणार नाही. प्रभू श्रीराम, छत्रपती शिवाजी महाराज, जिजामाता इत्यादी महान व्यक्तींविषयी सामान्य व्यक्तीने अगदी सहजपणे बोलू नये. त्यांच्यासंबंधी कोणताही चुकीचा अभिप्राय देऊ नये एवढी तरी सामान्य बुद्धी असणे त्यांच्या चांगल्या मानसिक आरोग्यासाठी सुद्धा आवश्यक आहे. अन्यथा त्यांना आयुष्यभर पश्चात्ताप करावा लागेल. भारतीय संविधानाने आपल्याला भाषणाचे स्वातंत्र्य दिले असले तरी राष्ट्रपुरुषांचा, देशातील सन्माननीय व्यक्तींचा, जनतेने निवडून दिलेल्या नेत्यांचा अपमान करून तात्पुरती स्वस्त लोकप्रियता प्राप्त करण्याच्या नादात मर्यादा ओलांडू नये. असे केल्यास देशातील जनता आणि कायदेशीर व्यवस्था त्यांच्यावर कठोर उपचार केल्याशिवाय राहणार नाही.

**शशिकांत पांडे**/७५८८७४१९९९

### स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार नव्हे

विनोदी कलावंत कुणाल कामराने शिवसेना नेते राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंच्या विरोधात विडंबन करणारं गाणं म्हटलं. यामुळे आता राज्यात नवा वाद उफाळून आला असून शिवसैनिकांनी त्याच्या स्टुडिओची तोडतोड केली आहे.

कुणाल कामरा हा एक भारतीय विनोदवीर आहे. २०२० मध्ये कामराने अर्णब गोस्वामी यांच्या गैरवर्तन केल्याबद्दल त्याला इंडिगो एअर लाईन्सने तीन महिन्यांसाठी एअर लाईन्स प्रवासासाठी प्रतिबंधित केले होते. याआधीही कुणाल कामराने पंतप्रधान नरेंद्र मोदींवर टीका केली होती. त्याबद्दल लोकांनी त्याला सुनावले होते. अभिव्यक्ती स्वातंत्र्याने अनेक गोष्टींची मुभा दिली असली तरी त्याचा वापर करताना विवेक आणि तारतम्य पाळायलाच हवे. स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार नव्हे, याचे नेहमी भान ठेवायला हवे. कुणाल कामराने त्याचे उल्लंघन सातत्याने केले आहे. प्रत्येक व्यक्तीने आपल्या स्वतंत्र वागण्याचा इतरांवर अनिष्ट आणि विपरीत परिणाम होत तर नाही, याचे भान ठेवायला हवे. कुणाल कामराविरुद्ध कायदेशीर कारवाई करणे अत्यंत गरजेचे आहे, कारण त्याने अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या सर्व सीमा पार केल्यात आहेत.

**अविनाश देशपांडे**/९२८४६७९६२३

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल अ‍ॅड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स अ‍ॅप क्रमांकावर पाठवावा.

## संक्षिप्त वृत्त



### नागपूरच्या दहावे साहित्य संमेलन अध्यक्षपदी डॉ. पठाण

**सोलापूर, दि. २४ मार्च-**

अखिल भारतीय मुस्लिम मराठी साहित्य संमेलन २६ व २७ एप्रिलला नागपूर येथे आयोजित करण्यात आले असून या संमेलन अध्यक्ष म्हणून शिक्षण तज्ञ, ज्येष्ठ साहित्यक व माजी कुलगुरु शहाबुद्दीन नुर महंमद पठाण उर्फ ए. एन. पठाण यांची निवड करण्यात आल्याचे केंद्रीय अध्यक्ष डॉ अजीज नदाफ व सचिव अय्यूब नल्लामंदू यांनी एका जाहिर केले आहे. संमेलन उदघाटन ज्येष्ठ साहित्यिक डॉ. रावसाहेब कसबे यांच्या हस्ते होणार असून संमेलन स्वागत अध्यक्ष म्हणून प्रा डॉ शरयु तायवाडे यांची निवड करण्यात आली आहे आणि मुख्य संयोजक प्रा .जावेद पाशा कुरेशी नागपूर व प्रा. इ. जा. तांबोळी यांच्या मार्गदर्शना खाली संयोजन समितीचे सदस्य नागपूर येथील प्रा. डॉ.असलम बारी, ॲड. कुतुब जफर, प्रा. एड. रमेश पिसे, मा. अब्दुल रऊफ शेख, प्रा.डॉ. एस एस पठाण, ज्ञानेश्वर रक्षक, शकील पटेल, माणिकराव खोब्रागडे, नेहा गोडघाटे, डॉ. ममता मुन, संजय गोडघाटे, अहमद कादर, ताहीरा शेख, हाजी नासीर साहेब, सुरेश मुन, प्रा.राहुल मुन, जमील अन्सारी, इम्रान फैज, रोशनी गणवीर, शिफा कुरेशी, प्रितीबाला बोरकर, सुष्णा कळमकर, रजनी संबोधी, हिफाजूर्रहमन खान, खेमराज भोयर, कलाम खान, हनीफ कुरेशी यांचा समावेश आहे. संपन्न होत असलेल्या संमेलनाच्या संयोजनाची आणि कार्यक्रमाची व्यवस्था ही समिती करीत आहे. पत्रकार परिषदेत उपाध्यक्ष इ.जा.तांबोळी, सचिव अयूब नल्लामंदू, सहसचिव मुबारक शेख, खजीनदार हसीब नदाफ, इंतेखाब फराश यांची प्रमुख उपस्थिती होती.




### मिळकत कर थकबाकीपोटी ४ गाळे केले सील; सोलापूर महापालिकेची कारवाई

**सोलापूर, दि. २४ मार्च-**

मार्च एंडच्या दरम्यान महापालिका प्रशासनाकडून मिळकतकर थकबाकी वसुलीची जोरदार मोहीम सुरू आहे. मिळकत कर थकबाकी पोटी आज महापालिकेच्या मिळकतकर संकलन विभागाच्या विविध पथकांकडून चार गाळे सील करण्याची कारवाई करण्यात आली. महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या आदेशानुसार उपायुक्त आशिष लोकरे यांच्या मार्गदर्शनाखाली मिळकत कर थकबाकी वसुली व कारवाईची मोहीम सुरू आहे. या अंतर्गत महापालिका मिळकत कर संकलन विभागाचे अधीक्षक युवराज गाडेकर यांच्या माध्यमातून विविध पथकाद्वारे वसुली व कारवाई मोहीम राबविण्यात आली. सोलापूर शहरातील विविध पेठांमध्ये ही मोहीम राबविण्यात येत आहे. आज मिळकत कर थकबाकी पोटी शहरातील विविध भागातील चार गाळे सील करण्यात आले. सोलापूर शहरातील मिळकतकर थकबाकीदारांनी आपली थकबाकी भरून कटू कारवाई टाळावी अन्यथा यापुढे सील करण्याची तसेच जप्ती व लिलावाची प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.

# जिल्ह्यातील ३१ जणांचा बंदूक परवाना रद्द

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २४ मार्च -**

जिल्ह्यातील चार हजार ७५ पैकी एक हजार ३६५ जणांचे परवाने रद्द करावेत, असा प्रस्ताव पोलिस अधीक्षक कार्यालयाने जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठविला आहे. त्यानुसार जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आदेशानुसार स्थानिक पोलिसांनी संबंधितांना नोटीस बजावल्या आहेत. दरम्यान, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी मयत ३० जणांचे शस्त्र परवाने कायमचे रद्द केले आहेत. तर एका व्यक्तीने दहावेळा मुदतवाढ देऊनही शस्त्र खरेदी न केल्याने त्यांचाही परवाना रद्द केला आहे.

सोलापूर जिल्ह्यातील साडेतीन हजार जणांनी स्वतःकडील शस्त्रे लोकसभा निवडणुकीवेळी पोलिस ठाण्यांमध्ये जमा केली होती. त्यानंतर सहा महिन्यांनी विधानसभा निवडणूक झाली, तरीदेखील सुमारे साडेतेराशे जणांनी शस्त्रे नेलीच नाहीत. जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार पोलिस ठाण्यांकडून संबंधितांना शेवटची नोटीस बजावून त्यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. त्या एक हजार जणांचे परवानेही रद्द होण्याची शक्यता




आहे. चपळगाव (ता. अक्कलकोट) येथील एकाने २००४ मध्ये शस्त्र परवाना घेतला, २०२० पर्यंत परवान्याचे नुतनीकरण केले, पण त्यांनी शस्त्र विकत घेतले नव्हते. त्यांनी पैसे नसल्याने शस्त्र खरेदी न केल्याचा जबाब दिला आणि त्यांना पुन्हा मुदतवाढ दिली, तरीदेखील त्यांनी शस्त्र न घेतल्याने त्यांचाही परवाना रद्द करण्यात आला आहे.

### या मृत 30 जणांचा परवाना रद्द

संदीपान अजगरे, नारायण अजगरे (रोपळे, पंढरपूर), मालोजीराव विनायकराव निंबाळकर (वैराग, बार्शी), विठ्ठल रोंगे (खर्डी, पंढरपूर), लालासाहेब पाटील (चारे, बार्शी), भागवत पाटील (कौठाळी, पंढरपूर), गुलाबगीर गोसावी (नवी पेठ, पंढरपूर), अरविंदगीर गोसावी, सुभाषगिरी गोसावी (दाळे गल्ली, पंढरपूर), विजयकुमार शहा (करकंब, पंढरपूर), लक्ष्मण चव्हाण (सुस्ते, पंढरपूर), उत्तम पाटील (भानसळे, बार्शी), ज्ञानेश्वर मोरे (पटवर्धन कुरोली, पंढरपूर), बाळासाहेब बारबोले (कासारवाडी रोड, बार्शी), अजयकुमार देशमुख (कासेगाव, पंढरपूर), पांडुरंग पाटील (भाळवणी, पंढरपूर), अप्पासाहेब भोसले (सुस्ते, पंढरपूर), दादामहाराज मनमाडकर (स्टेशनरोड, पंढरपूर), नारायण ऊर्फ बाळकृष्ण घाटे (यावली, बार्शी), लक्ष्मणदास शर्मा (गुज्जर घाट, पंढरपूर), अब्दुल गनी तांबोळी (बार्शी), हरी कुलकर्णी (देवगाव, बार्शी), भरमण्णा येळमेली, देवप्पा येळमेली (आंदेवाडी, अक्कलकोट), संदीपान गलांडे (जवळगाव न. १, बार्शी), निजगोंडप्पा बिराजदार (चिंचोळी, अक्कलकोट), शिराजोद्दीन शेख (हैद्रा, अक्कलकोट), दरेप्पा अरवत (कोर्से गाव, अक्कलकोट), सिद्राम शिंगे (कलहिप्परगे, अक्कलकोट), ज्ञानोबा माळी (फुलचिंचोली, पंढरपूर) या ३० मयत व्यक्तींचे शस्त्र परवाने जिल्हाधिकाऱ्यांनी रद्द केले आहेत.



## भारतीय संस्कृती सर्वश्रेष्ठ : पुष्पा पाटील

### सावित्रीमाई फुले संस्थेतर्फे कर्तृत्ववान महिलांचा सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ मार्च-**

नारी ही सबसे महान है नारी कडे भरपूर त्यागी आणि संन्यासी गुण आहेत. नारीचा सन्मान म्हणजे संपूर्ण कुटुंबाचा सन्मान. प्रत्येक स्त्रीने मुलींना, मुलांना चांगलं काय वाईट काय याची जाणीव करून द्या. त्याग, संयम चांगले गुण अंगीकारा, मोबाईलचा अनावश्यक वापर टाळा. संवादपुरताच वापर करा. भारतीय संस्कृतीच सर्वश्रेष्ठ आहे असे मत इंचगिरी मंठाचे मठाधीश पुष्पा पाटील यांनी बोलताना सांगितले.

सावित्रीमाई फुले सामाजिक संस्था यांच्या वतीने विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान महिलांचा सन्मान रंगभवन येथील समाज कल्याण केंद्र हॉलमध्ये झाला. यावेळी बोलत होत्या. अध्यक्षस्थानी गुरुनाथ करजगीकर हे होते. यावेळी शिवसेना प्रवक्ता ज्योती वाघमारे, जिल्हाप्रमुख प्रियदर्शन साठे, अभियंता दिलीप हिप्परगी, एलकेपी मल्टीस्टेटचे सीईओ राजकुमार बहिरे, अध्यक्ष महादेव जंबगी यांची व्यासपीठावर उपस्थित होती. शिवसेना प्रवक्त्या ज्योती वाघमारे म्हणाल्या की, आज आमच्यावर सावित्रीबाई फुले यांचे ऋण आहेत. कारण त्यांनी अंगावर शेण दगड खाल्ल्या म्हणून आज आमच्यावर फुल बरसतात. प्रत्येक क्षेत्रात स्त्री धडाडीने काम करत आहे. त्याकाळी सावित्रीबाई फुले झाल्या नसत्या तर आज प्रत्येक स्त्रीला फक्त चूल आणि मूल सांभाळायचे काम राहिलं असतं. सूत्रसंचालन श्रीपतराव देशमुख यांनी केले, मल्लिकार्जुन चोखंडे यांनी आभार मानले.

**यांचा झाला सन्मान**

डॉ. निशा कोतवाल (वैद्यकीय), वर्षा भंडारकवठे (सरपंच), उमा पाटील (शैक्षणिक), केतकी कामतकर (सामाजिक), गायत्री मुळे(अभियंता), सरिता धर्मे (आधिपरिचारिका), श्रीदेवी शिंदे (ग्राम पंचायत अधिकारी), डॉ. तेजस्विनी कांबळे (पत्रकारिता), विद्या सोमनाथ चौगुले (स्वयंपाकिण), संगीता कुंभार (महिला पोलीस कॉन्स्टेबल).

# ए.जी. पाटील अभियांत्रिकीमध्ये राष्ट्रीय विज्ञान दिन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ मार्च-**

ए.जी. पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयात राष्ट्रीय विज्ञान दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने सायन्स क्लब अंतर्गत विज्ञान प्रकल्प स्पर्धा आणि प्रदर्शन आयोजित केले होते. यामध्ये सर्व शाखा व वर्षाचे विद्यार्थी सहभागी झाले होते. हे प्रकल्प परीक्षणासाठी डॉ. एस.आर.पुजारी, डॉ. हिंगणगावकर आणि प्रा. एस.ए. जेऊरकर हे तीन तज्ञ उपस्थित होते. प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांनी बॉडी मास इंडेक्स त्यानुसार होणारे आजार आणि उपचार यांची एक अभिनव वेबसाईट बनवली, ऑटोमेटेड पार्किंग सिस्टीम, अपघात प्रतिबंधक व्यवस्था, वायफाय टॉकिंग रोबोट इत्यादी अभिनव कल्पना सादर करण्यात आल्या.

याप्रसंगी प्रा. एस. ए. जेऊरकर, डॉ. एस. ए. पुजारी, डॉ. हिंगणगावकर यांनी मार्गदर्शन करीत विद्यार्थ्यांच्या परिश्रमाचे कौतुक केले व सातत्य ठेवण्याबाबत मार्गदर्शन केले. याप्रसंगी प्रथम वर्ष समन्वयक प्राध्यापक पंतोजी यांनी सायन्स क्लब ची माहिती दिली. संस्थेचे सचिव श्री एस. ए.पाटील, ट्रस्टी श्री एस. एस. पाटील, कॅम्पस डायरेक्टर डॉ. एम. ए. चौगुले प्राचार्य डॉ. व्ही. व्ही. पोतदार यांनी विद्यार्थ्यांच्या प्रकल्प प्रदर्शनाला भेट दिली. त्यांच्या सृजनशीलतेचे कौतुक केले आणि बक्षीस पात्र विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बुशरा डोणगावकर व ईशान वाघमारे यांनी केले. प्रमुख अतिथींची ओळख प्रा. डी.ए. जव्हेरी यांनी करून दिली. प्रा. एम. एन. देशमुख यांनी आभार मानले.

**पारितोषिके मिळविलेले ग्रुप :** केहेकशा आणि अनाम बांगी अरेवाले इस्माईल आणि ग्रुप, रॉनी भक्ता आणि ग्रुप, निखिल राठोड आणि ग्रुप, ओंकार फुलारी आणि ग्रुप, समरीन शेख आणि ग्रुप, पारस रंगरेज इत्यादी. गुरुराज पाटील आणि ग्रुप, युवराज बिदरकोटे आणि ग्रुप.





## जाहीर प्रगटन

तमाम जनतेस, विशेषतः मौजे रऊळगांव ता. बार्शी जि. सोलापूर येथील नागरीकास या जाहीर प्रगटनाद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल पुनम सचिन भोसले, वय २५ वर्षे, धंदा - शेती व घरकाम, रा. रऊळगांव ता. बार्शी जि. सोलापूर यांनी दिलेल्या माहिती व अधिकारपत्रावरुन या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की,

मौजे रऊळगांव ता. बार्शी जि. सोलापूर येथील जमीन गट नं. १० व १५ या दावा मिळकतीमध्ये त्यांचे पती व मुले यांचे कायदेशिर अविभक्त हक्क व हिस्सा आहे. करीता आमचे अशिलाचे वर नमुद मिळकतीसंदर्भात कोणताही हस्तांरणाचा व्यवहार करु नये, तसा व्यवहार केल्यास सदरचा व्यवहार आमचे अशिल यांचे कायदेशिर हक्कावर बंधनकारक राहणार नाही. तरी कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून या जाहीर प्रगटनाद्वारे सुचित करण्यात येते की, वर नमुद मिळकतीसंदर्भात कोणीही कसल्याही प्रकारचा खरेदी, विक्री, दान, गहान, बक्षीस, कर्ज, बोजा इ. प्रकारचा हस्तांतरणाचा व्यवहार करु नये, केल्यास तो आमचे अशिल यांचे कायदेशिर हक्कावर बंधनकारक राहणार नाही.

सबब जाहीर प्रगटन दिले असे. दिनांक : २४/०३/२०२५

**सही/-**
**जाहीर प्रगटन देणार**
**पुनम सचिन भोसले**

**तर्फे सही/-**
**ॲड. जी. के. नवले**
**धाराशिव**

## जाहिर नोटीस

डि. सोलापूर सब डि. व ता. बार्शी पैकी मौजे उपळाई ठोंगे व आसपासचे परिसरातील तमाम सर्व लोकांना श्री. रामेश्वर प्रल्हाद पारखे, रा. उपळाई ठोंगे, ता. बार्शी यांनी सांगितलेल्या व दिलेल्या तोंडी व लेखी माहितीवरुन व जाहिर नोटीस प्रसिध्द करणेस सांगितलेवरुन या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांना कळविणेत येते की,

डि सोलापूर सब डि व ता. बार्शी पैकी मौजे उपळाई ठोंगे येथील शेतमीनी गट नं. ५८१/१ क्षेत्र हे. ०२-१९ आर, आकार रु. ०५-७४ पैसे, गट नं. ५८१/२ याचे क्षेत्र हे. ०२-१७ आर, याचा आकार रु. ०५-७२ पैसे गट नं. ५८१/३ याचे क्षेत्र हे. ०२-१७ आर, याचा आकार रु. ०५-३८ पैसे, गट नं. ५८१/४ याचे क्षेत्र हे. ०२-१७ याचा आकार रु. ०५-७२ पैसे, गट नं. ५८१/५ याचे क्षेत्र हे. ०२-१७ आर, आकार रु. ०५-७२ पैसे, गट नं. ९०९/१ याचे क्षेत्र हे. ००-५० आर, आकार रु. ०१-६० पैसे, गटनं. ९०९/२ याचे क्षेत्र हे. ००-५० आर, याचा आकार रु. ०१-०६ पैसे, गट नं. ९०९/३ याचे क्षेत्र हे. ००-५० आर याचा आकार रु. ०१-०७ पैसे, गट नं. ९०९/४ याचे क्षेत्र हे. ००-५१ आर याचा आकार रु.०१-०६ पैसे, या जमिनीबाबत बार्शी मा. दिवाणी न्यायाधीश क. स्तर यांचे न्यायालयामध्ये श्रीमती कौशल्या बाबुराव वैद्य, रा. पारा, ता. वाशी, यांनी यातील रामेश्वर प्रल्हाद पारखे व मालन परमेश्वर पारखे व इतर प्रतिवादी यांचेविरुध्द उपरोक्त नमूद जमिनीचे सरसनिरस मानाने वाटप होवून पृथ्थक कब्जा मिळण्याकरीता व डिक्लेरेशन मिळण्याकरीता दिवाणी दावा रे.मु.नं. १४८/२०१८ हा दावा दाखल केलेला आहे. सदर दाव्याचे काम मे. कोर्टामध्ये प्रलंबित आहे. व यातील जमिन गट नं. ५८१/३, ५८१/४, ९०९/२, ९०९/३ या जमिनीमध्ये रामेश्वर प्रल्हाद पारखे यांची कब्जेवहिवाटी पूर्वीपासून होती व आहे.

असे असताना यातील मालन परमेश्वर पारखे, ह्या वादी कौशल्या बाबुराव वैद्य यांचा नमूद दावा जमिनीमधील अविभक्त सामाईक कायदेशीर हिश्यासहीत गट नं. ५८१/४ व गट नं. ९०९/३ ह्या जमिनी अनाधिकाराने विनापरवाना हस्तांतरीत करण्याच्या प्रयत्नात आहेत. तसेच त्रयस्थ व्यक्तिला दान, गहाण, बक्षीसपत्र, लिज, लीन खरेदीविक्री करण्याच्या प्रयत्नात आहेत.

या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांना कळविण्यात येते की, मालन परमेश्वर पारखे यांचेबरोबर कोणीही मौजे उपळाई ठोंगे येथील जमिनी गट नं. ५८१/४ व ९०९/३ बाबत कोणतेही दान, गहाण, बक्षीसपत्र, लिज, लीन खरेदी-विक्री, इत्यादी व्यवहार करू नयेत अन्यथा सदर व्यक्तिची फसगत होवू शकते व सदर व्यक्ति कायदेशीर कारवाईस पात्र राहू शकते कोणाचीही फसगत होवू नये म्हणून ही जाहिर नोटीस प्रसिध्द केली असे दि. २४/०३/२०२५

**सही/-**
**ॲड. विलास चंद्रकांत लुंडे**
**बी.कॉम., एलएल.बी.**
**रा. १९७९, तुळशीराम रोड,**
**बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर**
**मो.नं. ९२८४९५३९१०**
**अशिलातर्फे ॲडव्होकेटस्**



## नोकरीच्या शोधात

अुत्तम सेवा

मंगळवार
दि. २५ मार्च २०२५

**उमेदवारांसाठी अत्यंत महत्त्वाची सूचना- खालील विविध स्पर्धा परीक्षांचे फॉर्म योग्य त्या विहीत नमुन्यात नसल्यास रद्द होऊ शकतात. तरी हे टाळण्यासाठी नोकरीविषयक स्पर्धा परीक्षा फॉर्म विक्रीचे सोलापुरातील एकमेव, अचूक फॉर्म विक्री केंद्र, अुत्तम सेवा, पार्क चौक, सोलापूर येथूनच फॉर्म खरेदी करावेत व संभाव्य नुकसान टाळावे.**

| अ. क्र. | ज्या कार्यालयात पद आहे त्या कार्यालयाचे नाव | शैक्षणिक/तांत्रिक अर्हता पदनाम व अनुभव | वयोमर्यादा (वर्षात) | अर्ज भरण्याची अंतिम तारीख |
|---|---|---|---|---|
| **१)** | **महाराष्ट्र लोकसेवा आयोग, MPSC** | | | |
| १ | राज्यसेवा पूर्व परिक्षा (१२७ पदे) | पदवीधर स्त्री/पुरुष उमेदवार असावे | ३८ पर्यंत | १७/०४/२५ |
| २ | वनसेवा पूर्व परिक्षा (१४४ पदे) | पदवी (विज्ञान) उत्तीर्ण स्त्री/पुरुष | ४३ पर्यंत | |
| ३ | स्थापत्य अभियांत्रिकी (११४ पदे) | पदवी (स्थापत्य) उत्तीर्ण स्त्री/पुरुष | ३८ पर्यंत | |
| **२)** | **भारतीय नौदल** | | | |
| १ | अग्निवीर (MR) | दहावी (५०%) उत्तीर्ण स्त्री/पुरुष असावे | २० पर्यंत | १०/०४/२५ |
| २ | अग्निवीर (SSR) | बारावी (५०%) गणित विषयासह उत्तीर्ण किंवा अभियांत्रिकी पदविका उत्तीर्ण | २० पर्यंत | |
| **३)** | **भारतीय नौदल** | | | |
| | टोपास (०५ पदे) | दहावी व पोहण्याचे ज्ञान असावे | २५ पर्यंत | ०१/०४/२५ |
| **४)** | **केंद्रीय सशस्त्र पोलीस दल** | | | |
| | असिस्टंट कमांडंट (३५७ पदे) | पदवीधर स्त्री/पुरुष उमेदवार असावे | २५ पर्यंत | २५/०३/२५ |
| **५)** | **केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दल, CISF** | | | |
| १ | सफाईवाला (१५२ पदे) | दहावी उत्तीर्ण स्त्री/पुरुष उमेदवार | २३ पर्यंत | ०३/०४/२५ |
| २ | ट्रेड्समन (१००९ पदे) | दहावी व ITI उत्तीर्ण असावे | २३ पर्यंत | |

**✻ मोफत सरकारी अपडेट ✻**
**सर्व सरकारी नोकरींचे व स्पर्धा परिक्षांचे अपडेट आपल्या व्हॉटस्‌ॲपवर मोफत मिळविण्याकरिता ९७६३७४१९९१ या नंबरला ''जॉईन'' असा मेसेज व्हॉटस्‌ॲप करावा.**

सुवर्णसंधी - १) वार्षिक वर्गणी भरल्यास वर्षभर नोकरीविषयक फॉर्म घरपोच मिळतील.
२) नोकरीविषयक फॉर्म संबंधित कार्यालयास सत्वर पोहोच केले जातील. (कुरिअर सर्व्हिस)
३) खाजगी नोकरी (प्रायव्हेट प्लेसमेंट)साठी नाव नोंदणी करा. ४) नोकरीविषयक साप्ताहिकाचे सभासद व्हा.

वरीलपैकी कोणत्याही फॉर्मसाठी वा अचूक माहितीसाठी भेटा वा रु. ५०/- ची मनिऑर्डर करा. MPSC, RRB, BSRB, SET, NET, IAS / IPS, NDA, CDS, LIC, KVS नवोदय, कोर्ट, निवड मंडळ, स्टाफ सिलेक्शन, इंजिनिअरिंग, पोलीस भरती, तलाठी, रेल्वे या स्पर्धा परीक्षांची अद्ययावत पुस्तके फक्त आमच्याकडेच मिळतील.

अुत्तम सेवा

१) २२, डॉ. कोटणीस शॉपिंग सेंटर, सिद्धेश्वर मंदिराजवळ, पार्क चौक, सोलापूर. वेळ स. १० ते सायं ७, फोन नंबर - ९७६३७४१९९१.

www.uttamseva.org



## Classifieds

**विकणे आहे**

**विजापूर रोड, अत्तार नगर येथील प्लॅट नं. १०१ अंबिका रेसिडेन्सी अपार्टमेंटमधील ३ BHK प्लॅट विकणे आहे.**
**- संपर्क -**
**प्रदीप चंद्रकांत ख्याडे**
**मो. ९८९०८६६४६४**
**८१७७९७८३८३**

**दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.**



## NOTICE OF SPECIAL GENERAL MEETING

**(Only for Members)**

Honorable Members, Special general meeting of Jankalyan Multi State Mahila Co-operative Credit Society Limited, Solapur, will be held on Wednesday, 7th April 2025 at 11.00 A.M. at Shivsmarak Solapur to transact the following business :

1. To read and confirm the minutes of the previous AGM held on 20.09.2024.
2. To consider and approve the amendment in Bye Laws alongwith adoption of the new Bye Laws.
3. To approve the leave of those members who are absent to AGM.
4. To consider any other matter with the permission of the Hon. Chairman.

**Note:**

1. If the meeting is adjourned for want of corum, the same shall be held after half an hour at the same venue on the same day
2. The Notice of Annual General Meeting has been available at Every Branch of Society.
3. If any member desires to ask any question, or wants to seek any information on the above agenda, he should submit his questionnaire by hand, post before 02/04/2025, during the working hours of society. It may please be noted that questions raised at the eleventh hours shall not be answered

By the order of the Board of Directors

Place : Solapur
Date : 24/03/2025

**Mrs. Vijaya Jayant Shelgikar**
(Chairman)
Jankalyan Multi State Mahila Co-operative Credit Society Limited, Solapur.



## जाहीर प्रसिध्दीकरण

पुढील नेमलेली ता. १९/०४/२०२५
दि. कि अर्ज नं. ३६/२०२५
नि.५

**बार्शी येथील मे. सिव्हील जज्ज ज्यू. डि. सो. यांचे कोर्टात**
**(जी.एस. पाटील सो)**

**सौ. निर्मला काकासाहेब भांगे,** - **अर्जदार**
वय ३६ वर्षे, धंदा - घरकाम,
रा. भांडेगांव, ता. बार्शी, जि. सोलापूर
विरुध्द
**कोणीही नाही** - **सा.वाला**

ज्याअर्थी, यातील अर्जदार यांनी सदरचा अर्ज यातील अर्जदार हिची आई पारुवाई रामराव उर्फ रामभाऊ काकडे ही दि. ०३/०३/२०२३ रोजी मौजे भांडेगांव ता. बार्शी, जि सोलापूर येथे मयत झालेली आहे. तसेच अर्जदार हिचे वडिल रामभाऊ उर्फ रामराव भुजाबा काकडे हे देखील दि. १२/१०/२००७ रोजी मौजे भांडेगांव ता. बार्शी, जि. सोलापूर येथे मयत झालेले आहेत. मयत पारुबाई रामराव उर्फ रामभाऊ काकडे यांना अर्जदार ही एकमेव असे कायदेशीर वारस आहे. मयत पारुबाई रामराव उर्फ रामभाऊ काकडे यांना अर्जदार यांचेशिवाय दुसरे कोणीही अपत्य नव्हते व नाही. यातील अर्जदार यांना शासकीय कार्यालयामध्ये अर्जदार हिची आई पारुबाई रामराव उर्फ रामभाऊ काकडे ही मयत झाल्याने अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. म्हणून अर्जदार यांना पारुबाई रामराव उर्फ रामभाऊ काकडे याचे कायदेशीर वारस म्हणून वारस दाखला मिळणेसाठी अर्जदाराने सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रसिध्दीकरणद्वारे कळविण्यात येते की, वर नमूद अर्जदाराचे अर्जातील मागणी व विधानासंबंधाने जर कोणाचेही आक्षेप असल्यास सबंधीतांनी ही जाहीर प्रसिध्दीकरण प्रसिध्द झालेपासुन ३० दिवसाचे आत अथवा पुढील नेमलेल्या ता. (१९/०४/२०२५ रोजीपर्यंत मे. कोर्टात स्वतः अगर आपल्या विद्यीज्ञामार्फत होऊन आपले तक्रारी, हरकती लेखी स्वरुपात सादर कराव्यात अन्यथा मुदतीनंतर मे. कोर्टाचे पुढील हुकूम होतील. हा जाहीर प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व मे. कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिध्द केले असे ता. १५/०३/२०२५

**सही/-**
**कनिष्ठ लिपीक**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहाय्यक अधिक्षक,**
**मे. सि.ज. ज्यु.डी.सो, बार्शी**



## जाहीर नोटीस

सोलापूर येथील तमाम लोकांस विशेषतः शहर सोलापूर व मैंदर्गी येथील सर्व रहिवासीयांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णन : डि व सब डी सोलापूर तालुका अक्कलकोट पैकी मैंदर्गी नगर परिषद, मैंदर्गी येथील इंदिरा गांधी झोपडपट्टी, धनगर गल्ली बिरलिंगेशवर मंदिरजवळ यांसी नवीन वार्ड क्रं.१, यांसी जुना वार्ड क्रं. १६ यांसी नवीन म्युन्सिपल घर नंबर २०४ यांसी जुना म्युन्सिपल घर नंबर अ-५९ यांसी हद्द पूर्वपश्चिम २६ फुट दक्षिणोत्तर २० फुट एकूण क्षेत्र ५२० चौरस फुट इतके असून यात १० X १० मापाची पत्र्याची दोन खोल्या असून बाकीची खुली जागा आहे. यात नळ कनेक्शन व विद्युत कनेक्शन सह आहे. यासी चतुःसीमा पूर्वेस - रस्ता, पश्चिमेस - यशवंत मणुरे यांची जागा, दक्षिणेस - बोळ, उत्तरेस - बोळ.

सदर प्रमाणे वर वर्णन केलेली घरजागा ही लक्ष्मण तुकाराम पुजारी यांचे कब्जेवहिवाटीची होती त्यांनी दिनांक २४/०३/२०२५ रोजी कब्जा पावती करारपत्राने तसेच संमतीपत्र व प्रतिज्ञापत्राद्वारे मे. पब्लिक नोटरी सो, यांचे समोर दिलेली आहे. त्याप्रमाणे सदरी घरजागा ही आमचे अशिल बसप्पा पीरप्पा पुजारी यांच्या कब्जेवहिवाटीची झालेली आहे. त्याप्रमाणे आमचे अशिल हे सदर घरजागेवर नगर परिषद मैंदर्गी यांचेकडे कर आकारणीला नाव लावण्यासाठी अर्ज दिलेले आहे.

तरी या नोटीसीद्वारे कळविण्यता येते की, इंदिरा गांधी झोपडपट्टी, धनगर गल्ली बिरलिंगेश्वर मंदिर जवळ यांसी नवीन वार्ड क्रं.१, यांसी जुना वार्ड क्रं. १६ यांसी नवीन म्युन्सिपल घर नंबर २०४ यांसी जुना म्युन्सिपल घर नंबर अ-५९ या जागेवर आमच्या अशिल बसप्पा पीरप्पा पुजारी यांचे कर आकारणी दप्तरी नाव लावणेस कोणाची काही हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून सात (७) दिवसाच्या आत हक्काचे व अधिकाराचे लेखी कागदोपत्री पुराव्यानिशी खालील पत्त्यावर लेखी हरकत नोंदवावी, मुदतीत कोणाचीही हरकत व तक्रार न आल्यास ही झोपडी निर्वेध व निजोखमी आहे असे समजून आमचे अशिल त्यांच्या नावाची नोंद मैंदर्गी नगर परिषद, मैंदर्गी येथील कर आकारणी दप्तरी करुन घेतील व त्यानंतर कोणाचेही व कसल्याही प्रकारची तक्रार व हरकतीचा विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी. कोणाचीही फसगत होवू नये म्हणून ही जाहीर प्रकटन दिले ता.२४/०३/२०२५.

**सही/-**
**नाईकवाडी ए.डी. ॲडव्होकेट**
**(नोटरी भारत सरकार)**
**१८८६/४, विणकर वसाहत मु.पो. मैंदर्गी**
**ता. अक्कलकोट जि. सोलापूर.**
**मो.नं. ९८८१५२२९०७/८४२१०९८१७७**
**अशिलातर्फे ॲडव्होकेट**



## जाहीर प्रसिध्दीकरण

दि. कि. नं. ०७/२०२५

**अक्कलकोट येथील मे. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर सो यांचे न्यायालयात**

**सौ. स्वाती शिवानंद जमगे** - **अर्जदार**
वयः ३१ वर्षे, धंदा घरकाम
रा. माळी गल्ली, मु. पो. अक्कलकोट,
ता. अक्कलकोट, जि. सोलापूर ४१३२१६
विरुध्द
**कोणीही नाही** - **सामनेवाला**

ज्याअर्थी स्व. जगदेवी विश्वनाथ बशेट्टी यांचेकडे अर्जदार ही लहानपासुनच रहावयास होती. म्हणुन अर्जदार स्वाती शिवानंद जमगे हिला स्व. जगदेवी विश्वनाथ बशेट्टी यांनी स्वतःची मुलगी मानलेले होते. स्व. जगदेवी विश्वनाथ बशेट्टी यांचे शहर सोलापूर येथे दि. २९/१०/२०२४ रोजी हे मयत झालेले आहे. सदर स्व. जगदेवी विश्वनाथ बशेट्टी यांचे अर्जदार यांनी कायदेशीर वारस असल्याने लिगल हेअरशिप सर्टिफिकेट मिळणेसाठी मे. कोर्टात अर्ज केलेला आहे. सदर स्व. जगदेवी विश्वनाथ बशेट्टी यांचे अर्जदार यांचेशिवाय इतर कोणीही कायदेशीर वारस नव्हते व नाही.

१) मिळकतीचे वर्णन : डि व सब डि सोलापूर पैकी तालुका अक्कलकोट पैकी मौजे नन्हेगांव येथील शेतजमीन गट नं. १५६/२ याचे एकूण क्षेत्र ०० हेक्टर ७० आर, यांसी आकारणी खालीलप्रमाणे : पूर्वेस - रस्ता, पश्चिमेस - गट नं. १५१ ते १६२, क्षिणेस - गट नं. १६३/२, उत्तरेस - गट नं. १५६/१

येणेप्रमाणे चतुःसिमेमध्ये वर्णन केलेली खुली जागा त्यातील दगड, माती वगैरे तदंगभुत वस्तुसह व इजमेंट हक्कासहची मिळकत.

त्याअर्थी सदर अर्जदार यांना स्व. जगदेवी विश्वनाथ बशेट्टी यांचे वारस असल्याचे लिगल हेअरशिप सर्टिफिकेट अर्जदार यांना देणेबाबत कोणाचेही काही हरकत व तकार असल्यास सदर प्रसिध्दीकरण प्रसिध्द झालेपासून ३० दिवसात किंवा नेमलेली तारीख ०३/०५/२०२५ रोजी मे. कोर्टात हजर राहून लेखी हरकत घ्यावी, अन्यथा पुढील आदेश पारीत करुन अर्जदार यांचे नावे वारसा दाखल दिला जाईल याची नोंद घ्यावी. ही जाहीर प्रसिध्दीकरण दिली ता. २४/०३/२०२५

**सही-**
**लिपीक**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा. अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय**
**कनिष्ठ स्तर, अक्कलकोट**

www.tarunbharat.net
तरुण भारत

# धूम आयपीएलची...



## महत्त्वाचे

### आशियाई कुस्ती स्पर्धेत भारतीय संघाचे नेतृत्व पांघळ व पुनियाकडे



**अम्मान** : २०२४ च्या वाईट हंगामानंतर सोमवारपासून जॉर्डनमधील अम्मान येथे सुरू होणाऱ्या वरिष्ठ गट आशियाई कुस्ती अजिंक्यपद स्पर्धेत अंतिम पांघळ व दीपक पुनियाला नवीन जोमाने सुरुवात करण्याची संधी मिळेल तसेच इतर भारतीय कुस्तीपटूंना आंतरराष्ट्रीय स्तरावर आपली स्वतःची ओळख निर्माण करण्याची संधी मिळेल. युवा खेळाडू अंतिम पांघळ पॅरिस ऑलिम्पिकमधून लवकरच बाहेर झाली होती. दोन वेळची २० वर्षांखालील विश्वविजेती अंतिम पांघळसह २३ वर्षांखालील विश्वविजेती रितिका हुडा व १७ वर्षांखालील विश्वविजेती मानसी लाथेर व मनीषा भानवाला यांच्याकडून खूप अपेक्षा बाळगल्या जात आहे. भारतीय संघ : पुरुष फ्रीस्टाइल : चिराग (५७ किलो), उदित (६१ कि.), सुजित कलकल (६५ कि.), विशाल कालीरामन (७० कि.), जयदीप (७४ कि.), चंद्रमोहन (७९ कि.), मुकुल दह्या (८६ कि), दीपक पुनिया (९२ कि.), जॉयंती कुमार (९७ कि.) व दिनेश (१२५ कि.) महिला : अंकुश (५० कि.), अंतिम पांघळ (५३ कि.), निशू (५५ कि.), नेहा शर्मा (५७ कि.), मुस्कान (५९ कि.), मनीषा बनवाला (६२ कि.), मोनिका (६५ कि.), मानसी लाथर (६८ कि.), ज्योती बेरवाल (७२ कि.) व रितिका हुडा (७६ कि.). ग्रीको रोमन : नितीन (५५ कि.), सुमित (६० कि.), उमेश (६३ कि), नीरज ६७ कि.), कुलदीप (७२ कि.), सागर (७७ कि.), राहुल (८२ कि), सुनील (८७ कि.), नितेश (९७ कि.) व प्रेम (१३० कि).

### राष्ट्रकुल पदक विजेता बॅडमिंटनपटू सुमित रेड्डी निवृत्त

**नवी दिल्ली** : २०२२ च्या राष्ट्रकुल क्रीडा मिश्र संघातील रौप्य पदक विजेत्या संघातील सदस्य असलेला भारताचा दुहेरी तज्ज्ञ बॅडमिंटनपटू बी. सुमित रेड्डीने पूर्णपणे प्रशिक्षणावर लक्ष केंद्रित करण्यासाठी सक्रिय बॅडमिंटन खेळाडू म्हणून निवृत्तीची घोषणा केली आहे. मनू अत्रीसोबत पुरुष दुहेरी जोडी बनवणारा व त्याची पत्नी एन. सिक्की रेड्डीसह अनेक बॅडमिंटनपटूंसोबत मिश्र दुहेरी खेळणारा हैदराबादचा ३३ वर्षीय खेळाडूने समाजमाध्यमाव्दारे ही घोषणा केली. 'निवृत्त होत आहे. कृतज्ञता आणि उत्साहाने पुढचा अध्याय स्वीकारत आहे. सर्व पाठिंब्यासाठी मी माझे कुटुंब, मित्र आणि शुभचिंतकांचे आभार मानतो, असे सुमितने म्हटले आहे. सुमित व मनू या जोडीने २०१६ च्या दक्षिण आशियाई खेळांमध्ये सुवर्णपदक जिंकले, रिओ ऑलिम्पिक साठी पात्र ठरले आणि तो हैदराबादमधील आशिया सांघिक स्पर्धेत पुरुष संघाचा भाग सुद्धा होता. त्याने २०१४ आणि २०१८ च्या आशियाई खेळांमध्ये भारताचे प्रतिनिधित्व केले आणि २०१६ कॅनडा ओपन जिंकले, तसेच २०१५ मध्ये यूएस ओपन आणि डच ओपनमध्ये उपविजेता म्हणून स्थान मिळवले. अश्विनी पोनप्पा सोबत सुमितने २०१७ च्या सय्यद मोदी इंटरनॅशनलमध्ये दुसरे स्थान मिळवले.


### जोकोविचने नदालचा सर्वाधिक सामने जिंकण्याचा विक्रम मोडला



**मियामी** : नोवाक जोकोविचने मियामी ओपनमध्ये अर्जेंटिनाच्या कॅमिलो उगो काराबेलीला हरवून ४११ व्या एटीपी मास्टर्स टेनिस स्पर्धेत आपला १००० वा सामना जिंकला आणि या बरोबरच त्याने स्पेनच्या राफेल नदालचा सर्वाधिक एटीपी मास्टर्स १००० सामने जिंकण्याचा विक्रम मोडीत काढला. २४ वेळा ग्रॅण्ड स्लॅम विजेत्याने तिसऱ्या फेरीत लकी लूसर काराबेलीवर ६-१, ६-० असा विजय मिळवला. सर्बियाच्या जोकोविचने ४०९ मास्टर्स १००० विजयांसह स्पर्धेत प्रवेश केला व तो आपल्या दीर्घकालीन प्रतिस्पर्ध्यापेक्षा केवळ एका विजयाने मागे होता. रिंकी हिजिकाटाविरुद्ध पहिल्या फेरीत विजय मिळवल्यानंतर त्याने नदालच्या सर्वाधिक मास्टर्स १००० विजयांच्या यादीत बरोबरी केली. १९९० मध्ये मास्टर्स १००० स्तरावर सर्वाधिक जेतेपदे (४०), अंतिम फेरी (५९) आणि उपांत्य फेरी (७८) जिंकणारा जोकोविच आता नदालला मागे टाकून सर्वाधिक सामने जिंकण्याचा (४१०) विक्रम केला आहे. १९९० मध्ये त्याने रविवारी मास्टर्स १००० सामन्यात ४११ वा विजय नोंदवला होता. मला आणखी एक टप्पा गाठण्याचा, आणखी एक विक्रम मोडण्याचा अभिमान आहे. असे जोकोविच म्हणाला.

# श्रेयस अय्यर-शुभमन गिल आमने-सामने





◆ **अहमदाबाद, २४ मार्च**

१८ व्या इंडियन प्रीमियर लीग क्रिकेट हंगामात मंगळवारी नरेंद्र मोदी आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर पंजाब किंग्ज आणि गुजरात टायटन्स यांच्यादरम्यान साखळी सामना खेळला जाणार आहे. श्रेयस अय्यरने कर्णधारपदाला साजेशी कामगिरी करण्याचे लक्ष्य ठेवले असून तो आयपीएलमध्ये नेहमीच वाईट कामगिरी करणाऱ्या पंजाब किंग्जचे नशीब पलटवण्याचा प्रयत्न करणार आहे.

२०२० च्या आयपीएलच्या अंतिम फेरीत दिल्ली कॅपिटल्सचे नेतृत्व केल्यानंतर चार वर्षांनी श्रेयस अय्यरने गच वर्षी कोलकाता नाईट रायडर्स संघाला आयपीएलचे जेतेपद मिळवून देण्याचे मोठे यश मिळवले होते व आता त्याच्यासमोर पंजाब किंग्जची १८ वर्षांची पहिली आयपीएल जेतेपदाची प्रतीक्षा संपवण्याचे आव्हान आहे.

पंजाब संघ २०१८ मध्ये उपांत्य फेरीत पोहोचला व २०१४ मध्ये एकदा अंतिम फेरीत पोहोचला, परंतु संघात अनेक बदल आणि नेतृत्व बदल असूनही, किंग्ज इलेव्हन पंजाबमधून पंजाब किंग्जमध्ये बदल करूनही, गत चार आवृत्त्यांमध्ये त्यांना अव्वल ५ मध्ये स्थान मिळवता आले नाही.

तथापि, अय्यरच्या नेतृत्वाखाली पंजाबकडे सिद्ध नेतृत्व क्षमता असलेला कर्णधार आहे. तो पंजाबमध्ये प्रशिक्षक रिकी पॉण्टिंगसोबत पुन्हा एकत्र येणार आहे व त्यामुळे नवीन सुरुवात करण्यासाठी एक आदर्श व्यासपीठ मिळेल.

दुसरीकडे, भारताचा वन-डे संघाचा उपकर्णधार शुभमन गिलने गुजरात टायटन्सचा कर्णधार म्हणून कठीण हंगामाचा सामना केला आहे. हार्दिक पांड्याच्या नेतृत्वाखाली २०२२ मध्ये जेतेपद जिंकल्यानंतर व २०२३ मध्ये उपविजेतेपद मिळवल्यानंतर २०२४ मध्ये संघ आठव्या स्थानावर राहिला.

गिल आणि अय्यर दोघेही उत्तम फॉर्ममध्ये आहेत. त्यांनी या महिन्याच्या सुरुवातीला दुबईमध्ये भारताच्या चॅम्पियन्स चषक जिंकण्याच्या मोहिमेत महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

अय्यरने चॅम्पियन्स चषकाच्या पाच सामन्यात २४३ धावा करून भारताचा सर्वाधिक धावा करणारा फलंदाज म्हणून कामगिरी केली, तर गिलने बांगलादेशविरुद्धच्या पहिल्या सामन्यात शतकही झळकावले आणि भारताच्या विजयात महत्त्वपूर्ण योगदान दिले.

संघाच्या गतिमानतेबद्दल, गुजरात टायटन्सची फलंदाजीची ताकद गिल व इंग्लंडचा यष्टिरक्षक-फलंदाज जोस बटलर यांच्याकडून मिळालेल्या चांगल्या सुरुवातीवर अवलंबून असेल. मध्यम फळीची जबाबदारी वेस्ट इंडीजच्या शेर्फन रुदरफोर्ड, साई सुदर्शन व मसूद शाहरुख खान यांच्याकडे असेल, तर अष्टपैलू रशीद खान, राहुल तेवतिया, ग्लेन फिलिप्स, वॉशिंग्टन सुंदर आणि महिपाल लोमर यांच्याकडे असेल. वेगवान गोलंदाजीची जबाबदारी मोहम्मद सिराज, कॅगिसो रबाडा, प्रसिद्ध कृष्णा, दक्षिण आफ्रिकेचा गेराल्ड कोएत्झी व ईशांत शर्मा आदींवर असेल. फिरकी विभागाचे नेतृत्व रशीद खान व डावखुरा फिरकी गोलंदाज साई किशोर करतील.

दुसरीकडे, पंजाब किंग्ज त्यांच्या फलंदाजीसाठी कर्णधार अय्यर, जोश इंग्लिस, प्रभसिमरन सिंग, मार्कस स्टोइनिस आणि ग्लेन मॅकसवेलवर असेल. पंजाब संघाकडे अझमतुल्लाह उमरझाई, स्टोइनिस, मार्को जानसेन, शशांक सिंग आणि मुशीर खान सारखे अष्टपैलू खेळाडू आहेत.

वेगवान गोलंदाजीचे नेतृत्व अर्शदीप सिंग करगणार असून त्याला लॉकी फर्ग्युसन, कुलदीप सेन व यश ठाकूरची साथ असेल, तर लेग-स्पिनर युजवेंद्र चहल व डावखुरा फिरकी गोलंदाज हरप्रीत ब्रार यशस्वी हंगामाची आशा बाळगतील. (वृत्तसंस्था)

**आजचा सामना**

**पंजाब किंग्ज वि. गुजरात टायटन्स**
**स्थळ** : नरेंद्र मोदी आंतरराष्ट्रीय स्टेडियम, अहमदाबाद
**वेळ** : सायंकाळी ७.३० वाजतापासून
**थेट प्रसारण** : स्टार स्पोर्ट्सवर

# मॅथ्यू हेडनकडून धोनीची प्रशंसा



सूर्यकुमार यादवला यष्टीचित करताना महेंद्रसिंह धोनी

◆ **चेन्नई, २४ मार्च**

आयपीएल सामन्यादरम्यान रविवारी महेंद्र सिंह धोनीने सूर्यकुमार यादवला ज्या पद्धतीने यष्टिचीत करून तंबूत परत पाठवले, ते बघून ऑस्ट्रेलियाचा माजी सलामीवीर मॅथ्यू हेडन याने माजी भारतीय संघ कर्णधार ४३ वर्षीय धोनी याच्या क्षमतेची खूप प्रशंसा केली. धोनी आपल्या कारकिर्दीच्या शेवटच्या टप्प्यात आहे, पाच वर्षांपूर्वी त्याने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतली आहे आणि संघाला पाच आयपीएल जेतेपद मिळवून दिल्यानंतर चेन्नई सुपर किंग्जसाठी खेळाडू म्हणून खेळत आहे.

तथापि, नूर अहमदच्या चेंडूवर क्षणार्धात बेल्स काढून सूर्यकुमारला तंबूत परत पाठवून त्याने रविवारी पुन्हा एकदा आपली प्रतिभा दाखवली.धोनी जबरदस्त फॉर्मात आहे, असे ऑस्ट्रेलियाचा माजी फलंदाज आणि २०१० पर्यंत सीएसकेमध्ये धोनीचा सहकारी राहिलेल्या हेडन म्हणाला. यष्टिरक्षणासाठी केवळ इतकी जलद वेळ, उत्तम हालचाल व चांगली दृष्टी महत्त्वाची आहे व याची धोनीला अजूनही जाणीव आहे, असे हेडन म्हणाला.

**रचिन रवींद्रने दिले सीएसकेच्या विजयाचे श्रेय फिरकी गोलंदाजांना**

चेन्नई सुपर किंग्जचा स्टार फलंदाज रचिन रवींद्रने मुंबई इंडियन्सविरुद्धच्या विजयाचे श्रेय जागतिक दर्जाच्या रविचंद्रन अश्विनच्या नेतृत्वाखालील संघाच्या फिरकी गोलंदाजांना दिले. तो म्हणाला की फिरकीपटूंच्या प्रभावी गोलंदाजीमुळे आम्हाला योग्य संतुलन मिळते अश्विनने ३१ धावांत १ बळी घेतले, तर अफगाणिस्तानचा नूर अहमदने १८ धावांत ४ बळी घेऊन सर्वांचे लक्ष वेधून घेतले आणि मुंबईला ९ बाद १५५ धावसंख्येपर्यंत रोखले. अश्विन हा एक जागतिक दर्जाचा खेळाडू आहे. मी त्याच्याविरुद्ध थोडासा खेळलो, तो खूप अनुभव घेऊन येतो. त्याच्याकडे प्रचंड क्रिकेट ज्ञान व फिरकी गोलंदाजीबद्दल माहिती आहे, असे रचिन म्हणाला. अश्विन सामना कसा व कुठे वळत आहे हे उत्तमरीत्या जाणतो. तो सामन्याचा एक उत्तम विचार करणारा खेळाडू आहे. त्याच्यासोबत सामन्याविषयी संवाद साधणे हा एक सन्मान आहे. अशा महान भारतीय खेळाडूचा खेळ बघतच मी मोठा झालो आहे, असेही तो नम्रपणे म्हणाला. (वृत्तसंस्था)

# हरमनप्रीत, स्मृती, दीप्ती बीसीसीआयच्या केंद्रीय कराराच्या सर्वोत्तम श्रेणीत कायम

◆ **नवी दिल्ली, २४ मार्च**



हरमनप्रीत कौर | स्मृती मंधाना | दीप्ती शर्मा

भारतीय महिला संघाची कर्णधार हरमनप्रीत कौर, तिची उपकर्णधार स्मृती मंधाना आणि अष्टपैलू दीप्ती शर्माला सोमवारी बीसीसीआयच्या सर्वाधिक मानधनाच्या श्रेणीतील केंद्रीय करारांच्या अ श्रेणीमध्ये कायम ठेवण्यात आले आहे.

वेगवान गोलंदाज रेणुका ठाकूर, अष्टपैलू जेमिमह रॉड्रिग्ज, यष्टिरक्षक ऋचा घोष व सलामीवीर शेफाली वमाने आपलीब श्रेणी करार कायम ठेवण्यात यश मिळवले. गत वर्षी ब श्रेणीमध्ये असलेली डावखुरी गोलंदाज राजेश्वरी गायकवाडला या हंगामात स्थान मिळाले नाही.

युवा ऑफ-स्पिनर श्रेयंका पाटील, वेगवान गोलंदाज तितस साधू आणि अरुंधती रेड्डी, अष्टपैलू अमनजोत कौर व यष्टिरक्षक उमा छेत्री यांना त्यांचे पहिले केंद्रीय करार मिळाले आहे, त्यांना यास्तिका भाटिया, राधा यादव, अमनजोत कौर, उमा छेत्री, स्नेह राणा व पूजा वस्त्रकार यांच्यासह क श्रेणीमध्ये स्थान देण्यात आले आहे. मेघना सिंग, देविका वैद्य, सब्बिनेनी मेघना, अंजली सरवाणी व हरलीन देओल मात्र या करारातून बाहेर पडल्या.

अ श्रेणीतील महिला क्रिकेटपटूला सामना शुल्काच्या व्यतिरिक्त ५० लाख रुपये मिळतात आणि ब आणि क श्रेणीतील महिला क्रिकेटपटूंना अनुक्रमे ३० लाख आणि १० लाख रुपये मिळतात.

या वर्षाच्या अखेरीस जेव्हा एकदिवसीय विश्वचषक घरी असेल तेव्हा भारतीय संघाला या संधीचा सामना करावा लागेल. सर्व संसाधने असूनही, भारतीय महिलांना अद्याप जागतिक करंडक जिंकता आलेली नाही. (वृत्तसंस्था)

### तितास, श्रेयांका, अमनजोत प्रथमच केंद्रीय करारबद्ध

◆ **नवी दिल्ली, २४ मार्च**

आशादायक युवा वेगवान गोलंदाज तितास साधू, मध्यमगती अष्टपैलू अरुंधती रेड्डी आणि अमनजोत कौर, यष्टिरक्षक-फलंदाज उमा छेत्री आणि अष्टपैलू श्रेयंका पाटील यांना सोमवारी ग्रेड सी श्रेणीत स्थान मिळाल्यानंतर २०२४-२५ हंगामासाठी बीसीसीआय महिला केंद्रीय करार देण्यात आला. अ श्रेणीला ५० लाख रुपये, ब श्रेणीतील खेळाडूंना ३० लाख रुपये व क श्रेणीतील खेळाडूंना प्रत्येकी १० लाख रुपये मिळणार आहेत. २०२४-२५ हंगामासाठी बीसीसीआयी महिला केंद्रीय करार यादी :अ श्रेणी : हरमनप्रीत कौर, स्मृती मंधाना, दीप्ती शर्मा. ब श्रेणी : रेणुका सिंग, जेमिमाह रॉड्रिग्ज, ऋचा घोष, शेफाली वर्मा. क श्रेणी : यस्तिका भाटिया, राधा यादव, श्रेयांका पाटील, तितस साधू, अरुंधती रेड्डी, अमनजोत कौर, उमा चेत्री, स्नेह राणा, पूजा वस्त्राकर. (वृत्तसंस्था)

# सोलापूरचा पॅराशूटर कविन केंगनाळकरला रौप्यपदक

● खेलो इंडिया पॅरा गेममध्ये उल्लेखनीय कामगिरी



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ मार्च-**

नवी दिल्ली येथे सुरू असलेल्या दुसऱ्या खेलो इंडिया पॅरा गेममध्ये सोलापूरचा पॅराशूटर कविन केंगनाळकर याने आर वन कॅटेगिरीतील दहा मीटर रायफल शूटिंगमध्ये ६०८.९ गुण मिळवीत रौप्यपदक पटकाविले.

कौशल्य आणि अचूकतेचे रोमांचक प्रदर्शन करत त्याने ही कामगिरी केली. या खेळात सातत्याने आपली प्रतिभा दाखवणाऱ्या कविनने संपूर्ण स्पर्धेत अपवादात्मक तंत्र आणि संयम दाखवला. रौप्यपदक जिंकणे हे त्याच्या कठोर परिश्रम, समर्पण आणि चिकाटीचे प्रतीक आहे.

> हे रौप्य पदक केवळ वैयक्तिक कामगिरी नाही तर म ाझ्या प्रशिक्षकांना, कुटुंबाला आणि माझ्या संपूर्ण प्रवासात मला पाठिंबा देणाऱ्या सहकाऱ्यांचे यश आहे.
> **- कवीन केंगनाळकर**

# प्रशांत सुतार महाराष्ट्र राज्य लॉन टेनिस संघटनेचे नवे अध्यक्ष

● मुख्यमंत्री फडणवीस यांनी केले अभिनंदन

**मुंबई, दि. २४ मार्च-**

माजी राष्ट्रीय टेनिसपटू, प्रमाणित टेनिस प्रशिक्षक आणि दक्षिण आशियातील एकमेव एटीपी २५० टेनिस स्पर्धा असलेल्या टाटा ओपन महाराष्ट्रचे माजी स्पर्धा संचालक प्रशांत सुतार यांची महाराष्ट्र राज्य लॉन टेनिस संघटनेच्या (एमएसएलटीए) अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे.

सांगलीतुन खेळाडू म्हणून टेनिस कारकिर्दीची सुरुवात करणारे श्री सुतार यांनी श्री. भरत ओझा यांच्याकडून अध्यक्षदाची सुत्रे नुकतीच स्विकारली. ओझा यांची महाराष्ट्र राज्य लॉन टेनिस संघटनेच्या व्यवस्थापकीय परिषदेच्या कार्याध्यक्षपदी निवड झाली आहे.

एसएसएलटीए परिषदेचे सदस्य असलेले सुतार महाराष्ट्र सरकारशी जुळवून समन्वय साधून डेव्हिस करंडक, एटीपी, डब्ल्यूटीए स्पर्धांसह प्रमुख आंतरराष्ट्रीय टेनिस स्पर्धा सुरु करण्यात आघाडीवर आहेत. नागपूर येथील एमएसएलटीएच्या महत्वाकांक्षी आदिवासी प्रकल्पातही सुतार यांचा सहभाग होता. सुतार यांनी आपल्या व्यावसायिक कंपनीच्या माध्यमातून रोहन बोपण्णा, सुमित नागल, अनिरुद्ध चंद्रशेखर आणि अन्य कुमार खेळाडूंना प्रायोजित केले आहे. पुणे जिल्ह्यातील बहुराष्ट्रीय कंपनी आर्यन्स पंप्स ॲण्ड एन्व्हायरो सोल्युशनचे सुतार अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक आहेत. ही कंपनी सर्वात आव्हानात्मक पर्यावरणीय स्वच्छता आणि आपत्ती व्यवस्थापनासाठी सरलीकृत उपाय विकसित करण्याचे काम करते. गाळ काढून टाकण्यासाठी आणि गटार तसेच कालवे स्वच्छ करण्यासाठी प्रगत तंत्रज्ञानासह विशेष उद्देश वाहनांवर बसवता येतील अशी मशीनही सुतार यांची कंपनी तयार करते.



मुंबई : अध्यक्षपदी निवड झाल्यानंतर त्यांचे अभिनंदन करताना मुख्यमंत्री फडणवीस.

त्यांचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अभिनंदन केले. सोलापूर जिल्हा लॉन टेनिस संघटनेचे अध्यक्ष राजेश दमाणी आणि मानद सचिव राजीव देसाई यांनीही अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

# सोलापूरने सांगलीला बरोबरीत रोखले

## कै. भाई नेरूरकर चषक राज्य खो-खो स्पर्धा : धाराशिव, कोल्हापूर, पुणे, नाशिक व ठाण्याचे एकतर्फी विजय



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ मार्च -**

कै. भाई नेरूरकर चषक राज्य खो-खो स्पर्धेत पुरुष गटातील सलामीच्या सामन्यात सोलापूरने सांगलीला बरोबरीत रोखले.

महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा व युवक सेवा संचालनालयच्या वतीने इचलकरंजी (जि. कोल्हापूर) येथील विठ्ठल रामजी शिंदे शाळा क्रमांक २१च्या मैदानावर सोमवारपासून सुरु झालेल्या या स्पर्धेत सकाळच्या सत्रात मध्यंतराच्या १४-१५ अशा पिछाडीवरून सोलापूरच्या खेळाडूंनी बहारदार खेळी करीत २६-२६ अशी बरोबरी केली.

सांगलीकडून अभिषेक केरीपाळे याने आपल्या धारदार आक्रमणात तब्बल दहा गडी बाद करीत १.३० मिनिटे संरक्षण करीत अष्टपैलू खेळी केली. सत्यजित सावंतने १.४० व १.०० मिनिटे संरक्षण केले. सागर गायकवाडनेही ४ गडी टिपले. सोलापूरच्या अजय कश्यपने आपल्या धारदार आक्रमणात ७ बळी व १.०० मिनिटे पळती तर जुबेर शेख याने ४ गडी बाद केले. अक्षय इंगळे (१.१०, १.१० मिनिटे संरक्षण व ३ गुण), सौरभ चव्हाण (१.००,१.०० व १.१० मिनिटे व ३ गुण) व अमोल केदार (३ गुण) यांनी संघाच्या बरोबरीत साथ दिली.

**अन्य निकाल**

**किशोर** : धाराशिव विजयी विरुद्ध नागपूर १७-६ एक डावाने. कोल्हापूर वि. वि. बुलढाणा १९-७ एक डाव १२ गुणांनी.

**किशोरी** : सांगली वि. वि. बुलढाणा १३-९ एक डाव ४ गुणानी.

**महिला** : पुणे वि. वि.नागपूर १८-९ एक डाव ९ गुणांनी, नाशिक वि. वि. रत्नागिरी १३-१० एक डाव ३ गुणांनी, ठाणे वि. वि. अकोला १७-१० एक डाव ७ गुणांनी

**नागपूरची किशोर व पुरुष गटात कडवी लढत**

किशोरी गटात मध्यंतराच्या ३-३ अशा बरोबरीनंतर सोलापूरने नागपूरला १०-८ असे २ गुण दीड मिनिटे राखून नमविले. ऋतुजा सुरवसे हिने पहिल्या डावात तब्बल ५ मिनिटे संरक्षण करीत नागपूरचे संरक्षण खिळखिळे केले. सोलापूरची कर्णधार सृष्टी काळे हिने ४ गडी बाद करीत संघाच्या विजयात साथ दिली. दुसऱ्या डावात कार्तिकी यलमार व मालन राठोड या दोघींनी प्रत्येकी २.३० मिनिटे संरक्षणाची बाजू सांभाळली. नागपूरकडून ठाकरे हिने (२.२० मिनिटे व २ गुण) व दुर्गा धारवाडे हिने (२.१०, १.०० मिनिटे) यांनी लढत दिली.

पुरुष गटातील चुरशीच्या सामन्यात पुण्याविरुद्ध नागपूरने मध्यंतरापर्यंत कडवी लढत दिली. १०-९ अशा एका गुणाच्या आघाडीवरून पुण्याने नागपूरला २४-१६ असे ८ गुणांनी हरविले. पुण्याकडून अनिकेत चिखले (२.००, १.३० मिनिटे व २ गुण), शिवम शिंगाडे १.५०, १.५० मिनिटे) व रितेश कडगी (६ गुण) यांनी संघाच्या विजयात महत्वपूर्ण कामगिरी केली. नागपूरच्या कोमल महाजन (२.०० मि. व ४ गुण), पियूष नांदूरकर (१.०० मिनिटे व ३ गुण) याने एकाकी लढत दिली. अन्य सर्व सामने एकतर्फी झाले



# ऑल स्टार फेन्सिंग क्लबचे अथर्व बारसे व ज्ञानदा शिरवळ महाराष्ट्र संघात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ मार्च -**

येथील ऑल स्टार फेन्सिंग क्लबचे अथर्व बारसे व ज्ञानदा शिरवळ यांची महाराष्ट्र तलवारबाजी संघात निवड झाली.

कटक (ओडिसा) येथे होणाऱ्या २६व्या सब ज्युनिअर राष्ट्रीय तलवारबाजी स्पर्धेत ते सहभागी होतील. बुलढाणा येथे झालेल्या २६व्या सब ज्युनिअर राज्य तलवारबाजी स्पर्धेतीलसेबरमध्ये वैयक्तिक प्रकारात अथर्व याने सुवर्ण व ज्ञानदा हिने कांस्यपदक प्राप्त केले. हे दोघे बी. एफ. दमाणी हायस्कूलचे आहेत. त्यांना पवन भोसले यांचे मार्गदर्शन लाभले.

त्यांचे सोलापूर जिल्हा तलवारबाजी संघटनेचे जिल्हाध्यक्ष प्रा. प्रकाश काटुळे व संघटना सदस्य राजेंद्र गोटे यांनी सत्कार केला. त्यांचे जिल्हा सचिव प्रा.दिपक शिंदे, सदस्य जितेंद्र पवार व अनिल पाटील यांनी अभिनंदन करून स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त




### दत्तकला फार्मसीच्या प्रा.ज्योती जावळे यांना पी.एच.डी. प्रदान

**करमाळा, दि. २४ मार्च-**

दत्तकला शिक्षण संस्थेच्या इन्स्टिटयूट ऑफ फार्मासुटिकल सायन्स अँड रिसर्च (फॉर गर्ल्स) या महाविद्यालयाच्या उपप्राचार्या प्रा.ज्योती जावळे यांनी डॉ. वैषाली काशीकर यांच्या मार्गदर्शनाखाली सावीत्रीबाई फुले पुणे विद्यापिठ पुणे येथून पी.एच.डी.प्राप्त केली. त्यांनी 'डेव्हलपमेंट अॅण्ड इव्हॅल्युयशन ऑफ नॅनोकॅरिअर फॉर डीलेव्हरी ऑफ अॅन्टीकॅन्सर फायटोकेमीकल्स' या विषयावरती काम करून प्रबंध सादर केला. यामुळे प्रा. ज्योती जावळे यांना संस्थेचे अध्यक्ष प्रा. रामदास झोळ, संस्थेचे सचिव माया झोळ व अमेपुर्वाफोरमचे अध्यक्ष डॉ. अमोल कुलकर्णी यांच्या हस्ते गौरविण्यात आले. यावेळी संस्थेचे मुख्य प्रशासकिय अधिकारी तथा प्राचार्य डॉ. विशाल बाबर, दत्तकला कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ. हरिबा जेडगे, अनुसया कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य प्रा. अमित पोंदकुले उपस्थित होते.



### आरटीएस परीक्षेत यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार

**पिलीव, दि. २४ मार्च-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील कर्मवीर भाऊराव पाटील विदयालयातील इयत्ता सातवीमधील आरटीएस परीक्षेत यश सपांदन करणाऱ्या धनश्री घोंगडे, रूद्र यादव, राजवर्धन पाटील, समृद्धी जगदाळे व सार्थक वाघ या यशस्वी विद्यार्थ्यांचा व मार्गदर्शक शिक्षकांचा विदयालयाच्या वतीने सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अधक्षस्थानी मुख्याध्यापक शिवाजी कापसे होते. यावेळी पर्यवेक्षक मोरे, ज्येष्ठ लेखनिक भोरकडे, आरटीएस विभाग प्रमुख आठर, वाघमारे, ठाकर, सचिन पाटील, मेटकरी, जाधव, घोडके, पाटील, जाधव, मगर उपस्थित होते. सूत्रसंचालन लिंगे यांनी केले तर आभार वाघमारे यांनी मानले.



### जिल्हास्तरीय कृतिनिष्ठ शिक्षक पुरस्काराने प्रा. धनाजी चव्हाण सन्मानित

**सांगोला, दि. २४ मार्च-**

सांगोला विद्यामंदिर ज्यु.कॉलेजमधील प्रा.धनाजी चव्हाण यांना छत्रपती परिवार, मरवडे यांचेवतीने जिल्हास्तरीय कृतिनिष्ठ शिक्षक पुरस्कार प्रसिद्ध कवी इंद्रजीत भालेराव यांचे शुभहस्ते सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला. यावेळी पुरस्कार स्वीकारताना व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा.शिवाजीराव काळुंगे, मुख्याध्यापक श्रीरंग आवळेकर, सांगोला विद्यामंदिरचे उपप्राचार्य प्रकाश म्हमाणे, प्रा.शिवशंकर तटाळे, प्रा.डी.के पाटील, उन्मेष आटपाडीकर, सुनील जवंजाळ उपस्थित होते. या यशाबद्दल सां.ता.शि.प्र. मंडळाचे अध्यक्ष प्रा. प्रबुद्धचंद्र झपके, सचिव म. शं.घोंगडे, सहसचिव प्रशुद्धचंद्र झपके, खजिनदार शंकरराव सावंत, सदस्य विश्वेश झपके, प्राचार्य अमोल गायकवाड, उपमुख्याध्यापिका शहिदा सय्यद, पर्यवेक्षक सुरेश मस्तुद, प्रदिप धुकटे, मच्छिंद्र इंगोले यांनी प्रा.धनाजी चव्हाण यांचे अभिनंदन केले.

## निधन वृत्त...



### मंगल पवार

**सोलापूर,दि. २४ मार्च-**

विजापूर रस्ता येथील सिटीझन पार्कमधील रहिवाशी मंगल नागेश पवार (वय ६९) यांचे अल्पशा आजाराने सोमवारी (दि. २४) दुपारी निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, तीन मुले, एक मुलगी, सुना नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर रात्री उशिरा मोदी स्मशानभूमीत अंत्यविधी संस्कार करण्यात आले.



### अनुराधा जोशी

**सोलापूर, दि. २४ मार्च-**

अनुराधा अवधूत जोशी (वय ६८) यांचे रविवारी पहाटे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. त्यांच्यावर मोदी स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, एक मुलगी, सून, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

# उन्हाळ्यात माठाला नागरिकांची पसंती

### नैसर्गिक थंड पाण्याचे आरोग्यदायी फायदे

**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रुप, दि. २४ मार्च-**

उन्हाळ्याची चाहूल लागताच तापमानाचा पारा चढू लागला आहे. शरीराला ताजेतवाने ठेवण्यासाठी आणि तहान भागवण्यासाठी अनेक नागरिकांचा कल आता मातीच्या माठांकडे वाढला आहे. नैसर्गिक थंड पाणी पुरवणाऱ्या माठाचा उपयोग केवळ तहान भागवण्यासाठीच नव्हे, तर शरीरासाठी आरोग्यदायी ठरत आहे.

माठामध्ये पाणी नैसर्गिक पद्धतीने थंड राहते. यामध्ये कोणतेही रसायन वापरण्यात येत नाही, त्यामुळे शरीराला कोणताही त्रास होत नाही. प्लास्टिकच्या बाटल्यांमध्ये ठेवलेले पाणी आरोग्यासाठी हानिकारक ठरू शकते, मात्र माठातील पाणी शरीराला



थंडावा देऊन पचनतंत्र सुधारते आणि उष्णतेपासून संरक्षण करते.

फ्रीज किंवा कूलरच्या तुलनेत माठ हा अधिक किफायतशीर आणि पर्यावरणपूरक पर्याय आहे. माठासाठी कोणत्याही विजेची आवश्यकता नसते, त्यामुळे वीज बचत होते आणि वीज बिलातही बचत होते.

> माठ हा केवळ तहान भागवण्यासाठी नव्हे, तर पर्यावरणपूरक आणि आरोग्यदायी उपाय म्हणून नागरिकांमध्ये लोकप्रिय ठरत आहे. स्थानिक कारागिरांकडून माठ विक्रीला चांगला प्रतिसाद मिळत आहे. यामुळे रोजगाराच्या संधी उपलब्ध होत आहेत. माठ बनवायला वेळ आणि मेहनत लागते. सध्या एक माठ १८० ते ३०० रुपयांपर्यंत विकला जात असून, मागणी अधिक असल्याने कारागिरांचे उत्पन्न वाढले आहे.

> उन्हाळ्यात माठांची मागणी खूप वाढते. नैसर्गिक थंड पाणी मिळत असल्यामुळे लोक माठाला अधिक पसंती देतात. माठ बनवायला वेळ आणि मेहनत लागते, पण विक्री चांगली होत असल्यामुळे समाधान मिळते. ग्राहकांकडूनही चांगला प्रतिसाद मिळतोय.
>
> **- अप्पू कुंभार, कुंभार**

त्यामुळे माठाचा वापर हा पर्यावरणपूरक आणि किफायतशीर ठरतो. माठामध्ये असलेल्या मातीच्या सूक्ष्म छिद्रांमुळे पाण्याचा नैसर्गिक गाळ होतो. त्यामुळे पाण्यातील अशुद्धता दूर होते आणि पाणी स्वच्छ आणि शुद्ध राहते.

माठाच्या मातीमध्ये अल्कधर्मी गुणधर्म असतात जे पाण्याचे कि स्तर संतुलित ठेवतात. त्यामुळे शरीरातील आम्लता कमी होऊन पचन सुधारते. माठातील थंड पाणी शरीरातील जठररस संतुलित ठेवते, त्यामुळे पचन प्रक्रिया सुधारते आणि अपचनाचा त्रास कमी होतो. माठामधून पाणी हळूहळू वाफेच्या स्वरूपात बाहेर पडते, ज्यामुळे पाण्याचे तापमान कमी राहते आणि नैसर्गिक थंडावा टिकून राहतो. माठातील पाणी प्यायल्याने शरीरातील टॉक्सिन्स नैसर्गिकरीत्या बाहेर टाकले जातात आणि शरीर शुद्ध होते.

माठ हे मातीपासून तयार झालेले असल्यामुळे त्याचा वापर केल्याने पर्यावरणपूरक जीवनशैलीला प्रोत्साहन मिळते आणि पृथ्वीशी जोडले असल्याचा अनुभव येतो. माठातील पाणी हे थंडसर आणि मृदू असल्यामुळे त्याची चव फ्रीजमधील पाण्यापेक्षा अधिक चांगली वाटते. माठाच्या निर्मितीसाठी कोणत्याही विजेचा वापर होत नाही. त्यामुळे कार्बन उत्सर्जन कमी होते. माठाच्या मातीमध्ये असलेले नैसर्गिक मिनरल्स पाण्यात मिसळले जातात, जे शरीरासाठी फायदेशीर ठरतात. माठातील थंड पाणी चयापचय क्रिया सुरळीत ठेवते, त्यामुळे वजन नियंत्रणास मदत होते.

## बठाण येथे टिपर चालकावर गुन्हा दाखल; १५ लाख २५ हजाराचा मुद्देमाल जप्त

**तभा वृत्तसेवा**
**मंगळवेढा, दि.२४ मार्च-**

बठाण येथील भीमा नदी पात्रातून वाळू भरुन जाणारा बिगर पावतीचा टिपर पोलीसांच्या मदतीने महसूल प्रशासनाने पकडून अज्ञात चालकाविरुध्द गुन्हा दाखल केला. आत्तापर्यंत अनेक बिगर पावती टिपरवर कारवाई झाल्याने संबंधीत ठेकेदाराकडून पावती न देता केवळ पैसे घेवून वाहने वाळू भरुन दिली जात असल्याचे कारवाईवरुन उघड होत आहे.



पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार फिर्यादी तलाठी संग्राम वाडकर हे गुंजेगाव येथे कार्यरत असून दि.२३ रोजी महसूल अधिकाऱ्यांच्या आदेशाने हद्दीत चोरुन अवैध वाळूचे उत्खनन करुन चोरी करणाऱ्या लोकांवर कारवाई करण्याकरिता तीन पथके नेमली होती. यामध्ये महसूल नायब तहसिलदार एम.एम.कन्हेर व इतरांचा समावेश होता. निवडणूक नायब तहसिलदार जयश्री स्वामी यांनी तलाठी वाडकर यांना फोनवरुन बठाण येथील वाळू डेपोच्या ठिकाणी टिपर चेक करण्यास सांगितले. तलाठी वाडकर व अन्य महसूल कर्मचारी उचेठाण येथे थांबले असता सायंकाळी ६.३० वाजता एम.एच.१३ डी.क्यू.००४४ हे वाहन वाळू घेवून समोरुन येत असल्याने त्याला थांबण्याचा इशारा केला. यामध्ये वाळू होती. वाहन उभा करुन चालक पळून गेला. विना परवाना वाळूचे उत्खनन करुन चोरुन विक्रीसाठी घेवून जात असल्याची खात्री झाल्याने सदर अज्ञात चालकाविरुध्द मंगळवेढा पोलीसात फिर्याद देण्यात आली. पोलीसांनी वाळू व टिपरसह १५ लाख २५ हजार रुपयाचा मुद्देमाल जप्त केला आहे. दरम्यान बठाण नदी पात्रातून बिगर पावतीचा वाळू भरुन आलेला टिपर क्रमांक एम.एच.१३ डी.क्यू.००४४ हा सामाजिक कार्यकर्ते यांनी पकडून दिल्याचा दावा त्यांनी केला आहे. सदर टिपरजवळ पावती नसल्यामुळे कोळी यांनी महसूल अधिकाऱ्यांना फोन करुन सांगितल्यावर त्या टिपरवर कारवाई करण्यात आली आहे. महसूल अधिकाऱ्यांनी दररोज वाहनाची तपासणी न केल्यास रस्त्यावर उतरुन बिगर पावतीची वाहने तपासणार असल्याचे सांगितले. कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न उद्भवल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी महसूल अधिकाऱ्यांवर राहील.

### पेशवा युवा मंचतर्फे १ मे रोजी सामुदायिक व्रतबंध

**पंढरपूर, दि. २४ मार्च -**

येथील पेशवा युवा मंचच्या वतीने प्रतिवर्षाप्रमाणे सामुदायिक व्रतबंध सोहळ्याचे गुरुवारी दि. १ मे रोजी आयोजन केले आहे. येथील आरती प्रांगणामध्ये हा सामुदायिक व्रतबंध सोहळा संपन्न होणार असल्याची माहिती पेशवा युवा मंचचे अध्यक्ष ज्ञानराज बेणारे व उपाध्यक्ष मंगेश कवडे यांनी दिली. या व्रतबंध सोहळ्यात सहभागी होणाऱ्या बटूस सोवळे, उपरणे, पळी, पंचपात्र, संध्येची पोथी मोफत देण्यात येणार आहे. बटू सोबत येणाऱ्या दहा लोकांची मोफत भोजन व्यवस्था करण्यात आली आहे. संस्कारानंतर बटूंची शोभायात्रा काढण्यात येणार असून यामध्ये शहरातील समाज बांधवांनी सहभागी व्हावे, असे आवाहन पेशवा युवा मंचचे अध्यक्ष ज्ञानराज बेणारे व उपाध्यक्ष मंगेश कवडे यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी व नाव नोंदणीसाठी ९७६५२७७३२५ व ९८२२६१९०२० या क्रमांकावर संपर्क करावा, असे देखील आवाहन करण्यात आले आहे.

## अक्कलकोटच्या सौंदर्यात भर; कमलाराजे चौक झाला देखणा



**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट दि .२३**

तीर्थक्षेत्र अक्कलकोट येथील कमलाराजे चौक येथील पाण्याचे कारंजे नुकतेच चालू केल्याने अक्कलकोटच्या सौंदर्यात भर पडली आहे.

तारामाता उद्यानातील कारंजेही चालू करावेत अशी मागणी नागरिकातून व्यक्त होत आहे. कमलाराजे चौक येथील कारंजे शिवजयंती उत्सवानंतर चालू करण्यात आले. यामध्ये रंगीत प्रकाशझोत असल्याने ते अधिकच मनमोहक लक्षवेधक झाले आहेत. यामुळे आता तारा माता उद्यानातील ऐतिहासिक जगप्रसिध्द कारंजे चालू करावेत अशी मागणी होत आहे .

# अक्कलकोटमध्ये हिंदू-मुस्लिम समाजाची एकता

### आ. सचिन कल्याणशेट्टी; कोरबू मित्रपरिवारातर्फे इफ्तार पार्टी

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.२४ मार्च-**

अक्कलकोट तालुका हा सर्वधर्म समभावाचे प्रतीक असून हिंदू-मुस्लिम समाजाची एकता अक्कलकोट येथे आज सुद्धा टिकून असल्याने रमजान, गणेशोत्सव, नवरात्र उत्सव, दीपावली, विविध गावाच्या जत्रा यासह विविध सण हिंदू मुस्लिम बांधव एकत्र साजरी करीत असल्याचे प्रतिपादन आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी केले.



भाजपा अल्पसंख्यांक जिल्हाध्यक्ष नन्नूभाई कोरबू मित्रपरिवारातर्फे रमजान महिन्याचे औचित्य साधून सर्व हिंदू मुस्लिम बांधावासाठी 'दावत ए इफ्तार'चे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते. आ. कल्याणशेट्टी यांनी इफ्तार पार्टी आयोजित केल्याबद्दल नन्नूभाई कोरबू मित्रपरिवाराचे कौतुक केले.

याप्रसंगी आणि छत्र मंडळाचे प्रमुख कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे भोसले, राष्ट्रवादीचे दिलीप सिद्धे, श्री वटवृक्ष देवस्थानचे अध्यक्ष महेश इंगळे, माजी उपनगराध्यक्ष यशवंत धोंगडे, माजी नगरसेवक मिलन कल्याणशेट्टी, रिपाई तालुकाध्यक्ष अविनाश मडीखांबे, शिवसेना तालुकाप्रमुख संजय देशमुख, आलम कोरबू, पोलीस निरीक्षक राजेंद्र टाकणे, पोलीस निरीक्षक महेश स्वामी, एपीआय निलेश बागाव, लाला राठोड, नागराज कुंभार, मैंदर्गी चे युवा नेते महेश सावरी, हुसेनसाहेब मुजावर, नावेद डांगे,चंद्रकांत मडीखांबे, मोहसीन बागवान, रजाक सय्यद, भैया नाईकवाडी, शकील नाईकवाडी, रशिद खिस्तके, सलीम शेख, वाहिद नाईकवाडी, गौस शेख, नागराज कुंभार, शबाब शेख, आसिफ नाईकवाडी, हनीफ कोरबू मारुती बावडे, स्वामीराव गायकवाड,बुडन तांबोळी, सोहेल बागवान, बबलू जमादार, आसिफ नाईकवाडी, सैपन पठाण, हुसेन बळोरगी, मुबीन पटेल, गौस पटेल, नूर शेख, अजय मुकणार, निखिल पाटील, शुभम मडीखांबे, भीमा मलवे, श्रीकांत मलवे, मोहसीन शेख, अझहर शेख, अफसर पठाण, अश्फाक शेख, सुभान नाईकवाडी, दाऊद नाईकवाडी, इस्माईल मणियार, अल्ताफ कोरबू, जावेद नाईकवाडी, गोटू माने, आलम इनामदार, नूर नाईकवाडी, कदीर नाईकवाडी, सोनू इनामदार, सोनू खिलाडी, अरबाज खान, सुभान नाईक, जोयेफ कोरबु, रईस शेख, सैपन शेख, असलम कोरबू, सुभान शेख, सैपन कोरबू , टिल्लूया शेख, जावेद शेख, रमजान नाईक, संजय बडवे, आसिफ नाईकवाडी, तौसीफ नाईकवाडी, तनवीर शेख, आयान मणियार, सुतार उपस्थित होते. आभार रशिद खिस्तके यांनी मानले.



## लोकअदालतीमध्ये ३७० प्रकरणे निकाली

### सात कोटी ४२ लाख ५ हजार रुपयांची तडजोड शुल्क वसूल

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २४ मार्च-**

तालुका विधी सेवा समितीच्यावतीने जिल्हा न्यायालयात दि.२२ मार्च रोजी राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले होते. या लोकअदालतीमध्ये ३७० प्रकरणे तडजोडीने मिटविण्यात आली आहेत. या प्रकरणामध्ये सात कोटी ४२ लाख ५ हजार ३८९ रुपयांची तडजोड झाली असल्याची माहिती तालुका विधी सेवा समितीचे अध्यक्ष तथा जिल्हा व सत्र न्यायाधीश डी. एन. सुरवसे यांनी दिली. लोकअदालतीसाठी पाच पॅनलची व एक नियमित न्यायालयाची व्यवस्था करण्यात आली होती. या पॅनलमध्ये जिल्हा न्यायाधीश एस.बी. देसाई, न्यायाधीश ए. ए. खंडाळे, न्यायाधीश एस एस चोपडा, न्यायाधीश एस.एस. राऊळ, न्यायाधीश ए.एस. सोनवकर, न्यायाधीश ए.एस. साळुंखे यांनी काम पाहिले. सदरची लोकअदालत प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश एम.एस. शर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेली होती. त्यासाठी तालुका विधी सेवा समितीचे अध्यक्ष तथा जिल्हा न्यायाधीश डी. एन. सुरवसे, सहदिवाणी न्यायाधीश ए. ए. खंडाळे यांनी वेळोवेळी बैठका घेवुन पाठपुरावा केली. या लोकअदालतीस विधीज्ञ, बँक कर्मचारी, न्यायालयीन कर्मचारी, महावितरणचे अधिकारी व पक्षकार मोठया संख्येने उपस्थित होते.

## ओन्ली समाजसेवा बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने नारीशक्तीचा सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २४ मार्च-**

येथील ओन्ली समाजसेवा बहुउद्देशीय संस्था व एमआयटी रेल्वे इंजिनिअरिंग कॉलेज बार्शी यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिनानिमित्त एमआयटी कॉलेजमधील हिरव्यागार निसर्गरम्य वातावरणात संपन्न झाला. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून अध्यक्षस्थानी एम आयटी कॉलेजचे प्राचार्य डॉ. मधुकर लेंगरे, बार्शी पोलीस उपनिरीक्षक सिंधू देशमुख, व्यसनमुक्ती केंद्र संचालिका डॉ. पल्लवी तांबारे, स्त्रीरोगतज्ञ डॉ. गौरी गायकवाड, दंत शैल्य चिकित्सक डॉ. समिता गरुडे व संस्थेच्या प्रमुख सदस्य कोमल राहुल वाणी हे प्रमुख पाहुणे म्हणून लाभले.



भारतातील पहिल्या महिला शिक्षिका सावित्री बाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. प्रास्ताविक मोनिका सोनवणे यांनी केले. पाहुण्यांचा परिचय प्रगती वाणी यांनी करुन दिला. एमआयटी रेल्वे इंजिनिअरिंग कॉलेज माहिती महेश केवडकर यांनी दिली. कार्यक्रमाचे अध्यक्ष व प्रमुख पाहुणे यांचा सत्कार करण्यात आला. विविध क्षेत्रात काम करणाऱ्या यशस्वी महिलांच्या सन्मान प्रमुख पाहुणे यांच्या हस्ते करण्यात आला. त्यामध्ये अॅड. वंदना जगनाडे, भूमी उपअधीक्षक रेश्मा तांबारे, केंद्रीय मुख्याध्यापिका चित्रा उकिरडे, प्रकल्प अधिकारी रेश्मा पठाण, महिला हेड कॉन्स्टेबल आरती कसबे, डॉ. रोहिणी मुल्ला, महसूल सहाय्यक स्मिता कोल्हे, लोकमंगल बँक व्यवस्थापक वर्षा शिंदे, अॅड. वंदना चंदनशिवे, कनिष्ठ सहाय्यक शितल गिराम, वीर पत्नी गौडगाव रोहिणी काकडे, आदर्श महिला गीता भोजने, आरोग्यसेविका स्वप्नाली उकिरडे, बार्शी महिला पोलीस रेश्मा सुतार, परिचारिक डॉ. जगदाळे मामा हॉस्पिटल जयश्री मानूरकर, आदर्श माता प्रतिभा नलवडे, महावितरण ऑपरेटर मोनिका जाधव/आटकळे, सफाई कर्मचारी बार्शी नगरपरिषद अनिता साठे, वाहक एसटी डेपो करुणा शिवशरण, कृषी समिती अनुराधा इनामदार यांचा सन्मान करण्यात आला.

याप्रसंगी पाच बचत महिला गटांचाही सन्मान करण्यात आला. त्यामध्ये सखी बचतगट बार्शी अध्यक्षा अश्विनी शेलार, ध्यास महिला पतसंस्था बार्शी अध्यक्ष रचना पाटील, वीरभद्र उत्पादक महिला बचतगट बार्शी अध्यक्षा आशादेवी स्वामी, आशा महिला स्व. सहाय्यता महिला बचतगट बार्शी, अध्यक्षा रेखा विधाते, निसर्ग महिला उत्पादित गट सासुरे अध्यक्षा वैशाली आवारे या बचतगटातील सर्व महिलांचा सन्मान करण्यात आला. याप्रसंगी सिंधुताई देशमुख, डॉ. रेश्मा तांबारे, डॉ. गौरी गायकवाड त्यांची मनोगती झाली. कार्यक्रमाचे अध्यक्षीय भाषण प्रा. डॉ. मधुकर लेंगरे यांनी केले. सूत्रसंचलन प्रा. माधुरी शिंदे व शितल उलभगत यांनी केले. आभार संस्थेच्या प्रमुख सायरा मुल्ला यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष राहुल वाणी व सचिव विजयकुमार दिवाणजी यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व सदस्य महिला सदस्य यांनी परिश्रम घेतले.

# सर्व्हिस रोडवरील अतिक्रमण स्वतःहून काढा अन्यथा कारवाई होणार

● आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांचा इशारा
● विजापूर रोडवरील अतिक्रमणाची पाहणी



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ मार्च-**

विजापूर महामार्गावरील सर्व्हिस रोडवरील अतिक्रमण नागरिकांनी स्वतःहुन काढावे अन्यथा कारवाई करण्यात येईल, असा इशारा आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी दिला आहे.

सोलापूर शहरातील विजापूर नाका ते सैफुल सर्व्हिस रोडवर फळ विक्रेते, भाजीपाला विकणारे तसेच वाळू डेपो इतर अतिक्रमण या ठिकाणी झाले असून आज महापालिका आयुक्त डॉ.सचिन ओम्बासे यांनी पाहणी केली. यावेळी पोलीस उपायुक्त विजय कबाडे,उपायुक्त तैमूर मुलाणी, सहायक आयुक्त शशिकांत भोसले, नगररचना संचालक मनिष भिष्णूरकर, महामार्ग विभागाचे सुतार, राजगुरू, उपअभियंता नीलकंठ मठपती, अतिक्रमण प्रतिबंधक विभागाचे हेमंत डोंगरे, सुफियान पठाण आदी अधिकारी उपस्थित होते. त्यामुळे स्वतःहुन काढावे अन्यथा होणार आहे.

विजापूर नाका ते सैफुल सर्व्हिस रोड वरील रस्त्याच्या दोन्ही बाजूला अनधिकृत खोके, लाकडी खोके, खाद्या पदार्थ, चायनीज गाड्या, कच्चे बांधकाम केलेले गोडावून, लोखंडी खोके असे अतिक्रमण झाले असून ते अतिक्रमण ज्याचे आहे. त्यांनी स्वतःहुन काढून घ्यावे अन्यथा कारवाई करावी लागेल, असा इशारा आयुक्त डॉ.सचिन ओम्बासे यांनी दिला आहे.

# गुन्हेगार भोला हावळे दोन वर्षासाठी तडीपार

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २४ मार्च -**



शहरातील जुना पूना नाका परिसरातील सराईत गुन्हेगार भोला हावळे यास पोलिस उपायुक्त विजय कबाडे यांनी सोलापूर व धाराशिव या दोन जिल्ह्यातून दोन वर्षासाठी तडीपार करण्याचे आदेश दिले. तडीपारीच्या आदेशानंतर हावळे यास ठाणे येथे सोडण्यात आले आहे.

भोलेनाथ उर्फ भोला बलभिम हावळे (वय २४, रा. हांडे प्लॉट, मुख्याध्यापक भवन समोर, जुना पूना नाका, सोलापूर) असे तडीपार करण्यात आलेल्या गुन्हेगाराचे नाव आहे. हावळे याच्याविरुध्द सन २०२० व २०२४ या कालावधीत दंगा करणे, मारामारी करणे, महिला अत्याचार तसेच जातीवाचक शिवीगाळप्रकरणी गुन्हे दाखल आहेत.

त्यामुळे हावळे यास तडीपार करण्याबाबतचा प्रस्ताव जोडभावी पेठ पोलिसांकडून पोलिस उपायुक्त कबाडे यांच्याकडे पाठविण्यात आला होता. त्यास उपायुक्त कबाडे यांनी मंजुरी देत हावळे यास दोन वर्षासाठी सोलापूर व धाराशिव या दोन जिल्ह्यातून तडीपार करण्याचे आदेश दिले.



**सोलापूर : रयत सेवक संघ सातारा, सोलापूर संघ यामध्ये सदस्यपदी शहाजी शेगर शाखा शिंदेवाडी (ता. माळशिरस) यांची निवड झाली. यावेळी रयत शिक्षण संस्था साताराचे माजी सचिव जे. जी. जाधव, रेडे, सोलंकर, भायगुडे व जिल्हा अध्यक्ष धनाजी लेंडवे व सदस्य उपस्थित होते.**

## संक्षिप्त वृत्त



### हरिभाई देवकरण प्रशालेत शहीद दिन

**सोलापूर, दि. २४ मार्च-**

हरिभाई देवकरण प्रशालेच्या मैदानावर हुतात्म्यांचे स्मरण करून शहीद दिन संपन्न झाला. प्रारंभी प्रमुख पाहुणे ९ महाराष्ट्र बटालियनचे सबमेजर कृष्णप्रसाद सपकोटा, हवालदार गोपीनाथ घोडके, वक्ते मल्लिकार्जुन घवाळे, मुख्याध्यापक रविंद्र पानसरे, जेष्ठ पर्यवेक्षक हणमंत मोतीबने, पर्यवेक्षक रणधीर यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले. संगीत विभागातर्फे देशभक्ती गीत सादर केले. प्रास्ताविक पर्यवेक्षक औदुंबर सर्वगोड यांनी केले. प्रशालेतील विद्यार्थ्यांनी मनोगते व्यक्त केली. प्रमुख वक्ते मल्लिकार्जुन घवाळे यांनी आपल्या मनोगतातून शाहिद दिनाचे महत्त्व सांगितले. मुख्याध्यापक रविंद्र पानसरे यांनी देशभक्ती गीत सादर केले. जेष्ठ पर्यवेक्षक हणमंत मोतीबने यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन एच.एम. नलावडे तर आभार आभार भक्ती माळवदकर यांनी मानले.



### ग्रंथालयाच्या दुसऱ्या हप्ताचे अनुदान द्या; उपजिल्हाधिकाऱ्यांना दिले निवेदन

**सोलापूर, दि. २४ मार्च-**

राज्यातील ११९५० सार्वजनिक ग्रंथालयाचे मार्च महिन्यात मिळणारे दुसऱ्या हप्ताचे अनुदान न मिळाल्याने ग्रंथालयात काम करणाऱ्या २०३२१ कर्मचाऱ्यांवर कुटुंबाची उपजीविका भागविण्यावर संक्रांत आली आहे. ग्रंथालय अनुदानाची फाईल अर्थ खात्याकडे मंजूरी असून त्यांनी मंजुरी दिल्यानंतर उच्च व तंत्रशिक्षण मंत्री यांचे उपसचिव अमोल मुत्याल हे निधी वितरण आदेश काढतील त्यानंतर ग्रंथालयांना अनुदान मिळणार आहे यासाठी ३१ मार्च पर्यत अनुदान ग्रंथालयाच्या खात्यात जमा होण्यासाठी जिल्हाधिकारी यांच्या मार्फतचे निवेदन उपजिल्हाधिकारी अमृत नाटेकर यांना देण्यात आले. यावेळी सार्वजनिक ग्रंथालय कर्मचारी विकास परिषदेचे अध्यक्ष सदाशिव बेडगे सचिव धोंडिराम जेवूरकर, सहसचिव नरसिंह मिसालोलू, सिध्दाराम हालकुडे आदी उपस्थित होते.



### चैत्र पालवीनिमित्त मेहता शाळेत सुरेल गीतांचा कार्यक्रम

**सोलापूर, दि. २४ मार्च-**

कै.वि. मो. मेहता माध्यमिक शाळेत चैत्र पालवी या सुरेल गीतांचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. गुढीपाडवा हा मराठी वर्षाचा पहिला दिवस मानला जातो. या दिवसापासून नवीन शालिवाहन संवत्सर सुरू होते. चैत्राचा उदय साऱ्यांनाच नवी उमेद नवा उत्साह घेऊन येतो. या नवीन वर्षाच्या स्वागतानिमित्त आपल्या प्रशालेतील बालकलाकारांनी पावसामुळे निसर्गसृष्टीत होणारी आनंदाची बरसात आपल्या सुरेल गीतातून सादर केली. 'घन बरसत आले' ही संकल्पना यावर्षी साकारली गेली. या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून प्रा. सुनील इंगळे ( तसेच सुजित बनसोडे (प्रसारण अधिकारी, सोलापूर आकाशवाणी) उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन, सरस्वती पूजन व गौरी पूजनाने झाली. तसेच मान्यवरांच्या हस्ते गुढी उभारून त्याची पूजा करण्यात आली. याप्रसंगी सुनील इंगळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमात शाळेचे विद्यार्थी, संगीत शिक्षिका रमा कुलकर्णी व धनश्री विधाते यांनी पावसावर आधारित गाणी सादर केली. बरसो रे मेघा मेघा, हिरवा निसर्ग हा भवतीने, अधीर मन झाले, अग्गोबाई ढग्गोबाई, गारवा, इत्यादी प्रकारची गाणी सादर करण्यात आली. त्याचबरोबर सुंदर निसर्ग नृत्य लक्षवेधी ठरले. कार्यक्रमास शाळा समिती अध्यक्ष राजेश पटवर्धन व सुमेधा पटवर्धन, दळवे उपस्थित होते. प्रास्ताविक मुख्याध्यापिका श्रुती बागेवाडी यांनी केले तर सूत्रसंचालन व आभार ओंकार पुजारी व प्रणिती म्हेत्रे यांनी केले. यावेळी शिक्षिका मीनाक्षी भाटवडेकर उपस्थित होते.

सदस्यता अभियान यशस्वी केल्यानंतर

# सोलापूर भाजपाच्या संघटनात्मक निवडीस प्रारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ मार्च-**

भारतीय जनता पक्षाने संपूर्ण देशात आपली राष्ट्रीय सदस्यत्व मोहीम सुरू केली होती. याच धर्तीवर सोलापूर शहरातही ही मोहीम मोठ्या प्रमाणात राबवून आपले दिलेले टार्गेटही पूर्ण केले. यामध्ये स्थानिक भाजपा पदाधिकारी आणि स्थानिक लोकप्रतिनिधींनी मोठे योगदान दिले. या सदस्यता नोंदणीनंतर आता संघटनात्मक नियुक्त्या जाहीर केल्याची माहिती भाजपाचे शहराध्यक्ष नरेंद्र काळे यांनी दिली.

या मोहिमेची सुरुवात नवी दिल्लीत झाली आणि यानंतर ती देशभरात सुरू करण्यात आली. या मोहिमेद्वारे सदस्यत्वाची सुविधा देण्यासाठी भाजपने ८८०००२०२४ हा मिस कॉल नंबर दिला होता. या नोंदणीत सोलापुरातूनही प्रतिसाद मिळाला




असल्याचे काळे यांनी सांगितले. तर भाजपा शहर-जिल्ह्यातील संघटन पर्व अभियान अंतर्गत होणाऱ्या निवडणुकांसाठी खालील मंडल निवडणूक अधिकाऱ्यांच्या नावांची घोषणा करण्यात आली आहे. यामध्ये उत्तर पूर्व अनिल कंदलगी, मध्यवर्ती उत्तर संगीता जाधव, उत्तर पश्चिम जय साळुंके, मध्य पूर्व प्रशांत फत्तेपुरकर, मध्यवर्ती मध्य प्रवीण दर्गो पाटील, मध्य पश्चिम श्रीनिवास करली, दक्षिण पूर्व अनंत जाधव, दक्षिण पश्चिम, रुद्रेश बोरामणी अशा नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. तर संजय कोळींची शहर निवडणूक अधिकारी म्हणून जबाबदारी देण्यात आल्याची माहिती काळे यांनी सांगितले.



## किरण माशाळकर यांना समाजरत्न पुरस्कार

**सोलापूर, दि. २४ मार्च -**

स्त्री शक्ती फाऊंडेशनच्या संस्थापिका तथा अध्यक्षा किरण नारायण माशाळकर यांना शिवराणा युवा प्रतिष्ठानच्यावतीने राजमाता जिजाऊ समाजरत्न पुरस्कार प्रदान करण्यात आला.

हा पुरस्कार वितरण सोहळा येथील शिवस्मारक सभागृहात झाला. शहर उत्तरचे आमदार विजयकुमार देशमुख, माजी नगरसेवक विक्रांत वानकर, भाजपाचे शहराध्यक्ष नरेंद्र काळे, प्रतिष्ठानचे अध्यक्ष रवी कोटमाळे यांच्या उपस्थितीत हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

# दक्षिणमधील शाळांच्या समस्या सोडवा

● आमदार सुभाष देशमुख यांची विधिमंडळात मागणी
● शालेय शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर यांनी घेतली दखल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ मार्च-**

दक्षिण सोलापूर तालुक्यात शालेय शिक्षणासंदर्भात अनेक समस्या प्रलंबित असून, त्यामुळे विद्यार्थ्यांना शिक्षणापासून वंचित राहावे लागत आहे. या पार्श्वभूमीवर, विधिमंडळात शिक्षण विभागाशी संबंधित विविध मुद्दे उपस्थित करून सभागृहाचे लक्ष वेधले. दरम्यान, या त्यांच्या मागणीची दखल शालेय शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर यांनी घेतली.

आ. देशमुखांनी केलेल्या मागणींमध्ये द. सोलापूर तालुक्यातील पटसंख्या कमी असलेल्या शाळांमध्ये शिक्षक नसल्याने, काही शाळा कागदोपत्री सुरू असल्या तरी प्रत्यक्षात मात्र बंद आहेत. त्यामुळे सरकारने तातडीने निर्णय घेऊन या शाळा कार्यान्वित करण्यासाठी आवश्यक पावले उचलावीत. कर्नाटक, महाराष्ट्र सीमावर्ती





भागातील मातृभाषा कन्नड असून, शाळांमध्ये मराठी भाषा अनिवार्य आहे. अशा ठिकाणी कन्नड भाषा शिक्षक उपलब्ध करून दिल्यास, कन्नड व मराठी या दोन्ही भाषांचा समन्वय साधला जाऊ शकतो.

सीमावर्ती भागातील कारखानदारांची एकत्रित बैठक घेऊन या भागातील शाळा दत्तक योजनेतून दत्तक देऊन वापरण्यायोग्य करण्यात. तसेच दक्षिण सोलापूर तालुक्यातील डिजिटल शाळा कारखानदारांना दत्तक देणार का? असाही सवाल यावेळी उपस्थित केला. सोलापूर महानगरपालिका हद्दवाढीनंतर काही शाळा जिल्हा परिषदेतून महापालिकेकडे वर्ग झाल्या.

मात्र, या शाळांच्या दुरुस्तीची जबाबदारी महापालिका आणि जिल्हा परिषद एकमेकांवर टाकत आहेत. त्यामुळे या शाळा किती दिवसात महापालिकेत वर्ग करणार? यावर शालेय शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. त्यांनी विविध बैठकांचे आयोजन करून, तसेच जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून योग्य ती कार्यवाही करण्यात येईल, असे स्पष्ट केले.

# सोलापूरला न्यायाधीशांची गौरवशाली परंपरा : ओक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर. दि.२४ मार्च -**

जिल्ह्याने न्यायव्यवस्थेला अनेक बांगले न्यायाधीश दिले असून सोलापूरला न्यायाधीशांची गौरवशाली परंपरा आहे. असे प्रतिपादन सर्वोच्च न्यायालयातील न्यायमूर्ती अभय ओक यांनी केले.

रविवारी, हुतात्मा स्मृती मंदिरात सोलापूर बार असोसिएशनने आयोजित केलेल्या राज्यस्तरीय वकिलांच्या परिषदेत न्यायमूर्ती ओक हे बोलत होते. यावेळी व्यासपीठावर सोलापूरचे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश मनोज शर्मा, ठाण्याचे कौटुंबिक न्यायाधीश अमित आळंगे, महाराष्ट्र व गोवा बार कौन्सिलचे माजी अध्यक्ष व सदस्य ॲड. मिलिंद थोबडे, सर्वोच्च न्यायालयातील ॲड. डॉ. अरविंद आव्हाड, जिल्हा सरकारी वकील प्रदीपसिंग राजपूत, बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. विजय शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती. घटनेच्या उद्देशिकेला वंदन व मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने या परिषदेचे उद्घाटन करण्यात आले आहे. यावेळी सोलापूर बार असोसिएशनच्या वेबसाइटचे उद्घाटन सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती अभय ओक यांच्या हस्ते संगणकाची कळ दाबून करण्यात आले. यावेळी सोलापूर बार असोसिएशनने वर्षभर राबविलेल्या विविध उपक्रमांची माहिती एलईडी प्रेझेंटेशनच्या माध्यमातून सादर करण्यात आली. यावेळी महाराष्ट्र व गोवा बार कौन्सिलचे सदस्य ॲड. थोबडे म्हणाले, न्यायमुर्ती ओक यांनी अनेक लँडमार्क जजमेंट दिले आहेत. मध्यंतरी कर्नाटकात वानरांचा अकाली मृत्यू झाला. त्यावेळी त्यांनी सुमोटो पिटीशन दाखल करून घेऊन गाइडलाइन्स दिल्या, अंगणवाडी सेविकांना ग्रॅच्युएटी मिळण्याचा हक्क आहे याबाबत त्यांनी जजमेंट दिले असल्याचे सांगितले.

कार्यक्रमास न्यायाधीश, शहर व जिल्हा बरोबर राज्यभरातून मोठ्या संख्येने वकील उपस्थित होते. प्रास्ताविक बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. शिंदे यांनी तर स्वागत ॲड. निदा सैफन यांनी केले. सूत्रसंचालन बार असोसिएशनचे सचिव ॲड. मनोज पामूल व ॲड. श्रेया सापटणेकर यांनी केले. तर आभार खजिनदार विनयकुमार कटारे यांनी मानले.

# वि.मा. मिरासदार यांची आज श्रद्धांजली सभा

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २४ मार्च-**

येथील आपटे उपलप प्रशालेचे माजी मुख्याध्यापक, विद्या विकास मंडळाचे माजी सचिव रा. स्व.संघाचे पूर्व विभाग संघचालक वि. मा. मिरासदार यांचे १७ मार्च रोजी निधन झाले.

त्यांचे अनेक सामाजिक संस्था,संघटनांशी जिव्हाळ्याचे संबंध होते. सर्वांचे वतीने त्यांना आदरांजली अर्पण करण्यासाठी मंगळवार दि. २५ मार्च रोजी



सायंकाळी ५-०० वा.आपटे उपलप प्रशालेमध्ये श्रद्धांजली सभेचे आयोजन केले आहे. तरी उपस्थित राहावे असे आवाहन विद्या विकास मंडळ व परिवाराचे सचिव हरिभाऊ डांगे यांनी केले आहे.

# शिरखुर्म्याचे साहित्य घेण्यासाठी ग्राहकांची मीना बाजारात गर्दी





**सोलापूर : विजापूर वेस ते बेगमपेठमध्ये रमजाननिमित्त मिना बाजारात खरेदीसाठी ग्राहकांची गर्दी होत आहे. हा मार्ग वाहतूकीस बंद करण्यात आला. दुसऱ्या छायाचित्रात सुका मेवाचा बाजाराचे टिपलेले छायाचित्र. (छायाचित्र : केवल तिवारी)**

| रमजान ईदच्या निमित्ताने बाजारात सुकामेव्याचे दर | |
|---|---|
| तपशील | दर प्रतिकिलो रुपयात |
| विलायची | ४ हजार |
| काजू | १ हजार २०० |
| बदाम | १ हजार २०० |
| पिस्ता | २ हजार २०० |
| चारोळी | २ हजार |
| अक्रोड | १ हजार ६०० |
| खजूर | ६०० |
| खोबरे | २४० |
| खसखस | ६०० |
| काबुली | १ हजार |
| साधे शेवया | १०० |
| चुंबल शेवया | २०० |
| फेणी | २०० |

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२४ मार्च-**

मुस्लिम बांधवांचा प्रमुख सण रमजान ईदच्या पार्श्वभूमीवर शहरातील बाजारपेठ विविध साहित्यांनी सजली आहे. रमजान सणामध्ये शिरखुर्म्याला सर्वाधिक महत्त्व आहे. त्याअनुषंगाने शहरातील विजापूर वेस मीना बाजारपेठेत विविध साहित्य तसेच खाद्यपदार्थ आणि सुकामेवा उपलब्ध झाले आहे.

रमजान सणाला केवळ आठ दिवसांचा कालावधी बाकी असून पुढील सोमवारी शहरात मोठ्या उत्साहात रमजान ईद साजरी होणार आहे. त्या अनुषंगाने बाजारपेठेत खरेदीला वेग आलेला दिसत आहे. रमजान ईदच्या निमित्ताने शहरातील मीना बाजारपेठ ही प्रमुख बाजारपेठ मानली जाते. येथे कपड्यांपासून, विविध गृहसजावटीचे साहित्य, खाद्यपदार्थ, सुकामेवा, आदींसह रेडीमेड आणि शूटिंग शर्टिंग कापड देखील खरेदीसाठी उपलब्ध असतात. मुस्लिम बांधव मोठ्या उत्साहात बाजारपेठेतून सणासाठी आवश्यक असणाऱ्या विविध साहित्यांची खरेदी करतात. त्याला काही दिवसांपासून बाजारपेठेत आबालवृद्ध ग्राहकांची वर्दळ वाढत आहे.

सणाला आठ दिवसांचा कालावधी बाकी असल्याने बाजारपेठेत ग्राहकांची गर्दी लक्षात घेता प्रशासनाने विजापूर वेस येथे जाणारे रस्ते बंद केले आहेत. पर्याय मार्गाचा अवलंब करण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.

### सुका मेव्यांच्या दरात वाढ

विलायचीसह सुक्यामेवाचे दर वाढलेले आहेत. दरवर्षी सुकामेव्यांच्या दरामध्ये वाढ होते. यंदाच्या वर्षी देखील थोड्याफार प्रमाणात वाढ झालेली आहे. ग्राहक मीना बाजारमध्ये विश्वासाने या साहित्यांची खरेदी करतात. यंदा देखील बाजारपेठेत ग्राहकांची खरेदीसाठी गर्दी होत आहे. शेवटच्या टप्प्यात खरेदीसाठी ग्राहक मोठ्या प्रमाणात बाजारामध्ये येतात.

**- सादिक मर्चंट,**
**सुकामेव्यांचे विक्रेते मीना बाजार**

### खरेदीसाठी महिलांची गर्दी

रमजान ईद सणामध्ये शिरखुर्म्याला सर्वाधिक महत्त्व आहे. मुस्लिम बांधव एकमेकांच्या घरी गेल्यानंतर त्यांना शिरखुर्मा दिला जातो. हिंदू बांधव देखील मुस्लिम बांधवांच्या घरी ईदच्या शुभेच्छा देतात. तेव्हा त्यांना शिरखुर्मा दिला जातो. यासाठी दूध, शेवया, बदाम, काजू, चारोळे, खसखस असे विविध सुकामेव्यांची आवश्यकता असते. विविध सुकामेवा आणि शेवया घेण्यासाठी बाजारात महिलांची तसेच आबालवृद्धांची गर्दी होत असल्याचे दिसून येत आहे.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : विवेक कृष्णाजी घळसासी. ● समूह मुख्य संपादक : दिलीप यशवंत पेठे.● मुख्य संपादक :प्रशांत वसंतराव माने दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. E-mail starunbharatgmail.com. ● Website:http://dainiktarunbharat/ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## सोलापुरात गुरुवारी नोंदणीकृत विश्वस्तांसाठी कार्यशाळा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ मार्च-**

धर्मदाय आयुक्त कार्यालयाच्या वतीने गुरुवार दि.२७ मार्च २०२५ रोजी सकाळी ९.३० ते दु.२ वाजेपर्यंत डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृह, सोलापूर येथे नोंदणीकृत विश्वस्तांसाठी कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे.

महाराष्ट्रात नविन सरकार स्थापन झालेपासून मुख्यमंत्री यांनी संदर्भाकीत शासन निर्णयान्वये ‘‘क्षेत्रीय कार्यालयांसाठी १०० दिवसांचा कृति आराखड्याच्या‘‘ अनुषंगाने क्षेत्रीय शासकीय व निमशासकीय कार्यालयांसाठी १०० दिवसांसाठी ७ कलमी कृति आराखडा दिले आहे. सुकर जीवनमान मधील नागरिकांना मिळणाऱ्या सेवा जास्तीत जास्त सुलभ करण्याच्या दृष्टीने प्रचलित कामकाजाच्या पध्दतींचे पुनर्विलोकन करुन प्रशासकीय कार्यपध्दतीमध्ये किमान दोन सेवा अतिशय सुलभ पध्दतीने द्याव्यात. नागरिकांचे दैनंदिन जीवन सुकर व्हावे याकरीता सातत्याने प्रयत्न करावेत. या मुद्दयावर प्रभावी कार्यवाही करण्यातबाबत निर्देश दिले. शासन निर्णयाच्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्य मुंबईचे धर्मादाय आयुक्त अमोघ कलोती व पुणे धर्मादाय सहआयुक्त यांच्या निर्देशानुसार या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यशाळेत संस्था नोंदणी अधिनियम, १८६० व महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० अन्वये विश्वस्तांना दाखल करण्यात येणाऱ्या प्रकरणात विविध तज्ञामार्फत मार्गदर्शन करण्यात येणार आहे. या कार्यशाळेस जास्तीत जास्त संख्येने विश्वस्तांनी उपस्थित राहावे, असे आवाहन सोलापूर विभागाचे धर्मादाय उपआयुक्त प्रविण कुंभोजकर यांनी केले आहे.




https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

सोलापूर तरुण भारत


## ▶▶ संक्षिप्त वृत्त...

### घराजवळ कोंबड्या आल्याचे विचारल्याने महिलेस मारहाण

**सोलापूर, दि. २४ मार्च -**

घराजवळ कोंबड्या आल्याचे विचारल्याने महिलेस मारहाण करून जखमी करण्यात आले. ही घटना बुऱ्हाणपूर (ता. अक्कलकोट) येथे २३ मार्च रोजी मध्यरात्रीच्या सुमारास घडली.उर्मिला अमोल भालेराव (वय ३६) असे जखमी महिलेचे नाव असून त्यांच्यावर सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात उपचार सुरु आहेत. २३ मार्च रोजी मध्यरात्रीच्या सुमारास राहत्या घराजवळ कोंबड्या आमच्या घराजवळ का येतात असे उर्मिला यांनी विचारले असता बसवंत चंदु कांबळे व इतर ५ जणांनी मिळून उर्मिला यांना लाथाबुक्क्याने तसेच लाकडाने मारहाण करून जखमी केले. उर्मिला यांना उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.



### हायवेचे काम करताना सळई अंगावर पडल्याने दोघे जखमी

**सोलापूर, दि. २४ मार्च -**

दुधनी (ता. अक्कलकोट) येथे हायवेचे काम करीत असताना अंगावर लोखंडी सळई पडल्याने दोन तरूण जखमी झाले. अबुनलहा (वय २०) आणि जमिर इस्लाम (वय २८, दोघे रा. पश्चिम बंगाल) अशी जखमींची नावे असून त्यांना उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. २४ मार्च रोजी दुपारी दुधनी पासून १० किमी अंतराव अबुनलहा व जमिर हे दोघे हायवेचे काम करीत होते. त्यावेळी अंगावर लोखंडी सळई पडून त्यांच्या डोक्यास जबर मार लागला. त्यामुळे दोघांना उपचारासाठी मित्र इमाम हुसेन याने सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.




### गच्चीवरील ग्रीलमधून पडून दीड वर्षाचा बालक जखमी

**सोलापूर, दि. २४ मार्च -**

गच्चीवरील ग्रीलमधून पडून दीड वर्षाचा बालक जखमी झाला. खालीद हुसेन नदाफ (वय दीड वर्ष, रा. कुमठेगाव, ता. उत्तर सोलापूर) असे जखमी बालकाचे नाव आहे. २३ मार्च रोजी सायंकाळी राहत्या घरातील गच्चीवर खेळत असताना ग्रील मधून खाली पडून खालीद हा जखमी झाला. त्यामुळे त्याला वडील हुसेन यांनी उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### लोंबकळणाऱ्या वायरचा शॉक लागून ५ वर्षीय बालक जखमी

**सोलापूर, दि. २४ मार्च -**

शहरातील लष्कर परिसरात लोंबकळणाऱ्या वायरला पकडल्याने शॉक लागून ५ वर्षीय बालक जखमी झाला. महेश सुनिल मन्सावाले (वय ५, रा. लष्कर, सोलापूर) असे जखमी बालकाचे नाव आहे. २४ मार्च रोजी सायंकाळी राहत्या घराजवळ खेळत असताना महेश याने लोंबकळणाऱ्या वायरला पकडले. त्यावेळी त्याच्या डाव्या हाताला शॉक लागून तो खाली पडून जखमी झाल्याने त्याला उपचारासाठी काका मेघराज परदेशी यांनी उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.



### दक्षिण पंचायत समितीची २८ मार्चला आमसभा

**सोलापूर, दि. २४ मार्च-**

दक्षिण सोलापूर तालुक्यांतर्गत २०२४-२५ च्या आमसभेचे आयोजन दि. २८ मार्च २०२५ रोजी सकाळी १०.०० वाजता श्री शिवछत्रपती रंगभवन सभागृह, रंगभवन चौक, सोलापूर येथे केलेले आहे. तरी तालुक्यातील तमाम आजी, माजी खासदार, आमदार, सभापती, उपसभापती, जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, सरपंच, ग्रामपंचायत सदस्य तसेच सर्व स्थानिक स्वराज्य संस्थेचे, संघटनेचे अध्यक्ष, पदाधिकारी, तालुक्यातील सर्व सज्ञान नागरिक यांनी आम सभेस उपस्थित राहण्याचे आवाहन दक्षिण पंचायत समितीचे गट विकास अधिकारी शंकर कवितके यांनी केले आहे.

# सोलापुरात वादळी वारे, विजांच्या कडकडाटासह अवकाळी पाऊस

**● रस्ते झाले जलमय, उकाड्याची तीव्रता कमी ● आंबा, द्राक्ष बागायतदारांना भीती**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ मार्च-**

गेल्या दोन दिवसांपासून वातावरणात बदल झाला असून, आभाळ येत असल्याने अवकाळी पाऊस येण्याचा अंदाजही हवामान विभागाने वर्तविला होता. त्या अनुषंगाने (दि. २४) दुपारीच तीनच्या सुमारास अवकाळी पावसाने सोलापूरसह धाराशिव जिल्ह्याच्या काही भागात हजेरी लावली.



दरम्यान, या पावसाबरोबर वादळी वारे, विजांचा कडकडाट होवू लागल्याने आता जास्त पाऊस पडतो की काय? अशी भीती आंबा आणि द्राक्ष बागायतदारांना वाटत होती. मात्र अर्धा पाऊण तासच पावसाची रिपरिप होती; यामुळे बागायदारांनी सुटकेचा श्वास सोडला. दुपारी ३ नंतर सोलापूर शहरात अचानक पावसाचे मोठे थेंब आले आणि पावसानेही लगेच सुरूवात केली. जवळपास अर्धातास पावसाने हजेरी लावल्याने रस्ते जलमय झाले. या पावसामुळे वातावरणात उकाडा नाहीसा होवून गारवा निर्माण झाल्याने सर्वांना हायसे वाटले. शहरात अनेक चिमुकल्यांनी आणि शालेय विद्यार्थ्यांनी या पावसात भिजून आनंद लुटला. वादळी वारे आल्याने शहरातील रस्त्यांवर झाडांच्या पानाचाच थर दिसून आला. अनेक दिवसांनंतर पहिला अवकाळी पाऊस पडल्याने सर्वत्र घाण पाण्याचेच साम्राज्य होते. मार्च महिन्यापासूनच तापमान वाढत गेले. गेल्या आठवड्यात तर ४१.१ अंश सेल्सियसपर्यंत सोलापूरचे तापमान गेल्याने दुपारी रस्ते ओस पडत होते. आज सकाळपासून वातावरणात बदल दिसून येत होता. कधी शिराळ तर कधी ऊन असा खेळ सुरू असताना अवकाळी पावसाने मध्येच येवून धिंगाणा घातला. तरीही आजचे तापमान ३८.९ अंशी सेल्सियस इतके नोंदवले गेले आहे.

या पावसामुळे उशिराने छाटणी केलेल्या द्राक्षबागा, आंबा बागा, काढणीला आलेली ज्वारी, गहू आदींना फटका बसण्याची भीती जाणकार शेतकऱ्यांनी व्यक्त केली होती. मात्र पावसाच्या लहान-मोठ्या सरी पडून पाऊस बंद झाल्याने शेतकरी बांधवांनी समाधान व्यक्त केले. तरीही वातावरणात निवळेपर्यंत अवकाळी पावसाचे भय या शेतकऱ्यांना आहेच.

## अक्कलकोटच्या लोकअदालतीमध्ये दोन हजार ३७६ प्रकरणे निकाली

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २४ मार्च -**




अक्कलकोटयेथीलन्यायालयात दिनांक २२ मार्च २०२५ रोजी राष्ट्रीय लोकअदालतीत दाखलपूर्व व न्यायालयीन प्रलंबित अशी एकूण २३७६ प्रकरणे निकाली काढण्यात आली, तसेच विविध विभागाची सुमारे १ कोटी ९१ लाख इतक्या रकमेची तडजोड करण्यात आली, अशी माहिती तालुका विधी सेवा समितीचे अध्यक्ष एम.एम. कल्याणकर यांनी दिली.

राष्ट्रीय लोकअदालतीसाठी जिल्हा विधी सेवा समितीचे अध्यक्ष तथा प्रमुख जिल्हा न्यायाधीश मनोज एस. शर्मा, सचिव यु. पी. देवर्षी यांचे मार्गदर्शनाखाली दोन पॅनलची स्थापना करण्यात आली होती. सदर पॅनलमध्ये दिवाणी न्यायाधीश एम.एम. कल्याणकर आणि सह दिवाणी न्यायाधीश श्रीमती एन. ए. एल. शेख यांनी पॅनल प्रमुख म्हणून काम पाहिले. तसेच ॲड. सौ. एस. डी. बाके यांनी पॅनल विधीज्ञ म्हणून काम पाहिले. सदर लोकअदालीतमध्ये ११५ प्रलंबित प्रकरणे व २२६१ दाखलपूर्व प्रकरणे निकाली काढण्यात आली.

सदर लोकअदालती मध्ये विधीज्ञ संघाचे अध्यक्ष ॲड. सौ.हल्ले, सरकारी वकील सरवदे, कु. कांबळे, विधीज्ञ संघाचे सदस्य ॲड.सापटणेकर, ॲड. मंगरुळे, ॲड. उडचाण, ॲड. हर्डीकर व इतर विधीज्ञ, पंचायत समितीचे गट विस्तार अधिकारी संजय पाटील, तसेच अक्कलकोट न्यायालयाचे सहा.अधिक्षक किशोर रणदिवे, न्यायालयीन कर्मचारी डोके, कांबळे, रोहित मुळे, सौ बमचंडे, किणगी, मोरे, आळगुंडगी, नदाफ, पठाण, सौ.पटेल, शहाबादे, कुंभार, आहेरकर, शेख उपस्थित होते. तसेच,न्यायालयीन कर्मचारी, बँक कर्मचारी, ग्रामपंचायत कर्मचारी, पक्षकार उपस्थित होते.

## जिल्हा प्रशासन घेणार अधिकाऱ्यांसाठी नवीन गाड्या

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ मार्च-**

सोलापूर जिल्ह्यातील काही उपजिल्हाधिकारी, प्रांत, तहसीलदार यांच्या गाड्या जुन्या झालेल्या आहेत. त्यामुळे त्या निर्लेखित करण्यात आल्या आहेत. या अधिकाऱ्यांना आता प्रशासकीय कामकाजासाठी नव्या गाड्या खरेदी करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी आज (दि. २४) दिली.



त्यासाठी जिल्हा नियोजन मंडळातून जवळपास ८० लाख रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. या अंतर्गत सध्या ६ गाड्या खरेदी करण्यात येणार आहेत. गाड्या खरेदीसाठी जिल्हाधिकारी यांनी परवानगी दिली आहे. या गाड्या अप्पर जिल्हाधिकारी, प्रांताधिकारी, आणि उत्तर तहसीलदार, दक्षिण तहसीलदार यांच्यासाठी या नव्या गाड्या खरेदी करण्यात येणार आहेत. त्यासाठी प्रत्येक गाडीसाठी ११ लाख ६६ हजार रुपयांची सध्या तरतूद करण्यात आली असून, त्यांच्या त्यांच्या पातळीवर गाडीची निवड करुन गाडी खरेदी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. तहसीलदार, प्रांताधिकाऱ्यांना प्रशासकीय कामासाठी सातत्याने फिल्डवर जावे लागते. ग्रामीण भागातील शेतरस्ते, गावठाण विषय व इतर विषयांच्या केसेस तसेच गोष्टीच्या पाहणीसाठी तालुका स्तरावरही दौरे करावे लागतात. त्यामुळे शासकीय गाडी आवश्यक असते. त्यासाठी तातडीने या गाड्या खरेदी करण्याच्या सूचना वरिष्ठ पातळीवरुन देण्यात आल्या आहेत. लवकरच या गाड्यांची खरेदी पूर्ण होणार असून, आता अधिकाऱ्यांच्या दिमतीला नव्या कोऱ्या गाड्या मिळणार आहेत.

## बाजार समितीचा रणसंग्राम आजपासून; मतदारसंघनिहाय उमेदवारांची चाचपणी सुरु

**● आजपासून अर्ज विक्री ● पॅनलसाठीही हालचाली गतिमान**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ मार्च-**

सोलापूरच्या श्री सिद्धेश्वर कृषी उत्पन्न बाजार समिती निवडणुकीच्या रणसंग्रामासाठी आजपासून अर्ज विक्री प्रक्रियेला सुरुवात होणार आहे. यासाठी मतदारसंघनिहाय उमेदवारांची चाचपणी आणि पॅनलसाठीही हालचाली गतिमान झाल्या आहेत. मंगळवारी २५ मार्चपासून अर्ज विक्री सुरु होणार आहे. २७ एप्रिल रोजी सकाळी ८ ते सायंकाळी ५ या वेळेत मतदान होणार असून, मतमोजणी २८ एप्रिल रोजी होणार असल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी किरण गायकवाड यांनी सांगितले.



उमेदवारासाठी सूचक आणि अनुमोदक त्याच मतदारसंघातील असणे बंधनकारक असून, नामनिर्देशन पत्र दाखल करण्यासाठी डिपॉझिट रक्कम निश्चित करण्यात आली आहे. सर्वसाधारण गटासाठी पाच हजार रुपये तर राखीव उमेदवारासाठी एक हजार रुपये ही रक्कम असणार आहे. अर्ज माघारी घेताना स्वत: उमेदवार असणे बंधनकारक आहे. सूचकाद्वारे अर्ज माघारी घ्यायचा असेल तर त्यासाठी प्रतिज्ञापत्र सादर करणे बंधनकारक असल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी गायकवाड यांनी सांगितले. एकूण १८ संचालकांसाठी ही निवडणूक होत असून, सहकारी संस्था ११, ग्रामपंचायत ४, व्यापारी २, हमाल-तोलार १ अशा जागा आहेत. मतदार यादीसाठी किंमत ठरविण्यात आली असून, सहकारी संस्था मतदार यादीसाठी २०० रुपये, ग्रामपंचायत १०० रुपये, व्यापारी २०० रुपये, हमाल-तोलार १०० रुपये, पोटनियमासाठी १०० रुपये असे दर असणार आहेत.

**निवडणुकीचा तपशील**

| मतदारसंघ | मतदार संख्या |
|---|---|
| सहकारी संस्था | १,८९५ |
| ग्रामपंचायत | १,१७६ |
| व्यापारी | १,२७६ |
| हमाल-तोलार | १,०८४ |

**● पूर्वी घेतलेले अर्जही ग्राह्य**



यापूर्वी निवडणूक जाहीर झाली होती. त्यावेळी एक दिवस अर्जाची विक्री करण्यात आली आहे. तो दिवस धरुन पाच दिवस नामनिर्देशन पत्रांची विक्री करण्यात येणार आहे. पूर्वी विकत घेतलेला अर्जही आताच्या निवडणुकीसाठी ग्राह्य धरण्यात येणार असल्याचे किरण गायकवाड यांनी सांगितले.

**● गैरसोय होऊ देणार नाही**

उमेदवारी अर्जांची विक्री, उमेदवारी दाखल करणे यासाठी विशेष व्यवस्था करण्यात आली असून, कोणाचीही गैरसोय होऊ देणार नाही. याची दक्षता घेऊन तसे नियोजन करण्यात आले आहे. पॅनलनिहाय उमेदवारी अर्ज एकदम दाखल होणार असतील तर त्या दिवशी योग्य ती व्यवस्था करण्यात येणार असल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी किरण गायकवाड यांनी सांगितले.

# ४०० परिचारिकांना मिळणार गणवेश अन् दिवाळी भत्ता

**● जि.प.च्या अर्थसंकल्पात सीईओ कुलदीप जंगम यांचे आरोग्य विभागास झुकते माप**
**● वाढीव निधीची तरतूद करून ग्रामीण जनतेच्या आरोग्यास प्राधान्य**

**तभा वृत्तसेवा ,**
**सोलापूर, दि. २४ मार्च,**




सन २०२५-२६च्या अर्थसंकल्पात १० लाख रूपयांचा विशेष निधी ठेवल्याने जिल्ह्यातील चारशे अर्धवेळ परिचारिकांना गणवेश अन् दिवाळी भत्ता मिळणार आहे. जिल्ह्यातील अर्धवेळ परिचारिकांना दिवाळी भत्ता आणि गणवेश मिळावे, अशी मागणी परिचारिका संघटनेकडून सातत्याने होत होती. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी या मागणीचा विचार करून आरोग्य विभागाच्या मागील वर्षीच्या मूळ तरतुदीपेक्षा एक कोटी १२ लाख रुपयांची वाढ करुन पाच कोटी १० लाख निधी तरतुद केली आहे.

सीईओ जंगम यांनी ग्रामीण भागातील नागरिकांना आरोग्याच्या सोईसुविधा उपलब्ध करून देण्यासाठी नवीन योजना सुरू केली आहे. ग्रामीण भागातील रूग्णांना आरोग्याच्या समस्या उद्‌भवू नयेत यासाठी जिल्हा प्रशासन दक्ष असल्याचे दिसून येते.



सीईओ जंगम यांनी वाढीव निधींची तरतूद करून आरोग्य विभागास प्राधान्य दिल्याचे दिसून येते. या निधीतून महिलांना बाळंतपणासाठी दवाखान्यात घेऊन जाण्यासाठी आशांना किट उपलब्ध करुन देण्यासाठी ४० लाख निधी देण्यात येणार आहे. तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र औषधे खरेदीसाठी १० लाख, स्मार्ट प्राथमिक आरोग्य केंद्र करण्यासाठी ५० लाखांचा निधी ठेवला आहे.

सर्पदंश व श्वानदंश लस खरेदीसाठी ५० लाख, गरोदर महिलांसाठी जनईत्री कार्ड, युनिवर्सल डिस्चार्जसाठी २० लाख, दुर्धर आजारावरील उपचारासाठी २० लाख, प्राथमिक आरोग्य केंद्र जैव घनकचरा विल्हेवाट लावण्यासाठी ३० लाख, प्राथमिक आरोग्य केंद्रात ई ओपीडी प्रणालीसाठी १० लाख तसेच वीज, पाणी, दूरध्वनी, इंधन, कुटुंबकल्याण शस्त्रक्रिया , सर्जन वाहन इंधनसाठी १ कोटी २५ लाख निधी असे एकूण १ कोटी १२ लाख वाढीव निधीसह ५ कोटी १० लाख निधीची तरतुद करण्यात आली आहे.

आरोग्य विभागाकडून यंदा रूग्णांच्या आरोग्य पार्श्वभूमीला महत्व देण्यात आले आहे. गर्भवती महिलांवर उपचार करताना त्यांच्या सर्व तपासण्या व उपचाराची माहिती जनईत्री कार्डमध्ये असणार आहे. युनिवर्सल कार्डमध्ये प्रत्येक रूग्णांची माहिती ऑनलाईन नोंद करण्यात येणार आहे. यामध्ये रूग्णांची इतर आजार व उपचाराची माहीती असणार आहे . तसेच ईओपीडी प्रणालीद्वारे रूग्णांची नोंद ठेवण्यात येणार असून भविष्यात इतर आरोग्याच्या उपचारासाठी मदत होणार आहे.

**नाविन्यपूर्ण योजनांसाठी निधी**

- अर्धवेळ परीचारिका गणवेश व दिवाळी भत्ता : १० लाख
- जनईत्री कार्ड व युनिवर्सल डिस्चार्ज कार्ड : २० लाख
- स्मार्ट आरोग्य केंद्र : ५० लाख
- गर्भवती महिलांना बाळंतपणासाठी दवाखान्यात नेणेसाठी आशांना मानधन : ४० लाख
- ई ओपीडी प्रणाली : १० लाख

**मागील योजनांसाठी निधी**

- प्राथमिक आरोग्य केंद्र औषधे खरेदी : १० लाख,
- श्वानदंश व सर्पदंश लस खरेदीसाठी : ५० लाख,
- वाहन इंधन खर्चः १ कोटी २५ लाख,
- दुर्धर आजार उपचार : २० लाख,
- जैव घनकचरा विल्हेवाट : ३० लाख,

**ईओपीडी, जनईत्री, युनिवर्सल डिस्चार्ज कार्ड**



सीईओ कुलदीप जंगम यांनी अर्धवेळ परिचर यांना दिवाळी बोनस आणि गणवेश मिळावे, यासाठी बजेट मध्ये निधीची तरतुद केली आहे. तसेच ई ओपीडी प्रणाली, स्मार्ट आरोग्य केंद्र, जनईत्री व युनिवर्सल डिस्चार्ज कार्ड व आशांना मदत नाविन्यपूर्ण योजना सुरू करण्यात आली आहेत. आरोग्य विभागासाठी वाढीव निधीची तरतूद केली आहे.

**- डॉ. संतोष नवले,**
**जिल्हा आरोग्य अधिकारी**

## लोकअदालतीमध्ये वाहतूक नियम उल्लंघन करणाऱ्या ४ हजार वाहन चालकांनी भरला ४० लाखांचा दंड

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर. दि. २४ मार्च -**

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सोलापूर व वाहतूक नियंत्रण पोलीस यांचे संयुक्त विद्यमाने आयोजित लोक अदालत मध्ये वाहतूक नियम उल्लंघन करणाऱ्या ४०१० वाहन चालकांनी ४० लाख ६१ हजार ५०० रुपयांचा दंड भरला.

वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकांवर ई-चलानव्दारे कारवाई करण्यात येते. ज्या वाहनधारकांनी वाहतूक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन धा दंडाची तडजोडीची तडजोड रक्कम अद्याप पावेतो भरलेली नव्हती अशा वाहन धारकांना एसएमएसव्दारे नोटीस/सुचना देण्यात आली होती. त्याचप्रमाणे मुदतीत दंड भरणा न केलेले एकूण १०,००० वाहन चालकांना समन्स काढण्यात आलेले होते व समन्स निघूनही दंड न भरलेल्या ७०० वाहनचालकांचे नावे वॉरंट काढण्यात आले होते.



पोलिसांनी केलेल्या आवाहनानुसार लोकअदालतीमध्ये ४०१० वाहन चालकांनी स्वतःहून दंडाची रक्कमेचा भरणा केला आहे आणि अशा वाहनधारकांकडून ४० लाख ६१ हजार ५०० रुपये इतकी रक्कम भरणा करुन घेण्यात आली. नागरिकांची गैरसोय होवू नये व तात्काळ रक्कमेचा भरणा होण्याकरीता शहर वाहतूक पोलीस शाखेकडून पोलीस अंमलदार यांना अद्यावत मशिनसह सदर टिकाणी उपस्थित ठेवण्यात आलेले होते. त्यामुळे बरीच मोठी सोय झाली.


समन्स स्विकारुन देखील लोकअदालत प्रक्रियेला प्रतिसाद दिला नाही. अशा वाहनचालकांना वॉरंट काढण्यात येणार आहे. वाहनचालकांनी त्यांच्या वाहनांवर असलेला दंड त्वरीत भरावा. जर दंड भरला नाही तर अशा वाहन चालकांचे खटल मा. न्यायालयात पाठविले जातील व आपणास न्यायालयीन प्रक्रियेला सामोरे जावे लागेल. तरी आपण आपल्या वाहनावरील दंड त्वरीत नजिकच्या ट्राफिक कार्यालयात तसेच कोणत्याही ट्राफिक अंमलदाराकेड कुठेही भरावा व न्यायालयीन प्रक्रियेतून वाचावे असे आवाहन करण्यात येत आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## ज्ञानामृत आनंदलहरी - १०६६

**शब्दशस्त्रें झाले क्लेश । संतीं मानावा उपदेश ।।**

सहजासहजी कोणी कोणाचे मोठेपण, चांगुलपण मान्य करीत नाहीत. काहीतरी नाव ठेवणे, उणीव काढणे, काहीतरी दोष दाखवणे हा अनेकांचा स्वभाव असतो. निस्वार्थ भावाने दुसऱ्याचे मोठेपण, चांगुलपण मान्य करणा-यांची संख्या नगण्य असते. आपला नित्याचा अनुभव असतो की, बरेच लोक तोंडापुरते गोड बोलतात आणि समोरून बाजूला जाताच ज्याच्याशी गोड बोलले, ज्याचे कौतुक केले किंवा ज्यांच्याबद्दल चांगले बोलले त्याला नाव ठेवतात. स्वतःला समोरच्याचा अनुभव नसला तरीही त्याच्याबद्दल जणू कांही याला अनुभवच आला आहे, अशा अविर्भावात नको ते बोलतात. खरे म्हणजे असा स्वभाव इतरांसाठी तर चांगला नसतोच; पण ख-या अर्थाने अशा नाव ठेवणा-या व्यक्तीसाठीही चांगला नसतो. अशा लोकांना सुधारणे अवघड असले तरीही संत सज्जन अशांना मार्गदर्शन करीत राहतात. असे अकारण नाव ठेवणारे लोक सुधारले तर समाजातील, कुटुंबातील अनेक अकारण निर्माण होणारे प्रश्न निर्माण होत नाहीत. विचित्र हावभाव, नकारात्मक ईशारे, घालून पाडून तसेच टोचून बोललेले शब्द बोलणा-यांसह इतरांसाठीही नुकसानकारक असतात. आर्थिक व सामाजिक नुकसानीपेक्षा जास्त प्रमाणात भावनिक व मानसिक नुकसान होते. हे नुकसान केवळ समोरच्याच्या नकारात्मक, अहंकारात्मक स्वभावामुळे होते. कधी-कधी संतानाही अशा लोकांच्या बोलण्याचे शिकार व्हावे लागते. श्री ज्ञानदेवही अशा क्लेशकारक तीक्ष्ण शब्दांपासून अलिप्त राहू शकले नाहीत. त्यांनाही क्लेश होतील एवढे लोकांचे अकारण बोलणे खावे लागले.



लोकांच्या बोलण्यामुळे त्यांना होत असलेल्या क्लेशांची जाणीव मुक्ताईंना झाल्याने ती म्हणाली,

**शब्दशस्त्रें झाले क्लेश । संतीं मानावा उपदेश ।।**

दादा, लोकांच्या बोलण्याचे क्लेश झाले तरीही आपण संताचा उपदेश मानला पाहिजे. अर्थात, लोकांच्या बोलण्याचा विपरीत परिणाम स्वतःवर होऊ न देता आपण लोकोपयोगी, लोकाभिमुख कार्य करीत राहिले पाहिजे. ध्येयापासून विचलीत करणे हेच तर अशा लोकांचे ध्येय असते. आपण त्यांच्या अशा खेळीला बळी पडलो तर हे लोक जिंकतील आणि आपण व आपल्यावर अवलंबून असणारे हरतील. दादा, आपणाला असे होऊ द्यायचे नाही. त्यामुळे आपण संत वचनांवर विश्वास ठेवून क्लेशातून बाहेर पडू या. श्री ज्ञानदेवांना असे सांगण्यासाठी, त्यांना क्लेषातून बाहेर काढण्यासाठी त्यांची मुक्ताई भगिणी त्यांच्या पाठीशी होती. समाजातील अनेकांना मुक्ताई मिळेलच असे नाही. असे असले तरीही मुक्ताईचा ज्ञानप्रकाश हे सदर आपल्या सर्वांसाठी एक प्रकारे मुक्ताईच आहे. या सदराची अनुभूती आपणाला बऱ्याचशा क्लेशातून बाहेर काढण्यास साहाय्यकारी ठरेल यात आम्हास शंका वाटत नाही.

**जय जय राम कृष्ण हरी ।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

# लालपरी बंद पडल्यास करा 'शिवशाहीतून' उर्वरित प्रवास

## वाहकांनी साध्या तिकिटावर जास्त पैसे न आकाराण्याचे एसटी महामंडळाने काढले आदेश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२४ मार्च**

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या (एसटी) धावत्या एसटी बसमध्ये बिघाड झाल्यास प्रवाशांना कोणत्याही श्रेणीच्या एसटी बसमधून - प्रवासाची मुभा महामंडळाकडून देण्यात आली आहे. परंतु, काही चालक-वाहक या सुविधेत खोडा घालत असल्याने महामंडळाला पुन्हा आदेश काढावा लागला आहे. कर्मचाऱ्यांना त्याबाबत सूचित करण्याचे निर्देश सर्व विभाग प्रमुखांना देण्यात आले आहेत. एसटी बसमधून प्रवास करताना काही तांत्रिक कारणाने या बस रस्त्यातच बंद पडण्याच्या घटना अनेकदा घडत असतात. अशा बसमधील प्रवासी दुसऱ्या बसची वाट पाहात असतात. काही वेळा साधी बस बंद पडली असल्यास त्याच वेळी उच्च श्रेणीची इतर बस आल्यास प्रवाशांकडून तिकीटाचा फरक वसूल केला जात होता.मात्र अशाप्रकारे फरक वसूल न करण्याचे आदेश महामंडळाने जारी केले होते.परंतु, अनेक आगारातील चालक-वाहकांकडून या आदेशाचे पालन होत नसल्याच्या तक्रारी महामंडळाच्या मध्यवर्ती कार्यालयाला प्राप्त झाल्या. त्यामुळे महामंडळाने पुन्हा याबाबतचे आदेश काढले आहेत. दरम्यान,एसटी बसमध्ये बिघाड झाल्यानंतर इतर कोणत्याही बसमधून प्रवासाची मुभा होती. परंतु कर्मचारीच यात खोडा घालत असल्याने पुन्हा आदेश काढण्याची वेळ महामंडळावर आली आहे.



### आदेशाची पुन्हा एकदा माहिती देणार

महामंडळाच्या आदेशानुसार, बस बंद पडल्यास प्रवाशांना कोणत्याही श्रेणीच्या बसम धून त्याच तिकिटावर प्रवासाची मुभा आहे. प्रत्येक एसटी कर्मचाऱ्यांना याबाबत अवगत करण्यात येईल. ज्यादा पैसे वसूल करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल.

**-अमोल गोंजारी, विभाग नियंत्रक, एसटी महामंडळ, सोलापूर.**

## जैन सोशल ग्रुप सेंट्रलच्या अध्यक्षपदी संजय शहा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ मार्च-**

जैन सोशल ग्रुप सेंट्रलच्या वार्षिक सर्व सर्वसारधारण सभेमध्ये अध्यक्षपदी संजय शहा यांची निवडीची घोषणा संस्थेचे संस्थापक केतन शहा यांनी सीनाई रिसॉर्ट कामती येथे केली. सभेची सुरवात नवकर महामंत्राने करण्यात आली.



स्वागत अशोक छाजेड व प्रास्ताविक संजय शहा यांनी केले. उपाध्यक्षपदी संतोष बंब, सचिवपदी अशोक छाजेड, सहसचिव संजीव पाटील, खजिनदार अतुल गांधी,व माजी अध्यक्ष गौतम संचेती याच्या नावाची घोषणा केली. रत्नावली शहा यांनी रंगपंचमी वरील २ नृत्य सादर केले. संचालकपदी हितेंद्र शहा, धन्यकुमार खाबे, दिनेश जैन, नूतन गांधी, चंद्रकांत दोषी, हितेंद्र वोरा, रुपल शहा, जयश्री लोणावत, आनंदी बोथरा, वासंती कोठारी, कामिनी गांधी, हेतल अवलानी, पदंमकुमार मेहता, संजय पटवा, सल्लागार म्हणून इंदरमल जैन, बाबूभाई मेहता, नंदकिशोर शहा, गौतम वैद, सांगिनी अध्यक्ष वैशाली पुरवत, राहुल मुनोत व प्रितेश बंब. यावेळी सर्व १४८ सदस्यांना भेट वस्तू देण्यात आली. सूत्रसंचालन संतोष बंब यांनी केले व आभार अशोक छाजेड यांनी मानले.

## सोलापूर रेल्वे विभाग २४ विशेष उन्हाळी रेल्वे गाडी चालवणार

### कुर्डूवाडी, लातूर स्थानकांवर थांबणार विशेष उन्हाळी रेल्वेगाड्या

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२४ मार्च-**

मध्यरेल्वेच्या सोलापूर विभागा मार्फत उन्हाळी सुट्ट्यांची सुरवात आणि प्रवाशांची वाढती संख्या लक्षात घेता, प्रवाशांची अतिरिक्त गर्दी कमी करण्यासाठी मुंबई-नांदेड दरम्यान २४ उन्हाळी विशेष गाड्या चोलवण्याचा निर्णय घेतला आहे. याविशेष गाड्यांना सोलापूर विभागातील कुर्डूवाडी आणि लातूर या दोन स्थानकांवर थांबा देण्यात आला आहे.

एलटीटी मुंबई - हुजूर साहेब नांदेड साप्ताहिक विशेष गाडीच्या २४ फेऱ्या आहेत. रेल्वे क्रमांक ०११०५ साप्ताहिक विशेष गाडी ९ एप्रिल ते २५ जूनपर्यंत एलटीटी मुंबईहून दर बुधवारी रात्री १२.५५ वाजता निघतील आणि त्याच दिवशी सायंकाळी ७ वाजता हुजूर साहेब नांदेड येथे पोचेल. गाडी क्रमांक ०११०६ साप्ताहिक विशेष गाडी ९ एप्रिल ते २५ जून या कालावधती हुजूर साहेब नांदेड येथून दर बुधवारी रात्री ८ वाजता निघेल आणि दुसऱ्या दिवशी दुपारी २. ४५ वाजता एलटीटी मुंबई येथे पोहोचेल. या गाडीला ठाणे, कल्याण, लोणावळा, पुणे, दौंड, कुर्डूवाडी, लातूर, लातूर रोड, परळी वैजनाथ, गंगाखेड, परभणी आणि पूर्णा हे थांबे आहेत.

दरम्यान, या गाडीसाठी एक प्रथम वातानुकूलित, एक द्वितीय वातानुकूलित, पााच तृतीय वातानुकूलित, आठ स्लीपर क्लास, चार सामान्य द्वितीय श्रेणी, एक पॅन्ट्री कार (लॉक्ड कंडिशन), एक जनरेटर व्हॅन आणि एक द्वितीय श्रेणीसह गार्ड ब्रेक व्हॅन असे २२ कोच असतील.



## 'शेष बाकी..पांडुरंग' सत्प्रवृत्तीने लिहिलेले आत्मकथन

### ज्येष्ठ साहित्यिक मुरहरी केळे यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि.२४ मार्च**

'शेष बाकी... पांडुरंग' हे पांडुरंग बलभीम जाधव यांनी लिहिलेले आत्मकथन हे सत्प्रवृत्तीने लिहिलेले आहे. त्यात कृतज्ञतेची भावना ओतप्रोत भरलेली आहे. त्यात द्वेषभावना तीळमात्र नाही. जाधव हे निरपेक्ष आयुष्य जगले व जसे जगले तसे त्यांनी या आत्मकथनात मांडले. या आत्मचरित्रात अनेक व्यक्तिचित्रणे येतात. तसेच कौटुंबिक संघर्षाचे त्यांनी मोकळ्या मनाने वर्णन केलेले आहे. सत्य लिहिण्यासाठी जी हिंमत लागते ती लेखकामध्ये आहे. असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक तथा त्रिपुरा राज्य विद्युत मंडळाचे माजी अध्यक्ष डॉ. मुरहरी केळे यांनी केले.

पांडुरंग बलभीम जाधव, सेवानिवृत्त कृषी अधिकारी यांच्या 'शेष बाकी...पांडुरंग' या आत्मकथनाच्या प्रकाशन सोहळ्याप्रसंगी मुरहरी केळे बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी माजी आमदार विनायकराव पाटील होते.

पांडुरंग बलभीम जाधव यांनी हे आत्म कथन लिहिण्यामागची भूमिका आपल्या मनोगतात स्पष्ट केली. ॲड. धनंजय माने म्हणाले, प्रत्येक क्षेत्रात चांगल्या व्यक्तीची गरज असते. जसेकी चांगला डॉक्टर, चांगला वकील, चांगला शिक्षक, त्याप्रमाणे पांडुरंग जाधव हे एक चांगले व आदर्श अधिकारी होते. बर्याच आत्मचरित्रात स्वत:चे उदात्तीकरण केलेले आढळते पण या आत्म कथनात लेखकाने स्वत:चे कोठेही उदात्तीकरण केलेले नाही. स्वत:चे दोषही त्यांनी कबूल केलेले आहेत. प्रामाणिकपणा व प्रांजळपणा हे या आत्मकथनाचे वैशिष्ट्य आहे. सुरुवातीला शिवप्रज्ञा प्रकाशन, सोलापूरचे प्रकाशक तथा लेखक राजेंद्र भोसले यांनी प्रास्ताविक केले. आभार डॉ. मनीषा जाधव यांनी मानले तर सूत्रसंचालन अभिराम सराफ यांनी केले. या कार्यक्रमास आकाशवाणीचे अधिकारी गजानन सुरवसे, योगिराज वाघमारे, दत्ता घोलप, मारुती कटकधोंड, वंदना कुलकर्णी, गोविंद काळे, अशोक जानराव, डॉ. शिवाजीराव देशमुख आबासाहेब साबळे, कृषी अधिकारी साठे, मंडल कृषी अधिकारी राजीव जाधव, भास्कर गायकवाड, ॲडविन पिंटो उपस्थित होते.

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : मंगळवार | दिनविशेष - चांगला दिवस, पापमोचनी स्मार्त एकादशी, श्रवणोपवास, संत नामदेव उत्सव |
| दि. २५ मार्च २०२५ | ....राहू काल.... |
| विक्रम संवत् २०८०-८१ | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| शके - १९४६ | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| संवत्सर - क्रोधी नाम | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| मास - फाल्गुन | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| कृ. एकादशी (२७.४५) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| ऋतु - वसंत | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| नक्षत्र - श्रवण (२७.४९) | शनिवार : स. ९ ते १०.३० |
| योग - शिव (१४.५२) | |
| करण - बव (१६.३०) | |

### राशीभविष्य

**मेष** : आपल्या कामातील नियमीतपणाच आपल्याला यश देणार आहे. दुसऱ्याच्या भरोशावर काम टाकू नका. कौटुंबिक जीवन आनंदमय राहणार आहे.

**वृषभ** : शुभकार्यात भाग घेतल्यामुळे आनंदी रहाल. शत्रूवर विजय मिळवाल. आळस झटकून कामास लागा.

**मिथुन** : धैर्यामुळे आपली सर्वात मोठ्यातली मोठी म हत्वकांक्षा पूर्ण होईल. साहस, पराक्रमात वाढ होईल. फ कटचा मोठेपणा स्तुतीपासून दूर रहा.

**कर्क** : घराची समस्या दूर होईल. अचानक लाभ होण्याचा योग आहे. वायफळ बडबड करू नका. व्यापार व्यवसायात प्रगती होईल.

सिंह : गुंतवणूकीच्या योजना फायदेशीर ठरतील. स्वाध्याय व ज्ञानात भर पडणार आहे. तणावाकडे लक्ष न देता कामे करा.

**कन्या** : प्रतिष्ठीत व्यक्तिंचा संप होईल ज्यामुळे आपली प्रगती होणार आहे. भावनेच्या आधारावर कोणताही निर्णय घेऊ नका. कायद्याचा निकाल आपल्या बाजूने लागण्याचा योग आहे.

तुळ : संकोच केल्यामुळे आपल्याला निष्कारण नुकसान होण्याची शक्यता आहे. आर्थिक कामात अडचणी निर्माण होतील.

**वृश्चिक** : अनोळखी व्यक्तिच्या सहकार्यामुळे आत्मविश्वासात वाढ होईल. खर्चावर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न करा.योजलेले कामे पार पडतील. कौटुंबिक वातावरण आनंदी राहील.

**धनु** : फायद्याच्या संधी मिळून कार्यक्षमता वाढल्यामुळे उत्साह वाढणार आहे. रागावर नियंत्रण ठेवून कामे पार पाडा.

**मकर** : मान सन्मान मि ळण्याच्या संधी आल्यामुळे कार्यशील रहाल. वाद विवादापासून दूर रहा. व्यापारात वेळेवर निर्णय घेऊ न शकल्यामुळे नुकसान होण्याची शक्यता आहे. मुलांच्या कामाच्या बाबतीत समाधानी रहाल.

**कुंभ** : स्थावर संपत्तीबाबतचे वाद मिटल्यामुळे आनंदी रहाल. आरोग्याच्या तक्रारी दूर होतील. व्यापार व्यवसाय चांगला चालेल. काही निर्णय चूकीचे ठरण्याची शक्यता आहे.

**मीन** : जवळच्या व्यक्तिची भेट झाल्यामुळे आनंदी वातावरण निर्माण होईल. आधिकारी लोकांचे सहकार्य मिळेल. मुलांच्या बाबतीत चांगल्या बातम्या ऐकावयास मिळतील.

## अद्यापक गटात मॉडर्न प्रशालेच्या मनीषा फडके प्रथम

### ज्ञानप्रबोधिनीच्या आंतरशालेय पुस्तक परिचय स्पर्धा

### मेहता प्रशालेच्या आर्या करंटे, तनिष्का कुंभारे यांचीही बाजी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ मार्च-**

विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची सवय वृध्दिंगत व्हावी, वाचनाची आवड लागावी, तसेच वाचनातून मिळालेले अनुभव त्यांना शब्दबध्द करता यावेत, या हेतूने ज्ञान प्रबोधिनी तर्फे 'आंतरशालेय पुस्तक परिचय' स्पर्धा झाली. स्पर्धा घेण्याचे हे चौदावे वर्ष आहे. तसेच अध्यापकांकरिताही आंतरशालेय पुस्तक परिचय स्पर्धा आयोजित करण्याचे हे दहावे वर्ष आहे. या दोन्ही स्पर्धांचा पारितोषिक वितरण समारंभ रसिका तुळजापुरकर यांच्या हस्ते संपन्न झाला. या वर्षी इ.५ वी ते ७ वीच्या गटातून ९२ तर इ.८वी ते १०वीच्या गटातून ७९ विद्यार्थ्यांचा सहभाग होता. दहा शाळांमधून १७१ विद्यार्थी या स्पर्धेत सहभागी झाले होते. अध्यापक गटात सात शाळांमधून १३ अध्यापकांचा सहभाग होता. सहभागी सर्व १८४ विद्यार्थी व अध्यापकांना प्रशस्तीपत्र व पुस्तकरुपी भेट देण्यात आली. मुख्याध्यापिका सुनीता चकोत यांनी कार्यक्रमाचा समारोप केला.



**पारितोषिकविजेते असे**

**(प्रथम तीन व उत्तेजनार्थ)**

**५ वी ते ७ वी** : अन्य शाळा : आर्या अमित करंटे (वि.मो.मेहता प्रशाला), अनुष्का अनिरुध्द सुत्रावे (एस. आर. चंडक प्रशाला) व संचिता सचिन कांबळे (वि.मो.मेहता प्रशाला), साक्षी विनायक लिंगरकर (मॉडर्न प्रशाला) व मृणाल निरज महामुरे (सकुबाई हिराचंद नेमचंद प्रशाला) दर्शना लक्ष्मीनारायण आरगे (निलकंठेश्वर प्रशाला).

**ज्ञान प्रबोधिनी** : शुभदा संदेश पवार, ओम व्यंकटेश बल्ला, स्वप्निल श्रीहरी झाडकर, राजनंदिनी बसप्पा रगटे

**८ वी ते १०वी** : अन्य शाळा : तनिष्का प्रसाद कुंभारे (वि.मो. मेहता प्रशाला), शर्वरी ज्ञानदेव लाम काने (दमाणी प्रशाला) व आकांक्षा अमर पवार (वीरतपस्वी हायस्कूल), मुकताई सिद्धेश्वर पाटील (सिद्धेश्वर कन्या प्रशाला), ज्ञानेश अशोक पेंटा (सकुबाई हिराचंद नेमचंद प्रशाला), भाग्यश्री अनिल कोळेकर (निलकंठेश्वर प्रशाला). **ज्ञान प्रबोधिनी** : दिपा अंबादास साखरे, नंदिनी प्रकाश पाटील, स्वामिनी शिरसट.

**अध्यापक गट** : मनिषा अरुण फडके (मॉडर्न प्रशाला), स्मिता अमित कोटींकर (सेवासदन प्रशाला), सारिका सोमनाथ पंडित (छ. शिवाजी प्रशाला), संगिता संतोष रेळेकर (सकुबाई हिराचंद नेमचंद प्रशाला)

## बघितल्याच्या रागातून दोघांची तरूणास मारहाण

**सोलापूर, दि. २४ मार्च-**

शहरातील सिध्दार्थ चौकात मला बघितल्याच्या रागातून दोघांनी तरूणास बेदम मारहाण करून जखमी केले. याप्रकरणी मुकेश भिमसिंग सत्तारवाले (वय ३५, रा. लोधी गल्ली, बेडर पूल, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन पांचू बंबेवाले, कोहिनूर कोन बंबेवाले (रा. लोधी गल्ली, सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २२ मार्च रोजी सकाळी साडेआठच्या सुमारास सिध्दार्थ चौक येथे मुकेश सत्तारवाले यास बंबेवाले यांनी माझ्याकडे रागाने का बघितला असे म्हणून विनाकारण लाकडी बांबूने मारहाण करून जखमी केले. म्हणून सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस हवालदार वाघमारे पुढील तपास करीत आहेत.




## सोलापूर शहराच्या सर्वांगीण विकासासाठी प्राधान्य देणार : उपमुख्यमंत्री अजित पवार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२४ मार्च-**


सोलापूर शहराच्या सर्वांगीण विकासासाठी आपण सकारात्मक असून येणाऱ्या काळात शहराच्या सर्वांगीण विकासासाठी महाराष्ट्र शासनाच्या निधीत सोलापूर शहराचा विकासाच्या दृष्टीने तरतूद करून विविध विकास कामांसाठी प्रयत्नशील राहू अशी ग्वाही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली.



महायुती सरकारच्या माध्यम ातून सोलापूर शहराच्या औद्योगिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, क्रीडा, बेरोजगार युवकांना रोजगार उपलब्ध तसेच नागरिकांना अन्य मूलभूत सुविधा मिळाव्यात, यासाठी शहर विकास आराखडा संदर्भात महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या बाराम ती येथील निवासस्थानी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष किसन जाधव यांनी भेट घेऊन या संदर्भात चर्चा केली. स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या अनुषंगाने राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीची भूमिका सर्वसाधारण नागरिकांपर्यंत पोहोचावा. माहयुती सरकारच्या माध्यम ातून घेतलेले लोककल्याण्यार्थ निर्णय सामान्य नागरिकांपर्यंत पोहोचवा अश्या सूचना देखील यावेळी पवार यांनी दिल्या असल्याचे किसन जाधव यांनी सांगितले. याप्रसंगी बारामती जिल्हा परिषद सदस्य कुलदीप तावरे, राष्ट्रवादी शहर संघटक ऋषी येवले, माणिक कांबळे, महादेव राठोड, हुलगप्पा शासम, दीपक आरगेल आदींची उपस्थिती होती.

## संघ हीच जीवनगाथा

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जनक डॉक्टर केशव बळीराम हेडगेवार (जन्म १ एप्रिल १८८९, मृत्यू २१ जून १९४०). आपल्यासमोर संघ हीच जीवनगाथा या शीर्षकाखाली मी छोट्या छोट्या कथा लिहित आहे. या कथांचे स्वरूप आहे अलक. म्हणजे अति लघु कथा. ही कथा वाचायला सोपी; स्मरणात ठेवायला सोपी; सम जायला सोपी; अशी असेल असा माझा प्रयत्न आहे. आधीच सांगते कथा म्हणजे निव्वळ गोष्ट नव्हे एवढे ध्यानी ठेवावे. जसे यथा म्हणजे येन प्रकारेण; तथा म्हणजे तेन प्रकारेण; सर्वथा म्हणजे सर्वे प्रकारेण तसेच कथा म्हणजे केन प्रकारेण, या अर्थाने मी अलक लिहिले आहे.



**- सुरेखा विजय काणे,**
छत्रपती संभाजीनगर
माजी जिल्हा बौद्धिक
प्रमुख राष्ट्र सेविका समिती, मो. ९९६००५३५२१

### अलकः-८८ राष्ट्रीय मार्गदर्शन

१९४७ साली ब्रिटिश सत्ता भारतातून नष्ट झाली तरी पण गोवा पोर्तुगीजांच्या, हैदराबाद निजामाच्या अधिपत्याखाली होता. या दोन्ही ठिकाणी मुक्ती आंदोलन सुरू होते. अखेर १७ सप्टेंबर १९४८ साली हैदराबादच्या निजामाने शरणागती पत्करली. त्यावेळच्योशिरींळेप झजङ्ज यासाठी सरदार वल्लभ भाई व श्री गुरुजी यांच्यात वार्तालाप होऊन दिशा ठरली होती. तसेच गोवा मुक्तीच्या बाबतीत श्री. गुरुजींच्या भावना अतिशय तीव्र होत्या. सुधीर फडके व श्री गुरुजी यांच्यात बातचीत होऊन १९५५ साली संघाच्या काही तेजस्वी तरुणांनी सशस्त्र क्रांती करून दादरा नगर हवेली ची मुक्तता प्रत्यक्षात घडवून आणली होती. यात सुधीर फडके, मोहन रानडे, डॉक्टर पुंडलिक गायतोंडे असे अनेक तरुण सहभागी झाले होते. आणि १९६२ ला भारतीय सेनेने गोव्यात तिरंगा फडकवला होता, परंतु गोव्याचे वेगळे अस्तित्व व वेगळी संस्कृती मान्य करून. तेव्हा श्री गुरुजींनी ठणकावून सांगितले की सगळ्या भारताची संस्कृती एकच आहे वेगळी संस्कृती गोव्यात असेल तर ती पोर्तुगीजांची होती. हीच गोष्ट काश्मीर बाबत. खरं म्हणजे काश्मीरचे महाराज हरीसिंग यांना स्वतंत्र भारतात मानाचे पद मिळणे ही आवश्यक गरज होती. पण पंडित नेहरूंनी याला नकार दिला. ते शेख अब्दुल्लांचा कैवार घेऊन अडून बसले होते. पण तरीसुद्धा आज नाही उद्या काश्मीर भारताचे सर्वांगानी होईल असा भविष्यातील विचार करून श्री गुरुजींनी महाराजा हरिसिंग यांना विलीनीकरणास तयार केले. व २६ ऑक्टोबर १९४७ रोजी हरिसिंग यांनी सही केली. परंतु पंडित नेहरूंनी शेख अब्दुल्लाला प्रधानमंत्री चा दर्जा दिला. काश्मीरचेही वेगळेपण नेहरूंनी कायम ठेवले आणि तिथे दोन ध्वजाला मान्यता दिली. परंतु आज पंतप्रधान मोदींनी काश्मीरचे ३७० कलम व ३५ हे कलम रद्द करून श्री. गुरुजींची इच्छा पूर्ण केली आहे. परंतु दुर्दैवाने एक देश मे दो निशान, दो विधान, दो प्रधान नही चलेंगे अशी घोषणा देणाऱ्या शामाप्रसाद मुखर्जींना पंडित नेहरूंनी जेलमध्ये टाकले व तिथेच त्यांचा संशयास्पद मृत्यू झाला आहे.

**क्रमशः**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### भाजप युवा मोर्चाच्या वतीने जेऊर येथे पालकमंत्री गोरे यांचे स्वागत

**करमाळा दि.२४ मार्च-**

ग्रामविकास व पंचायत राजमंत्री तसेच सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे करमाळा दौऱ्यावरती असताना जेऊर या ठिकाणी भाजप युवा मोर्चाच्या वतीने त्यांचे जंगी स्वागत करण्यात आले. यावेळी फटाक्यांच्या आतिषबाजीसह हलगी वाजवत स्वागत करण्यात आले. तसेच यावेळी विविध विकास कामांच्या संदर्भात निवेदने व मागण्या करण्यात आल्या. यावेळी भारतीय जनता पार्टी युवा मोर्चाचे तालुकाध्यक्ष शुभम बंडगर, भाजप कार्यकर्ते रविकिरण माळवे, पाठक काका, हरिश्चंद्र शेळके, देविदास पाटील, पत्रकार हर्षवर्धन गाडे, बाबासाहेब चौगुले, सौरभ केकान, शिवराज देशमुख, सौरभ देशमुख, विष्णू वाघमोडे, प्रदीप वाघमोडे माऊली सलगर, साईनाथ बोरकर, सुरज महानगर सुरज मुलानी, बंटी वाघमोडे, पप्पू ढावरे, रामेश्वर सूर्यवंशी,माधव सूर्यवंशी उपस्थित होते.




### सत्यवान वाघमारे यांना राज्यस्तरीय मराठी साहित्य उत्कृष्ट अध्यापन सेवा पुरस्कार

**पिलीव, दि. २४ मार्च -**

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील कर्मवीर भाऊराव पाटील विदयालयाच्या सत्यवान वाघमारे यांना ज्ञानज्योती बहुउद्देशीय संस्था टाकळीभान (ता. श्रीरामपूर) यांच्या वतीने राज्यस्तरीय उत्कृष्ट मराठी अध्यापन व साहित्यसेवा कार्य गौरवाने संस्थेचे अध्यक्ष अर्जुन राऊत, उपाध्यक्ष संदीप घटारे, कार्याध्यक्ष सागर पवार व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत सत्यवान वाघमारे यांना प्रदान करण्यात आला. वाघमारे यांना पुरस्कार मिळाल्याबद्दल मुख्याध्यापक शिवाजी कापसे, पर्यवेक्षीका मोरे यांनी अभिनंदन केले.



### करमाळ्यात सावंत गटाच्या वतीने जामा मस्जिद येथे इप्तार पार्टी

**करमाळा दि,२४ मार्च-**

करमाळा शहरातील जामा मस्जिद येथे आज सावंत गटाच्या वतीने नगरसेवक संजय सावंत यांनी या इप्तार पार्टीचे आयोजन केले होते. या इप्तार पार्टीसाठी आमदार नारायण आबा पाटील, सावंत गटाचे नेते सुनील बापू सावंत, पंचायत समितीचे सदस्य एडव्होकेट राहुल सावंत, नगरसेवक अल्ताफशेठ तांबोळी, माजी नगरसेवक फारुक जमादार, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मजहर नालबंद,पै, दादा इंदलकर, माजी नगरसेवक रवींद्र कांबळे, दिपक सुपेकर, युवा नेते अल्लाउद्दीन शेख, सामाजिक कार्यकर्ते फिरोज बेग, भारिप चे देवा लोंढे, राजेंद्र वीर, पप्पू वस्ताद, नागेश उबाळे, आनंद रोडे, जमील काझीआप्पा वीर पांडुरंग सावंत, अमोल मोरे, पप्पू माळी,सिकंदर फकीर उपस्थित होते. यावेळी आ. पाटील म्हणाले की, अनेक सुफी संत महापुरुषाची विचारधारा समाजामध्ये रुजवणे खूप गरजेचे आहे असून रमजान महिन्यातील इफ्तार पार्टी म्हणजे एकमेकांना जोडणारा समता बंधुता भाईचारा प्रस्थापित करणारा हा महिना असून मुस्लिम धर्मियांचा हा पवित्र रमजान महिना धार्मिक व सामाजिक सलोखा आणि शांतता अबाधित ठेवण्याचे काम छत्रपती शिवाजी महाराज तरुण मंडळ गेल्या अनेक वर्षापासून काम करत आहे आप आपसातील बंधुभाव वाढविण्यासाठी व शांतता व संयम ठेवण्याचे काम रमजान चे रोजे शिकवतात, असे यावेळी पाटील म्हणाले. इप्तार पार्टी यशस्वी करण्यासाठी माँ आयेशा मस्जिद चे विश्वस्त साजीद बेग सामाजिक कार्यकर्ते आलीम खान, वाजीद शेख, अकबर बेग, जहाँगीर बेग, समीर शेख, राजू नालबंद यांनी परिश्रम घेतले.



### शिवसेना जिल्हाप्रमुख संतोष पाटील यांचा हैद्रा येथे सत्कार

**अक्कलकोट, दि.२३ मार्च-**

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे नूतन सोलापूर जिल्हाप्रमुख संतोष पाटील यांनी अक्कलकोट तालुक्यातील हैद्रा येथील हजरत खाजा सैफुलमुल्क चिस्ती दर्गा येथे दर्शन घेतले. यावेळी दर्गाह कमिटीच्या वतीने शिवसेना जिल्हाप्रमुख संतोष पाटील यांचा सत्कार करण्यात आला. दर्गा कमिटीचे चेअरमन रफिक मुजावर यांच्या हस्ते फेटा बांधून शाल देऊन संतोष पाटील व जिल्हा उपप्रमुख घोडके यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी संतोष पाटील यांनी अक्कलकोट तालुक्यात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाची ताकद वाढविण्यासाठी प्रयत्न करणार असून जुन्या आणि नव्या पदाधिकाऱ्यांचा योग्य सन्मान केला जाईल. पक्षाची ताकद वाढविण्यासाठी विशेष लक्ष दिले जाईल असे सांगितले. या प्रसंगी शिवसेना अक्कलकोट शहराचे माजी प्रमुख रवी डोके , माजी तालुकाप्रमुख मनोज पवार, स्वामीराव मोरे, फैयाज जमादार, श्रीशैल पाटील आदी उपस्थित होते.

# अक्कलकोट आगारासाठी सर्वतोपरी मदत करु

## आ. सचिन कल्याणशेट्टी यांचे आश्वासन; अक्कलकोट आगार येथे १० नवीन अशोक लेलँड बसचे पूजन

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.२४ मार्च-**

गेली आडीच वर्षअक्कलकोट तालुका विकासाच्या बाबतीत बदलत होता. आता बदलेल विकसित अक्कलकोट आहे. बसस्थानक नवे झाले. १० नवीन बस आल्या अजून नवीन बस आणल्या जातील. डेपोआगाराची इमारतही नवी निर्माण केली जाईल. आगारामध्ये कुपनलीकासह आवश्यक सोयीसुविधा पुरविण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करु, असे आश्वासन आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी दिले.

अक्कलकोट आगार येथे १० नवीन अशोक लेलँड बसचे पूजन तालुक्याचे आ. सचिन कल्याणशेट्टी यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी आमदार कल्याणशेट्टी



बोलत होते. याप्रसंगी भाजपाचे शहर अध्यक्ष शिवशरण जोजन माजी उपसभापती विलास गव्हाणे शिवसेना ता. प्रमुख संजय देशमुख महिला तालुकाप्रमुख वर्षा चव्हाण, राजेद्र बंदिछोडे, आरपीआय तालुकाध्यक्ष अविनाश मडीखांबे नन्हु कोरबु मल्लू स्वामी राष्ट्रवादी ता . अध्यक्ष दिलीप सिध्दे, सोलापूर विभागाचे विभाग नियंत्रक अमोल गोंजारी, वाहतूक अधिकारी अजय पाटील, विभागीय यंत्र अभियंता शीतल बिराजदार, स्थापत्य अभियंता तुषार चौधरी , आगार व्यवस्थापक रणजित साळवी, पालक अधिकारी मालन बनसोडे, वाहतूक अधिक्षक पवन हनगल, वाहतूक निरीक्षक नागेश रोडगे , वाहतूक नियंत्रक श्रीमंत खसकी, वाहतूक नियंत्रक मदनसिंह घाटगे आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. वाहतूक अधिकारी अजय पाटील यांनी आमदार कल्याणशेंट्टी यांचे आभार व्यक्त केले. आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी अक्कलकोट बसस्थानक इमारत व नविन बससाठी शासन दरबारी मोठा पाठपुरावा केला याबद्दल आमदार सचिन कल्याणशेट्टी यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी रमेश कापसे, परमेश्वर यादवाड, यशवंत धोंगडे, अप्पासाहेब पाटील, प्रभाकर मजगे, महेश जानकर, भिमराव साठे, दत्तात्रय मुनाळे, . निजप्पा गायकवाड, प्रदीप पाटील, कांतू धनशेट्टी, नागराज कुंभार, धोंडप्पा बनसोडे, विनोद मोरे, अतिष पवार,सचिन पवार, राहूल काळे आदीसह कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राहुल स्वामी, बाशाभाई नागणसुरे , मेहसीन शेख, राजू मुनाळे, प्रमोद धनशेट्टी, लक्ष्मीपुत्र मुनोळी, श्रीकांत वालीकर, वसंत बंडगर, मजहर दरेखा आदी उपस्थित होते. प्रस्तातावना व आभार सविता पवार यांनी मानले.

> मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात राज्यातील एस.टी. सेवा अधिक सक्षम, आधुनिक आणि प्रवाशांसाठी सोयीस्कर करण्याच्या दृष्टीने सातत्याने पावले उचलत आहोत.अक्कलकोट आगारात भविष्यात आणखी नव्या एस.टी.बसेस, सुधारित सेवा आणि प्रवाशांसाठी उत्तम सुविधा उपलब्ध करून देण्याचा माझा निर्धार आहे, असे प्रतिपादन आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी याप्रसंगी केले.

# वृक्षारोपणासाठी मंगळवेढा ते पंढरपूर सायकल प्रवास

## वारी परिवारातर्फे पालखी तळावर केली लागवड; हवामानदिनानिमित्त उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा दि.२४ मार्च-**

विचार स्वच्छ हवामानाचा, विचार पर्यावरण रक्षणाचा या उद्दिष्टाने दि. २३ मार्च जागतिक हवामान दिनानिमित्त मंगळवेढा येथील वारी परिवार सायकल क्लबच्या वतीने रविवारी मंगळवेढा ते पंढरपूर सायकल वरती जाऊन पंढरपूर येथील ६५ एकर पालखी तळावरती वृक्षारोपण करण्यात आले. आज सिमेंटची वाढती जंगले आणि निसर्गाची झपाटय़ाने होत असलेली हानी यामुळे तापमानात वाढ झालेली आहे तसेच औद्योगिकीकरणामुळे रस्त्यांचे जाळे पसरलेले असले तरी रस्त्यालगत वृक्षांची कमतरता आहे तर दुसरीकडे



हजारो वाहनांमधून सोडण्यात येणारा कार्बनडॉक्साइड वायूचाही परिणाम होत आहे अशा स्थितीत पृथ्वीवरील वाढते तापमान वेळीच रोखण्यासाठी झाडे लावून त्याचे संवर्धन करण्याची नितांत गरज आहे हे ओळखून हरित वारी पालखी महामार्गाचे संकल्पक हभप शिवाजी महाराज मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली वारी परिवार सायकल क्लब मधील प्रत्येक सदस्यांच्या हस्ते पालखी तळावर वड, पिपंळ देशी वृक्ष लावण्यात आले.

सदर उपक्रमात ५०१ झाडे लावून त्याचे संवर्धन देखील केले जाणार असून नजीकच्या काळात वारी साठी येणाऱ्या वारकऱ्यांना झाडाची गार सावली व स्वच्छ प्राणवायू मिळण्यास मदत होणार आहे. यावेळी शिवाजी महाराज मोरे यांनी वृक्ष लागवड ही चळवळ होऊन तरुणांनी पर्यावरणाच्या रक्षणासाठी पुढे आले पाहिजे असे सांगून वारी परिवार सायकल क्लबचे आभार मानले. यावेळी कृतियुक्त सायकल रॅलीमध्ये विजय क्षीरसागर, कल्याण घुले, जयंत पवार,राजेंद्र नलवडे,नंदकुमार नागणे, चंद्रजीत शहा, ओम लुगडे, योगीराज ठेंगील,स्वप्निल टेकाळे, सिद्धेश्वर डोंगरे, प्रफुल्ल सोमदळे, पांडुरंग कोंडूभैरी, यश महामुनी, पवन टेकाळे, गणेश मोरे, विजय जठार,अरुण गुंगे,प्रा विनायक कलुबर्मे,सतिश दत्तू आदी जण सहभागी होते.

### गौडगांवच्या शिवाजी शिक्षण मंडळास पुरस्कार

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २४ मार्च-**

तालुक्यातील गौडगाव येथील श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ या संस्थेस दिशा विकास मंच सातारा यांच्यावतीने समाजरत्न पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. कर्मवीर भाऊराव पाटील यांचे शिष्य कर्मवीर लोहोकरे गुरुजी यांनी स्थापन केलेल्या संस्थेच्या सामाजिक व शैक्षणिक कार्यातील भरीव योगदानाबद्दल दिशा विकास मंचचे संस्थापक अध्यक्ष सुशांत मोरे यांच्यावतीने समाजरत्न पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. या पुरस्काराबद्दल संस्थेचे अध्यक्ष विनायकराव गरड, सचिव पंडितराव लोहोकरे, अरुण भड, वसंत त्र्यंबक काकडे, डॉ. संतोष भड सर्व संचालक मंडळाचे संस्थेच्या संलग्न सर्व शाखा प्रमुखांनी, कर्मचाऱ्यांनी, गावातील ग्रामस्थांनी, सेवक नागनाथ गरड, भास्कर काकडे, अभिमान भड यांच्यावतीने आभार मानण्यात आले.

# सत्यमेव जयते स्पर्धेत कृषी सखी शेतकरी गट प्रथम

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. २४ मार्च-**

पुणे येथील बालेवाडी येथे सत्यमेव जयते फार्मर कप स्पर्धेचे बक्षीस वितरण महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस, कृषिमंत्री माणिकराव कोकाटे, कृषिमंत्र्यांचे सचिव संतोष पाटील, सिने अभिनेते आमिर खान, किरण राव, पाणी फाउंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यजित भटकळ, प्रमुख मार्गदर्शक डॉक्टर अविनाश पोळ यांच्या प्रमुख उपस्थितीत देण्यात आले.

बार्शी तालुक्यामध्ये पानी फाऊंडेशन आयोजीत सत्यमेव जयते फार्मरकप २०२४ स्पर्धा आयोजीत



करण्यात आली होती. यामध्ये ७२ शेतकरी गट सहभागी झाले होते त्यापैकी ५० गट हे महिला शेतकरी गट होते तर २२ शेतकरी गट पुरुषांचे होते. यावेळी या स्पर्धेमध्ये सहभाग घेण्यासाठी सर्व शेतकरी गटानी फार्मर कपचे ट्रेनिंग घेतले होते. ट्रेनिंग घेतल्यानंतर प्रथमतः गट तयार केला त्यानंतर ट्रेनिंगमध्ये शिकवल्याप्रमाणे लागवडी मधील अंतर असेल, बीजप्रक्रिया असेल, उगवण क्षमता तपासणे,एकत्र बियाणे खरेदी करणे, रासायनिक कीटकनाशकाचा वापर करण्याऐवजी नैसर्गिक पद्धतीने बनवलेल्या निमार्क व दशपर्णी अर्क याचा वापर केला,तसेच शेतीमधील सर्वच कामे आवड सावड पद्धतीने एकमेकांच्या शेतामध्ये जाऊन केली. या सर्व गोष्टींमुळे शेतकरी गटाचा उत्पादन खर्च कमी झाला व उत्पन्न वाढले सर्वच गटांना भरघोस उत्पन्न भेटले तसेच एकत्र काम केल्यामुळे सर्वांनी शेतीतील कामाचा आनंद देखील घेतला. चांगल्या कामगिरीमुळे बार्शी तालुक्यात सुर्डी येथील कृषी सखी महिला शेतकरी गटाचा प्रथम क्रमांक आला तर द्वितीय क्रमांक कृषी शक्ती महिला शेतकरी गट मुंगशी (आर) तसेच हिरकणी महिला शेतकरी गट भालगाव यादेखील गटांना द्वितीय पुरस्कार पुरस्कार मिळाला.



### ‘तिमिर छेदताना’ मनाला उभारी देणारे निराशा दूर करणारे पुस्तक : दीपक आर्वे

#### सचिन वायकुळे लिखित पुस्तकाचे प्रकाशन

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.२४ मार्च**

वर्तमान स्थितीत बदलत्या जीवनशैलीमुळे अस्वस्थता , अस्थिरतेचा अनुभव अनेकांना येत आहे. अशास्थितीत लेखक सचिन वायकुळे लिखित ‘तिमिर छेदताना’ हे पुस्तक मनाला उभारी देणारे नि निराशा दूर करणारे आहे, असे प्रतिपादन सेवानिवृत्त सहाय्यक पोलीस आयुक्त दीपक आर्वे यांनी केले.

कोल्हापूरस्थित अविष्कार फाऊंडेशन यांच्यावतीने येथील डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृहात बार्शीचे लेखक सचिन वायकुळे लिखित डॉ. सुनीलकुमार लवटे जीवन चित्र ‘तिमिर छेदताना’ या पुस्तकाचे प्रकाशन पार पडले, याप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. अनिल देशमाने होते. व्यासपीठावर अविष्कार फाऊंडेशन कोल्हापुरचे संस्थापक अध्यक्ष संजय पवार, लेखक वायकुळे, जब्बार शिकलगार, प्राचार्या डॉ. सुनिता केदार, लेखक वायकुळे यांचे वडील निवृत्त तहसीलदार मदनराव वायकुळे, आई विमल मदनराव वायकुळे, ॲड. शांताराम पाटील, दिपाली माने, पवन पवार, ए. बी. शेख आदी उपस्थित होते. अनाथपणा वाट्याला येऊनही स्वतःच्या आयुष्याचा कुंभार होत जीवनाकडे पाहणारे डॉ. लवटे हे निश्चितच सर्वांसाठी प्रेरक आहे. तरुणांनी समस्यांमुळे निराश न होता, त्याला पाठ न दाखवता समर्थपणे वाटचाल करावी यासाठी आत्मविश्वास वाढविणारे हे पुस्तक आहे, असे लेखक वायकुळे म्हणाले. प्रास्ताविकात संयोजक आविष्कार फाउंडेशनचे अध्यक्ष संजय पवार यांनी या पुस्तकातील अनेक संदर्भ देत कौतुक केले. यावेळी. डॉ. देशमाने यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन माधुरी सावंत यांनी केले. या कार्यक्रमासाठी विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

## सुळेवाडी येथे प्रधानमंत्री आवास योजनतेली बांधकामे रखडली

**पिलीव, दि. २४ मार्च -**

केंद्र व राज्य शासनाने गोरगरीब जनतेला चांगला निवारा मिळावा म्हणून खेड्यापाड्यातील सर्व सामान्य नागरिकांना प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत घरे मंजूर केली आहेत.सुळेवाडी गावातील ३५ लाभार्थ्यांना या योजनेअंतर्गत घरे मंजूर करण्यात आली आहेत.पण सुळेवाडी येथे सध्या पिण्याच्या पाण्याची भिषण पाणीटंचाई जाणवत आहे. यामुळे खरेतर माणसांना व जनावरांना पिणयासाठीच पाणी नाही तर घरकुल बांधणयासाठी लागणारे पाणी कोठुन आणायचे असा प्रश्न लाभार्थ्यांनमधुन विचारला जात आहे. उन्हाळा संपेपर्यंत तर सध्या घरकुल बांधणे अवघड आहे. पाऊस पडल्यावर पाणी उपलब्ध झाल्यावरच सदरचे लाभार्थी घरे बांधतील अशी परिस्थिती आहे. शासनाने घरे या दुषकाळी सुळेवाडी गावातील घरकुल लाभार्थीना घरकूल बांधणयासाठी मुदतवाढ देणे आवश्यक आहे. त्यामुळे अडचणीत असणाऱ्या लाभार्थी यांना दिलासा मिळेल .सुळेवाडी येथील लाभार्थी पाणी नसल्यामुळे घरकुल बांधकामाला मुदतवाढ देण्याची मागणी करीत आहेत.

## गुढीपाडव्या दिवशी वृत्तपत्र विक्री बंदचा इशारा

**पंढरपूर शहर वृत्तपत्र विक्रेत्यांच्या बैठकीत निर्णय**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२४ मार्च-**

दिवसेंदिवस महागाई वाढत आहे. मात्र वृत्तपत्र विक्रीच्या कमिशनमध्ये वाढ होत नाही. यामुळे वृत्तपत्र विक्रेते आर्थिक संकटात सापडले आहेत. यामुळे वृत्तपत्र कंपन्यांनी कमिशनमध्ये वाढ करावी. अन्यथा गुढीपाडवा रविवार दि. ३० मार्च रोजी पंढरपुरातील वृत्तपत्र विक्री बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

पंढरपूर शहर वृत्तपत्र विक्रेता संघटनेची बैठक अध्यक्ष महेश पटवर्धन यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. यावेळी प्रदेश सदस्य गोरख भिलारे, जिल्हा उपाध्यक्ष नंदकुमार देशपांडे, सदस्य सिद्धेश्वर सावंत यांच्यासह पंढरपुरातील वृत्तपत्र विक्रेते उपस्थित होते. यावेळी गोरख भिलारे म्हणाले, ऊन, वारा, पाऊस याची तमा न बाळगता वृत्तपत्र विक्रेते घरोघरी जाऊन वृत्तपत्र विक्री करतात. दिवसेंदिवस महागाई वाढत आहे. मात्र वृत्तपत्र विक्रीच्या कमिशनमध्ये वाढ झाली नाही. यामुळे वृत्तपत्र विक्रेते आर्थिक संकटात सापडले आहेत. त्यामुळे वृत्तपत्र कंपनींनी कमिशनमध्ये वाढ करावी याबाबतचे निवेदन देण्यात आले आहे.

# राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत पोवार, पाटील व चव्हाण प्रथम

**पार्थ पवार यांच्या वाढदिवसानिमित्त पंढरपुरात वक्तृत्व स्पर्धा**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २४ मार्च-**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे युवा नेते पार्थ अजित पवार यांच्या वाढदिवसानिमित्त राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेश सचिव श्रीकांत शिंदे यांच्यावतीने भव्य राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. नेत्यांचे वाढदिवस डिजीटल बोर्ड, विविध ठिकाणी लाखो रूपये खर्च केले जातात परंतू खऱ्या अर्थाने वक्तृत्व स्पर्धेच्या माध्यमातून ग्रामीण व शहरी भागातील अनेक कर्तृत्ववान विद्यार्थ्यांना आपल्या




अंगातील कला गुणांना वाव देण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देणे ही नक्कीच चांगली बाब आहे, असे गौरवोद्गार पंढरपूरचे सुप्रसिध्द नेत्रतज्ञ डॉ. मनोज भायगुडे यांनी काढले.

स्पर्धेचे उद्घाटन पंढरपुरातील नेत्रतज्ञ डॉ.मनोज भायगुडे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. यावेळी समाधान काळे, साईनाथ बडवे, मुन्ना भोसले, सुनिल भोसले, लाला पानकर, कृष्णा वाघमारे, ॲड. अमित नेहतराव, अनिकेत शिरसट, संग्राम अभंगराव, युवराज मचलंबे, विशाल आर्वे, समाधान गाजरे सर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

> **पुढील वर्षी १ लाखांचे बक्षीस देणार : श्रीकांत शिंदे**
>
> पुढील वर्षी वक्तृत्व स्पर्धेत जास्तीत जास्त विद्यार्थ्यांमधील कलागुणांना वाव मिळावा व त्यांच्यात प्रथम क्रमांकासाठी स्पर्धा निर्माण झाली पाहिजे, यासाठी १ लाखांचे बक्षीस देण्यात येणार असल्याचे श्रीकांत शिंदे यांनी जाहीर केले.

या स्पर्धेमध्ये महाविद्यालयीन गटातून ऋतुजा पोवार (इचलकरंजी), तेजस पाटील (पुणे) यांना प्रथम क्रमांक विभागून देण्यात आला. दुसरा क्रमांक आकाश मोहिते (अहिल्यानगर), रोहन कवडे (पुणे) यांना तिसरा क्रमांक तर उत्तेजनार्थ अभिजीत लामकाने (पंढरपूर), मोनाली पाटील (पंढरपूर), प्रथम गणेश भिंगारे (पानीव) यांना देण्यात आला. माध्यमिक व उच्च माध्यमिक गटातून प्रथम क्रमांक साक्षी चव्हाण (सुस्ते), दुसरा निलश्री यादव (सातारा), तिसरा राजवीर तळेकर (भोसे) यांना तर उत्तेजनार्थ सृष्टी माने (निमगांव), श्रृती देठे (वाडीकुरोली), आरोही मारेकर (बागल वस्ती) यांना देण्यात आला. स्पर्धेत ५६ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. स्पर्धेचे परिक्षक म्हणून दादासाहेब तळेकर, योगेश गायकवाड, प्रा.परमेश्वर झांबरे यांनी काम पाहिले. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी शुभम पवार, सारंग महामुनी, प्रदिप निर्मळ, रफिक मुलाणी, अभिनव शिंदे यांनी परिश्रम घेतले.

CMYK

# आपला जिल्हा

**सोलापूर तरुण भारत**, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## चिकलठाणच्या उपसरपंचपदी अक्षय सरडे



**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. २४ मार्च-**

चिकलठाण ग्रामपंचायतच्या उपसरपंचपदी बागल गटाच्या अक्षय सरडे यांचे बिनविरोध निवड झाली.

यावेळी सरपंच धनश्री करांडे, विकास गलांडे, जि.प. उपाध्यक्ष राजेंद्रकुमार बारकुंड, मकई सहकारी साखर कारखाना संचालक दिनकर सरडे, आदिनाथ कारखाना माजी उपाध्यक्ष केरू गव्हाणे, मच्छिंद्र सरडे, बाळासाहेब कोकाटे, योगेश सरडे, अविनाश सरडे, बब्रुवान सरडे, माजी सरपंच सुखदेव नेमाणे, साहेबराव मारकड, हेमंत बारकुंड, ग्रामविकास अधिकारी घाडगे भाऊसाहेब, रंगनाथ पवार, धनाजी सरडे, राहुल गोळे, सचिन सरडे, संजय गव्हाणे, आनंद पोळ, शशिकांत सरडे, समाधान गव्हाणे, श्रीपाल गव्हाणे, बापूसाहेब राऊत, मच्छिंद्र कांबळे, महादेव सरडे उपस्थित होते.



## संक्षिप्त वृत्त...



### स्वच्छ शाळा सुंदर शाळा पुरस्काराने कोर्टी प्रशाला सन्मानित

**करमाळा, दि.२४ मार्च**

कोर्टी (ता.करमाळा) येथील जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळेस छत्रपती शिवाजी सांस्कृतिक कला क्रीडा मंडळ मरवडे ता.मंगळवेढा यांच्याकडून स्वच्छ शाळा सुंदर शाळा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार प्रशालेचे केंद्रीय मुख्याध्यापक विशाल शहाणे यांनी संस्थेचे अध्यक्ष सुरेश पवार, धनश्री उद्योग समुहाचे प्रमुख प्रा.शिवाजी काळुंगे, राज्य उपाध्यक्ष राजन सावंत, कवी इंद्रजित भालेराव या मान्यवरांच्या हस्ते स्वीकारला. या वेळी शिक्षक संतोष महाडीक, शिक्षिका दिपाली साळुंके, प्रियांका डहाळे, संगिता भंडारे उपस्थित होते. गटशिक्षणाधिकारी जयंत नलवडे, शिक्षण विस्तार अधिकारी नितीन कदम, मिनीनाथ टकले, केंद्रप्रमुख आदिनाथ देवकाते, सरपंच भाग्यश्री मेहेर, उपसरपंच पुष्पा जाधव, मेजर हनुमंत जाधव यांनी शाळेचे अभिनंदन केले.



### पोलीस महानिरीक्षक सुनिल फुलारी यांचा शहीद जवान संस्थेच्यावतीने सत्कार

**सांगोला,दि.२४ मार्च-**

कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक सुनील फुलारी यांना सलग दुसर्यांदा केंद्रीय गृह मंत्रालयाच्या उत्कृष्ट प्रशासकीय सेवेसाठी राष्ट्रपती पोलीस पदक देण्यात आले. याबद्दल सांगोल्यातील शहीद जवान संस्थेच्या वतीने शाल, झाडाचे रोप व गोंदवलेकर महाराजांचे प्रवचन पुस्तक भेट देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी जिल्हा पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधीक्षक प्रितम यावलकर, उपविभागीय पोलीस आधिकारी विक्रांत गायकवाड, पोलीस निरीक्षक भिमराव खणदाळे, सहायक पोलीस निरीक्षक सचिन जगताप उपस्थित होते. विशेष पोलीस महानिरीक्षक सुनील फुलारी हे सांगोला पोलीस स्टेशनची वार्षिक तपासणी करण्यासाठी आले होते. त्यानिमित्ताने पुण्श्लोक राजमाता आहिल्यादेवी होळकर सभागृहात नागरी सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता.



### श्री वर्धमान जैन वाचनालयात शहीद क्रांतिकारकांना अभिवादन

**बार्शी, दि. २४ मार्च-**

श्री वर्धमान जैन सार्वजनिक तालुका वाचनालय,बार्शी येथे शहीद दिनानिमित्त आज दि. २३ मार्च रोजी सकाळी ११-३० वाजता भारतमातेचे वीर थोर सुपुत्र शहीद भगतसिंग,सुखदेव,राजगुरु यांच्या प्रतिमेचे पूजन व अभिवादन वाचनालयाचे अध्यक्ष किशोर श्रीश्रीमाळ, संचालक धीरज कुंकूलोळ, आनंद सुराणा यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी वाचनालयाचे वाचक वर्ग व सभासद उपस्थित होते. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन संचालक धीरज कुंकूलोळ यांनी केले. वाचनालयाचे ग्रंथपाल सुरेश यादव क्लार्क विराज पतंगे यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.




### रोजा इफ्तारीतून सामाजिक सलोखा

**पंढरपूर, दि. २४ मार्च-**

येथील मुर्शदबाबा दर्गा येथे रमजान महिन्यानिमित्त रोजा इफ्तारचे आयोजन रवी सर्वगोड यांच्या माध्यमातून करण्यात आले. या कार्यक्रमात विविध समाजातील लोकांनी एकत्र येऊन सामाजिक सलोखा आणि बंधुत्वाचा संदेश दिला. याप्रसंगी विविध धर्मीय आणि समाजातील मान्यवर उपस्थित होते. शाहनवाज मुलाणी,सईद सय्यद,जावेद भालदार, मुसा मुजावर, इस्माईल बोहरी,शफी मुलाणी, सलीम सय्यद, फैयाज सय्यद, अशपाक देवळे, रौफ मुलाणी, गौस नाडेवाले, मक्का मस्जिद पेशईमाम,शोयब बोहरी, मुश्ताक भाई अत्तारी,इम्रान मणेरी, इम्रान तांबोळी, ज्ञानोबा सर्वगोड, गणेश सर्वगोड, राजेंद्र सर्वगोड, शाहू सर्वगोड, सतिश सर्वगोड,अमोल पाटील, सिद्धनाथ सांवत, शरद सोनवणे, प्रफुल्ल कांबळे यांनी कार्यक्रमाला हजेरी लावली.

# सण, उत्सव साजरे करताना सामाजिक सलोखा राखावा

## उपविभागीय पोलीस अधिकारी अर्जुन भोसले यांचे आवाहन



**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २४ मार्च -**

रामनवमी, रमजान ईद, हनुमान जयंती, महात्मा फुले जयंती, गुढीपाडवा आदी आगामी काळात येणारे सण, उत्सव सर्वांनी शातंतेमध्ये साजरे करावेत. सर्वधर्मीय बांधवांनी एकमेकांच्या भावनांचा आदर करीत हे, सण उत्सव साजरे करावेत. या काळात सामाजिक सलोखा, शांतता कायम राखून प्रशासनाने दिलेल्या सुचनांचे पालन करावे असे आवाहन उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ.अर्जुन भोसले यांनी केले आहे.

सण ,जयंती उत्सव व रमजान ईदच्या पार्श्वभूमीवर पोलीस संकुल पंढरपूर येथे शांतता समितीच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. बैठकीस प्रशिक्षणार्थी आयपीएस अंजना कृष्णन, तहसीलदार सचिन लंगुटे, पोलीस निरिक्षक विश्वजीत घोडके, तय्यब मुजावर, सहाय्यक पोलीस निरीक्षक सागर कुंजीर तालुक्यातील पोलीस पाटील तसेच शहर व तालुक्यातील समाज बांधव उपस्थित होते.

यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. भोसले म्हणले पंढरपूर तालुक्यात सर्व जाती-धर्मीय बांधव एकत्र येवून सण, उत्सव साजरे करतात, ही आजपर्यंतची परंपरा आहे. त्यामुळे आजपर्यंत तालुक्यात सामाजिक सलोखा आणि शांतता टिकून असून हीच परंपरा कायम राखणे, ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे.

आगामी काळात साजरे होणारे सण, जयंती उत्सव काळात सर्वांनी नियमांचे पालन करून आणि एकमेकांच्या भावनांचा आदर करून उत्साही वातावरणात साजरे करावेत. सण ,जयंती उत्सवाच्या अनुषंगाने लावण्यात येणारे बॅनर हे स्थानिक प्रशासनाच्या परवानगीने लावण्यात यावेत. तसेच ते वेळेत काढून घ्यावेत. यावेळी पोलीस निरिक्षक घोडके म्हणाले सर्व जाती धर्मातील समाज बांधवानी आप आपले सण उत्सव शांततेत व उत्साही वातावरणात साजरे करावेत. यावेळी पंढरपूर तालुक्यात शांतता अबाधित ठेवण्यासाठीच्या उपाययोजना काय व कशा याविषयी उपस्थितांनी विचारलेल्या प्रश्नांना बैठकीत समाधानकारक उत्तरे दिली.

### आक्षेपार्ह पोस्टची माहिती द्यावी

सोशल मीडियावरील पोस्टची खात्री केल्याशिवाय ती व्हायरल करू नये. सोशल मीडिया वापरतांना खबरदारी घ्यावी. समाज मन बिघडवणारी अनुचित पोस्ट व्हायरल करणे टाळावे. सोशल मीडियावरील बहुतांश आयडी चुकीच्या असल्याने अशा चुकीच्या आयडीला लाईक किंवा पोस्ट शेअर करू नये. कोणी आक्षेपार्ह पोस्ट ठेवली तर त्याची माहिती पोलिसांना द्यावी, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

# कर्मयोगी कारखान्यास राष्ट्रीय पातळीवरील तांत्रिक कार्यक्षमतेचा द्वितीय पुरस्कार





**तभा वृत्तसेवा,**
**श्रीपूर, दि. २४ मार्च-**

श्रीपूर (ता. माळशिरस) येथील कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखान्यास नवी दिल्ली येथील नॅशनल फेडरेशन को-ऑपरेटिव्ह शुगर फॅक्टरी लि. यांचा राष्ट्रीय पातळीवरील कार्यक्षमतेचा द्वितीय पुरस्कार जाहीर झाला आहे. त्याचे वितरण नवी दिल्ली येथे होणार असल्याची माहिती कारखान्याचे चेअरमन प्रशांतराव परिचारक यांनी दिली.

हा पुरस्कार गळीत हंगाम २०२३-२४ मध्ये कारखान्याने केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल असल्याचे श्री. परिचारक यांनी सांगितले. यावेळी व्हा. चेअरमन कैलास खुळे, कार्यकारी संचालक डॉ.यशवंत कुलकर्णी, कारखान्याचे संचालक दिनकरराव मोरे, दिलीपराव चव्हाण, उमेशराव परिचारक, ज्ञानदेव ढोबळे, तानाजी वाघमोडे, बाळासाहेब यलमर, भगवान चौगुले, लक्ष्मण धनवडे ,भास्कर कसगावडे, भैरू वाघमारे, गंगाराम विभुते, सुदाम मोरे, विजय जाधव, हनुमंत कदम, किसन सरवदे, सिताराम शिंदे, दिलीप गुरव, सिताराम शिंदे, शामराव साळुंखे, राणू पाटील, दाजी भुसनर व कारखान्याचे अधिकारी उपस्थित होते.

अधिक माहिती देताना परिचारक यांनी कारखान्याचे संचालक मंडळ व अधिकारी, कामगार यांनी नियोजन बद्ध केलेल्या कामामुळे कारखाना उत्तम ऊसाचे गाळप करू शकला. त्याचे परिणाम स्वरूप म्हणून कारखान्यास हा पुरस्कार मिळत असून उत्तम कामगिरीचे सातत्य कारखान्याने राखले आहे.

त्यामुळे सर्व अधिकारी कामगार अभिनंदास पात्र आहेत असे सांगितले. कार्यकारी संचालक डॉ.यशवंत कुलकर्णी यांनी कारखान्याचे चेअरमन प्रशांतराव परिचारक यांच्या मार्गदर्शनाखाली कारखाना वाटचाल करीत असून नवी दिल्ली यांचा तांत्रिक कार्यक्षमतेचा द्वितीय पुरस्कार मिळाला याचा आनंद असल्याचे सांगून २०२३-२४ या गळीत हंगामात ज्यूस ते इथेनॉल करण्यास केंद्र सरकारने बंदी घातल्याने कारखान्याचे दर दिवशी १५०० मे. टन. गळीत कमी होऊन सुद्धा कारखान्याने गाळप क्षमतेचा उच्चांक प्रस्थापित करत १० लाख ७१ हजार मे. टन ऊस गाळप करून ११ लाख ५३ हजार क्विंटल साखर उत्पादित केली. तर जिल्ह्यात सर्वाधिक ११. १५ टक्के साखर उतारा मिळविला.

यात तांत्रिक कार्यक्षमतेचा पुरेपूर वापर, पूर्ण ऊसाचे गाळप, कमी लॉसेस, विनाखंड गाळप या बाबींचा विचार केला गेला. कारखान्याने आज पर्यंत देश पातळी वरील ११ तर राज्य पातळीवर ५५ पुरस्कार प्राप्त केल्याचे त्यांनी सांगितले.

# सांगोल्यातील वाणीचिंचाळे येथे माझी वसुंधरा अभियान

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. २४ मार्च-**




सांगोला तालुक्यातील वाणीचिंचाळे गावात पर्यावरण व वातावरणीय बदल लक्षात घेता पंचम हाभूतांवर आधारित शासनाचे माझी वसुंधरा अभियान यशस्वीपणे राबवले जात आहे. सदर अभियान यशस्वी होण्यासाठी गावकऱ्यांनी कंबर कसली आहे.

हे अभियान घराघरापर्यंत प्रत्येक माणसापर्यंत पोहोचण्यासाठी प्लास्टिक बंदी, वृक्ष संवर्धन, पाणी बचत, जैविक शेतीचा वापर, इंधन बचत, ऊर्जा साधनांचा योग्य वापर, विविध शासकीय योजना, टाकाऊपासून टिकाऊ वस्तू बनवणे, वाहतुकीच्या हरित साधनांचा वापर, किचन गार्डन तयार करणे, ई कचरा व्यवस्थापन, घनकचरा व्यवस्थापन, रेन वॉटर हार्वेस्टिंग, शोषखड्याचा वापर अशा प्रकारे विविध संदेश देणारे चित्र गावाच्या दर्शनी भागात भिंतीवर व झाडावर रेखाटण्यात आले आहेत. तसेच सेल्फी पॉइंट तयार करण्यात आले आहेत. विविध उपक्रमामुळे गावात माझी वसुंधरा अभियानास उत्तम प्रतिसाद मिळत आहे. सदर अभियान यशस्वी करण्यासाठी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी उमेशचंद्र कुलकर्णी, विस्तार अधिकारी अमोल तोडकरी, मिलिंद सावंत यांच्यासह अनेक अधिकारी गावकऱ्यांना मार्गदर्शन करत आहेत.



# सेन्ट्रल बँकेकडून अन्नछत्र मंडळास दोन फ्रीज भेट

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २४ मार्च-**

येथील सेन्ट्रल बँक ऑफ इंडिया शाखेकडून श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळास बँकेचे क्षेत्रीय प्रमुख अचिंत कुमार यांच्या हस्ते दोन डीप फ्रीज भेट देण्यात आल्या.

यावेळी श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली सुरु असलेले धार्मिक क्षेत्रातील कार्य महान असल्याचे मनोगत सेन्ट्रल बँक ऑफ इंडिया सोलापूर विभागाचे क्षेत्रीय प्रमुख अचिंत कुमार यांनी व्यक्त केले.

याप्रसंगी अक्कलकोट शाखेचे शाखा प्रमुख इरेश बागेवाडी उपस्थित होते. सदर जणांचा सत्कार न्यासाच्या वतीने कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जन्मेजयराजे भोसले यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी न्यासाचे सचिव शामराव मोरे, मुख्य पुरोहित अप्पू पुजारी, भोसले, गोटू माने, निखील पाटील, सतीश महिंद्रकर, सरफराज शेख, मैनुद्दीन कोरबू, शहाजी यादव, बाळासाहेब घाडगे, संभाजीराव पवार, श्रीनिवास गवंडी, दत्ता माने, तानाजी पाटील, राजू पवार, रमेश हेगडे, प्रसाद हुल्ले, शरद भोसले, बसवराज क्यार, अनिल बिराजदार, चंद्रकांत हिबारे, एस के स्वामी, शावरेप्पा माणकोजी, कल्याण देशमुख, धनंजय निंबाळकर, विशाल घाडगे, रोहित कदम, विठ्ठल रेड्डी, समर्थ चव्हाण उपस्थित होते.



# ‘अन्नछत्र’च्या रक्तदान शिबीरास प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि .२४ मार्च-**

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली न्यासाकडून शासकीय-निमशासकीय उपक्रमांना नेहमीच मोलाचे सहकार्य केले जाते. त्याप्रमाणे दि.२३ रोजी शहीद दिनाचे औचित्य साधून संवेदना-२ या निमा संघटना शाखा अक्कलकोट, यांच्या वतीने अन्नछत्र मंडळाच्या परिसरात आयोजित देशव्यापी रक्तदान शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

दरम्यान रक्तदान शिबिराचे उदघाटन न्यासाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे भोसले व सचिव शामराव मोरे यांच्या हस्ते व निमाचे पदाधिकारी व सदस्य यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. या रक्तदान शिबिरात स्वामी भक्तांसह सेवेकरी कर्मचारी यांनी सहभाग घेतला. सोलापूर येथील अक्षय ब्लड बँकची टिम उपस्थित होती. याप्रसंगी निमाचे डॉ. प्रदीप घिवारे, डॉ. राजेंद्र पाटील, डॉ. गिरीष साळुंखे, डॉ.आदित्य कोतवाल, डॉ. लिंगराज बोकडे आदि उपस्थित होते. यावेळी न्यासाचे नामा भोसले, गोटू माने, निखील पाटील, सतीश महिंद्रकर, यादव, बाळासाहेब घाडगे, बाळासाहेब पोळ, योगेश कटारे, संभाजीराव पवार, श्रीनिवास गवंडी, दत्ता माने, तानाजी पाटील, राजू पवार, रमेश हेगडे, प्रसाद हुल्ले, शरद भोसले, बसवराज क्यार, अनिल बिराजदार, चंद्रकांत हिबारे, एस के स्वामी, शावरेप्पा माणकोजी, कल्याण देशमुख, धनंजय निंबाळकर, विशाल घाडगे, रोहित कदम, विठ्ठल रेड्डी, समर्थ चव्हाण यांच्यासह सेवेकरी उपस्थित होते.

# ६५ एकर भक्ती सागरात ५०१ झाडे लावण्याचा संकल्प

- जागतिक वनीकरण दिनानिमित्त श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती, पंढरपूर नगरपरिषद व वृक्षप्रेमी ग्रुपच्या वतीने आयोजन




**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २४ मार्च-**

जागतिक वनीकरण दिनानिमित्त श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती, पंढरपूर नगरपरिषद व वृक्षप्रेमी ग्रुप पंढरपूर, वृक्षदायी संस्था देहू ग्रुपच्या वतीने ६५ एकर भक्ती सागर येथे ५०१ झाडे लावण्याची सुरुवात हभ प शिवाजीराव मोरे महाराज, पंढरपूर नगर परिषदेचे माजी नगराध्यक्ष लक्ष्मणराव शिरसट यांच्या हस्ते माजी नगरसेवक नवनाथ रानगट, विक्रम शिरसट, उपमुख्याधिकारी सुनील वाळूजकर, पंढरपूर अर्बन बँकेचे संचालक सोमनाथ होरणे, अतुल खुडे, देहूचे गावचे सरपंच संतोष हगावणे,देहू वृक्षदायी संस्थेचे सचिव सुभाष पाटील, ॲड. रामलिंग कोष्टी, वर्षा चंकेश्वरा यांच्या उपस्थित करण्यात आला

आषाढी कार्तिकी माघी चैत्री या यात्रेमध्ये श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी आलेले भाविक नदीपलीकडे असलेल्या ६५ एकर भक्ती सागर मध्ये मोठ्या प्रमाणात वास्तव्यास असतात या ठिकाणी येणाऱ्या भाविकांना सावली मिळावी या उदात्त हेतूने श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती, पंढरपूर नगरपरिषद, वृक्षदायी संस्था देहू, व पंढरपूर शहरामध्ये मोठ्या प्रमाणात सध्या वृक्ष लागवड करत असलेली वृक्षप्रेमी संस्थाच्या वतीने या ठिकाणी झाडे लावण्याचा निर्णय घेण्यात आला होता त्यानुसार आज ६५ झाडे लावून या ठिकाणी या कामाची सुरुवात केली आहे. सुमारे ५०१ झाडे या भक्ती सागर मध्ये लावण्यात येणार असल्याची माहिती मंदिर समितीचे सदस्य ह भ प शिवाजीराव मोरे महाराज यांनी दिली यावेळी देहू इथून वृक्षदायी संस्थेचे ४० निसर्ग प्रेमी उपस्थित होते. तसेच मंगळवेढा येथील वारी परिवार, पंढरपूर शहरातील वृक्षप्रेमी ग्रुप, श्री विठ्ठल रुक्मिणी योग प्राणायाम संस्थेचे चे सदस्य मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. यावेळी श्री विठ्ठल रुक्मिणी योग प्राणायाम संस्थेचे सचिव प्रशांत आगवणे, उपाध्यक्ष रवींद्र कोडग, खजिनदार त्रिभुवन तारे , वारी परिवाराचे सतीश दत्तू, वृक्षप्रेमी ग्रुपचे सदस्य ॲड. सुधाकर कांबळे, जयप्रकाश मांगले, आनंद नगरकर, जगन्नाथ मुळीक, के.जी. जाधव, मोहन बोडके, संजय साबळे, अमित लाडे, नाना शिंदे, स्वप्निल मोरे, वेळापुरे साहेब, दीपक थिटे, सतीश खडके, माऊली म्हेत्रे, वैभव येवनकर, राजाभाऊ तिवाटणे, हेमंतशेठ व्होरा, जितेंद्र वजरीनकर, शामराव तापडिया सुनिल भालेराव सुदर्शन मोरे, महेश बडवे, नागेश मंजरतकर, नवनाथ राऊत हे उपस्थित होते. सूत्रसंचालन दीपक इरकल यांनी केले.

धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



तेरच्या सुरज गायकवाड व त्याच्या संघाचा देशात डंका...

## नालॉग आणि डिजिटल हॅकेथॉन स्पर्धेत पटकावला देशात पहिला क्रमांक

**तभा वृत्तसेवा**
**तेर, दि.२४ मार्च -**

धाराशिव तालुक्यातील तेर येथील सूरज भीमराव गायकवाड आणि त्यांच्या संघाने MeitY अंतर्गत C2S कार्यक्रमात, C-DC बंगळुरूतर्फे १५-२० मार्च २०२५ दरम्यान आयोजित 'नालॉग आणि डिजिटल हॅकेथॉन' मध्ये देशात पहिला क्रमांक पटकावला. या उल्लेखनीय कामगिरीसाठी सूरज आणि त्यांच्या संघाचे सर्वत्र कौतुक होत आहे.



या स्पर्धेत देशभरातील २२०० संघा पैकी ४० संघाची अंतिम निवड करण्यात आली होती.

यामध्ये समावेश असलेल्या सुरज यांच्या संघाने अवघ्या ३ दिवसांत चिप डिझाईन करून देशात पहिला क्रमांक पटकावला.

## संक्षिप्त वृत्त...



### डिजिटल नारी सशक्तिकरण मेळावा संपन्न

**तुळजापूर, दि.२४ मार्च -**

तंत्रज्ञानाच्या प्रगतीसोबत महिलांनी सशक्त बनावे आणि डिजिटल युगाशी जुळवून घ्यावे या उद्देशाने डिजिटल नारी सशक्तिकरण महिला मेळावा धाराशिव येथे आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात महिला सक्षमीकरण, तंत्रज्ञान, आरोग्य आणि सुजाण पालकत्व यासारख्या महत्त्वपूर्ण विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमात धनंजय जेवळीकर यांनी एमकेसीएलच्या विविध योजनांची माहिती उपस्थित महिलांना दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निशिगंधा सोनवणे यांनी केले. शेवटी उपस्थितांचे आभार ज्योति पाटील यांनी मानले.



### हॉलीबॉल मैदानास क्रिडाधिकाऱ्यांची भेट

**तुळजापूर, दि.२४ मार्च -**

शहरातील पूजारी नगर सोसायटीच्या अंतर्गत ओपन स्पेसमध्ये तयार करण्यात आलेल्या हॉलीबॉल मैदानास क्रीडाधिकारी गणेश पवार यांनी सदिच्छा भेट देऊन पाहणी केली. तुळजापूर तालुका नूतन क्रीडा अधिकारी गणेश पवार यांच्यासह जेष्ठ क्रीडा मार्गदर्शक इसाक पटेल, महाराष्ट्र अथेलेस्टिक असोसिएशनचे सहसचिव योगेश थोरबोले यांचा पूजारी नगर सोसायटी फाऊंडेसहनतर्फे शाल व श्यामची आई कादंबरी देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी पूजारी नगर फाऊंडेशन गणेश पूजारी, कार्याध्यक्ष श्रावण पवार, उपाध्यक्ष उमाजी गायकवाड, सहसचिव तानाजी म्हेत्रे, सतीश खोपडे, रुतेश कवडे, सिद्धू इंगोले, कैलास जमादार, सोमनाथ पूजारी, विशाल शिंदे, लिंबाजी पूजारी, ॲड. राज राठोड, विनायक बेरगळ, काशिनाथ राऊत आदी उपस्थित होते.



### लोहारा येथील शांतता कमिटीची बैठक

**लोहारा, दि.२४ मार्च -**

आगामी काळात येणारे सण व रमजान ईद व इतर सण उत्सव हे शांततेत व जातीय सलोखा राखून साजरे करावे, तसेच नागपूर येथील घडलेल्या घटने बाबत व सोशल मीडियावरील प्रसारीत होणाऱ्या अफावर विश्वास ठेवू नये, असे आवाहान उपविभागीय पोलीस अधिकारी (उपविभाग उमरगा) सदाशिव शेलार यांनी केले. आगामी काळात येणारे रमजान ईद व इतर सणाच्या अनुषंगाने लोहारा शहरातील पोलीस ठाण्यात दि.२२ मार्च रोजी उपविभागीय पोलिस अधिकारी (उपविभाग उमरगा) सदाशिव शेलार यांच्या अध्यक्षतेखाली व सहाय्यक पोनि. ज्ञानेश्वर कुकलारे यांच्या प्रमुख उपस्थितीत लोहारा तालुक्यातील सर्व मस्जिदचे मौलाना तसेच शांतता व मोहल्ला कमिटीतील सदस्य यांची बैठक घेण्यात आली.

### धाराशिवात जागतिक क्षयरोग दिन साजरा

**धाराशिव, दि.२४ मार्च -**

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व जिल्हा क्षयरोग केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आज २४ मार्च रोजी जागतिक क्षयरोग दिवस साजरा करण्यात आला. यावेळी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. शैलेंद्र चौहाण, जिल्हा आरोग्य अधिकारी, डॉ. सतीश हरिदास, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. धनंजय चाकूरकर, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे प्रा.डॉ. स्वप्निल सांगळे, वैद्यकीय महाविद्यालयाचे ऊरो विभाग प्रमुख डॉ. प्रवीण डुमने, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. विनयशील कुलकर्णी, प्राचार्य मूजावर, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. अभिजीत बनसोडे, डॉ. शेख, डॉ. सय्यद, वैद्यकीय महाविद्यालयाची विद्यार्थी तसेच नागरिक उपस्थित होते.

### शशिकला गाढवे यांचे निधन

**परंडा, दि.२४ मार्च -**



परंडा तालुक्यातील सोनारी येथील जेष्ठ महिला शशिकला शिवलिंग गाढवे याचे रविवारी दि२३ मार्च रोजी निधन झाले. मृत्यू समयी त्या ८० वर्षाच्या होत्या. त्याच्या पाठीमागे एक मुलगा, सुन, नातवंडे असा परिवार आहे. परंडा तालुक्यातील काँग्रेस आयचे पदाधिकारी नितीन गाढवे यांच्या त्याच्या त्या आई होत.

### लतिकाबाई कदम-परमेश्वर यांचे निधन

**तुळजापूर, दि.२४ मार्च -**



शेतकरी कामगार पक्षाच्या माजी नगरसेविका लतिकाबाई किसनराव कदम-परमेश्वर (वय ७५) यांचे अल्पशा आजाराने वार शनिवार दि.२२ मार्च रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, तीन मुले, सुना व नातवंडे असा परिवार आहे. पारंपारिक कदम-परमेश्वर स्मशानभूमीत सकाळी ९ वाजता त्यांचा पार्थिव वर अंत्यविधी करण्या आले. माजी नगराध्यक्ष अजित कदम परमेश्वर यांच्या त्या मातोश्री होत्या.

# सिबिल स्कोअर आधारावर शेतकऱ्यांना कर्ज नाकारू नये : खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर

## ७.५ लाख रुपयापर्यंत शैक्षणिक कर्ज विनातारण घेता येणार...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२४ मार्च -**

केंद्र सरकारने शेतकऱ्यांच्या आणि विद्यार्थ्यांच्या आर्थिक गरजांसंदर्भात महत्त्वपूर्ण निर्णय घेतले आहेत. लोकसभेत खासदार ओमप्रकाश भूपालसिंह उर्फ पवन राजेनिंबालकर यांनी तारांकित प्रश्न क्रमांक ३३१ नुसारविचारलेल्या प्रश्नांना उत्तर देताना अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी महत्त्वपूर्ण माहिती दिली.

राष्ट्रीयीकृत बँका सिबिल स्कोर कमी असलेल्या शेतकऱ्यांना कर्ज नाकारत असल्याच्या तक्रारींची दखल घेत सरकारने स्पष्ट केले आहे की, बँकांनी कर्जवाटपाच्या प्रक्रियेत कर्ज माहिती कंपन्यांचा अहवाल (CIBIL स्कोर) विचारात घ्यावा, मात्र केवळ त्याचाच आधारावर कर्ज नाकारू नये. तसेच, शेतकऱ्यांसाठी सरकारने २ लाख रुपयांपर्यंतच्या कर्जांवर कोणतीही तारण (Collateral) मागितली जाणार नाही, असे आदेश दिले आहेत.



याशिवाय, ३ लाख रुपयांपर्यंतच्या पीककर्जासाठी कोणतेही प्रोसेसिंग फी, प्रलेखन शुल्क किंवा इतर सेवा शुल्क आकारले जाणार नाही, असेही सरकारने जाहीर केले आहे. यामुळे छोट्या व मध्यम शेतकऱ्यांना कर्ज मिळवणे अधिक सोपे होणार आहे. सरकारने ७.५ लाख रुपयांपर्यंतच्या शिक्षण कर्जासाठी कोणत्याही प्रकारच्या तारणाची आवश्यकता नसल्याचे स्पष्ट केले आहे. भारत सरकारच्या 'शिक्षण कर्जासाठी पत हमी निधी योजना' (CGFSEL) अंतर्गत ही कर्जे हमीदाराशिवाय मंजूर केली जातील.

तसेच, 'पीएम विद्यालक्ष्मी योजना' सुरू करण्यात आली आहे, जी देशातील ८६० उच्च शिक्षण संस्थांमध्ये प्रवेश घेणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांना सहज आणि पारदर्शी पद्धतीने कर्ज देईल. या निर्णयांमुळे शेतकरी आणि विद्यार्थी दोघांनाही आर्थिक मदतीचा मोठा आधार मिळेल, असे मत व्यक्त केले जात आहे.

## तुळजापूर ड्रग्ज प्रकरणात आणखी दोन आरोपी अटकेत

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२४ मार्च -**

तुळजापूर ड्रग्ज प्रकरणात तामलवाडी पोलिसांनी आणखी दोन आरोपींना अटक केली असून, यामुळे आरोपींची एकूण संख्या १९ वर पोहोचली आहे. मात्र, या कारवाईत गंभीर विसंगती समोर आली आहे, कारण सात फरार आरोपींपैकी चार जणांची नावे पोलिसांनी अद्याप गोपनीय ठेवली आहेत. या गोपनीयतेमागे नेमके काय कारण आहे, असा सवाल जनतेतून उपस्थित होत आहे. फरार आरोपींमध्ये एका पोलिसाचा मुलगा असल्याची माहिती समोर आली आहे.

काल अटक करण्यात आलेले आरोपी सुलतान लतीफ शेख (पुणे) आणि जीवन नागनाथ साळुंखे (सोलापूर) यांचा समावेश आहे. आतापर्यंत १० आरोपींना न्यायालयीन कोठडी देण्यात आली आहे. फरार आरोपींमध्ये माजी नगराध्यक्षांचा हस्तक आणि पोलिस अधिकाऱ्याचा मुलगा असल्याने, या प्रकरणावर राजकीय आणि पोलिसीय आडपडदा होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

यातील चार फरार आरोपींची नावे पोलिसांनी गोपनीय ठेवली आहेत, ज्यामुळे पोलिसांच्या वर्तवणुकीवर संशय निर्माण झाला आहे.

जनतेच्या मनात या प्रकरणाबद्दल प्रचंड रोष आहे. स्थानिक नागरिक आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी पोलिसांकडून पारदर्शक तपास आणि कठोर कारवाईची मागणी केली आहे.

## तुळजापूर नगर परिषदेच्या मुख्याधिकारीपदी अजिंक्य रणदिवे

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२४ मार्च -**

नगर परिषद मुख्याधिकारी पदाचा पदभार अजिंक्य रणदिवे यांनी स्वीकारला. तुळजापूर नगर परिषदेसाठी शासनाच्या आदेशान्वये अजिंक्य रणदिवे यांची नगरपरिषदे येथे मुख्याधिकारी या पदावर नियुक्ती झाली होती.



सदर पदाचा पदभार मुख्याधिकाऱ्यांनी रणदिवे यांनी २४ मार्च रोजी स्वीकारला आहे. पदभार स्विकारण्या पुर्वी त्यांनी श्री तुळजाभवानी मातेचे दर्शन घेतले.

यावेळी तुळजापूर नगर परिषदेच्या वतीने संघटनेचे अध्यक्ष दत्तात्रय साळुंखे, जिल्हाध्यक्ष अमर ताकमोघे यांनी मुख्याधिकारी यांचे पुष्पगुच्छ, फेटा, आई तुळजाभवानी मातेची प्रतिमा देऊन स्वागत केले. सदर कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी बापूसाहेब रोचकरी, नम्रता शिंदे, सायली पाटील, पुष्पांजली मंगरुळे, शरद पवार, विशाल लोंढे, प्रमोद माळी यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कार्यालय अधीक्षक वैभव पाठक यांनी केली.

## पन्नालाल सुराणा, रमाकांत कुलकर्णी यांना जीवनगौरव पुरस्कार प्रदान

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.२४ मार्च -**

महाराष्ट्र लोकविकास मंचतर्फे दरवर्षी सामाजिक क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या व्यक्तींना पुरस्कार देऊन सन्मानित केले जाते. याही वर्षी २०२५ च्या प्रतिष्ठित पुरस्कारांची घोषणा नुकतीच करण्यात आली होती त्यानुसार दि.२३ मार्च रोजी पर्याय सामाजिक संस्था हसेगाव के. येथे जेष्ठ समाजसेवक पन्नालाल सुराणा आणि रमाकांत कुलकर्णी यांना जीवनगौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

यावेळी व्यासपीठावर पर्याय संस्थेचे कार्यवाहक विश्वनाथअण्णा तोडकर, एम.एन. कोंढाळकर, भूमिपुत्र वाघ, अनिता तोडकर, मनिषा घुले, ओम गिरी, अनिगुंठे, के. व्ही. सरवदे आदी उपस्थित होते.




तसेच शरद केशवराव झरे, वैदेही सुधीर सावंत, विलास गोडगे, शिवराम कांबळे, रणजित बोबडे, बंडू आंबटकर, ॲड. राधाकृष्ण बलभीमराव देशमुख या सातही सामाजिक कार्यकर्त्यांनी स्वतःच्या आयुष्यातील पंचेवीस ते पस्तीस वर्ष सामाजिक बदलासाठी कार्य केलेले आहे. भूकंप, दुष्काळ, कोविड, पर्यावरण, महिला, बालके यांच्या साठी आयुष्यातील अनेक वर्ष कार्य केलेले आहे. यासाठी त्यांना समाजकार्य गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला.

या पुरस्कार वितरण समारंभात जेष्ठ समाजसेवक पन्नालाल सुराणा, रमाकांत कुलकर्णी यांच्यासह एम.एन. कोंढाळकर यांनी आपले विचार व्यक्त केले.

तर अध्यक्षीय समारोप विश्वनाथअण्णा तोडकर यांच्या भाषणाने झाला. यावेळी ते म्हणाले की पायात घालायचं खेटर, तोंडाला लावायची पावडर मॉल मध्ये विकली जाते आणि पोटात घालायचा भाजीपाला हा गटाराच्या कडेला बसून विकला जातो हे मोठं दुर्दैव आहे. शेतकऱ्याच्या मालाला हमी भाव दिला जात नाही, मात्र पॅकिंग केलेल्या क्रीमची पुढी सुद्धा सर्व करासहित विकली जाते.

आश्रुबा गायकवाड यांनी आभार व्यक्त केले तर सूत्रसंचालन मनिषा घुले यांनी केले.

## जयंती उत्सव समीतीच्या अध्यक्षपदी क्षिरसागर, उपाध्यक्षपदी फुलसुंदर

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.२४ मार्च -**

लोहारा शहरातील महात्मा फुले युवा मंच लोहारा यांच्या वतीने शहरातील माऊली कॉम्प्लेक्स येथे नगरसेवक अविनाश माळी यांच्या अध्यक्षतेखाली महात्मा फुले जयंती उत्सव समीतीची बैठक घेण्यात आली.

यावेळी जयंती उत्सव समीतीच्या अध्यक्षपदी गहिनीनाथ क्षिरसागर, उपाध्यपदी पदी शुभम फुलसुंदर, महेश सुर्यवंशी, तर सचिवपदी शाम क्षिरसागर सहसचिवपदी धिरज क्षीरसागर, कोषाध्यक्षपदी शशिकांत माळी यांच्या निवडी करण्यात आल्या. यावेळी माजी नगरसेवक श्रीनिवास माळी, युवा मंच अध्यक्ष सचिन माळी, राजेंद्र क्षीरसागर, अमोल माळी, शरण फुलसुंदर, किशोर क्षीरसागर, विष्णु क्षीरसागर, सोमनाथ माळी, दिनेश माळी, श्रीकांत माळी, संजय काटे, ज्ञानेश्वर क्षीरसागर, संदिप माळी, अशोक क्षीरसागर, अशोक काटे, गणेश माळी, संतोष क्षीरसागर, बालाजी माळी, अरुण वाघमारे, राहुल माळी, लक्ष्मण क्षीरसागर, बजरंग माळी, बाळु माळी, गजानन वाघमारे, प्रशांत माळी, बालाजी क्षीरसागर, नितीन माळी, बंटी माळी, यांच्या सह युवा मंचचे सदस्य व समाजबांध व मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# धोकादायक वर्गखोल्या व वीज बिलासाठी निधीची तरतूद करा

## आमदार कैलास पाटील यांची सभागृहात मागणी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२४ मार्च -**

धोकादायक वर्गखोल्यासाठी निधीची कमतरता भासत आहे, शिवाय शाळेतील वीज बिल भरण्यासाठी कोणतीही तरतूद नाही या दोन्ही बाबीसाठी निधीची तरतूद करण्याबाबत आमदार कैलास पाटील यांनी सभागृहात आवाज उठविला. त्यावर मंत्री पंकज भोईर यांनी निधीची तरतूद करु असे आश्वासन दिले.

यावेळी आ.पाटील म्हणाले, धोकादायक वर्गखोल्याच्या दुरुस्तीसाठी जिल्हा परिषदेचा सेस, जिल्हा नियोजन समितीतुन पाच टक्के निधी देण्याची तरतूद आहे.

पण धाराशिव जिल्ह्यात धोकादायक वर्गखोल्याची संख्या ५९४ इतकी आहे. जिल्हा नियोजन समितीच्या पाच टक्केतुन फक्त ८२ वर्गखोल्या झाल्या आहेत.

मग उर्वरीत वर्गखोल्यात विद्यार्थ्यांनी धोकादायक खोल्यामध्येच शिकायचं का? राहिलेल्या ५१४ वर्गखोल्यासाठी स्वतंत्र निधीची तरतूद करावी. समग्र शिक्षण मधून ही काम होतील असं सांगितलं गेलं पण त्यांच्याकडूनही कामे झालेली नाहीत.



तसेच शाळामध्ये ई लर्निंग ची सोय केली असली तर त्याला लागणारी वीज ही व्यावसायिक दराने आकारली जात आहे.

ही आकारणी सवलतीच्या दराने उपलब्ध करावी तसेच या वीज बिलासाठी सुद्धा कोणतीही तरतूद नसल्याच आमदार पाटील यांनी निदर्शनास आणून दिली. यावर शिक्षण राज्यमंत्री पंकज भोईर यांनी उत्तर दिले. ते म्हणाले, धोकादायक वर्गखोल्यासाठी आपण वेगवेगळ्या माध्यमातून निधी उपलब्ध करत आहोत पण तो पुरेसा नसल्याच वास्तव आहे. म्हणून यासाठी स्वतंत्र निधी देण्यासाठी सरकार प्रयत्नशील आहे. तसेच वीजबिल दर हा व्यावसायिक पद्धतीने आकारला जाऊ नये असा शासनाने निर्णय घेतल्याच मंत्री भोईर यांनी सांगितले.

वीजबिल भरण्याकरिता सुद्धा निधी उपलब्ध करू असे त्यानी सांगितले.

## न.प. शाळेत जागतिक क्षयरोग दिन साजरा

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२४ मार्च -**

उपजिल्हा रुग्णालय व तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक क्षयरोग दिनानिमित्त दि.२४ मार्च रोजी नगरपरिषद शाळा क्रमांक ३ मध्ये माहितीपर कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

यावेळी वैद्यकीय अधिकारी डॉ. अविनाश ढगे यांनी क्षयरोगाची लक्षणे व उपचार याविषयी विस्तृत माहिती सांगितली.

वैद्यकीय अधिकारी डॉ. सुप्रिया जाधव यांनी क्षयरोगाचा प्रसार होऊ नये यासाठी करावयाचे प्रतिबंधक उपाय याविषयी विस्तृत माहिती सांगितली.

जागतिक क्षयरोग दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमास सुधाकर कांबळे (कुष्ठरोग तंत्रज्ञ), महेश पाठक (क्षयरोग पर्यवेक्षक), ओंकार वाघमोडे (एम.पी.डब्ल्यू), सौरभ सुरवसे (सुपरवायजर), सुजित माले (एन.एम.ए), दीपक माळी यांची उपस्थिती होती.

सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक महेश पाठक तर आभार मुख्याध्यापक तुकाराम मोटे यांनी मानले.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी निर्मला कुलकर्णी, जालिंदर राऊत, शरद कोळगे, पुष्पा काळे,वैशाली गोमारे, दिगंबर थेटे, दत्ता मेढे, अनिल राठोड, गोविंद प्रताप,कल्पना व्हटकर, संदीप माने यांनी प्रयत्न केले.

धाराशिव ग्रंथोत्सव २०२४ चे थाटात उद्घाटन... जिल्ह्यातील साहित्यिकांची पुस्तके विक्रीसाठी स्वतंत्र स्टॉल...

# ग्रंथ हे सोशल मीडियावर अँटिबायोटिकचे काम करतात : सुनील हुसे

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२४ मार्च -**

ग्रंथालय ही खऱ्या अर्थाने गावची सांस्कृतिक केंद्रे असून यामधील विविध लेखकांची पुस्तके वाचून अनेकजण प्रेरित होतात. मात्र, हल्ली सोशल मीडियाचा वापर मोठ्या प्रमाणावर होत असल्यामुळे वाचक संख्या कमी होत चालली असून ही अतिशय गंभीर बाब आहे. त्यामुळे ग्रंथालयांनी ई-बुक्स तयार करून वाचन संस्कृती टिकवावी. पुस्तके म्हणजेच ग्रंथ हे सोशल मीडियावर अँटिबायोटिक म्हणून काम करीत असल्याचे प्रतिपादन छत्रपती संभाजी नगरचे विभागाचे सहायक संचालक सुनील हुसे यांनी केले.





धाराशिव येथील जिल्हा ग्रंथालय कार्यालयाच्या वतीने ग्रंथोत्सव २०२४ चे आयोजन २४ व २५ मार्च रोजी जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय येथे करण्यात आले आहे. आज धाराशिव ग्रंथोत्सव -२०२४ चे उद्घाटन केल्यानंतर आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

यावेळी जिल्हा ग्रंथालय संघटनेचे अध्यक्ष व.ग. सुर्यवंशी, जिल्हा माहिती अधिकारी विवेक खडसे, जिल्हा ग्रंथालय अधिकारी हनुमान ढाकणे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

उद्घाटक म्हणून बोलतांना हुसे म्हणाले की, जिल्ह्यातील लेखकांनी प्रकाशित केलेली पुस्तके जिल्ह्यातील प्रत्येक ग्रंथालयामध्ये ठेवलीच पाहिजेत. त्यामुळे स्थानिक साहित्यकांचे लिखाण वाचून वाचकांना वाचनाची आवड निर्माण होण्यास मदत होते.

सध्या वाचन संस्कृतीवर सध्या फेसबुक, युट्यूब इन्स्टाग्राम, ट्विटर व ए.आय. यासारख्या सोशल मीडियाचे आक्रमण होत असून त्याच्या आहारी सुज्ञ नागरिक देखील गेले असल्याचे त्यांनी सांगितले. त्यामुळे जिल्ह्यातील प्रत्येक वाचनालयांनी किमान १० ई बुक्स तयार करून ती आपल्या गावातील शालेय विद्यार्थी व इतर वाचकांचा ग्रुप करून त्यांना वाचण्यासाठी उपलब्ध करून द्यावे असे आवाहन केले.

जिल्हा माहिती अधिकारी खडसे म्हणाले की, पुस्तक वाचनामुळे समाजामध्ये जे-जे मतभेद व भेदभाव असतात ते मिटविण्याचे काम ग्रंथ करतात.चांगल्या साहित्यिक व लेखकांचे साहित्य वाचावे. संस्कृती कशी वाढेल ती कशी टिकेल यासाठी प्रयत्न करावे असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाची सांगता ॲड. चौगुले यांनी पसायदानाने केली. प्रारंभी सहायक संचालक सुनील हुसे व जिल्हा माहिती अधिकारी विवेक खडसे यांच्या हस्ते फित कापून ग्रंथोत्सवाचे उद्घाटन करण्यात आले.

सकाळी धाराशिव शहरातून ग्रंथदिंडी काढण्यात आली. जिल्हाधिकारी कार्यालय येथे ग्रंथदिंडीचे पूजन निवासी उपजिल्हाधिकारी शोभा जाधव यांनी केले. या दिंडीत अनेकांचा सहभाग होता.

# नांदेड मध्ये आज महाविहार बुद्धगया मुक्ती आंदोलन महामोर्चा

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २४ मार्च**

बौद्ध्यत्तरांच्या ताब्यात असलेले बिहार राज्यातील महाबोधी महाविहार बौद्ध गया हे बौद्ध भिक्खू आणि बौद्ध धर्मी यांच्या ताब्यात देण्याच्या मागणीसाठी उद्या २५ मार्च रोजी महामोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. नांदेड जिल्ह्यातील लाखो बौद्ध अनुयायी या मोर्चात सहभागी होणार आहेत. नांदेड जिल्ह्यातील समस्त भिक्खू संघ, भारतीय बौद्ध महासभा, समता सैनिक दल तसेच जिल्ह्यातल्या विविध आंबेडकरी राजकीय- सामाजिक संघटनांनी या महामोर्चाचे आयोजन केलेले आहे.

बुद्धगया येथील महाबोधी महाविहार बुद्धविहार गेली वर्षानवर्षे बौद्ध्यत्तरांच्या ताब्यात आहे. विशेषतः हिंदू धर्मीयांनी बुद्धविहाराचे व्यवस्थापनावर ताबा घेऊन



मनमानी चालवली असून बुद्धिस्ट टेम्पल क्ट १९४९ नुसार हा ताबा असल्याने बौद्ध धर्मीय भिक्खू आणि बौद्ध अनुयायींच्या न्याय हक्कावर गदा आणली आहे. त्यामुळे सदर कायदा तत्काळ रद्द करण्याच्या मागणीसाठी भारतभर बौद्ध भिक्खू आणि अनुयायींनी व्यापक आंदोलन छेडले आहे.

बुद्धविहार मुक्ती आंदोलनाच्या समर्थनार्थ नांदेड जिल्ह्यात मुक्ती आंदोलन महामोर्चा आयोजित करण्यात आला आहे. नांदेडच्या कृषी उत्पन्न बाजार समिती मैदान नवीन मोंढा नांदेड येथे दुपारी १२ वाजता जिल्ह्यातील लाखो बौद्ध अनुयायींचा जमाव जमणार आहे. नवा मोंढा मैदान येथून महामोर्चाची सुरुवात होणार असून नियोजित भगवान बुद्ध पुतळा, महात्मा फुले पुतळा, शिवाजीनगर, कलामंदिर, वजीराबाद चौक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा, छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते नांदेड जिल्हाधिकारी कार्यालय असा महामोर्चाचा मार्ग राहणार आहे. महामोर्चा जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड येथे पोहोचल्यानंतर महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलन महामोर्चा आयोजकांच्या वतीने जिल्हाधिकारी नांदेड यांना मागणीचे निवेदन देण्यात येणार आहे, अशी माहिती महामोर्चा संयोजन समितीच्या वतीने संयुक्त प्रसिद्धी पत्रकात देण्यात आली आहे.

# अवैध मार्गाने वाळुची वाहतूक करणारे दोन ट्रॅक्टर पकडले

**तभा वृतसेवा**
**इस्लापूर, दि. २४ मार्च**

इस्लापूर परिसरातील रिठ्ठा येथे विनापरवाना वाळू ची वाहतूक करतांना दोन ट्रॅक्टर पोलीसांनी पकडले.हि कारवाई दि. २२ च्या रात्री साडेआठ वाजताच्या दरम्यान करण्यात आली. दरम्यान इस्लापूर पोलिसांनी केलेल्या या कारवाईचे पंचक्रोशीत मोठे कौतुक केले जात आहे.

इस्लापूर पोलिस ठाण्यांच्या अंतर्गत रिठा परिसरात रात्रीची गस्त घालत असतांना दोन ट्रॅक्टर वाळूने भरुन अवैध रित्या वाहतूक करीत असतांना पोलिसांना मिळून आले. दरम्यानं या दोन्ही ट्रॅक्टर ला ताब्यात घेऊन पोलिसांनी ही कारवाई केली. फिर्यादी ओमप्रकाश लक्ष्मण डिडेवार यांच्या फिर्यादीवरून आरोपी अमर मारोती केंद्रे रा. भंडारवाडी व गिरप्पा श्रीरंग नागरगोजे रा.पिंपरी यांच्या विरुद्ध कारवाई करण्यात आली असून त्यांच्या ताब्यातील वाळूने भरलेले ट्रॅक्टर क्रमांक एम.एच. २६ बी क्यू १०३३ किंमत ४ लाख ५० हजार, व तसेच दुसरे ट्रॅक्टर डी.टी. ५० किंमत ३ लाख ७० हजार असा एकून ८ लाख ३० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. हि कारवाई जिल्हा पोलिस अधीक्षक अबीनाशकुमार, अतिरिक्त पोलिस अधीक्षक खंडेराव धरणे, उपविभागीय पोलिस अधिकारी रामचंद्र मळघणे यांच्या मार्गदर्शनाखाली केल्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक उमेश भोसले यांनी सांगितले. दरम्यान कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलिस रात्रंदिवस एक करून सेवा देतात.परंतू माहेवारी हजारो रुपयांचा गल्लेलठ्ठ पगार घेवून महसूल व राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधिकारी व कर्मचारी काम बरोबर करीत नसल्याचे या भागातील नागरिकांचे म्हणणे आहे.या दोन्ही विभागांच्या कामगीरीकडे जिल्हाधिकारी यांनी लक्ष वेधून,दोषीं व कामचूकार अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाईचा बडगा उगारावा अशी मागणी आता सुजान नागरीकांतून जोर धरु लागली आहे.

# आदमपुरात चिमणी दिनानिमित्त मडकेरूपी तरंगता निवारा

**तभा वृतसेवा**
**आदमपूर, दि. २४ मार्च**

बिलोली तालुक्यातील ग्राम आदमपूर येथे रविवार दि.२३ मार्च रोजी जागतिक चिमणी दिनाचे औचित्य साधत गावातील पक्षी प्रेमी हौशी तरुणांकडून सिमेंटच्या जंगलात दुर्मिळ होत. चाललेल्या चिमण्यांना पर्यावरणपूरक मडकेरूपी निवारा आणि दानापाण्याची व्यवस्था दत्त,महादेव,विठ्ठल रूक्मिणी,हनुमान मंदिर व मुख्य रस्त्यांलगत जमेल तसे डुलते मातीचे मडके टांगून करण्यात आली.त्या मडक्यांवर निसर्ग,पक्षी संवर्धन संदर्भात सुविचार ही लिहिण्यात आले होते. जागतिक चिमणी दिनानिमित्त सलग तीन वर्षांपासून हा उपक्रम सुरू आहे.

# राविकाँच्या पाठपुराव्याला यश

**नांदेड, दि. २४ मार्च**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात विद्यार्थ्यांच्या मागणीला अखेर यश मिळाले असून परीक्षा आवेदन पत्र भरण्याच्या अंतिम तारखेत वाढ करण्यात आली आहे. फैसल सिद्दिकी यांनी विद्यापीठ प्रशासनाकडे निवेदन पाठवले होते. त्यामध्ये एम.ए. प्रथम व द्वितीय वर्षचा निकाल जाहीर होण्यास झालेल्या विलंबामुळे विद्यार्थ्यांना अर्ज भरण्यासाठी पुरेसा वेळ मिळावा, अशी मागणी करण्यात आली होती.

## संक्षिप्त वृत्त




### महादगीर महाराज पुण्यतिथी निमित्य शिव महापुराण कथेचे आयोजन

**निवघा बा-**हदगाव तालुक्यातील मौजे उंचेगाव (बु.) येथे दि. २२ मार्च रोजी गावचे ग्रामदेवत श्री महादगीर महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्य शिव पुराण महाकथा व संत तुकाराम महाराज गाथा पारायणाचे आयोजन करण्यात आले आहे. या सप्ताहात सकाळी ७ ते १० या वेळेत श्री संत तुकाराम महाराज गाथा पारायणाचे वाचन तपस्वी हभप माधवराव महाराज देशमुख उंचेगावकर यांच्या सुमधुर रसाळ वाणीतून होणार आहे तर दुपारी १ ते ५ यावेळेत शिव महापुराण कथेचे वाचन हभप गीताताई पाटील महाराज छत्रपती संभाजीनगरकर यांच्या सुमधुरवांनीतून होणार आहे. या सप्ताहातील दैनंदिन कार्यक्रम सकाळी ४ ते ६ काकडा भजन, ७ ते १० संत तुकाराम महाराज गाथा पारायण, दुपारी १ ते ५ शिवपुराण माहाकथा, सायंकाळी ६ ते ७ हरिपाठ, रात्री ८ ते १० हरी किर्तन होणार आहे. या सप्ताहात दररोज रात्री महाराष्ट्रातील प्रसिद्ध कीर्तनकारांचे कीर्तन होणार आहेत तर दि. २९ मार्च रोजी सकाळी सात ते दहा या वेळेत नगर प्रदक्षिणा होऊन हभप पांडुरंग महाराज संमगेकर यांचे सकाळी १० ते १२ या वेळेत काल्याचे किर्तन होईल व त्यानंतर महाप्रसाद होईल या धार्मिक कार्यक्रमाचा व महाप्रसादाचा परिसरातील भाविक भक्तांनी लाभ घ्यावा, असे आवाहन समस्त गावकरी मंडळी उंचेगाव (बु.) यांनी केले आहे.

### साईबाबा मंदिर कलशारोहण सातवा वर्धापन दिन २६ रोजी साजरा होणार

**नांदेड-**प्रती शिर्डी देवस्थान म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नांदेड शहरालगत असलेल्या धनगरवाडी येथील श्री साईबाबा मंदिराच्या



कलशारोहण सोहळ्याचा सातवा वर्धापन दिन येत्या २६ मार्च रोजी आयोजित करण्यात आला असून यानिमित्त भव्य कीर्तन सोहळा आणि महाप्रसादाचे आयोजन करण्यात आलेले आहे . या सोहळ्याला भाविक भक्तांनी उपस्थित राहावे असे आवाहन नांदेड जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक तथा माजी जिल्हा परिषद सदस्य प्रवीण पाटील चिखलीकर यांनी केले आहे. नांदेड जिल्ह्यातील ज्या भावी भक्तांना शिर्डी येथे जाऊन साईबाबांचे दर्शन घेणे कठीण असते किंबहुना ज्यांना साईबाबांचे दर्शन नित्यनेमाने करायचे हे अशा सर्व भावीकभक्तांसाठी आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या संकल्पनेतून धनगर वाडी येथे शिर्डी येथील साईबाबांचे प्रतिरूप स्थापन करण्यात आले आहे. या मंदिराची स्थापना होऊन आता सहा वर्षाचा कालावधी लोटला असून सातवा वर्धापन दिन दिनांक २६ मार्च रोजी पार पडणार आहे . यानिमित्त २६ रोजी दुपारी बारा वाजता हरिभक्त परायण पुरुषोत्तम महाराज बुलढाणेकर यांच्या कीर्तनाचा सोहळा आयोजित करण्यात आलेला आहे . या कीर्तन सोहळ्यास आ. प्रतापराव पाटील चिखलीकर , जिल्हा परिषदेच्या माजी सदस्य प्रणिताताई देवरे - चिखलीकर , हभप बालाजीराव पाटील मारतळेकर , ह भ प बालाजीराव झुंबाड , ह भ प बाबुराव केंद्रे , अमित पगडे यांच्यासह अनेकांची उपस्थिती राहणार आहे. आयोजित कलशारोहण वर्धापन दिनास , आणि महाप्रसादास भाविक भक्तांनी उपस्थित राहून लाभ घ्यावा असे आवाहन प्रवीण पाटील चिखलीकर यांनी केले आहे.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा रिपब्लिकन झंजावात अॅड. मामा येवले व्याख्यानमालेचे उद्या पहिले पुष्प

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २४ मार्च**

नांदेड आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ नेते तथा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा रिपब्लिकन झंजावत अॅड. मामा येवले यांच्या प्रथम पुण्यतिथीनिमित्त दिनांक २६ मार्च रोजी नांदेड येथे व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली आहे. व्याख्यानमालेचे पहिले पुष्प विख्यात आंबेडकरवादी विचारवंत डॉ. ऋषिकेश कांबळे हे गुंफणार आहेत अशी माहिती संयोजन समितीचे मार्गदर्शक सुरेशदादा गायकवाड, प्रफुल सावंत यांनी पत्रकार परिषदेतून दिली. यावेळी रमेश गोडबोले, सुरेश हटकर, प्रकाश येवले, सुखदेव चिखलीकर आदींची उपस्थिती होती.

कुसुम सभागृहात सायंकाळी ५ वाजता पार पडणाऱ्या या व्याख्यानमालेचे माजी लेडी गव्हर्नर तथा विश्वस्त, प.पू. डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती, दीक्षाभूमी नागपूरच्या प्रा. डॉ. कमलताई गवई यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात येणार आहे. 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीचे प्रजासत्ताक भारताच्या जडणघडणीतील योगदान' या विषयावर आंबेडकरी चळवळीचे भाष्यकार डॉ.ऋषिकेश कांबळे हे विचार पुष्प गुंफणार आहेत. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून खा.चंद्रकांत हांडोरे, खा.प्रा. रविंद्र चव्हाण, दिपक कदम यांची उपस्थिती राहणार आहे. कार्यक्रमाचे अध्यक्षपद ज्येष्ठ कवी प्रा. रविचंद्र हाडसनकर हे भूषविणार आहेत. याच वेळी जागतिक बौद्ध परिषद, बँकॉक, थायलंडचे भारतातील प्रादेशिक केंद्र क्रं. ७५, प्रज्ञाकरुणा विहार समिती, नांदेडच्या वतीने मातोश्री रमाई आंबेडकर आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर जीवन गौरव पुरस्कार २०२५ प्रा. डॉ. कमलताई गवई साहिवा यांना हा पहिला पुरस्कार घोषित करण्यात आला आहे. या व्याख्यानमालेत बुद्ध-भीम गीत रजनी सुप्रसिद्ध गायक संविधान मनोहरे, अमरावती, गायक क्रांतीकुमार पंडित आणि संच नांदेड यांच्या बुद्ध-भीम गीतांचा सुमधुर सांस्कृतिक कार्यक्रमही आयोजित करण्यात आला आहे.

# पोलीस उपमहानिरीक्षक यांच्या वार्षिक तपासणीत पोलीस पाटलांनी केला अवैध दारू विक्रीचा भांडाफोड

**तभा वृतसेवा**
**तामसा, दि. २४ मार्च**

नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी नुकतेच तामसा पोलीस ठाण्याची वार्षिक तपासणी केली. वार्षिक तपासणीत पोलीस ठाण्याच्या कारभाराबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले असले तरी पोलीस पाटील यांच्या बैठकीत पोलीस पाटील यांनीच अवैध दारू विक्रीचा भांडाफोड केल्याने तामसा पोलिसांची ऐनवेळी भंबेरी उडाली होती.

नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप, जिल्हा पोलीस अधिक्षक अबिनाश कुमार, अप्पर पोलीस अधीक्षक खंडेराया धरणे व अर्धापूर इन्चार्ज भोकर उपविभागीय पोलीस अधिकारी डॅनियल बेन यांनी शुक्रवारी पोलीस ठाण्याच्या वार्षिक तपासणीच्या निमित्ताने तामसा पोलीस ठाण्यात भेट दिली होती. नांदेड परिक्षेत्राचे कर्तव्यदक्ष पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी पोलीस ठाण्याची विस्तृत तपासणी केल्यानंतर तामसा पोलीस ठाणेअंतर्गत गावातील पोलीस पाटील, तंटामुक्ती अध्यक्ष, ग्रामसुरक्षा दल यांची संयुक्तिक बैठक घेऊन त्यांना गावात शांतता राखण्यासाठी सविस्तर मुद्द्यावर मार्गदर्शन केले. पोलीस पाटील यांच्या अडचणी जाणून घेताना अनेक पोलीस पाटील यांनी गावागावात राजरोसपणे अवैध दारू विक्री चालू असून अवैध दारू विक्रीमुळे गावातील शांतता राखण्यात बाधा निर्माण होत असल्याचा मुद्दा मांडला. अवैध दारू विक्रीचा पोलीस पाटलांनीच भांडाफोड केल्याने उपस्थित वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या निश्चितच भुवया उंचावल्या होत्या. त्यावेळी पोलीस उपमहानिरीक्षक उमाप यांनी तामसा पोलिसांना त्याबद्दल समज देत अवैध दारू विक्रीविरुद्ध तामसा पोलीस कारवाई करत नसतील तर पोलीस पाटलांनी थेट माझ्याशी संपर्क साधण्याचा सल्ला देत पोलीस उपमहानिरीक्षक यांनी त्यांचा मोबाईल नंबर पोलीस पाटलांना दिला. तामसा पोलीस ठाण्याला नव्याने रुजू झालेली सहाय्यक पोलीस निरीक्षक शहादेव खेडकर यांना अवैध दारू विक्रीसह अवैध धंद्यावर कारवाई करण्याच्या कडक निर्देश दिले. उल्लेखनीय म्हणजे सहाय्यक पोलीस निरीक्षक शहादेव खेडकर हे केवळ पंधरा ते वीस दिवसांपूर्वी तामसा पोलीस ठाण्याला रुजू झाल्याने आणि रुजू होताच त्यांनी काही गावातील अवैध दारू विक्रीवर कारवाई केल्यामुळे त्यांच्यावर कदाचित संभाव्य कारवाई होऊ शकली नसावी असे समजते.

मागील काळात बीट जमादारांनी मनमानी कारभार करीत अनेक गावात अवैध दारू विक्रीला मूकसंमती दिल्याची यावेळी जोरदार चर्चा होती.

# शांती आणि एकात्मतेचा संदेश : वसीम बाबू यांच्या कार्यालयात दावत ए इफ्तार पार्टीचे आयोजन

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २४ मार्च**

शांती आणि एकात्मतेचा संदेश देत येथे मुतावल्ली कुटुंब आणि मित्रांकडून वसीम बाबू सेठ यांच्या कार्यालयात दावत ए इफ्तार पार्टी आयोजित करण्यात आली होती, ज्यात धार्मिक सामाजिक क्षेत्रातील मान्यवर मंडळी उपस्थित होती.

जेमचे महामन ई काउसी, पैयाबोधी भन्ते, फादर रेव्ह. राज जॉन्सन याकूब, गुरुद्वारा बोर्डाचे माजी अधीक्षक सरदार रणजितसिंघ चिरागीया, मराठा सेवा संघ राष्ट्रीय अध्यक्ष कामाजी पवार, प्रशासनाकडून सहाय्यक नगरपालिका आयुक्त गिरीश कदम, पोलिस उपविभागीय अधिकारी सुशीलकुमार नायक, वजीराबादचे पोलिस निरीक्षक परमेश्वर कदम, वजिराबादचे पोलिस



निरीक्षक रणजित भिटे, वाहतूक शाखेचे पोलिस निरीक्षक साहेबराव गुट्टे, पत्रकार पंढरीनाथ बोकारे, वसीम बाबू सेठ, सत्य मराठीचे संपादक अयुब पठाण, नांदेड टुडेचे संपादक नईम खान यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

प्रत्येकाने प्रत्येक उत्सव एकत्र साजरा केला पाहिजे अशी भावना भन्ते पैयाबोधी यांनी यावेळी मार्गदर्शन करताना व्यक्त केली. इफ्तार पार्टीचे आयोजन केल्याने परस्पर बंधुता वाढते. भारत विविधतेत ऐक्याचे प्रतीक आहे. आपण कोणत्याही विभाजनशील सामर्थ्याच्या जाळ्यात अडकू नये. होळी, गुडी पडवा आणि ईद हे सर्व उत्सव आम्हाला एकत्र राहण्यास शिकवतात. आपण सर्वांनी हे एकत्र साजरे केले पाहिजे कारण ऐक्य ही आपली खरी शक्ती आहे असे प्रतिपादन वसीम बाबू सेठ यांनी केले. राज्य आणि देशाच्या समृद्धी, ऐक्य आणि शांततेसाठी यावेळी प्रार्थना करण्यात आली.

# नांदेड येथील महामोर्चात बौद्ध बांधवांनी सहभागी व्हावे : जितेंद्र ढवळे

**तभा वृतसेवा**
**कंधार , दि. २४ मार्च**

बिहार राज्यातील बुद्धगया महाबोधी महाविहार बौद्धांच्या ताब्यात देण्यात यावे, या मुख्य मागणीसाठी नांदेड येथे मंगळवार, २५ मार्च रोजी दुपारी १२ वाजता भिख्खू संघ, भारतीय बौद्ध महासभा, समता सैनिक दल, विविध आंबेडकरी पक्ष, संघटना व समस्त बौद्ध समाजाच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर महामोर्चा काढण्यात येणार आहे.



कृषी उत्पन्न बाजार समिती मैदान, नांदेड येथून महामोर्चाला सुरुवात होणार आहे. हा मोर्चा महात्मा फुले पुतळा, छत्रपती शिवाजी महाराज पुतळा, डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा मार्गे जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकणार आहे. यावेळी जिल्हाधिकाऱ्यांना विविध मागण्यांचे निवेदन देण्यात येणार आहे. या महामोर्चात कंधार तालुक्यातील हजारो बौद्ध समाज बांधवांनी सहभागी व्हावे, असे आवाहन भारतीय बौद्ध महासभेचे तालुकाध्यक्ष जितेंद्र ढवळे यांनी केले आहे.

# विद्यापीठ वार्षिक स्नेहसंमेलनाचे आज उद्घाटन

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. २४ मार्च**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ परिसराचे 'ज्ञानतीर्थ-२०२५' वार्षिक स्नेहसंमेलन दि. २५ ते २६ मार्च या कालावधीत संपन्न होणार आहे. दि. २५ मार्च रोजी स. १०:३० वा. विद्यापीठातील अधिसभा सभागृहामध्ये विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होणाऱ्या या स्नेहसंमेलनाचे उद्घाटन प्रसिद्ध कवी आणि कादंबरीकार डॉ. मनोज बोरगावकर यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन, कुलसचिव डॉ. डी.डी. पवार यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

या स्नेहसंमेलनाचा समारोप व पारितोषिक वितरण समारंभ दि. २६ मार्च रोजी सायंकाळी ०५:३० वा. दीक्षान्त सभागृहामध्ये होणार असून या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर असणार आहेत. यावेळी प्र -कुलगुरू डॉ. अशोक महाजन यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. प्रमुख पाहुणे म्हणून 'भोंगा' या राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त चित्रपटाचे अभिनेते श्री कपिल गुडसूरकर यांचे मार्गदर्शन लाभणार आहे. या प्रसंगी कुलसचिव डॉ. डी.डी. पवार यांची उपस्थिती राहणार आहे. या स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी विविध स्पर्धे चे आयोजन करण्यात आलेले आहे. दि. १० ते १२ मार्च या कालावधीमध्ये क्रीडा संचालक डॉ. भास्कर माने यांच्या संयोजनाखाली विद्यापीठ परिसरातील विद्यार्थ्यांच्या क्रिकेट स्पर्धा (मुले/मुली), व्हॉलीबॉल स्पर्धा (मुले/मुली) आणि १०० मीटर धावणे इत्यादी विविध क्रीडा स्पर्धा संपन्न झालेल्या आहेत.




**लोहा-नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप, पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, उप विभागीय पोलीस अधिकारी अश्विनी जगताप हे कंधार येथे विभागांतर्गत वार्षिक तपासणीसाठी आलें आसता संगमवाडीचे सरपंच चक्रधर घुगे, माजी सरपंच दगडोबा घुगे, संभाजी घुगे ,परमेश्वर घुगे ,तंटामुक्ती अध्यक्ष गोपीनाथ घुगे ,सदस्य भानुदास घुगे, शिवाजी घुगे, ज्येष्ठ मार्गदर्शक भानुदासराव घुगे, रामदास घुगे ,व गावकऱ्याच्या वतीने त्यांचा सत्कार केला.**

# बँड वाजवत नगरपालिकेची कर वसुली

**तभा वृतसेवा**
**हदगाव, दि. २४ मार्च**

हदगाव नगरपालिकेची घर टॅक्स व पाणीपट्टीची वसुली तसेच गाळे भाडे थकबाकी जास्त असल्याने कर दात्यांच्या घरासमोर बँड वाजवुन कर भरण्यासाठी सांगण्यात येऊन वसुली करण्यात येत आहे.

हदगाव शहरातील नागरिकांना सोयी सुविधा पुरविण्यासाठी नगरपालिका कटीबद्ध असुन विविध योजना राबविण्यासाठी नगर पलीकेला आपल्या स्वतःचा वाटा भरावा लागत असतो त्यासाठी नगरपालिकडे पैसा उपलब्ध राहत नसल्याने काही सुविधा या मिळू शकत नाही. त्यामुळे नागरिकाकडील कराची वसुली करणे गरजेचे आहे त्यासाठी उपाययोजना करून वसुली करावी लागत आहे.शहरातील नागरिकाकडे ३० लाखाची कराची वसुली थकीत असून नागरिकांनी स्वतः हून किंवा वसुलीस आलेल्या कर्मचाऱ्यांना



आपल्या कडील कराची थकबाकी भरून नगरपालिकेला सहकार्य करावे असे आवाहन मुख्याधिकारी गौरव वांडेकर यांनी केले आहे.

या वसुली पथकात प्रवीण मंगनाळे ,प्रशांत डोईजड ,गोविंद शिरसाठ, रवी ढेंगळे ,संकेत लांडगे , गोविंद नागरगोजे, नामदेव राठोड, सुरेश गिरबिडे ,सिद्धार्थ पंडित ,दिगंबर काळे, शेख मुसा ,शेख शार्दुल, महेमूद, शंकर काळे, महेश पुसेल्लु आदी या पथकात कार्यरत असून त्यांच्याकडे सर्वांनी कर भरणा करण्यात यावा अन्यथा पाणीपुरवठा बंद करण्यात येईल तसेच घराचा कर थकीत असल्यास घरावर देखील कारवाई करण्यात येईल असे वसुली पथक प्रमुख प्रवीण मगनाळे यांनी सांगितले.

# नव्या भुयारी पुलाकडे जणारा रस्ता खड्डेमय झाल्यामुळे वाहनधारक त्रस्त

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. २४ मार्च**

मुदखेड शहरातील सुभाष गंज मोंढा भागातील जिवाजी महाले चौकापासून पासून पश्चिमेस भुयारी पुल मार्गास जोडणारा १५० मीटर रस्ता, मुख्य रस्त्यावर खड्डेच खड्डे पडले आहेत. परिणामी, रस्त्याची मोठ्या प्रमाणात दुरावस्था झाली आहे. खड्डे पडल्याने खड्ड्यांमधील माती,गिट्टी,खडी रस्त्यावर आल्याने सर्वत्र परिसरात धूळ पसरल्याने या ठिकाणाहून ये-जा करताना वाहनधारकांना अपघाताचा धोका वाढला आहे. विशेष म्हणजे, अनेक वर्षांपासून हीच परिस्थिती असूनही नगरपरिषद प्रशासन आणि लोकप्रतिनिधी रस्ते कामाकडे दुर्लक्ष करीत असल्याने नागरिकांनी संताप



व्यक्त केला आहे.

अनेक वर्षांपासून रेल्वे गेट वर होणारी वारंवार वाहतुकीची कोंडी रेल्वे भुयारी मार्ग सुरू झाल्याने वाहतूक सुरळीत चालू झाली, परंतु शहर व शहराबाहेरील अनेक रस्त्यांना जोडला जाणारा हा मुख्य रस्ता जिवाजी महाले चौकापासून पश्चिमेस अंदाजे १५० मिटर अंतर असुन मोंढा येथील मुख्य बाजार पेठ,गणेश मंदिर, नवि आबादी, भोकर रस्ता, कृषी कार्यालय आदी विविध कार्यालये असून रेल्वे भुयारी मार्ग सुरू झाल्याने हा रस्ता मुख्य रस्ता झाला आहे. नागरिक या रस्त्याचा दिवसभरात वापर करीत असतात.गेल्या ५० वर्षांपासून या रस्त्याच्या नालीचे रुंदीकरणाचे काम झाले नसल्याने सांडपाणी करण्यास अडथळा येत आहे, या रस्त्यावर जागोजागी खड्डेच खड्डे पडलेले आहेत. अनेक वेळा दुचाकी वाहनांचे छोटे-मोठे अपघात होत आहेत. यासह रस्त्याचे नव्याने काम न झाल्याने रस्त्यांची दुरवस्था झाली आहे. पुन्हा एकदा रस्त्या-नालीचे काम करून नागरिकांना पूर्ववत रस्ता करून द्यावा, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात आली आहे. याप्रकरणी मुख्याधिकारी, नगरपरिषद मुदखेड यांना भारतीय जनता पार्टीचे शहराध्यक्ष संजय उर्फ पप्पू सोनटक्के यांनी निवेदन दिले आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## संस्कृतीचा सदैव अभिमान बाळगावा : प्रा.डॉ. भालेराव

**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.२४ मार्च -**

युवकांनी माती व नाती यांच्याशी इमान राखून आपला देश व आपल्या संस्कृतीचा सदैव अभिमान बाळगावा असे प्रतिपादन प्रा.डॉ. इंद्रजित भालेराव (सुप्रसिद्ध कवी व लेखक, परभणी) यांनी केले.

निलंगा तालुक्यातील औराद शहाजनी येथील मास्टर दीनानाथ मंगेशकर महाविद्यालयाच्या वार्षिक स्नेहसंमेलनाच्या समारोप कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शारदोपासक शिक्षण संस्थेचे सचिव रमेश बगदुरे होते. व्यासपीठावर संस्थेचे अध्यक्ष बस्वराज वलांडे, संचालक मडोळय्या मठपती, शिवाजीराव जाधव, दगडू गिरबने, गोपाळ भिंगोले, महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ.विजयकुमार पवार, मुख्याध्यापक दयानंद जाधव, प्राचार्य संतोष कळमासे, विद्यार्थी विकास परिषदेचे समन्वयक डॉ. विनोद चिंते, विद्यार्थी विकास परिषदेचे सचिव धनराज निंगाले इत्यादी उपस्थित होते. पुढे बोलताना प्रा.डॉ. इंद्रजित भालेराव यांनी स्वतःच्या कवी व लेखक जीवनातील विविध अनुभव सांगून विद्यार्थ्यांना वाचन-लेखन-पाठांतराचे महत्त्व सांगितले. आपल्या मार्गदर्शनातून निसर्ग, शेती, पीक-पाणी व शेतकरी जीवनाचे वास्तव व्यक्त केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. शंकर कल्याणे यांनी केले. प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.विजयकुमार पवार यांनी केले. उपस्थितांचे आभार धनराज निंगाले यांनी मानले.

## ▶▶ संक्षिप्त वृत्त...



### अनिसच्या शाखाध्यक्षपदी ॲड. संतोष गंभिरे यांची निवड

**उदगीर, दि.२४ मार्च -**

चाकूर येथे अंधश्रधा निर्मुलन समितीच्या कार्यकारणीची निवड करण्यात आली. यावेळी राज्य कार्यवाह उत्तरेश्वर बिराजदार यांच्या उपस्थितीत दि.२३ मार्च रोजी बैठक संपन्न झाली. सर्वानूमते अनिसच्या चाकूर शाखाध्यक्षपदी ॲड. संतोष गंभिरे पाटील यांची निवड करण्यात आली. चाकूर येथील रॅनबो स्कुल या ठिकाणी अनिसच्या नविन कार्यकारीणीची निवड राज्य कार्यवाहक उत्तरेश्वर बिराजदार यांच्या सह डॉ. गणेश गोमारे, प्रा.डॉ. दशरथ भिसे यांच्या प्रमुख उपस्थितीत बैठक घेण्यात आली. यानंतर सर्वानुमते कार्यकारणी निवड करण्यात आली असून शाखा अध्यक्ष म्हणून ॲड. संतोष गंभीरे पाटील, कार्याध्यक्ष धनराज सूर्यवंशी, प्रधान सचिव प्रा. शिवाजी खिराडे यांची निवड करण्यात आली. तसेच विविध विभागावर नविन व्यक्तींना संधी देण्यात आली असून यावेळी शाखेचे माजी अध्यक्ष मधुकर कांबळे यांनी प्रास्तविक केले. त्यानंतर निवड झालेल्या सर्व पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करण्यात आले.

### डॉ. नरसिंग कदम यांना राष्ट्रीय साहित्य गौरव पुरस्कार

**उदगीर, दि.२४ मार्च -**

छत्रपती शिवाजी राजे महाविद्यालयातील मराठीचे प्राध्यापक आणि साहित्यिक प्रा.डॉ. नरसिंग कदम यांना जागतिक आंबेडकरवादी साहित्य महामंडळ, नागपूर



यांच्याकडून डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय साहित्य गौरव पुरस्कार जाहीर झाला आहे. सदर पुरस्कार दि. ३० मार्च २०२५ रोजी नागपूर येथील ११व्या वर्धापन दिनानिमित्त प्रदान करण्यात येणार आहे. डॉ. कदम हे शैक्षणिक, साहित्यिक आणि सामाजिक क्षेत्रातील एक अत्यंत कार्यशील व्यक्तिमत्व आहेत. त्यांनी अनेक साहित्यिक व काव्यसंग्रह लिहिले आहेत आणि संपादित केले आहेत. त्यांचे ग्रंथ आधारस्तंभ बाप, महात्मा फुले : साहित्य आणि विचार, मला संस्कारित विद्यार्थी बनायचं यांसारख्या महत्त्वपूर्ण आहेत. डॉ. कदम यांनी सामाजिक कार्यातही महत्त्वपूर्ण योगदान दिले असून रक्तदान शिबिर, पोलिओ अभियान, स्वच्छता अभियान यासारख्या उपक्रमांत भाग घेतला आहे. यापूर्वी त्यांना अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळाले आहेत. त्यांना या पुरस्काराबद्दल किसान शिक्षण प्रसारक मंडळ आणि महाविद्यालयीन कुटुंबाने अभिनंदन केले आहे.

### भालचंद्र चाकूरकर यांचे निधन

**उदगीर, दि.२४ मार्च -**



येथील महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे कोषाध्यक्ष भालचंद्र चाकूरकर यांचे पुणे येथे निधन झाले आहे. त्यांचा अंत्यविधी (ता. २५ मार्च) सकाळी १० वाजता जळकोट रोड येथील सार्वजनिक स्मशानभूमीत होणार आहे. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी तसेच महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयाच्या जडणघडणीत त्यांचा मोलाचा वाटा होता.

# लोक न्यायालयात एकुण १४० प्रकरणे तडजोडीने निकाली

## ▶▶ १ कोटी १९ लाख ४१ हजार ९१० रुपये वसुल...

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.२४ मार्च -**

उदगीर येथील जिल्हा व सत्र न्यायालयात विधी सेवा समिती व विधिज्ञ संघ यांच्या सयुक्त विद्माने शनिवार दि.२२ मार्च रोजी रोजी राष्ट्रीय लोकअदालतचे आयोजन करण्यात आले होते. यात १४० प्रकरणे निकाली निघून १ कोटी १९ लक्ष ४१ हजार ९१० रुपये वसील झाली आहेत.

लोकन्यायालयात थकित प्रकरणापैकी १६७१ प्रकरणे लोक अदालतीत ठेवण्यात आली यात तडजोडीत १०९ प्रकरणे निकाली निघाली यात ८९ लाख २१ हजार, ५०१ रुपये वसुल झाली. वादपुर्व १८७२- प्रकरणे ठेवली होती.

यापैकी ३१ प्रकरण तडजोडीने निकाली निघाली असुन यात ३० लक्ष २० हजार ४०९ रुपये वसुल झाले. अशी एकुण १४० प्रकरणे निकाली निघाली असुन यात १ कोटी १९ लक्ष ४१ हजार ९१० रुपये वसुल झाली आहे. पाच पॅनल न्या.वाय.बी. गमे तदर्थ जिल्हा न्यायाधीश एक, दिवाणी न्यायाधीश व स्तर, पी.बी. लोखंडे, सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर के.ए. पोवार, दिवाणी न्यायाधीश क.स्तर एन.जे. चव्हाण, दिवाणी न्यायाधीश क.स्तर न्या.बी.आर. झेंडे तर पॅनलमध्ये ॲड. एस.एन. सूर्यवंशी,



ॲड.डी.एस. सोमवंशी, ॲड.पी.बी. पाटील, ॲड.एम.एम. निलेवाड, ॲड.ए.आर. सदानंद यांनी काम पाहिले. कर्मचारी एम.एल. सुत्राळे अधीक्षक पी.बी. सोनाळे वरिष्ठ लिपिक, सिस्टम ऑफिसर वाय.बी. फड यांनी परिश्रम घेतले.

विधिज्ञ संघाचे पदिधिकारी यांनी परिश्रम घेतले.

## इंग्रजी ही जागतिक ज्ञानभाषा : रामचंद्र तिरुके



**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.२४ मार्च -**

येथील महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयात इंग्रजी भाषा आणि संवाद कौशल्य या विषयावर विशेष सत्र तसेच बी.ए. तृतीय वर्ष व एम.ए. द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात संस्थेचे सचिव रामचंद्र तिरुके यांनी इंग्रजी ही जागतिक ज्ञानभाषा असल्याचे प्रतिपादन केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रामचंद्र तिरुके होते, तर व्यासपीठावर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजकुमार मस्के, छत्रपती शिवाजी राजे महाविद्यालय, उदगीरचे इंग्रजी विषयाचे डॉ. प्रशांत माने, उपप्राचार्य डॉ.एस.एन. हल्लाळे, इंग्रजी विभाग प्रमुख डॉ.एस.एम. सूर्यवंशी तसेच इतर मान्यवर उपस्थित होते. यावेळी मार्गदर्शन करताना रामचंद्र तिरुके म्हणाले की, आजच्या स्पर्धात्मक युगात इंग्रजीचे महत्त्व अधिक वाढले असून जागतिक संधी मिळवण्यासाठी ती आत्मसात करणे गरजेचे आहे. डॉ. प्रशांत माने यांनी भाषेच्या उत्क्रांतीचा इतिहास विशद करत विद्यार्थ्यांनी इंग्रजीचे सखोल ज्ञान मिळवावे असे सांगितले. प्राचार्य डॉ. राजकुमार मस्के यांनी वाचन, चिंतन आणि मनन या त्रिसूत्रीचा अवलंब करून विद्यार्थ्यांनी आपली बौद्धिक प्रगल्भता वाढवावी, असे मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. एस. एम. सूर्यवंशी यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. सौ. शिवनंदा रोडगे यांनी तर आभार डॉ. विजयालक्ष्मी प्रसन्ने यांनी मानले. या कार्यक्रमाला प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सेवकाचा आत्मदहनाचा इशारा

**तभा वृत्तसेवा**
**शिरूर अनंतपाळ, दि.२४ मार्च**

शिरूर अनंतपाळ येथील शिरूर अनंतपाळ कृषी उत्पन्न बाजार समिती ही अगोदरच अवसायानात निघाल्यामुळे या कृषी उत्पन्न बाजार समितीवर कुणाचेही लक्षे नसल्याचे दिसून येत आहे . तरी पण शिरूर अनंतपाळ कृषी उत्पन्न बाजार समिती च्या स्थापने पासून सेवक या पदावर नियुक्त असलेले नारायण शेषेराव गजिले हे आज ही कृषी उत्पन्न बाजार समितीचे विना मोबदला काम करीत आहेत. सध्या या बाजार समितीचा कारभार प्रभारी सचिव हाकीत असल्यामुळे व प्रशासक म्हणून सहायक निबंधक कार्यालय शिरूर अनंतपाळचे सहायक निबंधक आहेत. जर प्रभारी सचिवाला पगार देता येत असेल, तर मला पगार का दिला जात नाही. यासाठी दि.२५ मार्च रोजी सकाळी ११ वा. सहाय्यक निबंधक कार्यालय शिरूर अनंतपाळ समोर आत्मदहन करणार असल्याचा इशारा निवेदनाद्वारे कृषी उत्पन्न बाजार समितीचा सेवक नारायण गजिले यांनी तहसीलदार जिल्हा उपनिबंधक कार्यालय लातूर, सहायक दुय्यम निबंधक कार्यालय यांना निवेदनाव्दारे इशारा दिला आहे.

## जि.प. शाळा भोजराजनगर शाळेत स्नेह संमेलन उत्साहात साजरे

**तभा वृत्तसेवा**
**शिरूर अनंतपाळ, दि.२४ मार्च -**

शिरूर अनंतपाळ शहरातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भोजराज नगर शाळेत प्रती वर्षाप्रमाणे याही वर्षी शाळेच्या वतीने विविध गुणदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते.

मोबाईलच्या अतिव्यसनामुळे विद्यांर्थ्यासह पालकही कला श्रेत्रापासुन दुर जात आहे जि.प.शाळा भोजराजनगर हि १९८७ साली सुरु झालेली वस्तीशाळा आज २९० विद्यार्थीसंख्या असलेली मोठी शाळा आहे हि शाळा तालुक्याचे वैभव आहे. या शाळेत विद्यार्थ्याचा शारिरिक, मानसिक, बौध्दीक विकास होतो आहे. कला श्रेत्रातील कलावंताची जडणघडण स्नेहसंमेलनातुच होत असते म्हणुनच आपल्या विद्यार्थ्यांना या संधीचे सोन करायला शिकवा असे गौरवउद्गार ज्येष्ठ शिक्षणतज्ञ प्रभाकरराव कुलकर्णी गुरुजी यांनी उपस्थीत पालकांना दिला.

जि.प. शाळा भोजराजनगर शाळेच्या स्नेहसंमेलनात बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सुरेंद्र देवशटवार हे होते. मंचावर गटशिक्षणअधिकारी अनिल पागे, नगराअध्यक्षा मयावती धुमाळे, विस्तार अधिकारी विजयकुमार संभाळे, चेअरमन गोविंद हंद्राळे, शालेय व्यवस्थापन समितीचे सदस्य सुधीर लखनगावे, गुरुनाथ शिंदाळकर, नगरसेवक उमाकांत देवंगरे, नगरसेविका. खरटमोल कुसुम, अश्विनी लोंढे, सदस्या, शिंदे, नाटकरे, सचिन बेंबळगे, लोहार खंडु, सांगवे संगमेश्वर यांची उपस्थीती होती.

या स्नेहसंमेलनाच्या यशस्वितेसाठी शाळेचे मुख्याध्यापक राजेंद्र मुळखेडे, सहशिक्षिका विजया धुमाळे, मनिषा भुरे, सुर्यवंशी छाया, अश्विनी देवशटवार, आशा मुळे, देविदास सांगवे, महादेव सुर्यवंशी, रोहीदास नाबदे, काशिनाथ उंबरगे, छप्रावळे, डामगिरे आदिंनी परिश्रम घेतले.

## शहीद दिनानिमित्त भगतसिंग प्रतिष्ठानचे रक्तदान शिबिर

**तभा वृत्तसेवा**
**अहमदपूर, दि.२४ मार्च -**

शहीद दिना निमित्त शहीद भगतसिंग सामाजिक प्रतिष्ठानच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज चौकात भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन शहीद भगतसिंग, सुखदेव राजगुरू यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आले.



या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी संतोष लोमटे हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष प्रा. विश्वंभर स्वामी, जगद्गुरु तुकोबाराय प्रबोधन प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रा. मारोती बुद्रुक पाटील, डॉ. ऋषिकेश पाटील, दिनकर मद्यवाड, यादव, रवी महाजन प्रदेश अध्यक्ष भगतसिंग ग्रुप, अभय मिरकले, राजूभाऊ रेड्डी, सोमनाथ पूणे, मान्यवरांची उपस्थिती होती. यावेळी मुख्याधिकारी संतोष लोमटे म्हणाले की शहीद भगतसिंग सुखदेव राजगुरू यांच्या क्रांतिकारक विचाराबद्दल आणि दिलेल्या बलिदानाबद्दल देश त्यांना कधीच विसरू शकत नाही क्रांतीकारकांचे विचार व त्यांचा इतिहास अगदी मोजक्या शब्दात त्यांनी मांडला प्रतिष्ठाने आजवर केलेल्या कार्याचा गौरव करून अशी सामाजिक प्रतिष्ठानेच समाजाला योग्य दिशा देऊ शकतात आज आशा प्रतिष्ठानची देशाला गरज असल्याचेही म्हणाले यापुढेही असे सामाजिक उपक्रम राबवून समाजाच्या व राष्ट्राच्या उन्नतीसाठी कार्य करावे असेही त्यांनी सांगितले.

यावेळी प्रा. विश्वंभर स्वामी व प्रा. मारोती बुद्रुक पाटील यांनी रक्तदानाचे महत्त्व विशद करून शहीद भगतसिंग सामाजिक प्रतिष्ठाने केलेल्या उपक्रमाचे कौतुक करून निष्प्रह भावनेने प्रतिष्ठान काम करीत असल्याचे सांगितले.

हे रक्तदान यशस्वी करण्यासाठी शहीद भगतसिंग प्रतिष्ठानचे देवानंद गोरे, सुरेंद्र बेंबडे, सुनील सुरकुटे, महालिंग पुणे, अंगद जाधव, सचिन पाटील, अरूण मामा चोले, संतोष काडवादे, गोविंद गुडे, अनंत पंडगे, पंकज पांचाळ, अक्षय गुट्टे, प्रशांत स्वामी, शिवकुमार बेंद्रे, भागवत सुर्यवंशी, परशुराम सुरनर, वैजनाथ होनराव, प्रताप गवळी, रोहन बिराजदार, प्रशांत पांचाळ यांनी यशस्वी परिश्रम घेतले आहे.

## उदयगिरीत कन्नड विभागाच्या वतीने एक दिवसीय आंतर-विद्याशाखीय राष्ट्रीय चर्चासत्र संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.२४ मार्च -**

येथील महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयात कन्नड विभागाच्या वतीने 'वचन साहित्य आणि मानवी मूल्य' या विषयावर एक दिवसीय आंतरविद्याशाखीय राष्ट्रीय चर्चासत्र संपन्न झाले. या राष्ट्रीय चर्चासत्रात कर्नाटक, आंध्र, तेलंगणा, महाराष्ट्र यासारख्या विविध राज्यातून कन्नड अभ्यासक सहभागी झाले होते. राष्ट्रीय चर्चासत्राच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष मल्लिकार्जुन मानकरी हे होते.

यावेळी व्यासपीठावर उदगीर येथील हावगीस्वामी मठाचे मठाधीश शंभूलिंग शिवाचार्य महाराज, धारवाड येथील कर्नाटका विद्यापीठाच्या प्रकाशन विभागाचे सहसंचालक डॉ. सिद्धप्पा एन., बिदर जिल्ह्याचे शरण साहित्य परिषदेचे अध्यक्ष प्रो. शंभुलिंग कामन्ना, राजर्षी शाहू महाविद्यालय लातूर येथील पाली विभागप्रमुख डॉ. भीमराव पाटील, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती कार्याध्यक्ष माधव बावगे, संस्था उपाध्यक्ष डॉ. रेखा रेड्डी, बसवराज पाटील नागराळकर, मनोहरराव पटवारी, महादेव नौबदे, बसवराज पाटील मलकापूरकर, प्रशांत पेन्सलवार, शिवराज वल्लापुरे, प्राचार्य डॉ. राजकुमार मस्के, उपप्राचार्य डॉ.एस.एन. हल्लाळे यांची विशेष उपस्थिती होती.

यावेळी उद्घाटक म्हणून बोलताना धारवाड येथील कर्नाटका विद्यापीठाचे सहसंचालक डॉ. सिद्धप्पा एन. म्हणाले, महाराष्ट्राच्या सीमावर्ती भागामध्ये आयोजित वचन साहित्यावरील राष्ट्रीय परिषदेची नोंद विद्यापीठ व विद्यापीठ अनुदान आयोगाकडून घेतली जाईल. भारतीय संविधानामध्ये प्रविष्ट करण्यात आलेल्या अनेक बाबी महात्मा बसवेश्वरांच्या वचन साहित्यात दिसून येतात.

प्रो. शंभुलिंग कामन्ना म्हणाले, राष्ट्रीय ऐक्य व बंधुभाव निर्माण करण्याचे कार्य वचन साहित्याने केले आहे.

तसेच वर्तमानकालीन व भविष्यकालीन सर्व प्रश्नांचे उत्तर वचन साहित्यातून सोडविले जाऊ शकतात. त्यामुळे सर्वांनी वचन साहित्याचे वाचन व अनुकरण करावे, असे मत व्यक्त केले. डॉ. भीमराव पाटील म्हणाले, राजेशाहीमध्ये लोकशाहीची मुहूर्तमेढ रोवण्याचे कार्य महात्मा बसवेश्वर व त्यांच्या वचन साहित्याने केले आहे.

लोककल्याणकारी राज्याची निर्मिती वचन साहित्यातून झाली असून मानवी मूल्य जोपासण्याचे कार्य वचन साहित्य करत आहे.

हावगीस्वामी मठाचे मठाधीश शंभूलिंग शिवाचार्य महाराज म्हणाले वचन साहित्याची निर्मिती अनुभवातून झाली आहे. वचन साहित्यातून भेदभाव नष्ट करण्याचे व सर्वांप्रती ममत्व, बंधुभाव जोपासण्याचे कार्य केले जाते. त्यामुळे सर्वांनी समता व बंधुतेने वागावे, असे आवाहन उपस्थितांना केले.

अध्यक्षीय समारोप करताना महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष मल्लिकार्जुन मानकरी म्हणाले, वचन साहित्याचा प्रचार-प्रसार अधिक होण्यासाठी वारंवार अशा राष्ट्रीय चर्चासत्रांचे आयोजन मोठ्या प्रमाणात करावे, अशी अपेक्षा व्यक्त केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. राजकुमार मस्के यांनी तर पाहुण्यांचा परिचय कन्नड विभाग प्रमुख डॉ. रमेश मुलगे यांनी करून दिला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.एम.पी. मानकरी यांनी तर आभार डॉ.व्ही.पी. चन्नाळे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. बालाजी होकरणे, डॉ. प्रवीण अंबेसंगे यांनी परिश्रम घेतले.

## औरंगजेबाच्या वादग्रस्त पोस्ट नंतर येरमाळ्यात तणावाचे वातावरण

**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.२४ मार्च -**

येथील एकाने व्हॉट्सप स्टेट्स, इंस्टाग्राम स्टोरीला औरंगजेबाची वादग्रस्त पोस्ट टाकल्यानंतर येरमाळ्यात तणावचे वातावरण निर्माण झाले होते.येथील हिंदू तरुणांच्या वतीने पोस्ट करणाऱ्या युवकावर गुन्हा नोंद करण्यात यावा यासाठी पोलीस स्टेशनला निवेदन देण्यात आले.

याबाबत सविस्तर वृत्त असे की येरमाळा येथील सुभान गालिब तांबोळी याने दि.२२ मार्च रोजी दुपारी तीन वाजता वैयक्तिक व्हॉट्सप स्टेट्स व इन्स्टाग्राम स्टोरीच्या माध्यमातून दोन समाजात तेढ निर्माण करण्यासाठी औरंगजेबाच्या समर्थनार्थ औरंगजेबाचा फोटो वापरून त्याखाली किंग ऑफ हिंदुस्थान असा मजकुर लिहून स्टेटस ठेवून हिंदु समाजाच्या भावना दुखावल्याने गावातील हिंदुसमाजाच्या तरुणांमध्ये तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

## साहित्याने माणूस घडवला पाहिजे : डॉ. जनार्दन वाघमारे

**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.२४ मार्च -**

साहित्यातून मानवाचे भावजीवन व्यक्त होते. मानवाच्या भावना व्यक्त करण्याचे काम साहित्य करते. जसे नदीचा उगम लहान असतो आणि पुढे जाऊन तिचा प्रवाह मोठा होतो, तसे साहित्य लेखनाचे आहे. साहित्य लेखनाची सुरुवात ही छोटी झाली तरी भविष्यात ती व्यक्ती मोठा लेखक, साहित्यिक, कवी होऊ शकतो. प्रतिभा सर्वांकडेच असते त्या प्रतिभेचा विकास करावा लागतो. त्यातून दर्जेदार साहित्याची निर्मिती होऊ शकते. आज देशात निर्माण झालेली परिस्थिती लक्षात घेता होणारी साहित्याची नवनिर्मिती ही सर्व समस्यांना कवेत घेणारी व त्याची सोडवणूक करणारी असावी. त्या साहित्याने माणूस घडविला पाहिजे, असे मत शिक्षणतज्ञ, स्वा. रा. तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. जनार्दन वाघमारे यांनी व्यक्त केले.



ते निलंगा येथील महाराष्ट्र महाविद्यालय आणि विद्यार्थी सहाय्यक मंडळ लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कर्मयोगी स्व.डॉ.शिवाजीराव पाटील निलंगेकर साहित्य नगरीत तिसऱ्या लातूर जिल्हा विद्यार्थी मराठी साहित्य संमेलनाच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते. उद्घाटनपर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. माधव कोलपूके उपस्थित होते. तसेच विचार शलाकाचे संपादक डॉ. नागोराव कुंभार, व्यंकटराव देशमुख महाविद्यालय बाभळगाव येथील प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे, ग्रंथ मित्र प्रा. पांडुरंग अडसुळे, नळेगावच्या शिवजागृती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय वाघमारे, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. प्रशांत गायकवाड, महाविद्यालयातील विद्यार्थी विकास विभागाचे समन्वयक डॉ. हंसराज भोसले, डॉ. गिरवलकर यांची उपस्थिती होती.

विद्यार्थी साहित्य संमेलन घेण्यापाठीमागील उद्देश प्रास्ताविकातून डॉ. नागनाथ मोटे यांनी स्पष्ट केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मराठी विभाग प्रमुख डॉ. भास्कर गायकवाड व कमल गोमसाळे यांनी केले तर आभार डॉ. हंसराज भोसले यांनी मानले. साहित्य संमेलनासाठी लातूर जिल्ह्यातील अनेक महाविद्यालयातील विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लातूर दिनांक

**सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.**
**आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.**


## विश्वकोष मंडळाने सर्वच शाखांना सामावून घेतले: डॉ. कदम

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २४ मार्च -**
मराठी विश्वकोषाने मराठी भाषेलाच नव्हे तर सर्वच ज्ञान-विज्ञान शाखांना सामावून घेतले आहे, असे प्रतिपादन विश्वकोष निर्मिती मंडळाचे सदस्य डॉ. नरसिंह कदम यांनी केले.

महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोष निर्मिती मंडळ आणि नांदेडच्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे लातूर येथील उपकेंद्र परिसराच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'मराठी विश्वकोष नोंदलेखन' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा झाली. यावेळी उद्घाटक म्हणून ते बोलत होते. यावेळी विद्यापीठ उपकेंद्राचे संचालक डॉ. राजेश शिंदे, डॉ. एस. एस. कोंडेकर, विश्वकोष निर्मिती मंडळाचे सदस्य संतोष गेडाम, डॉ. अनिल जायेभाये, संध्या गवळी, सुरेश खोले, डॉ. पद्माकर सहारे, डॉ. प्रियदर्शन भवरे, डॉ. अशोक नारनवरे, अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. शंकर कडेकर उपस्थित होते.

यावेळी डॉ. कदम म्हणाले, मराठी विश्वकोष हा मराठी भाषेशी संबंधित नसून सर्व ज्ञान-विज्ञान शाखांना मराठी विश्वकोषाने सामावून घेतले आहे. सर्व विद्याशाखीय विषयांच्या नोंदी यात करता येऊ शकतात. विद्यापीठ उपपरिसराचे संचालक डॉ. राजेश शिंदे यांनी विश्वकोष निर्मिती मंडळ ही एक

महाराष्ट्र शासनाची महत्वाची संस्था आहे. मराठी भाषेत सर्वसमावेशक आणि प्रमाणबद्ध ज्ञानकोष निर्मितीचे कार्य करते. यासाठी जास्तीत जास्त नोंदी व्हाव्यात, अशी अपेक्षा नवोदित लेखकांकडून व्यक्त केली. पहिल्या सत्राचा समारोप डॉ. एस. एस. कोंडेकर यांच्या मार्गदर्शनाने झाला. तीन सत्रांत झालेल्या या कार्यशाळेतील पहिल्या सत्राचे प्रमुख मार्गदर्शक विश्वकोष निर्मिती मंडळाचे संतोष गेडाम यांनी 'मराठी विश्वकोष नोंदलेखन' या विषयावर मार्गदर्शन केले.



### संक्षिप्त वृत्त...

## मशाल रॅलीने शहीदांना अभिवादन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २४ मार्च -**
देशासाठी प्राणाची आहुती देणाऱ्या शहीद भगतसिंह, सुखदेव व



राजगुरू यांच्या शहीद दिनानिमित्त येथील वीर शहीद भगतसिंह स्मारक समितीच्यावतीने रविवारी सायंकाळच्या सुमारास डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क ते शहीद भगतसिंह चौकापर्यंत मशाल रॅली काढण्यात आली. यावेळी तरुणांच्या हातात तिरंगा झेंडे होते. देशभक्तीपर घोषणांनी परिसर दणाणून गेला होता.

येथील भगतसिंह स्मारक कृती समितीच्यावतीने शहीददिनानिमित्त शहराच्या आंबेडकर पार्कवरून रविवारी सायंकाळी साडे सहा वाजेच्या सुमारास ही मशाल रॅली निघाली. यावेळी सहभागी तरुणांच्या हातात पेटलेल्या मशाली, काही तरुणांच्या हातात तिरंगा झेंडे झळकत होते. प्रत्येकाने देशभक्तीपर घोषणांनी परिसर दणाणून गेला होता. देशासाठी बलिदान देणाऱ्या वीर शहीद भगतसिंह, सुखदेव व राजगुरू यांच्या अलिदानांची आठवण करून देणारा २३ मार्च हा दिवस ओळखला जातो. ही आठवण तरुणाईच्या मनात तेवत राहावी, यासाठी ही मशाल रॅली काढण्यात आली. स्मारक समितीचे गुलजितसिंग जुन्नी यांच्या नेतृत्वात निघालेल्या या रॅलीत ॲड. प्रदीप पाटील खंडापूरकर, मनोज डोंगरे, सूर्यासिंग राजपूत, ॲड. राधिका पाटील यांच्यासह तरुण, तरुणी आदी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

## सुखदेव व राज गुरुंना अभिवादन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २४ मार्च -**
भारतीय स्वातंत्र्यासाठी प्राणांची आहुती देणाऱ्या वीर शहीद भगतसिंह, सुखदेव आणि राजगुरू यांच्या प्रतिमांना लातूर जिल्हा मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या वतीने पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी ज्येष्ठ पत्रकार रामराव गवळी म्हणाले, देशाला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे पूर्ण झाली. परंतु, शहिदांचे समाजवादी भारताच्या निर्मितीचे स्वप्न हे स्वप्नच राहिले. शहीद भगतसिंह, सुखदेव आणि राजगुरू यांचे बलिदान हे कायम स्मरणात राहील. त्यांनी देशासाठी फार मोठा त्याग केला होता, असे ते म्हणाले. यावेळी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे जिल्हा सचिव कॉ. सुधाकर शिंदे, कॉ. विश्वंभर भोसले, माकपचे लातूर तालुका सचिव कॉ. संजय मोरे, रेणापूर तालुका सचिव कॉ. डी.पी कांबळे, जिल्हा सचिव कॉ. अशोक गायकवाड, प्रा. शरद पवार, संतोष शेळके, सोमनाथ जाधव, अजित पवार उपस्थित होते.

## व्हीएस पँथर्स जिल्हाध्यक्षपदी कांबळे

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २४ मार्च -**
येथील व्हीएस पँथर्स विद्यार्थी आघाडी जिल्हाध्यक्षपदी स्वप्निल कांबळे यांची संस्थापक अध्यक्ष विनोद खटके व प्रदेशाध्यक्ष सचिन मस्के यांच्या प्रमुख उपस्थितीत लातूरच्या भालचंद्र रक्तपेढीच्या सभागृहात पार पडलेल्या जिल्हा कार्यकारिणीच्या बैठकीत सर्वानुमते निवड करण्यात आली. नियक्तीपत्र देऊन सत्कार करण्यात आला.

लातूर जिल्ह्यात व्हीएस पँथर्स या सामाजिक संघटनेकडून शोषित, वंचित, शेतकरी, महिला व मजुरांच्या अडीअडचणींसह प्रश्नांबाबत आवाज उठवून न्याय देते. लातूर पॅटर्न शिक्षणाच्या बाबतीत देशभरात प्रसिध्द आहे. त्यामुळे विद्यार्थी व शैक्षणिक विविध समस्यांच्या सोडविण्यासाठी विद्यार्थी आघाडी गठीत केली. पूर्वी किरण पायाळ यांनी समर्थपणे जिल्हाध्यक्षपदाची धुरा सांभाळली आहे. आता स्वप्निल कांबळे यांच्यावर ही जबाबदारी सोपवित असल्याची घोषणा संस्थापक अध्यक्ष विनोद खटके यांनी केली.

यावेळी ग्रुप अध्यक्ष अमोल कांबळे, मार्गदर्शक संतोष मांदळे, रवि कुरील, संपर्क प्रमुख आनंद जाधव, जिल्हाध्यक्ष शरद किणीकर, शहराध्यक्ष असद शेख, ग्रुप शहराध्यक्ष संतोष जाधव, औसा तालुकाध्यक्ष सुनील सातपुते, चाकूर तालुकाध्यक्ष अजय वाघमारे, औसा शहराध्यक्ष महेश कांबळे, निलंगा प्रतिनिधी विनोद कांबळे, सूरज सूर्यवंशी, शाहरुख मणियार, हुसेन मांदळेसह पदाधिकारी उपस्थित होते.

# शहरात वाहतुकीची कोंडी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २४ मार्च -**
शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात सातत्याने वाहतुकीची कोंडी होत आहे. यासह जुना रेणापूर नाका व गुळ मार्केट चौकात वाहतुकीची कोंडी होत आहे. यामुळे भर उन्हात वाट काढण्यासाठी धडपडावे लागत आहे.

या ठिकाणची वाहतुकीची कोंडी फोडण्यासाठी शहर वाहतूक नियंत्रण शाखेच्या पोलिसांच्या नाकेनऊ येत आहेत. पण, ही कोंडी काही केल्या फुटत नाही. या वाहतूक कोंडीने लातूरकर बेजार झाले आहेत. पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी याकडे लक्ष देऊन

> शहरातील वाहतुकीला शिस्त लागावी. चौकांमधील वाहतूक विस्कळीत होऊ नये म्हणून महापालिका अंतर्गत १८ ठिकाणी वाहतूक सिग्नल बसविण्यात आले आहेत. मात्र, यातील विवेकानंद चौक, शाहू महाराज चौक, सुभाष चौक, नंदी स्टॉप, खर्डेकर स्टॉप, आदर्श कॉलनी, राजस्थान शाळेसमोरील चौक या आठ सिग्नलचा वापरच नाही. विशेष म्हणजे चालू असणारे सिग्नल अधूनमधून बंद असतात. अनेकदा सिग्नल बंद असल्याचे समजून वाहनधारकांकडून नियमांचे उल्लंघन होत आहे. यामुळे वाहतुकीच्या कोंडीत भर पडत आहे.

वाहतुकीची कोंडी फोडण्याबाबत उपाययोजना कराव्यात, अशी मागणी होत आहे.

लातुरात गेल्या काही वर्षांत वाहनांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली आहे. त्यामुळे शहराच्या रस्त्यावर मोठ्या संख्येने वाहने दिसून येतात. यात शहरातील शिवाजी महाराज चौक हे एक महत्त्वाचे ठिकाण आहे. शिवाजी महाराज चौकात उड्डाण पूल असला तरी त्याचा फारसा वापर होत नाही. बहुतांश वाहनधारक नेहमीच्याच रस्त्याचा वापर करताना दिसतात. याच भागातून जुन्या रेल्वे लाइनचाही रस्ता गेलेला आहे.



शहरातील मुख्य रस्ता, जुन्या रेल्वे लाइनचा रस्ता व रेणापूर रस्त्यांवरून वाहने एकाच वेळी शिवाजी महाराज चौकात येतात. त्यामुळे नेहमीच या चौकात वाहतुकीची कोंडी होत आहे. या चौकात सिग्नल लावण्यात आले आहेत.

पण, त्याचा फारसा उपयोग होत नाही. लाऊड स्पिकरच्या योजनेचाही उपयोग होत नसल्याचे दिसून येत आहे.

आतापर्यंतच्या आलेल्या वेगवेगळ्या पोलीस अधीक्षकांनी काही प्रयोग करण्याचा प्रयत्न केला. पण, परिस्थिती 'जैसे थे'च राहिली आहे. वाहतुकीची कोंडी काही केल्या संपत नाही. त्यात सकाळी आणि सायंकाळी शासकीय कार्यालये भरण्याच्या आणि सुटण्याच्या वेळी ही कोंडी अधिकच होते.

वाहतुकीवर कसे नियंत्रण मिळवता येईल यासाठी वाहतुकीवर नियंत्रण मिळविण्यासाठी उपाययोजना करण्याची आवश्यकता असल्याचे सांगीतले जाते.

## मौन, एकाग्रता व आत्मविश्वास यशाची त्रिसूत्री

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २४ मार्च -**
आपल्याला जीवनात यशस्वीता हवी असेल तर मौन, एकाग्रता आणि आत्मविश्वास या त्रिसूत्रीचा अवलंब करावा. हीच शैक्षणिक क्षेत्रातील यशाची गुरुकिल्ली आहे, असे प्रतिपादन प्रा. डॉ. वंदना मिश्रा यांनी केले.



श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर द्वारा संचलित महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील लोकप्रशासन विभागातर्फे व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते, त्यावेळी त्या प्रमुख अतिथी म्हणून बोलत होत्या. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. संजय गवई होते. विचारमंचावर राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. यशवंत वळवी, डॉ. गीता गिरवलकर, डॉ. भाग्यश्री दाणे आणि डॉ. श्रीराम भालेराव यांची उपस्थिती होती. प्रारंभी जगद्ज्योती महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी डॉ. मिश्रा म्हणाल्या, शिक्षणात प्रगती व ध्येय गाठण्यासाठी मन शांत ठेवल्यास निर्णय क्षमतेत सुधारणा होऊन आत्मविश्वास वृध्दिंगत होतो. यासाठी सोशल मीडिया व स्मार्ट फोनचा वापर कमी करावा. मनाच्या एकाग्रतेसाठी योग व ध्यान धारणेवरही भर द्यावा. लक्ष विचलित करणाऱ्या गोष्टींना टाळून ध्येयावर लक्ष केंद्रित केल्यास याचा फायदा केवळ विद्यार्थी दशेतच नव्हे तर व्यावसायिक व व्यक्तिगत जीवनातही होतो, असे त्यांनी सांगितले.

यावेळी संस्थेचे सचिव माधवराव पाटील टाकळीकर म्हणाले, देशात सुशासन निर्माण होण्यासाठी लोकप्रशासन विषयाची आवश्यकता आहे.

लोकप्रशासन मानवाच्या उत्क्रांती सोबतच अस्तित्वात आला आहे. अध्यक्षीय समारोप डॉ. गवई यांनी केला. सूत्रसंचालन बुशरा सय्यद हिने केले. डॉ. श्रीराम भालेराव यांनी आभार मानले.



## स्त्रीशक्तीने ठरवल्यास जगातील कुठलेही कार्य अशक्य नाही

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २४ मार्च -**
स्त्रिशक्तीने ठरवल्यावर जगातील कुठलेही कार्य अशक्य नाही. तिला केवळ प्रेम आणि सन्मान दिला पाहिजे. यामुळे आपला समाज खूप प्रगत होईल, असे प्रतिपादन सह्याद्री देवराईचे अरविंद जगताप यांनी रविवारी येथे आयोजित पर्यावरणप्रेमी महिला सन्मान सोहळ्यात केले.

दोन महिन्यांपूर्वी सह्याद्री देवराईचे सर्वेसर्वा सिनेअभिनेते सयाजी शिंदे व सह्याद्री देवराईचे समन्वयक सुपर्ण जगताप यांनी निसर्ग, पर्यावरणावर प्रेम करणाऱ्या विविध क्षेत्रातील शिक्षिका, डॉक्टर, गृहिणी अशा महिलांची बैठक घेऊन महाराष्ट्रातील दुर्मिळ वनस्पतींची माहिती एकत्रित करून ती देण्याबाबत आवाहन केले होते. त्यात मास रोहिणी, काळाकुडा, मेंढशिंगी, देवसावर, सोनसावर, शिवण, रान पांगरा, भोकर, हुंब, हेकळ, गोकर्ण, हिवर, उंडी, करवंद, कारं, मोह, पार जांभुळ, शिरीष, अर्जुन, काटेसावर, अशा विविध जवळपास दोनशे वनस्पतींची माहिती जमा करून या निसर्गप्रेमी महिलांनी सह्याद्री देवराईचे अरविंद जगताप व समन्वयक सुपर्ण जगताप यांच्याकडे दिली. ही माहिती एकत्रित करून सह्याद्री देवराईतर्फे पुस्तक तयार करण्यात येणार आहे. हे पुस्तक भविष्यात शालेय मुलांना या वनस्पतींचे ज्ञान मिळावे म्हणून शिक्षण विभागाला देण्यात येणार आहे.

यावेळी 'द्वारकादास श्यामकुमार'चे तुकाराम पाटील, डॉ. आरती झंवर, राजस्थानी महिला मंडळाच्या अर्चना सोमाणी, रुपाली बोराडे, सपना मशरू, धवल मशरू, डॉ. बी. आर. पाटील यांच्या हस्ते पर्यावरणप्रेमी महिलांना सन्मानित करण्यात आले. यावेळी नंदिनी पडिले, डॉ. दशरथ भिसे, भीम दुनगावे, अमृत सोनवणे, प्रशांत हल्ले, डॉ. गणेश गोमारे आदी उपस्थित होते.

## ७५ कोटींच्या कर वसुलीचा पालिकेने गाठला उच्चांक

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २४ मार्च -**
महापालिकेची स्थापना होऊन १४ वर्षांचा काळ लोटत आहे. लातूर नगरपरिषद असताना व येथील नागरिकांना कर भरण्याची तेवढी माहिती नव्हती. यामुळे महापालिका अस्तित्वात आल्यानंतर कराची वसूली करण्याचे मोठे आव्हान पालिकेपुढे होते.

परंतु, संपूर्ण आर्थिक धुरा केवळ कर वसुलीवरच असल्याने मागील दोन वर्षांपासून पालिकेने कर वसुलीवर भर दिला आहे. गेल्यावर्षी ५३ कोटींची वसूली झाली होती. यावर्षी त्यात तब्बल २० कोटींची वाढ झाली आहे. आतापर्यंत तब्बल ७५ कोटींची वसूली करण्यात आली आहे. येत्या आठ दिवसात आणखी ५ कोटींची वसूली करण्याचा पण पालिकेने बांधला आहे.

महापालिका अस्तित्वात आल्यापासून मागील १४ वर्षांत म्हणावा तेवढा कर वसूल होत नव्हता. यामुळे दरवर्षी मार्चअखेर आल्यानंतर पाणी, विद्युत पथदिवे यांचे कनेक्शन किमान पंधरा ते २० दिवस तोडलेलेच असत. पालिकेकडे पैसाच नसल्याने शेवटी राज्य शासनाला हस्तक्षेप करून विद्युत पथदिवे व पिण्याच्या पाण्याचे कनेक्शन सुरू करून घ्यावे लागत होते. विशेष म्हणजे मागील दोन वर्षांपासून लातूरकरांवर पाणी कनेक्शन, विद्युत पथदिव्यांचे कनेक्शन तोडण्याची नौबत आली नाही. या कालावधीत लातूर महापालिकेवर प्रशासक आहे.

महापालिका आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांच्या मार्गदर्शनात उपायुक्त डॉ. पंजाबराव खानसोळे यांच्या नेतृत्वात मागील एक वर्षापासून मालमत्ताधारकांना कराचा

भरणा करण्यासाठी प्रोत्साहित करण्यात आले. वेळप्रसंगी जप्ती, सील करण्यासारखे कठोर निर्णय घेण्यात आले. करावरील व्याजात माफी देण्यात आली. कर भरणाऱ्यांना लॉटरी पध्दतीने बक्षीसे देण्यात आली. यामुळे यावर्षी वर्षाअखेरपूर्वीच तब्बल ७५ कोटींच्या घरात वसुलीचा आकडा सरकू लागला आहे. यामुळे महापालिकेला स्वतःच्या आर्थिक गरजा भागविण्यासोबतच लातूरकरांच्या मूलभूत गरजा पूर्ण करता येणार आहेत. उर्वरित निधी विकासकामांवरही खर्च करता येणार आहे. लातूर महापालिकेकडे मालमत्ता कराव्यतिरिक्त दुसरे कोणतेही उत्पन्नाचे साधन उपलब्ध नाही. अशातच लातूरकरांना कराचा भरणा करण्याची सवय नव्हती. नगरपरिषद असतानापासून अनेक करदात्यांनी कराचा भरणा केला नव्हता. परंतु, असे सर्वच करदाते थकबाकीदार शोधून महापालिकेने त्यांना नोटिसा पाठविल्या. काहींवर पालिकेने कारवाईचा बडगा उगारल्याने वसुली होत आहे.

## सामाजिक परिवर्तनासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करावी लागते

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २४ मार्च -**
समाजात कोणताही बदल सहजासहजी घडत नसतो, त्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करावीच लागते असे प्रतिपादन श्री महात्मा बसेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष आदिनाथ सांगवे यांनी केले.

महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, राष्ट्रीय सेवा योजना, लातूर आणि आम्ही सेवक, हैप्पी व्हिलेज, हासेगाव ता.औसा जि.लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने हॅप्पी व्हिलेज, हासेगाव येथे युथ फॉर माय भारत व युथ फॉर डिजिटल लिटरसी विशेष युवक वार्षिक शिबिराचा उद्घाटन समारंभ आयोजित करण्यात आला होता यावेळी ते अध्यक्षीय समारोप करताना बोलत होते.

यावेळी विचारपीठावर उद्घाटक आम्ही सेवकचे संस्थापक प्रा. रवी बापटले, महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष माधवराव पाटील तपसेचिंचोलीकर, कोषाध्यक्ष विजयकुमार रेवडकर, संचालक राजेश्वर बुके, संचालक बस्वराज येरटे, संचालक प्रा. जी. एम. धाराशिवे, महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. संजय गवई, मुख्य समन्वयक डॉ. नल्ला भास्कर रेड्डी, राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. यशवंत वळवी, दुग्धशास्त्र विभाग प्रमुख डॉ. गुणवंत बिरादार रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. रत्नाकर बेडगे, प्रो. डॉ. शिवप्रसाद डोंगरे, डॉ. मनोहर चपळे, प्रा. किसनाथ कुडके आणि प्रा. मनोज मोटे आदी मान्यवर उपस्थित होते.

पुढे बोलताना आदिनाथ सांगवे म्हणाले की, प्रा. रवी बापटले यांनी सेवालयाच्या माध्यमातून पडीक, खडकाळ आणि बंजर जमिनीत टोकाच्या संघर्षातून नंदनवन उभे केले आहे.

त्यांनी अनेक वेळा हाल अपेष्टा सहन करून समाज आणि कुटुंबाचा रोष पत्करून केवळ एचआयव्हीग्रस्त मुलांच्या कल्याणासाठी अहोरात्र कष्ट करून ते आज ८५ मुलांमुलीचे आधारवड बनले आहे असे सांगून त्यांनी हॅप्पी व्हिलेजला एक लाख रुपयांची देणगी जाहीर सुद्धा केली. उपस्थित सर्वांनी उभे राहून त्यांचे टाळ्या वाजवून स्वागत केले.

उद्घाटक म्हणून बोलताना प्रा. रवी बापटले म्हणाले की, रुग्णांचे केवळ आरोग्य न सुधारतात त्यांचे शिक्षण, स्वयंरोजगार, स्वच्छता, व्यवसायिक शिक्षण, परिवार याही गोष्टीवरही लक्ष देणे गरजेचे असते. अलीकडच्या काळात समाजाच्या संवेदना हरवत आहेत, त्यामुळे रासेयोच्या विद्यार्थ्यांना सेवेसाठी सेवालयासारख्या संस्था दाखवल्या पाहिजे. आयुष्य हे खूप सुंदर असते. आयुष्यात येणाऱ्या प्रत्येक संकटाशी झुंज देऊन नवा इतिहास घडवला पाहिजे असेही ते म्हणाले.

यावेळी संचालक प्रा. जी. एम. धाराशिवे आणि स्वागतपर मनोगत प्राचार्य प्रो. डॉ. संजय गवई यांनी व्यक्त केले, प्रास्ताविक रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रो. डॉ. शिवप्रसाद डोंगरे यांनी केले. सूत्रसंचालन ऋतुजा भिसे आणि जयश्री भंडे यांनी केले. स्वागत गीत शिवाली मुकडे हिने सादर केले तर आभार डॉ. मनोहर चपळे यांनी मानले. यावेळी उपस्थित सर्व मान्यवरांनी सेवालालयाच्या विविध महत्त्वपूर्ण उपक्रमांची माहिती घेऊन प्राचार्य, आणि विद्यार्थी विद्यार्थिनींच्या समवेत हॅप्पी व्हिलेज येथील शेतामध्ये ऊस लागवड सुद्धा केली.

## इंटरनेटच्या युगातही मुद्रण व्यवहार टिकून

### ज्येष्ठ समीक्षक डॉ. सूर्यनारायण रणसुभे यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २४ मार्च -**
वाचनामुळे ज्ञान मिळते. ज्ञानात परिवर्तनाची मोठी ताकद आहे. इंटरनेटच्या जमान्यातही मुद्रण व्यवहार टिकून आहे. छापील पुस्तके वाचण्याचा आनंदच खूप वेगळा असतो. डिजिटल माध्यमातून वाचन संस्काराचे क्षेत्र दिवसेंदिवस विकसित होत आहे. याचे महत्त्व ओळखून प्रत्येक घरात मुलांवर वाचन संस्कार होणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ समीक्षक डॉ. सूर्यनारायण रणसुभे यांनी केले.

राज्य शासनचा उच्च व तंत्र शिक्षण विभाग, ग्रंथालय संचालनालय आणि लातूर जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयामार्फत येथील कम्युनिटी हॉलमध्ये आयोजित 'लातूर ग्रंथोत्सव'च्या समारोपप्रसंगी ते बोलत होते. यावेळी जिल्हा कोषागार अधिकारी डॉ. उज्वला पाटील, साहित्यिक डॉ. जयद्रथ जाधव, जिल्हा ग्रंथालय अधिकारी वंदना काटकर उपस्थित होते.



यावेळी डॉ. रणसुभे म्हणाले, लहान वयात लागलेली वाचनाची सवय जीवनाचा एक भाग बनते. त्यामुळे नव्या पिढीसाठी प्रत्येक घरात ग्रंथालय असावे. ज्ञान ही सर्वात मोठी शक्ती आहे. संस्कृती, इतिहास, समाज आणि राष्ट्र समजून घेण्यासाठी वाचन आवश्यक आहे, असेही त्यांनी सांगितले.

ग्रंथोत्सवाच्या दुसऱ्या दिवसाच्या पहिल्या सत्रात शालेय विद्यार्थ्यांचा 'मला आवडलेले पुस्तक' हा परिसंवाद घेण्यात आला.

यात विद्यार्थ्यांनी वाचलेल्या ग्रंथांविषयीची धाडसाने मते मांडली. साहित्यिक अनंत कदम यांच्या अध्यतेखाली हा परिसंवाद झाला. यात केशवराज विद्यालयाची भक्ती गरड, आनंदी स्वामी, अनंतपाळ नूतन विद्यालयाची सानिया चिस्ती, वासनगावच्या गणेश विद्यालयाची ज्ञानेश्वरी जाधव, रामनाथ विद्यालयाच्या प्रशांत कुंभार, मुक्तेश्वर विद्यालयाच्या तन्वी जवादे, निलंगा येथील महाराष्ट्र विद्यालयाचा प्रथमेश क्षीरसागर, आकांक्षा शिंदे, ज्ञानेश्वर विद्यालयाचा भीमांशकर आरदवाड, किरण भंडारे, जवळगा येथील गुरुदत्त विद्यालयाचा अनिरुध्द पाटील यांनी सहभाग घेतला. त्यांना संविधान उद्देशिकेची प्रत व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. सूत्रसंचालन वैशाली दुरुगकर यांनी केले.

संजय बाबळसुरे यांनी आभार मानले. आपल्या बोलण्याची भाषा जगण्यात आली, तर मराठीला अधिक चांगले दिवस येतील, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक डॉ. शेषराव मोहिते यांनी केले. माझी मराठी अभिजात मराठी या विषयावरील परिसंवादाच्या अध्यक्षपदावरुन ते बोलत होते. यावेळी डॉ. ज्ञानदेव राऊत, पत्रकार प्रदीप नणंदकर, अनिता येलमाटे, योगीराज माने उपस्थित होते.